९५३८
म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
क्र. नं. 202

ंव कोल्हटकर

# स्मारक-ग्रंथ



REFBK-0005432

## भाग दुसरा.

[ किं. १॥ रु. ]

# अच्युतराव कोल्हटकर

# स्मारकग्रंथ

## भाग २ रा.

संपादक व प्रकाशक—

**अनंत हरि गद्रे,**

निर्भीड कचेरी, मिठाबाई बिल्डिंग,

न्यू चर्नीरोड, मुंबई नं. ४.

मुद्रकः—कृष्णाजी नारायण सापळे,

१५-१७. त्रिभुवनरोड, मुंबई नं. ४.

REFBK-0005432

अच्युतराव कोल्हटकर स्मारकग्रंथ भाग १ ला—किं. १॥.

# अनुक्रमणिका.


| विषय | पान नं. |
|---|---|
| मराठी काव्याची प्रभात ... ... ... ... | ९ |
| डॉ. आंबेडकरांस पत्र ... ... ... ... | २२ |
| भीष्म पितामह ... ... ... ... ... | २५ |
| तमीळ भाषा ... ... ... ... ... | २९ |
| या अल्ला ! ... ... ... ... ... | ३६ |
| जिजा तूं कां रडतीस ? ... ... ... ... | ४३ |
| मराठींतील लावण्या ... ... ... ... ... | ४९ |
| प. वा. रा. व. वामनराव कोल्हटकर ... ... ... | ६९ |
| मेथांचें सुस्मरण ... ... ... ... ... | ९८ |
| तात्या फडके वारले ! ... ... ... ... ... | १०७ |
| गेल्या ! लक्ष्मीबाई गेल्या ! ... ... ... ... | ११३ |
| दाजीसाहेब वारले ! ... ... ... ... ... | ११६ |
| राजाला माकड चावलें ! ... ... ... ... | १२० |
| टिळकांची कविता ... ... ... ... ... | १२३ |
| नाटक झालें जन्माचें ... ... ... ... ... | १३२ |
| महाराष्ट्र नाट्यकलेचा शृंगारसाज ... ... ... | १३९ |
| हे तात्या आणि हे तात्या ! ... ... ... ... | १४८ |
| ब्राह्मण–अब्राह्मण ... ... ... ... ... | १५६ |
| बाळंभटाची पळीपंचपात्री ... ... ... ... | १६४ |
| द्रौपदी वस्त्रहरण ... ... ... ... ... | १६८ |
| वन्देमातरम् ! ... ... ... .. ... | १७४ |
| कमालपाशाची तलवार ! ... ... ... ... | १७८ |
| पुणेरी जोडे ! ... ... ... ... ... | १८१ |
| बंगालचा गुलाब ... ... ... ... ... | १९० |
| बायकोचे दागिने ... ... ... ... ... | १९७ |
| सत्तेशिवाय जीवितहि शून्य आहे ! ... ... ... | २०२ |
| नागपूरची घनघोर लढाई ! ... ... ... ... | २०७ |
| आज पानिपतचा स्मृतिदिन ... ... ... ... | २१३ |
| शेम शेम पुराण ! ... ... ... ... ... | २१६ |
| सोमा परटीण ( ले. वत्सलावहिनी ) ... ... ... | २२१ |

# अगदीं जरुरीपुरताच खुलासा !

कै. दे. भ. अच्युतरावजी कोल्हटकर यांच्या लेखांनीं नटविलेल्या स्मारकग्रंथाचा पहिला भाग गेल्या वर्षी ता. १५ जून रोजीं मी प्रसिद्ध केला व त्या दिवशीं वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखालीं झालेल्या दुसऱ्या पुण्यतिथि–उत्सवाचे वेळीं मी तो प्रेमादरानें व भक्तिभावानें अच्युतरावजींच्या पुण्यस्मृतीस समर्पण केला. संतोषाची गोष्ट ही कीं, माझा हा प्रयत्न जनतेस पसंत पडला इतकेंच नव्हे, तर शेंकडों लोकांनीं हें काम पुरें करण्याबद्दल प्रोत्साहनहि दिलें. स्मारकग्रंथप्रकाशनाचें काम आर्थिक नुकसान सोसून करावें लागत आहे ही गोष्ट तज्ज्ञांस, न सांगतांहि, समजण्यासारखी आहे. पण हा नफानुकसानीचा प्रश्न या खुलाशांत मी उपस्थित करूं इच्छित नाहीं. त्याचा निकाल या कार्यासंबंधानें सहानुभूति बाळगणाऱ्या रसिकांमार्फतच मला लावून घेतला पाहिजे. मधल्या भानगडी कांहींही झालेल्या असोत, आज तिसऱ्या पुण्यतिथीच्या दिवशीं दुसरा भाग प्रसिद्ध करण्याचा सुयोग येत आहे हीच समाधानाची गोष्ट होय.

अच्युतरावजींचें नांव निघालें, किंवा त्यांच्या वाङ्मयसेवेचा व देशसेवेचा विषय निघाला म्हणजे मनांत अनेक प्रकारची कालवाकालव सुरू होते व असें वाटतें कीं त्या देशभक्त व वाङ्मयप्रभु पुण्यपुरुषाविषयीं खूप खूप लिहावें ! पण हा मोह जसा मला पहिल्या भागाच्या वेळीं आवरावा लागला तसाच या वेळींहि आवरला पाहिजे. त्या देशभक्त साहित्याचार्यानें आपल्या हयातींत जें कांहीं लिखाण लिहून ठेवलें आहे तें इतकें चटकदार, इतकें विद्वत्तापूर्ण, इतकें स्फूर्तिदायक आणि इतकें विविध प्रकारचें आहे कीं, त्यांतील नुसता नमुना म्हणून, मासला म्हणून, कांहीं लेख प्रसिद्ध करावयाचें म्हटलें तरीहि शेंकडोंच नव्हेत तर हजारों पृष्ठेंहि भरून जातील ! निबंध, टीका, नाटक, कादंबरी, कथा, काव्य, विनोद, वक्रोक्ति, राजकारण, अध्यात्म, धर्म, समाजव्यवस्था, ज्योतिष इ. इ. सर्व प्रकारच्या विषयांवर अच्युतरावजींनीं लेख लिहिलेले आहेत इतकेंच नव्हे, तर त्यांतील बहुतेक सर्व लेख नावीन्यपूर्ण आणि चटकदार आहेत. विद्वत्ता आणि भाषाप्रभुत्व, देशप्रेम आणि धर्मप्रेम हे तर त्या सर्व लेखांचे प्राणच होत असें म्हणावयास हरकत नाहीं. सारांश, अच्युतरावजींच्या लिखाणाचा आणखी बराचसा भाग प्रसिद्ध होऊन वाचकांच्या हातांत पडेपर्यंत अच्युत-

रावजीविषयींचे माझे विचार वाचकांपुढें स्मारकग्रंथांतून न मांडणेंच इष्ट होय व त्यासाठीं मनाला पडणारा मोह आवरून धरणें योग्यच होईल असें मला वाटतें. मी तूर्त माझ्या मनाशीं असा विचार ठरविला आहे कीं, आणखी असे दोन तीन भाग प्रसिद्ध करून, ग्रंथाचा शेवटचा भाग म्हणून अच्युरावजींच्या विस्तृत चरित्रासह काय तें विवेचन करावें ! माझी अशी खात्री आहे कीं, सदर कार्याच्या महत्त्वाच्या दृष्टीनें हाच माझा विचार सर्वांस पटेल.

पहिल्या भागांत शक्य तों सर्वानुमतें निरपवाद ठरणारे असेच लेख कसोशीनें निवडून काढून मी दिले होते. या भागांत तितक्या कसोशीनें मी सर्वच लेखांची निवड केलेली नाहीं. ज्या लिखाणाविषयीं कांहीं विशिष्ट लोकांच्या मनांत विशिष्ट कारणासाठीं थोडेसें प्रतिकूल मत होण्याचा संभव आहे, असेहि थोडे लेख मी या भागांत दिले आहेत. अच्युतरावांचें लिखाण, आतां त्यांच्या मृत्यूला तीन वर्षे होऊन गेल्यामुळें, एक प्रकारें ऐतिहासिक स्वरूपाचें झालें आहे. या लिखाणाकडे आपण ऐतिहासिक व वाङ्मयिक दृष्टीनेंच पाहिलें पाहिजे असें मला वाटतें. या भागांतील कांहीं कांहीं लेखांकडे, टीकाविषय झालेल्या व्यक्तींकडून किंवा पंथांकडून मतभेद होण्याचा संभव असला तरी, उदार व व्यापक अशा वाङ्मयिक दृष्टीनें पाहिल्यास त्यांवरील आक्षेप निराधार ठरल्याशिवाय राहाणार नाहींत. म्हणून भावि आक्षेपकांस माझी अशी स्पष्ट विनंति आहे कीं, त्यांनीं उदार व व्यापक दृष्टीनें सापवाद लेखांकडे पहावें आणि अच्युतरावजींची विशिष्ट प्रकारची लेखनशैली समजून घेऊन त्यांच्याशीं समरस होण्याचा प्रयत्न करावा. थोड्याबहुत प्रमाणानें सापवाद ठरणारे लेख या भागांत क्वचित् देण्याचा माझा मुख्य उद्देश हा कीं, या त्यांच्या विशिष्ट प्रकारच्या लेखनशैलीची ओळख वाचकांस व्हावी. असें आहे तरी मी इतकें निक्षून सांगूं शकतों कीं, या भागांत जरी थोडे लेख सापवाद ठरण्यासारखे आले असले तरी ज्यांच्याबद्दल तीव्र व कटु मतभेद होईल असे लेख मी बुद्धिपुरस्सर गाळलेलेच आहेत. अर्थात् माझ्या या प्रयत्नाला वाचकांची सहानुभूतिच मिळेल अशी मला खात्री वाटते. या भागांत अच्युतरावजींच्या साहित्यविषयक लेखांचा मोठा भरणा मी मुद्दामच केला आहे. तोहि, पहिला भाग वाचणाऱ्या वाचकांना रुचिपालट करण्याच्या कामीं उपयुक्त ठरल्याशिवाय राहणार नाहीं. सांगायचें तात्पर्य इतकेंच कीं शक्य तितक्या सावधगिरीनेंच मी हें काम करीत आहें. म्हणून मला सर्वांचीच सहानुभूति मागण्याचा एक प्रकारचा हक्क पोंचतो.

अच्युतरावजींचे लेख प्रसिद्ध होणें किती महत्त्वाचें आहे याची जाणीव वाचकांना परस्पर व्हावी म्हणून याच भागांत मी मुद्दाम या ग्रंथाच्या पहिल्या भागावरील कांहीं निवडक अभिप्रायहि दिले आहेत. ते वाचल्यावर अच्युतरावजींच्या लिखाणाची थोरवी सर्वांनाच पटल्याशिवाय राहाणार नाहीं.

लोकाभिरुचि लक्षांत घेऊन या भागाला काग़द वगैरेच्या बहिरंगाच्या बाबतींत जास्त खर्च केला असल्यामुळें पृष्ठांची संख्या मला थोडी कमी करावी लागली आहे. पण या बाबतींत लोकाभिरुचीपुढें मान वांकविल्याशिवाय गत्यंतरच नव्हतें.

ग्रंथप्रकाशनाच्या कामीं येणारें आर्थिक नुकसान डोईजड झाल्यास पुढील भाग प्रसिद्ध होणें उत्तरोत्तर अधिकाधिक कठीण होत जाईल, ह्या गोष्टीकडे लक्ष देऊन अच्युरावजींच्यावर नितांत, निर्मळ, निर्द्वेष व निर्लोभ असें निरपेक्ष प्रेम करणाऱ्या बंधुभगिनींनीं या कामाला अवश्य ती मदत केली पाहिजे. मी निमित्तमात्र आहें, कार्य माझें एकट्याचें नव्हे, सर्वांचेंच आहे.

हे दोन्हीं भाग प्रसिद्ध करण्याच्या कामीं मला ज्या ज्या मित्रांचें व वृत्तपत्रांच्या चालकांचें सहाय्य झालें त्यांचा त्यांचा मी अत्यंत आभारी आहें. या सर्व मित्रमंडळीचा व्यक्तिशः नामनिर्देश करणें जवळ जवळ अशक्य असल्यामुळें मी मुद्दाम कोणतींच नांवें प्रसिद्ध करीत नाहीं. मात्र इतकेंच जाहीर करतों कीं, या कामीं मला अच्युतराव-जींच्या मित्रांची व शत्रूंची सहानुभूति वाढत्या प्रमाणांत मिळत आहे.

हें पुण्यकार्य पुरें झालें तर उत्तमच, पण तें पुरें न झालें तरीहि, एवढ्याशा छोट्या कामगिरीनें सुद्धां, मला माझ्या ' जन्माचें सार्थक ' झाल्याचेंच समाधान वाटत आहे ही गोष्ट मला निर्भीड वृत्तीनेंच सांगितली पाहिजे ! या दोन भागांच्या प्रसिद्धीनें सुद्धां अच्युतरावजींना मराठींतील देशभक्त साहित्याचार्यांत वरच्या दर्जाचें अढळ स्थान मिळाल्याशिवाय राहणार नाहीं हें मी प्रतिज्ञापूर्वक आजच जाहीर करून ठेवतों !

परमेश्वर करो आणि मध्येंच उत्पन्न होणाऱ्या संकटांचा सर्वांच्या आशिर्वादानें निरास होऊन अत्यंत नम्र वृत्तीनें मी हातीं घेतलेलें हें अत्यंत महत्वाचें काम लौकरच पुरें होवो !

निर्भीड कचेरी
मुंबई नं. ४
ता. १५ जून १९३४.

सर्वांचा नम्र सेवक,
**अनंत हरि गद्रे.**

# अच्युतराव कोल्हटकर स्मारक ग्रंथाच्या पहिल्या भागावरील पांच निवडक अभिप्राय म्हणजेच

# पांचांमुखीं परमेश्वर !

**केसरी—**

लेख आणि लेखक यांचा प्रायः अन्योन्यसंबंध आढळतो. तो असा कीं लिहिलेल्या मजकुरावरून लिहिणाऱ्याचा मनोधर्म कळून येतो आणि उलट, लेखकाच्या स्वभावावरून त्याच्या वाङ्मयाचा सुगावा लावतां येतो. कोहिनूरच्या उज्ज्वल तेजानें डोळे दिपले असतांनाच मन गोवळकोंड्याच्या खाणीकडे धांव घेतें आणि गोवळकोंड्याचें दर्शन होतांच, लंडनमध्यें जाऊन बसलेला कोहिनूर मनश्चक्षूपुढें उभा राहतो. तसाच कांहींसा हा प्रकार होय. परंतु अपवाद नाहीं तो नियम कसला ? जगाच्या वाङ्मयांत असेहि कांहीं ग्रंथ आहेत कीं, त्यांना लेखकनिरपेक्ष असें महत्त्व चढलेलें आणि चिरस्थायित्व जडलेलें दिसून येतें. कै. अच्युतराव कोल्हटकरांची साहित्यसंपदा कांहींशी अशीच आहे. म्हणूनच बडोदें येथील साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदावरून श्री. न. चिं. केळकर यांनीं श्री. अच्युनरावांच्या वाङ्मयाचा गौरपूर्वक उल्लेख केला होता. महाराष्ट्र भाषेंत व दैनिकाच्या सृष्टींत त्यांनीं आपला असा स्वतंत्र पंथ स्थापला आहे. त्यांचे कांहीं लेख कसोशीनें निवडून या संग्रहाचे द्वारें श्री. गद्रे यांनी महाराष्ट्र वाचकांना सादर केले आहेत..........

कै. अच्युतराव कोल्हटकर यांच्या दुसऱ्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या निवडक लेखांचा संग्रह श्री. गद्रे यांनीं प्रसिद्ध केला आहे. कै. अच्युतराव कोल्हटकर यांनीं मुख्यतः वृत्तपत्रकार या नात्यानें निरनिराळ्या प्रतींचें वाङ्मय निर्माण केलें. ह्या निरनिराळ्या प्रतींची ओळख मराठी वाचकांना अद्याप कायम आहे. त्यापैकीं लोकादरास पात्र ठरलेले असे कांहीं लेख एकत्र छापून श्री. गद्रे यांनीं कै. कोल्हटकर यांची आठवण ताजी केली आहे. लोकमान्यांच्या मृत्यूनंतर निघालेल्या संदेशाच्या स्पेशल अंकांतील लिखाण, ' शेवटची वेल सुकली ' वगैरे कोल्हटकरांच्या जोरकस लेखणीची साक्ष देणारे लेख या संग्रहांत आहेत.

**महाराष्ट्र—**

कै. अच्युत बळवंत कोल्हटकर यांची दुसरी पुण्यतिथी गेल्या गुरुवारीं महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं साजरी करण्यांत आली; व त्यांचें वाङ्मयस्मारक म्हणून त्यांच्या कांहीं

लेखांचा एक संग्रहहि श्री. अनंत हरि गद्रे यांनीं या प्रसंगीं प्रसिद्ध केला आहे. या छोटेखानी ग्रंथावरून अच्युतरावांच्या विविध वाङ्मयगुणांची कल्पना करणें, म्हणजे दर्शनी काचगृहांत मांडलेल्या सुंदर नमुन्यांवरून एखाद्या भव्य वस्तुभांडाराच्या समृद्धीची कल्पना करण्यासारखेंच आहे. तथापि त्यांच्या त्रुटित वाङ्मयावर धुरळा बसून तें कीर्तिशेष होण्यापूर्वी, श्री. अनंतराव गद्रे यांनीं वृत्तपत्रांच्या जीर्ण संभारांतून त्याचा उद्धार, अंशतः कां होईना, केला, याबद्दल त्यांचें अभिनंदन केलें पाहिजे.

**ज्ञानप्रकाश—**

महाराष्ट्रांतील एक प्रसिद्ध वृतपत्रकार, उच्च दर्जाचे साहित्यसेवक आणि व्यापक हिंदुधर्माचे पुरस्कर्ते परलोकवासी श्री. अच्युतराव बळवंत कोल्हटकर यांना देवाज्ञा झाल्यास आज दोन वर्षे पुरीं होत आहेत. त्यांच्या निधनाच्या द्वितीय स्मृतिदिनाच्या-प्रसंगीं श्री. अच्युतरावांचे एक निष्ठावंत भक्त आणि नाटककार श्री. अनंतराव गद्रे यांनीं श्री. अच्युतरावांच्या बहुमोल कामगिरीची महाराष्ट्रीय जनतेला कायमची स्मृति रहावी म्हणून त्यांच्या निवडक लेखांचा सुमारें तीनशें पृष्ठांचा पहिला भाग " श्री. अच्युतराव कोल्हटकर स्मारकग्रंथ " या नांवानें आज प्रसिद्ध केला आहे. या सुंदर, बहुविध, वाचनीय व मननीय लेखसंग्रहाचें आम्ही मनःपूर्वक स्वागत करतों, आणि श्री. अच्युतरावांनीं मराठी वाङ्मयाची केलेली दीर्घकालीन स्वार्थत्यागी सेवा लक्षांत घेऊन महाराष्ट्रीय वाचकवर्गाकडूनही या ग्रंथाचें प्रेमादरपूर्वक स्वागत केलें जाईल अशी दृढ आशा बाळगतों. श्री. अच्युतराव कोल्हटकर यांचा सध्यांच्या पिढींतील महाराष्ट्रीयांना तरी निदान नव्यानें परिचय करून देण्याचें कारण नाहीं. श्री. अच्युतरावांचा संदेश, त्यांचा चाबुकस्वार, सरकारजमा रंगीला रसूल, त्यांचें नारिंगी निशाण, वत्सलावहिनी, त्यांचा बाबू गेनू अणि त्यांचा श्रुतिबोध हीं नांवेंच इतकीं लोकप्रियतेला प्राप्त झालेलीं आहेत कीं, त्यावरून महाराष्ट्रीयांच्या अंतःकरणावर त्यांची छाप किती बसलेली आहे, हें चांगलेंच व्यक्त होतें.

या लेखसंग्रहांतील उताऱ्यांवरून अच्युतरावांच्या उच्च " साहित्यिकीची " कोणालाही सहज साक्ष पटेल. अच्युतरावांच्या लेखनाचा बराच मोठा भाग वृत्तपत्रीय लिखाणाच्या स्वरूपाचा आहे. सामान्यतः लोकांची अशी समजूत आहे कीं, वृत्तपत्रीय लिखाण हें अत्यंत अल्पजीवि, उथळ व अल्पमोलच असतें. पण श्री. गद्रे यांनीं प्रसिद्ध केलेला हा " साहेबांचा " [ अच्युतरावांना त्यांचे चहाते ' साहेब ' या नांवानें संबोधीत असत ] " स्मारकग्रंथ " हा वरील लोकभ्रमाला एक अभिनंदनीय अपवाद आहे, असें कोणीहि मान्य करील.

**मनोरंजन—**

श्री. अच्युतराव कोल्हटकर महाराष्ट्रांतील एक प्रसिद्ध वृत्तपत्रकार होते. त्यांचीं नाटकें, कादंबऱ्या, गोष्टी, लेख व कविता वाचल्या असतां ते उच्च दर्जाचे मार्मिक साहित्यसेवक होते असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. ते उत्तम वक्ते, कल्पक व व्यापक हिंदुधर्माचे पुरस्कर्ते होते. त्यांच्यामागें त्यांच्या दुसऱ्या वर्षश्राद्धाच्या दिवशीं त्यांच्या मानलेल्या धाकट्या भावानें, एक निष्ठावंत भक्त व नाटककार श्री. गद्रे यांनीं, ३२० पानांचा 'अच्युतराव कोल्हटकर' नांवाचा सचित्र स्मारकग्रंथ छापून प्रसिद्ध केला. यांत अथपासून इतिपर्यंत शक्य तितके अच्युतरावांच्याच हातचे परमेश्वरविषयक, पूर्वजविषयक, राष्ट्रपुरुषविषयक, साहित्यविषयक व विविधताविषयक अशा अनुक्रमानें लेख देऊन मधून मधून छोटे उतारेहि दिलेले आहेत.

सर्व महाराष्ट्रीयांनीं भरपूर आर्थिक आश्रय देऊन त्यांच्या श्रमांचें व कर्तव्यबुद्धीचें योग्य चीज केल्यास त्यांच्या हातून या स्मारकग्रंथाचा दुसरा भाग लवकरच प्रसिद्ध होण्याचा संभवहि आहे.

**चित्रमय जगत्—**

वृत्तपत्रांच्या धंद्यांत क्रांति करून आपल्या नावीन्यपूर्ण वृत्तलेखनकौशल्यानें प्रसिद्धीस आलेले सुप्रसिद्ध 'संदेशकार' कै. अच्युतराव कोल्हटकर यांचें नांव भारतीय वर्तमानपत्रांच्या इतिहासांत चिरंजीव झाल्यावांचून रहाणार नाहीं. बहुजनसमाजाला वर्तमानपत्रांची अभिरुचि लावण्याची, जनतेच्या अंतःकरणांत ताज्या बातम्यांसंबंधानें आतुरता उत्पन्न करण्याची व वर्तमानपत्राची संस्था लोकप्रिय करण्याची बहुमोल कामगिरी श्री. कोल्हटकरांनीं केली आहे, त्याबद्दल मराठी वाचकवर्गानें त्यांचें ऋणी राहिलें पाहिजे. त्यांच्या लिहिण्यांत चटकदारपणा, सुलभता व अखंड प्रवाहशीलत्व हे गुण प्रामुख्यानें असल्यामुळें मराठी वाचकवर्गावर त्यांनीं आपली मोहिनी घातली असल्यास आश्चर्य नाहीं. भाषेशीं विलास कसा करावा, तिला खेळवावी कशी, झुलवावी कशी ही कला त्यांच्याशिवाय इतरांना साधणें शक्य नाहीं. हा लेखसंग्रह प्रसिद्ध करण्यांत श्री. अ. ह. गद्रे यांनीं कोल्हटकरांबद्दलचा आपला आदर तर व्यक्त केलाच आहे; पण त्यापेक्षांही त्यांनीं मराठी वाङ्मयांत एका अमूल्य ग्रंथाची भर टाकण्याचें पुण्य संपादन केलें आहे. ह्या संग्रहांत लो. टिळक, गोखले, रानडे, आगरकर, भांडारकर इत्यादि थोर पुरुषासंबंधींचे लेख संकलित केले असून शिवाय कोल्हटकरांच्या इतर लेखांतीलहि भरपूर उतारे दिले आहेत. ग्रंथ-संपादनकार्य नमुनेदार झालें आहे. कोल्हटकरांचे पांच सहा अप्रसिद्ध फोटोहि त्यांत आले आहेत. छपाई सुंदर आहे. असा हा उत्कृष्ट ग्रंथ प्रत्येक मराठी वाचक आपल्या संग्रहीं ठेवल्यावांचून रहाणार नाहीं असा आम्हांस भरंवसा वाटतो. ह्या ग्रंथाच्या पुढील भागांची कोण मोठ्या आतुरतेनें मार्गप्रतिक्षा करणार नाहीं ?

# अच्युतराव स्मारक-ग्रंथ

## भाग २ रा.

## मराठी काव्याची प्रभात*

"घनश्याम सुंदरा, श्रीधरा।
अरुणोदय झाला।
उठि लवकर वनमाळी।
उदयाचळीं मित्र आला"

मराठी कवितेसंबंधानें अलीकडे जे तंटे उपस्थित झालेले आहेत ते पाहून कोणालाही दुःख वाटल्यावांचून रहाणार नाहीं. महाराष्ट्रांतील लोकांचा मुख्य दोष कलह–प्रियता हा आहे असें कित्येक वेळां दृष्टोत्पत्तीस आलें आहे आणि मराठी कवितेसंबंधानें जेव्हां वाद उत्पन्न झालेला आपण पहातों त्यावेळीं ह्या कलहप्रियतेचीच आणखी एकदां ओळख पटते. वास्तविक पहातां "मवाळ" आणि "जहाल" असल्या पक्षांचा मराठी कवितेच्या सदनांत उच्चारसुद्धां होतां उपयोगी नाहीं. परंतु अलीकडील अनुभव अगदीं निराळा येत असून एकमेकांचा पाडाव करण्याची भावना मराठी काव्य–सदनांतही इतकी प्रबल दिसते कीं महाराष्ट्राच्या कलहप्रियतेची पाठच थोपटावी लागते. मराठी कवितेसंबंधानें जो वाद माजत चाललेला आहे, तो प्राचीन कवि चांगलें कीं, अर्वाचीन कवि चांगले अशाबद्दल होय. वस्तुतः पहातां, प्राचीन आणि अर्वाचीन कवि हा वाद इतका क्षुल्लक आहे कीं, महाराष्ट्राशिवाय इतर ठिकाणीं तो कधींही चिरडीवर जाणार नाहीं. परंतु महाराष्ट्राचें भागधेयच असें आहे कीं, क्षुल्लक प्रश्न असला तरीही त्यावर रणें माजून परस्परांत वितुष्ट

* प्रभात मासिक, जुलै १९१५.

उत्पन्न व्हावें. या वितुष्टाचें पर्यवसान एक तर सरसकट सर्व जुन्या कवींना शिव्या देण्यामध्यें होतें अथवा उलट पक्षीं सर्व स्तुतीचा भर आधुनिक कवितेवर आदळून अलीकडील कवींसारखे कवि मागें झाले नाहींत आणि पुढें होणार नाहींत इतक्या अप्रयोजक कोटीपर्यंत जातें. वास्तविक पहातां प्राचीन व अर्वाचीन कवि हा भेदच अगोदर असमंजसपणाचा आहे. जो आजचा अर्वाचीन तोच उद्यांचा प्राचीन असें जर ढळढळीत आपल्या डोळ्यांपुढें दिसत आहे तर कालाचा काल्पनिक पडदा उभा करून कविवर्गांत दोन तट उपस्थित करणें अत्यंत असमंजसपणाचें आहे. प्राचीन कवि आणि अर्वाचीन कवि असे भेद जर कोणत्याही एखाद्या विशिष्ट काव्यगुणामुळें करावयाचे असतील तर तेंही अनवश्यक आहे. कारण त्यामुळें कित्येक अर्वाचीन कवींना प्राचीन म्हणावें लागेल, आणि प्राचीन कवींस अर्वाचीन ही पदवी लावावी लागेल. इतका हा भेद अनवश्यक व चमत्कारिक आहे आणि या भेदांत मराठी काव्याच्या खऱ्या हितचिंतकानें शिरूंच नये हें चांगलें.

कवितेचें खरें लक्षण म्हटलें म्हणजे हृदयांतील तरंगाचें रूप व्यक्त करून दाखविणें होय. कवितेस ह्याशिवाय दुसरें कांहींएक लागत नाहीं. कवितेस काल लागत नाहीं, चाल लागत नाहीं अथवा अलंकारांची शालही लागत नाहीं. " वाटुली पाहतां शीणले डोळुले " ही शब्दरचना किती साधी आहे, परंतु ह्या साध्या शब्द-प्रयोगांत जितकें काव्य भरलेलें आहे, तितकें काव्य सामावण्यास कैझर बादशहाचें सर्व कल्पना-साम्राज्यही पुरणार नाहीं. मानवी अन्तःकरणाच्या किनखापी पिशव्या रसिक-समाजापुढें भरभरून ओतून दाखविणें म्हणजेच काव्य, मग तें अर्वाचीनांनीं केलेलें असो अथवा प्राचीनांनीं केलेलें असो. कविता करण्याचा अधिकार प्राचीनांना होता व अर्वाचीनांनाही तो आहे. प्राचीनांनीं तो गाजविला आणि अर्वाचीन तो गाजवीत आहेत. ह्यांत कोणी कोणास हंसावयाचें अथवा कोणी कोणाची चेष्टा करावयाचें कांहींच कारण नाहीं. अर्वाचीन झाले तरी ते प्राचीनांचींच मुलेंलेंकरें आहेत व प्राचीन झाले तरी ते अर्वाचीनांचेच वडील आहेत. मग अमुक प्राचीन म्हणून त्यांचीच एकसारखी नांवाजणी अथवा आम्ही अर्वाचीन म्हणून आपलीच एकसारखी प्रशंसा करण्यांत काय अर्थ आहे? बापाला महामूर्ख म्हटल्यानें कोणताही लेक शहाणा ठरत नाहीं. अथवा हल्लींच्या पिढीला कमी लेखल्यानें प्राचीन पिढीच्या नांवलौकिकांत भर पडते अशांतलाही भाग नाहीं. आम्हांला एवढेंच वाटतें कीं, प्राचीन-अर्वाचीन, गद्य-पद्य, अथवा सयमक-निर्यमक असले वाद उकरून काढणें

म्हणजे केवळ वाऱ्याशीं भाण्डत बसणें होय. कलहाग्नीनें चेतलेल्या ह्या महाराष्ट्ररूपी होमकुण्डांत कवितादेवीच्या नेत्रज्वालांची भर पडण्याचें कांहींच कारण नाहीं. कवितादेवी म्हणजे कल्पना–कल्पवनांतील सुंदर गुलाबाचें फूल आहे. तिला तिच्या दासांनीं रणकल्लोळापासून दूर ठेवावयास नको काय ?

अर्वाचीन कवींचा प्राचीन कवींवर असा एक मोठा आक्षेप आहे कीं, त्यांनीं अध्यात्मविचाराचाच चुना घेऊन तो एकसारखा कुटला आहे. मुकुन्दराज घ्या, दासोपंत घ्या, अवचितसुत काशी घ्या अथवा मुक्तेश्वर घ्या, अध्यात्मविचार ह्या त्यांचा खरा विषय आणि ह्या विषयाच्या अनुषंगानें त्यांना जेवढी सुचेल तेवढी कविता ! अध्यात्मविचारांच्या शृंखलांनीं जखडलेलें असतां स्वतंत्र कल्पना सुचणें दुरापास्तच, तथापि त्यांतल्या त्यांत स्वतंत्र मनोभावनेची एखादी झुळूक लागली तर तेवढ्यापुरतेच प्राचीन वृत्त–जनिते ( versifiers ) हे कवि ! नाहींतर खऱ्या कवितेच्या नांवानें त्यांचेजवळ आंवळ्याएढें पूज्यच ! ही विचारसरणी उत्पन्न होण्यास खरोखर पुष्कळच कारणें घडलेलीं आहेत, आणि त्या सर्वांत मुख्य कारण हें कीं रम्यरमणीवर्णनाला ज्यांत स्थान नाहीं ती कधींच ‘ कविता ’च होऊं शकणार नाहीं ही कल्पना होय. रमणीवर्णनाची इतकी अनिवार तृष्णा अलीकडे कां उद्भवली असावी ह्याचें कारण ठरवीत बसण्याचें हें स्थळ नव्हे. परंतु अध्यात्मविचारांत कविता उत्पन्न होणार नाहीं असें कधींही म्हणतां यावयाचें नाहीं. अन्तःकरणाची प्रत्येक स्फूर्ति ही कवितेस सर्वथैव लागू आहे आणि भगवत्सेवेचा उगम जर खरोखर अन्तःकरणांतून होत असला तर अध्यात्मविचार करणारे कवि हे कवि नव्हेत असें म्हणणें कोणाही ‘ कविपुंगवा ’स अशक्यच होईल.

प्राचीन कविसंबंधानें एक मुख्य जी अडचण असते ती ही कीं, त्यांतील बहुतेक कवी संस्कृत संस्कृतीच्या कडेवर बसलेलीं लेंकरें आहेत. संस्कृत संस्कृति ज्या कल्पना देईल त्या बोलावयाच्या, ती ज्या उपमा सुचवील त्या घ्यावयाच्या, ती जी तत्त्वविद्या शिकवील ती शिकावयाची आणि तिनें ज्या कथा संग्रहीत केलेल्या असतील त्यांचेवर कवनें रचावयाचीं, अशी बहुतेक प्राचीन कवींची रीति असल्यामुळें प्राचीन मराठी कवि हे संस्कृत कवि अथवा संस्कृत तत्वज्ञ ह्यांचेपासून वेगळे आहेत असें भासतच नाहीं. ज्याप्रमाणें एखाद्या स्त्रीस भेटावयास बोलावलें म्हणजे तिच्या बालकाला निराळें आमंत्रण द्यावें लागत

नाहीं, त्याचप्रमाणें संस्कृत विद्या व ग्रंथभाण्डार ह्यांचा परिचय करून घेतला म्हणजे त्यांत नावीन्य वाटेनासें होतें. ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर, तुकाराम, वामन, मोरोपंत वगैरे महाकवींच्या काव्यांत शेंकडों नवीन दृष्टांत, शेंकडों नवीन दाखले, शेंकडों नवीन रूपकें नाहींत असें नाहीं, परंतु ज्याप्रमाणें नेकटायबूट कितीही चढविला पण डोक्यास मात्र माभळभटी पागोटें घातलें तर मनुष्य जसा जुन्या राहणीचाच ठरेल त्याप्रमाणें मराठी महाकवींनीं संस्कृत वाङ्मयाच्या साखरभातांत नवीन कल्पनांचे कितीही बदाम घातले तथापि त्यांचें संस्कृताश्रितत्व नाहींसें होत नाहीं. तुकारामाच्या कल्पना व उपमा वाचीत असतां आपण अगदीं भक्तिरसाच्या रंगांत यावें आणि तितक्यांत तीच उपमा व तोच दृष्टांत नामदेवाच्या काव्यांत आहे असें आढळल्याबरोबर, ज्याप्रमाणें आपला पहिला आनंद नाहींसा होतो त्याचप्रमाणें प्राचीन मराठी काव्यांवर आपण कितीही डोलूं लागलों तथापि त्यांत संस्कृत कल्पनांचा सर्वव्यापी परिमल अनुभवास येऊं लागल्याबरोबर आपलें लक्ष्य मराठीवरून संस्कृत संस्कृतीकडे उडून जातें. शिवाय संस्कृत संस्कृतीचीही गोष्ट घेतली तथापि त्यांत ‘ कविता ’ म्हणून एक औरच प्रकार आहे. ह्या प्रकाराचें जरी मराठी कवींनीं अनुकरण केलें असतें तरी आधुनिक कवींचें त्यांच्या कवित्वाबद्दल समाधान झालें असतें. परंतु तसें कांहींएक न होतां ज्या अर्थी “ मना सज्जना भक्तिपंथेंचि जावें, ” अथवा “ नतावनधृतव्रतज्वलन तूंचि वाधावनीं ” असल्या प्रकारचें आधुनिक कल्पनांप्रमाणें रुक्ष कवित्व मराठी कवि करूं लागले तेव्हां आधुनिक कवींचा त्यांच्या विषयींचा आदर सर्वतोपरी ढांसळून “ हे हो कवी कसले ? ” असा त्यांचेकडून प्रश्न होऊं लागला हें साहजिकच आहे.

संस्कृतांत वेदान्त अथवा ‘ घटपट ’ जरी हवें तितकें असलें तथापि काव्याचाहि भरपूर पुरवठा आहे. संस्कृतांतील काव्याइतकें विपुल आणि विविध काव्य दुसऱ्या फारच थोड्या भाषांत असेल. संस्कृत काव्यांत कांहीं नाहीं असें नाहींच. संस्कृत काव्यांतील सुभाषितांचा भरणा पाहूनच एखाद्याला संस्कृत भाषेविषयीं अत्यन्त आदर वाटावयास लागेल. संस्कृत काव्यांत नाटकें आहेत, भाण आहेत, चम्पू आहेत, छेकापन्हुति आहेत, अन्तर्लापिका आहेत, बाहिर्लापिका आहेत, भ्रमर आहेत, सखीजन आहेत, पान्थ आहे, वसन्त आहे, व स्त्रीलावण्याचीं तर इतकीं तऱ्हेतऱ्हेचीं वर्णनें आहेत कीं तीं ऐकून खरोखर लोहपिष्ट भक्षण करणाऱ्या तापसाचेंहि चित्त चलित होऊन जाईल. संस्कृतांत इतिहासपुराणें व गोष्टी तर अनंतच

आहेत. ह्याखेरीज नुसतीं अध्यात्मपर जरी काव्यें हवीं असलीं तथापि तीं संस्कृतांत मुळींच उणीं नाहींत. " प्राप्ते संनिहिते मरणे " असल्यासारख्या खऱ्या तात्त्विक बोलांपुढें कबीर तरी काय करील अथवा तुकाराम तरी काय बोलेल ?

असलें विशाल संस्कृत वाङ्मय पाहिलें आणि त्याचेपुढें प्राचीन मराठी वाङ्मय तुलनेकरितां ठेवलें म्हणजे मराठी गिरा ही अजून कोमल कन्यका आहे व ती संस्कृत जननीच्याच स्तनांतील दुग्धपान करीत आहे ह्याविषयीं आधुनिक कवींस तिळमात्र संशय वाटत नाहीं. प्राचीन मराठी कवि हे मुळीं कविच नव्हेत, संस्कृत काव्यसरोवरांतील जलांशाचे फवारे आपल्या मुखांतून सर्व महाराष्ट्रभर उडविणारे हे जलयंत्रोद्वार आहेत असें जें आधुनिक कवींना वाटतें तें ह्यामुळेंच होय. प्राचीन मराठी कवींनीं काय केलें ? तर जग हें नश्वर आहे कीं चिरस्थायी आहे ह्या सिद्धांताचा शोध लावला. परंतु अर्वाचीन कवि असें म्हणतात कीं संस्कृत कालीं विद्वान् लोकांच्या घरच्या साळुंक्यामैनासुद्धां जर जग हें ध्रुव आहे कीं अध्रुव आहे असा पक्ष–प्रतिपक्ष करीत असत तर ह्यांत ज्ञानेश्वर–एकनाथांनीं असा कोणता पुरुषार्थ केला ? रामदासांनीं मोठ्या आवेशानें रामायणीय युद्धाचें वर्णन केलें असेल, परन्तु संस्कृत काव्योदधींत जर अस्सल वाल्मिकि–रामायणाचाच समावेश आहे तर त्यापुढें रामदासांच्या काव्याचा अट्टहास कोण वाचील ? आधुनिक कवींचा मराठी प्राचीन कवींवर जो मुख्य आक्षेप आहे तो हाच कीं, मराठी कवि साधारणतः नीरस विषय काव्याकरितां निवडतात आणि ह्या विषयांतही ते आपली स्वतःची बुद्धि कांहींच चालवीत नसून संस्कृत वाङ्मयाच्या अवाढव्य छत्राखालीं ते कोणत्या कोपऱ्यांत लपून बसलेले असतात तें दिसतही नाहीं !

जे विषय आधुनिक कवींच्या काव्यांत येतात ते विषय प्राचीन मराठी कवींच्या काव्यांत येत नव्हतें हें प्रांजलपणें कबूल केलेंच पाहिजे. " अतां कोण्या वसंताचें ? " " कुणास्तव कुणीतरी, " " गुलाब, " " मधमाशीला, "—" माझें झाड, " " कन्यादान " असले विषय प्राचीन मराठी कवींत सांपडणें प्रायः अशक्य आहे. त्यांचे विषय म्हणजे ॐकारवर्णन, अनुभवामृत, अहिल्यास्तव, उमारमासंवाद, मनोबोध, मार्कंण्डेयाख्यान, रुक्मिणीपत्रिका, आणि, शृंगाराचा अतिरेकच झाल्यास रासक्रीडा, चन्द्रावळी इत्यादि होत. ह्यांपैकीं एकही विषय असा नाहीं कीं जो आधुनिक कवि हौसेनें घेतील. आधुनिक कवींचेही विषय असे नाहींत कीं जे प्राचीन

कवींनीं हौसेनें घेतलें असतें. ‘ छत्री ’ला पाहून कोणाही प्राचीन मराठी कवीची प्रतिभा उद्दीपित झालीच नसती. ‘ वीण्याची तुटलेली तार ’ पाहून कोणाही प्राचीन मराठी कवीला आपल्या प्रतिभेची तार तोडण्याची बुद्धि झाली नसती. प्राचीन मराठी कवि आज हयात नाहींत म्हणूनच अर्वाचीन मराठी कवींस त्यांना अप्रतिबंधपणें शिव्या द्यावयास सांपडत आहे. परंतु ते जर आज हयात असते तर त्यांनींही अर्वाचीन मराठी कवींची भयंकर निर्भत्सना केली असती. तुकाराम तर असेंच म्हणाला असता कीं “ सुपा टोपलीचे कवि । आम्ही सुधा हे काकवी. ”

असला हा भयंकर विषयभेद व स्वभाव–परिच्छेद पाहून साधारण वाचकाचें मन खरोखरच भांबावून जातें आणि तो प्राचीन कवींचा तरी भाट अथवा अर्वाचीन कवींचा तरी अभिमानी बनतो. आपल्या महाराष्ट्र–वाङ्मयांत जे विनाकारण तट पडत चाललेले आहेत व ज्यांचें पर्यवसान निःपक्षपातित्वाच्या वादविवादांत न होतां महाराष्ट्राच्या नेहमींच्या संवयीप्रमाणें द्वेष, मत्सर, विडम्बना, आणि विषदिग्ध भाषा ह्यांत होऊं लागलेलें आहे, त्यांच्या मुळाशीं प्राचीन कवि चांगले कीं अर्वाचीन कवि चांगले हें ठरविण्यांत झालेला मनाचा गोंधळ हेंच आहे. परंतु प्राचीन मराठी कवींचें विशिष्ट लक्षण पाहतांना ज्याप्रमाणें आपण संस्कृत संस्कृतीचा बळकट आश्रय हें त्यांचें मुख्य स्वरूप निवडून काढलें, त्याचप्रमाणें अर्वाचीन मराठी कवींचेंही विशिष्ट लक्षण काय आहे हें पाहून त्यांचेंही खरें स्वरूप निवडून काढलें पाहिजे. त्या लक्षणाचा शोध करतांना आपल्या लक्षांत जी गोष्ट एकदम येते ती ही कीं, ज्याप्रमाणें प्राचीन मराठी कवि हे संस्कृत संस्कृतीच्या कडेवरचीं अर्भकें होते त्याप्रमाणें अर्वाचीन मराठी कवि हे आंग्लसंस्कृतीच्या कडेवरील अर्भकें आहेत. दोन्ही मुलेंच, दोन्हीही दुग्धपान करणारींच, दोन्हींही मातृभुजाश्रितच, दोन्हीही स्वतंत्रपणें चालण्यास असमर्थच, परंतु ह्या दोहोंत एक मात्र ढळढळीत फरक असा आहे कीं प्राचीन कवि हे आपल्या स्वतःच्या आईचे अंगावर पीत असलेले असल्यामुळें बाळसेदार, तजेलेदार, हूड, हंसरे असे होते. उलटपक्षीं अर्वाचीन मराठी कवींना खऱ्या आईचें दूध कधींच न मिळाल्यामुळें त्यांच्यांत नैसर्गिक जोरदारपणा फारसा आढळून आला नाहीं. अर्वाचीन मराठी कवींची कविता त्रोटक असते व प्राचीन मराठी कवींची कविता दीर्घप्रवासी असते असें कित्येक मार्मिक निरीक्षक विधान करीत असतात. हें विधान जितकें खुबीचें तितकेंच मनास पटणारेंही आहे; तथापि त्यांतील तत्त्व वर जें सांगितलें तेंच आहे. हल्लींचे मराठी कवि जी क्षुल्लक

कविता रचीत असतात त्याचें कारण त्यांचा विनय नव्हे तर त्यांच्या अंगांत प्राचीन मराठी कवींच्या इतकी रग नाहीं हेंच आहे. मोरोपंतानें एकशें आठ रामायणें रचलीं त्याबद्दल मोरोपंतांची वाटेल तितकी टवाळी करा. तथापि प्रचंड रामकथेंत निरनिराळे व्यूह रचून त्या व्यूहांतून एकशें आठ वेळां वाट काढण्याची हिंमत त्याचे अंगीं होती ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे. **एकपत्नीव्रताची प्रौढी बाळगावी हें खरें आहे. पण ती कोणी? तर कृष्णाप्रमाणें सोळा सहस्र अंगना करण्याची पात्रता असूनही सीता नाहींशी झाल्या-बरोबर ज्यांनीं "हा सीते हा सीते" अशा एकनिष्ठतेच्या विलापांनीं सर्व दंडकारण्य दणदणून सोडलें त्या रघुकुळटिळकांनीं. क्षयाचा विकार झालेला आहे, दूध पचत नाहीं, डॉ. राव कडे सारखे खेटे चाललेले आहेत, (Bed Diet) शय्यापथ्यावर सर्व जीविताची मदार आलेली आहे, अशा शेंदाड शिपायांनीं एकपत्नीव्रताच्या लाम्बलाम्ब गप्पा मारल्या म्हणून त्यांत फायदा कोणता?**

अलीकडील कवींची स्थिति बरेच वेळां कार्डीपैलवानांच्यासारखी असते. ज्या-प्रमाणें असले एखादे **हाङ्कबहाद्दर** बाहेर ऐटीनें यावयास निघाले म्हणजे आपल्या शरीरांतील मांसलपणाची उणीव शिंप्यानें शिवलेल्या पोषाखाच्या फुग्यानेंच भागवून नेतात, त्याप्रमाणें अलीकडील कविही आपल्या कवनांचा क्षुद्रपणा निर्णय-सागर छापखान्याच्या फाउंडरींतील बॉर्डरींनीं व डॅशेसनींच पुष्कळ वेळां दडपून नेतात. एक पाव शेट व तीन पाव दाढी ही म्हण त्यावेळीं अगदीं सार्थ होते. अलीकडील अलंकारविभूषित मासिक पुस्तकें पहावीं तों एखादें पान चित्रविचित्र वेलींनीं व पुष्पांनीं अगदीं खचून गेलेलें असतें व आंत एक लहानशी कविता उगीच कोठें टुकूटुकू करीत बसलेली दिसते. त्यावेळीं असें सहज मनांत येतें कीं एवढ्या गुडघ्याएवढ्या न्हाणवलीला ह्या मासिक पुस्तककारानें एवढें मखर कशाला बांधलें आहे? परंतु कविता रचण्यापेक्षां त्या प्रसिद्ध करण्याचीच अलीकडील कवींना घाई असल्यामुळें कविराज जें चिटोरें अंगावर फेंकतील तेंच शिरसावंद्य मानून त्यालाच होईल तितक्या "उठावा"नें दाखविणें मासिक पुस्तककारांना भाग पडतें. अली-कडील कवितांत जो क्षुद्रपणा आढळतो त्याचें कारण हेंच कीं कवींची काव्यप्रतिभा बऱ्याच अंतरापर्यंत अव्याहत सुरू राहील इतकी ती ताकदवान नसते. अर्वाचीन कवींची स्फूर्ति म्हणजे **विजेचें तळपणें अथवा काजव्याचें चमकणें होय.**

त्याच्यापासून सूर्यप्रकाशाच्या उज्ज्वल, स्थिर व चिरप्रभावी तेजाची अपेक्षा करणें व्यर्थ आहे.

एका दृष्टीनें असें म्हणतां येईल कीं प्राचीन 'कवि' ही कवि नव्हते व अर्वाचीन 'कवि' ही कवि नव्हेत. ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव अथवा तुकाराम ह्यांपैकीं कोणताही कवि घ्या, ज्या दृष्टीनें कवि काव्यें रचतात तशी दृष्टि एकाही कवीची नव्हती. 'काव्यें' रचण्यापेक्षां ह्या सर्व महापुरुषांचा फारच उदात्त उद्देश होता. त्यांना 'कालिदास' म्हणवून घेण्याची मुळींच हांव नव्हती. ह्यांची मुख्य तृष्णा परमेश्वरानें आपणास आपले "दास" म्हणावें एवढीच होती. त्यांना कालिदास म्हणून कोणी कितीही मान दिला असता तथापि जर ईश्वरानें त्यांना आपलें म्हटलें नसतें तर त्यांच्या मनाचें समाधान झालें नसतें. अशा थोर विभूतींना 'कवि' म्हणणें ही एका प्रकारें त्यांची योग्यता कमी करण्यासारखेंच आहे. ते तत्त्वज्ञ, धर्मकर्ते व समाजोद्धारक होते. ते समाजनियमनाची गंगा होते. त्या गंगेंत लोकांना आपलीं पातकें, आपलीं दुःखें, आपले मनस्ताप बुडवून टाकण्याची परवानगी होती. परंतु आपली काव्यस्पृहाहि त्यांत खळबळून घ्यावी इतक्या हीन प्रतीचे ते नव्हते. ह्या थोर पुरुषांनीं आपले सर्व दिव्य उद्गार काव्यरूपांत काढलेले आहेत हें खरें, तथापि ह्यांचे काव्यरूपांतील उद्गार निघण्याचें कारण त्यावेळीं मराठी भाषेंत गद्य लिहिण्याची पद्धति फारशी नव्हती हेंच आहे. गद्य लिहिण्याची त्यांचे वेळीं जर अलीकडच्याप्रमाणें पद्धति असती तर ज्ञानेश्वरांनीं आपली "ज्ञानेश्वरी" व वामन पंडितांनीं आपली "यथार्थदीपिका" काव्यांत लिहिली असती कीं नाहीं हा प्रश्नच आहे. प्राचीन मराठी कवींपैकीं 'कवि' असे मुख्यतः फारच थोडे होते. बहुतकरून सर्व तत्त्वज्ञ, संत व साधुच फार होते. जगाला शिकविणें हा त्यांचा उद्देश होता, तें काव्यांत शिकविणें हा हेतु त्यांच्या अंतःकरणापासून फारच दूर असेल!

प्राचीन कवींप्रमाणें अर्वाचीन कवींनाही वास्तविक रीत्या 'कवि' म्हणतां यावयाचें नाहीं. परंतु प्राचीन कवींप्रमाणें ते तत्त्वज्ञ आहेत म्हणून त्यांना 'कवि' म्हणावयाचें नाहीं असें नव्हे, तर 'कवि' म्हणवून घेण्याइतका ह्यांचेजवळ स्फूर्तीचा सांठाच नाहीं. अर्वाचीन कवींपैकीं बरेचसे कवि आंग्लोपजीवी आहेत हें वर सांगितलेंच आहे. ह्यांचें बहुतेकांचें असें असतें कीं इंग्रजी वाचतां वाचतां एखादा चांगला मजकूर ह्यांना आढळला तर ते लगेच तो कवितेंत आणण्याचा प्रयत्न करतात.

परंतु इंग्रजी कवि जेवढें ढोंचतील तेवढेंच पाऊल पुढें टाकावयाचें हा अर्वाचीन कवींचा क्रम त्यांना काव्यकीर्तीत कितीसें अंतर पुढें नेणार? अर्वाचीन कवींची कविता म्हणजे एखाद्या सुंदर पैठणीवर काढलेली जरीची बुटी आहे. ती लहान लहान प्रमाणांत सर्वत्र चमकत असावयाची. परंतु बुटी म्हणजे कांहीं पैठणी नव्हे. ती एखाद्या महावस्त्रावर सुंदर दिसते, परंतु ती स्वतः कांहीं महावस्त्राप्रमाणें नेसावयाच्या उपयोगी नाहीं.

प्राचीन कवि इतर व्यावहारिक विषय जरी घेत नसले तथापि ते जे विषय घेत असत त्यांतच ते इतके तन्मय होत असत कीं त्यामुळें उत्पन्न झालेल्या मनःस्थितींतून काव्यनिर्झर उगम पावणें शक्य असे. आधुनिक कवींचें तसें नाहीं. आधुनिक कवि इतक्या आकुंचित, इतक्या भीरु, इतक्या अरुंद परिस्थितींत उत्पन्न झालेले आहेत कीं त्यांच्या स्फूर्तीचीं बन्धनें तटातट तुटून तीं स्वछंदपणें खिदळत जाईल असें शक्यच नाहीं. प्राचीन कवींना परमेश्वराचें गुण आठवून आनंदाच्या उकळ्या येत, त्यांना परमेश्वर भेटलासें वाटून त्याचें वर्णन केल्याशिवाय रहावत नसे, त्यांना भीम हा दुःशासनाचे उरावर बसलेला प्रत्यक्ष दिसे, अम्बरीषाची स्थिति पाहून त्यांना खरीखुरी अनुकम्पा उत्पन्न होई व भीष्माची निःपाण्डवी पृथ्वी करण्याची प्रतिज्ञा ऐकून त्यांना खरोखर द्रौपदीइतकेंच भय वाटत असे. आपल्या भोंवतीं चाललेले प्रकार, आपल्या भोंवतीं चाललेले पराक्रम, आपल्या भोंवतीं चाललेला आक्रोश पाहून तिकडे प्राचीन मराठी कवींनीं कां लक्ष्य दिलें नाहीं आणि अभिमन्यूचें प्रेत घेऊनच ते कां रडत बसले हें पूर्णपणें समजणें खरोखर कठिण आहे. तथापि त्यांतील एक कारण वर सांगितलें तेंच होतें, म्हणजे हें कीं प्राचीन मराठी कवि तत्वज्ञानी होते, कवि नव्हते, परंतु प्राचीन मराठी कवींची काव्यप्रतिभा उज्ज्वलित होण्यास ईश्वराच्या "वेड्यावांकड्या" भक्तीचेंच कां होईना, पण सबळ कारण होतें. आधुनिक कवींच्या संबंधानें हेंही कारण नाहींसें झालें आणि "सत्य सदा बोलावें सांगे गुरु आणि आपुला बाप" असल्या प्रकारचीं नीरस, निर्बुद्ध, निपट व कळकटलेली कविता जन्म पावली. अर्वाचीन कवींची प्रतिभा जागृत व्हावयास प्रबल कारण तरी कोणतें आहे? कविता उत्पन्न होण्यास अत्यन्त तुफान अशी मनोवृत्ति उत्पन्न व्हावी लागते. प्राचीन कवींच्या समोर अफजुलखानाचा वध, राजारामाचा जिंजीवास, पानपतची लढाई, वगैरे घनघोर प्रसंग नित्यशः घडूनही त्यांनीं त्यांचेकडे पाहिलें नाहीं हें खरें, तथापि सीतेचा

वनवास, द्रौपदीचा अपमान अथवा अभिमन्यूचा चक्रव्यूह, इत्यादि प्रसंगही सत्यवत् करण्याइतकी त्यांची मानससृष्टि जबरी असल्यामुळें त्यांना उत्कट प्रसंगांची कधीं कमतरताच पडली नाहीं, परंतु सध्यांच्या शतकांत असे प्रसंग कोणते आहेत? आतां भिल्टीच्या बोरांवर तुमच्या हातून एकही "ओलें" अक्षर निघावयाचें नाहीं. कारण त्यावर तुमचा विश्वास नाहीं. मराठे, रजपूत अथवा क्षत्रिय ह्यांच्या पराक्रमांनीं तुमचें चित्त थरारून जावयाचें नाहीं. कारण त्यांची तुम्हांला माहिती नाहीं. मग तुम्हीं कविता रचणार कशावर? नाण्यांच्या प्रश्नावर? इनाक्युलेशनवर? शाळांच्या बक्षिस समारंभावर? कर्झन साहेबांनीं मिठाचा कर माफ केला त्यावर? कीं मिण्टो साहेबांनीं मॉर्लेचा खलिता आणला त्याचेवर? विषय नसतां कविता रचण्यास बसलेले कवि दहा पांच कडव्यांच्या आंतच रडकुंडीला येतात ह्यांत कांहीं नवल नाहीं. मग ह्यांची कविता इंग्रजी कवींतून चोरलेल्या उष्ट्या कल्पनांवर, पहिल्याच बाळंतपणांत आटपलेल्या क्षयरोगी "प्रिये" वर, अथवा दृष्टीपुढें जो कोणता विषय असेल, मग ती छत्री असो, दऊत असो, चहाचा कप असो अथवा तीन बत्तींची सिगॅरेट असो, तिच्यावर चालावयाची. काय हे कवि आणि काय ह्यांची कविता!

प्राचीन कवि हे 'कवि' नव्हते कारण ते श्रेष्ठ तत्त्वज्ञानी होते, आणि अर्वाचीन कवि हे कवि नाहींत कारण 'कवि' म्हणण्याइतकी त्यांची स्फूर्तीच नाहीं हें वर दाखविलेंच आहे. मग हा महाराष्ट्र देश कवींवांचूनच सुना गेला काय, असा प्रश्न साहजिकच उपस्थित होईल. त्याचें एक उत्तर आम्ही असें देतों कीं, ह्या महाराष्ट्रदेशाचा नैसर्गिक स्वभावच असा आहे कीं येथें (Sentimental) भावनापीडित लोक उत्पन्न होत नाहींत. येथें सर्व रोखठोक हिशेबी काम. मुसलमानी अमदानींत कवितेला फार वाव होता, कारण त्या वेळचे इतिहास जर वाचले तर करुण प्रसंग त्यावेळीं फार उत्पन्न होत असत असें दिसतें. परंतु त्यावेळीं महाराष्ट्रांतील कवि रडगाणें लावीत बसले नाहींत. त्यांतील जे संत अथवा तत्त्वज्ञानी होते ते मुसलमानी धर्मापासून हिन्दुधर्माचा बचाव कसा करावा ह्या नादाला लागले व जे वीर अथवा राजकारणी होते ते मुसलमानी सत्तेपासून स्वदेशाचा बचाव कसा कसा करावा ह्या विचाराला लागले. ह्या दोहोंच्या झपाट्यांत रडण्याचे लांब लांब सूर काढणाऱ्या कवींना जागाच मिळाली नाहीं. तथापि महाराष्ट्रांत कवि झालेच नाहींत असें मात्र नाहीं. ज्यावेळीं मराठी राज्य स्थिरस्थावर होऊन लोकांच्या शृंगारवृत्ति थोड्याशा

रंगल्या, ज्यावेळीं वैभवाची खूप भरती होऊन "पंचकल्याणी घोडा अबलक" घरोघर दिसूं लागले, ज्यावेळीं भगवद्भक्त व वीर ( Heros ) [ 'शूर' नव्हे, कारण ह्या महाराष्ट्रांतून शूर लोक कधीं नाहींसे झालेच नाहींत ] ह्यांच्या पिढ्या मोरोपंत व बाजीराव ह्यांचेबरोबर संपल्या आणि ज्यावेळीं सक्त मेहनतीबरोबर सुखाचाही थोडासा झुरका घेण्याइतकी ऐपत महाराष्ट्राचे अंगीं आली त्याच वेळीं महाराष्ट्रांत खरे 'मराठी' कवि निर्माण होऊं लागले. ह्या कवींपैकीं प्रमुख कवि म्हणजे रामजोशी, अनंतफंदी, होनाजीबाळ, परशुराम वगैरे होत. अमृतराय वगैरे कवींचीही गणना ह्यांतच केली तरी चालेल, कारण हे थोडे बहुत दोन्ही पिढ्यांमधील आहेत. त्या कवींचा जो काल तीच खरी **मराठी काव्याची प्रभात** होय. त्या प्रभातीचें द्योतक म्हणूनच कीं काय, होनाजी बाळानें "घनश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला" हें अत्यंत मधुर पद रचलेलें आहे.

मराठी काव्याच्या प्रभातकाळचे हे कवि अगदीं स्वतंत्र प्रतिभांचे आहेत. ह्यांचीं काव्यें वाचूं लागलें म्हणजे खरोखर पहांटेच्या गुलाबी थण्डींत समुद्रकिनारची गोड झुळूक उपभोगीत हिण्डावयास गेल्याचा भास होतो. खरा "कवी" पेशा ह्यांचाच होता. "काव्य" रचण्याचा संकल्प करूनच ह्यांनीं आपले छंद रचले. हे स्वतःसही 'कवि' म्हणवीत असत व एकमेकांच्याही कवित्वकीर्तीची तारीफ करीत. होनाजी बाळनें तर अनन्तफन्दींच्या कवितेची मोकळ्या अन्तःकरणानें तारीफ करून "कवन बहुत उदरामधिं भरलें फणस जसा मोठा कापा" असें त्यांचें फार मजेदार वर्णन केलें आहे. हे कवि संस्कृत संस्कृतीच्याही पदराखालीं झांकले गेले नव्हते, आंग्ल संस्कृतीच्या कडेवरचें बाहुलें नव्हतें व जें काय होतें तें त्यांचें स्वतःचें होतें. त्यांच्या कल्पना निराळ्या, त्याचीं वृत्तें निराळीं, त्यांचे विषय निराळे, त्यांची हातोटी निराळी, त्यांचें सर्व निराळें होतें. खरी मराठी कविता काय ती ही होती. ह्यांनीं शृंगाराचीं वर्णनें केलीं म्हणजे 'महाराष्ट्रां'तल्या लावण्यलतिकांचीं हीं वर्णनें आहेत असें चटदिशीं मनाला पटतें. ह्यांनीं प्रेमविद्ध पुरुषांची केलेलीं वर्णनें ऐकलीं म्हणजे मराठे शिलेदार हुबेहुब डोळ्यांपुढें उभे येऊन राहतात. त्यांच्या कवितांनीं त्या वेळचा महाराष्ट्र कल्पनेपुढें चित्रित होतो. त्या वेळचें वैभव, त्या वेळचे विलास, त्या वेळच्या कामगिऱ्या, त्यावेळचे पराक्रम, त्या वेळचीं संकटें, त्या वेळचे दुर्धर प्रसंग, हे सर्व बरोबर रीतीनें त्यांच्याच कवितांनीं पुन्हां दिसावयास लागतात. त्या

वेळचे सद्गुण, त्या वेळचे दुर्गुण, त्या वेळच्या चांगल्या चाली, त्या वेळच्या वाईट चाली, हें सर्व, कांहींएक सत्यापलाप न करितां, आपणांस कळविणारे जर कोणी खरे जासूद असतील तर हेच ' कविराय ' होत. " सहज मनामधिं आलें साजणी कधीं स्वामीचा एकान्त घडे। तों जासूदें येऊन सांगितलें मुक्काम गंगे अलीकडे ॥ " हें एका विरहिणीचें सोत्कण्ठविचारप्रदर्शन जसा त्या वेळचा प्रेममय पण मर्द तरुण-वर्ग वाचकांच्या दृष्टीसमोर उभा करतो आणि त्यांपुढें हल्लींचे सेकण्ड क्लासांत बसून प्रिय-करणीची शाल सांवरणारे प्रेमवीर लुंगेसुंगे दिसूं लागतात. महाराष्ट्राची प्रथमपासून जर एखाद्या गुणाबद्दल प्रसिद्धि असेल तर ती मर्दपणाबद्दल आहे. दक्षिणचा घोडेस्वार पुरातन कालापासून शूरांच्या कर्णपथावर घोड्यांच्या टापा घालवीत आलेला आहे. असा शिलेदार जेव्हां कोठेंतरी तरवार गाजवून आपल्या प्रियकरिणीला भेटावयास घाईघाईनें कूच करीत जात असेल तेव्हां शृंगाररसाला आलेलें भरतें तो काय तो खरा ' मराठा ' शृंगार ! नाहींतर मिस्टरना डिसपेपशिया झालेला व मिसेस्‌ची गालफडें बसलेलीं, अशा स्थितींत कॉलेजमध्यें शिकलेले रोमिओ आणि ज्यूलिएटचे अथवा पुण्डरीक–महाश्वेतेचे शृंगार जबरदस्तीनें आठवून एखाद्या मासिकाकरितां मुद्दाम दळलेली माकडचेष्टा हा कसला शृंगार ? पन्नास रुपड्यांवर एखाद्या फर्ममध्यें खरडेघाशी करतां करतां कम्बरेचे टांके ढिले झालेले ' प्राणपति ' व चाळीमध्यें जुनेर नेसून नळाचें पाणी भरतां भरतां नको जीव झालेली ' प्राणसखी ' ह्यांच्या शृंगारांत स्वाभाविकपणा तो काय येणार ? व रसोत्पत्ति कशी होणार ?

संस्कृत कविता अतिशय ढंगवाली कविता आहे हें मागें सांगितलेंच आहे. संस्कृत कवितेमध्यें जितकी विविधता आहे तितकी दुसऱ्या कोणत्याही काव्यांत असेल कीं नाहीं हेंही मागें सुचविण्यांत आलेलेंच आहे. परंतु संस्कृत कवितेंतील हे सर्व ढंग काव्याच्या प्रभातकाळीं मराठी कवितेंत येत चाललेले होते. त्या प्रभाताच्या पुढें जर लगेच दिवस वरवर येत गेला असता तर पेशवाईपासून आजपर्यंत गेलेल्या शंभर वर्षांत मराठी काव्यानें बहार करून सोडली असती ही आम्हांस पक्की खात्री आहे. परंतु एकोणिसावें शतकांत जो एक ट्रॅन्स्फर सीन झाला व समाजस्थितींत जो एकदम पालट पडला त्याच्या योगानें नुकतीच पल्लव फुटत चाललेली मराठी कविता एकदम " सत्य सदा बोलावें, सांगे गुरु आणि आपुला बाप " असल्या वृत्तांवर येऊन बसली. ही मराठी कविता पूर्वीप्रमाणें विठ्ठलाचे पायांवर जरी पडली असती तरी एव्हांना शाप-

मुक्त होऊनही गेली असती. परंतु आतां त्याबद्दल विचार करून काय उपयोग? सध्यां हातांतल्या 'काठी'वरच्या कविता नशीबीं आलेल्या आहेत त्या खऱ्या !

मराठीचे आद्य वाङ्मयाचार्य "कवि" न बनतां लोकोद्धारकर्ते होऊन गेले त्याबद्दल आम्हांस अत्यन्त अभिमान वाटतो. लोकोद्धाराचें कार्य पुढें उभें राहिलें असतां काव्य-रचना सुचणें हें अधःपाताचेंच लक्षण होय आणि मराठी राष्ट्राच्या ऐन सुरवातीस त्यास जो गडबडीचा काळ आला त्यावेळीं लोकोद्धाराचें पवित्र कार्य टाकून जर आमचे ज्ञानोबा, आमचे एकनाथ, व आमचे तुकाराम "मम जिवाची प्रियकरिणी" करीत बसले असते तर राष्ट्राची भयंकर हानि झाली असती ह्यांत संशय नाहीं. एकनाथ, तुकाराम, ज्ञानेश्वर ह्यांना हातांतल्या काठीवर अथवा एखाद्या तरण्याताठीवर कविता करितां आली नसती असें जर कोणाचें म्हणणें असेल तर ती चूक आहे, कारण ज्या महापुरुषांना अध्यात्मासारख्या गूढ विषयावरसुद्धां छन्दोरचना करून वाचकांचें अन्तःकरण गदगद हालवितां आलें त्यांना जोरानें वाहणाऱ्या ओढ्यावर अथवा मुसळधार पडणाऱ्या सरीवर काव्य रचतां आलें नसतें असें म्हणणें अत्यंत असमंजसपणाचें आहे. हे गूढ ज्ञानाचे दीप, हे राष्ट्र-कर्तव्यांचे मेरुमणि, हे अगाध विश्वप्रेमाचे सागर, कवितांची जुळणी करूं शकले नसते असें कसें म्हणतां येईल? परंतु 'कवि' होण्यापेक्षां फार उदात्त कर्तव्यक्षेत्र त्यांनीं आपलेपुढें ठेवलें. त्यांनीं राष्ट्राचा संसार अंगावर घेतला. त्यांनीं राष्ट्राची चिंता पाठीवर वाहिली. ह्यांच्यापुढें कवींचें अल्पतेज तें किती? कवि हे कितीही थोर असले तथापि ते राष्ट्राचे अलंकार होत, राष्ट्राचे प्राण नव्हत हें कबूल केलेंच पाहिजे. विचारकर्ते, उद्धारकर्ते, सुस्थितिकर्ते हे देशाचे प्राण होत. आमचे ज्ञानेश्वर-तुकाराम ह्याच कोटींपैकीं होते. राष्ट्र आपल्या पायांवर उभें असलें ह्मणजे त्यास अलंकार ज्यास्त शोभा देत असतात. परंतु राष्ट्रास अलंकार चढविणाऱ्यापेक्षां राष्ट्रास त्याच्या पायांवर उभे करणारे महात्मे हे निःसंशय श्रेष्ठ ठरलेच पाहिजेत. शेक्सपियरविषयीं इंग्लण्डमधील लोकांना अत्यंत अभिमान आहे. एकानें एकदा असेंही ह्मटलेलें होतें कीं प्रसंग आला तर आह्मी साम्राज्यसुद्धां गमावूं परंतु आपला शेक्सपियर आह्मी कधींही गमावणार नाहीं. शांततेच्या वेळच्या त्या गर्वोक्ति वेजावाबरच्यिा असतात हें सध्यांच्या प्रसंगी उत्तम रीतीनें दिसून येणार आहे. सध्यां इंग्लण्डचे लोकांना जर असा प्रश्न विचारला कीं बोला, तुह्मांला तुमचा शेक्सपियर-मिल्टन पाहिजे, कीं लॉर्ड किचनर आणि लॉइड

जॉर्ज पाहिजे, तर ते ह्मणतील कीं पहिली जोडी जरी आणखी दोन शतकांनीं आह्मांला मिळाली तरी हरकत नाहीं, परंतु आमचे किचनर व लॉइड जॉर्ज ह्यांना आमचे पासून दूर नेऊं नका. उद्यां जर्मन् लोकांच्या तीसमैली तोफा सुटूं लागल्या असतां त्यांचेपुढें जर रोमिओ आणि ज्यूलियटच्या पुस्तकांची रास घातली तर शत्रु पळून जाईल काय? अशा वेळीं शेक्सपियर काय उपयोगी पडेल? अशा वेळीं लॉइड जॉर्ज व किचनरच उपयोगी पडतील व त्यांच्या बत्तीस मैली तोफाच शत्रूचें धाबें दणाणून टाकतील. कवि श्रेष्ठ झाले म्हणून त्यांच्या गुणांची अतिशयोक्ति गाण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कवि हे नाकांतील नथा आहेत, खुद्द नाक नव्हेत. राष्ट्र-कर्ते पुरुष हेच राष्ट्राचें नाक होत आणि ज्या राष्ट्रांत राष्ट्रकर्ते पुरुष ज्यास्त उत्पन्न होतात त्याच राष्ट्राचें नाक वरतीं रहातें. आम्हांस अत्यंत अभिमान वाटतो कीं महाराष्ट्राच्या संकटयुगांत तुकाराम–ज्ञानेश्वर–रामदासादिकांनीं राष्ट्रोद्धार करण्याचा विडा उचलला, ‘ कवि ’ म्हणवून घेण्याचा अट्टहास केला नाहीं. त्यांच्या हातून काव्य निर्माण झालेंच असेल तर तें सहज लीलेनें झालें, हेतुपूर्वक झालें नाहीं. ते ज्ञानी ह्या अर्थानें ‘ कवि ’ होते, काव्य–विरचक ह्या हेतूनें कवि नव्हते. महाराष्ट्राचे खरे कवि, रामजोशी–परशुराम आनंदफंदी इत्यादिक होत. मराठी काव्याची प्रभात म्हणजे त्यांचाच काल होय. त्या प्रभाताचा अजून दिवस व्हाव-याचा आहे; अजून महाराष्ट्राला भाग्योदयाचे दिवस यावयाचे आहेत; अजून महा-राष्ट्राचा कीर्ति–सूर्य मध्यान्हीं चढावयाचा आहे. त्या कीर्तिसूर्यास आम्ही आगाऊच वन्दन करतों व अशी अपेक्षा करितों कीं—

**ध्वान्तं क्वापि निलीनमम्बरमणि—**
**र्व्योमाग्रमारोहति ।**

---

# कै. अच्युतराव कोल्हटकरांचें एक महत्वाचें पत्र.*

डॉ. आंबेडकरसाहेब यांस—

माझा निरोप आपण सर्व अस्पृश्य बांधवांस कळवाल या आशेनें मी हें पत्र आपणांस लिहीत आहें. हिंदुधर्मांत अस्पृश्यता उत्पन्न होऊन हिंदु–धर्माच्या

* मौज ता. २२ जुलई १९३१

एकंदर औदार्यास विनाकारण संकुचितपणा आलेला आहे ही गोष्ट स्पष्ट, निःसंशय आहे; त्याचप्रमाणें हिंदुधर्मांतच काय, पण जगांतील कोणत्याही धर्मांत अथवा समाजव्यवस्थेंत कृत्रिम उच्चनीचता आणि अधिकाराची कृत्रिम वांटणी नसावी हेंच खरें आहे. अस्पृश्यता नाहींशी करण्यासाठीं आतांपर्यंत राष्ट्रांत जे जे प्रयत्न झाले, त्यांत 'अस्पृश्य' वर्गास ज्ञानाचा लाभ करून देणें, त्यांस धार्मिक अधिकार पूर्णपणें अर्पण करणें, व त्यांच्याशीं अन्नपानादि सर्व व्यवहार समानत्वाच्या दृष्टीनें करणें हे मुख्य प्रकार आहेत. आणि या सर्व प्रकारांस मी आपली संमति वेळोवेळीं शब्दांनीं व कृतीनेंही दाखविलेली आहे. "अस्पृश्य"ता–निवारणासाठीं कांहीं विवक्षित योजना अंमलांत आणावी, हा माझा विचार होता, व तशी योजना मी ठरवूनही ठेविलेली होती. सध्यांच्या तुरुंगवासांतून मुक्त झाल्यानंतर मी ती योजना सर्व महाराष्ट्रीय समाजापुढें व हिंदुस्थानांतील इतर जनतेपुढें विचारासाठीं मांडणार आहें. अस्पृश्यता नाहींशी करण्याचे जे मार्ग सध्यां चालू आहेत, त्यांपैकीं नाशिक येथें चाललेला सत्याग्रह मला पूर्णपणें सम्मत आहे. आणि माझी सर्व स्पृश्यवर्गास अशी कळकळीची विनंति आहे कीं, हिंदुधर्मांतील प्रत्येक व्यक्तीस देवमंदिरांत जाण्याचा जो हक्क आहे, तो त्यांनीं अस्पृश्यांस तावडतोब दिल्यावांचून राहूं नये.

ज्या राष्ट्रीय चळवळीचा अंगीकार हिंदुस्थाननें सध्यां केलेला आहे, त्या राष्ट्रीय चळवळीच्या हिताचे दृष्टीनें हिंदु धर्मांतील सर्वांनीं एक होऊन खरोखरच सख्या भावांप्रमाणें एकमेकांवर प्रेम करूं लागणें अत्यंत इष्ट आहे. हिंदु तेवढा एक झाल्यानेंच हिंदुस्थानच्या राष्ट्रीय चळवळीस लवकर यश येईल. मंदिरप्रवेशाचा प्रश्न आपण सत्याग्रह वगैरे मार्गांनीं सोडविण्याचें आपल्या अंगावर घेतलेलें आहे, त्यांत मी आपणांस यश चिंतितों. माझी आणखी अशीही सूचना आहे कीं हा प्रश्न सोडविण्यासाठीं प्रत्येक गांवांत एक नवीन मंदिर बांधावें व तें श्रीशिवाजीमहाराजांचें असावें. आणि सुरुवातीपासूनच त्यांत सर्व समाजांना सारखे हक्क ठेवावे. याप्रमाणें एकीकडून जुन्या समजुती सुधारण्याचा प्रयत्न व दुसरीकडून हिंदुसमाजांत राष्ट्रीय चेतना उत्पन्न करण्याचा नवीन प्रयत्न या दोहींची जोड उत्पन्न झाल्यास आपल्या कार्याला जास्त वेगानें सिद्धि प्राप्त होईल. कॉंग्रेसचें उदाहरण पुढें ठेवून सर्व हिंदु समाजाची कॉंग्रेस जर दरवर्षी भरवली जाईल आणि राष्ट्रीयसभेचा ज्याप्रमाणें अध्यक्ष नियुक्त करतात त्याचप्रमाणें दरवर्षी हिंदुसमाजानें आपला पुढारी मताधिक्यानें ठरवून एक वर्षपर्यंत त्याचा सर्व समाजावर अधिकार असावा, अशी

व्यवस्था केल्यास सध्यां शंकराचार्य वगैरे संस्थांना जें विकृत स्वरूप आलेलें आहे, तें नाहींसें होऊन हिंदुसमाजाचा पुढारी होण्याची शक्यता प्रत्येक जातीमध्यें उत्पन्न होईल आणि अशा रीतीनें हिंदुसमाजाची एकी व प्रगति होण्याचा मार्ग सुकर होईल. तेव्हां या दोन गोष्टी, विशेषतः श्रीशिवाजीमहाराजांच्या मन्दिराची कल्पना, आपणांपुढें ठेवलेल्या आहेत. या कार्यासाठीं पूर्वी श्रीशिवाजीमहाराजांच्या त्रिशतसांवत्सरिक उत्सवासाठीं चाललेल्या चळवळींत मी अंतःकरणपूर्वक खटपट केली, त्याप्रमाणें चोहोंकडे दौरा काढण्याचा माझा विचार होता, परंतु तो आतां कालांतरावर टाकणें अवश्य झालेलें आहे.

मी स्वतः राउण्डटेबलला अनुकूल नाहीं हें मी जाहीर रीत्या प्रकट केलेलेंच आहे. दुसऱ्याजवळ याचना करून कांहीं एक मिळणार नाहीं. जें काय मिळेल, तें स्वतःच्या ऐक्याच्या किंवा शहाणपणाच्या बळावर मिळेल अशी माझी समजूत आहे आणि त्यामुळें राउण्ड टेबलकरतां झालेल्या प्रयत्नांचें मला कौतुक वाटत नाहीं. तथापि आपण राउण्ड टेबलमध्यें जाऊन काय काम करतां याबद्दल इतरांच्याप्रमाणें माझेंही आपल्या भाषणाकडे व चळवळीकडे लक्ष होतेंच. परंतु आपण लंडनमध्यें ज्या कांहीं गोष्टी केल्या, त्यांत आपला विचारीपणा व समंजसपणा दिसून आला, हें मला आज आनंदानें नमूद केल्यावांचून राहवत नाहीं. अस्पृश्य समाज आपल्या पुढारीपणाखालीं जर राजकीय चळवळींत अग्रेसर झाला असता, आणि आपण राउण्ड टेबलला जाण्याचे ऐवजीं जर महात्मा गांधी आणि पंडित जवाहिरलाल नेहरू यांचेबरोबर तुरुंगांत गेलां असतां तर अस्पृश्यता फारच लवकर नाहींशी होऊन नुसत्या मंदिरप्रवेशालाच काय, पण रोटीव्यवहार व बेटीव्यवहारालाही पुष्कळांच्या मनांत हरकत उरली नसती ही माझी खात्री आहे. आतांपर्यंत त्याच दिशेनें प्रयत्न न झाल्याकारणानें अस्पृश्य वर्गानें एक मोठी संधि गमावली असें माझें मत आहे. तथापि आपण या विषयावर विचार करून आपलें सुकाणूं लंडनच्या दिशेनें फिरवण्यापेक्षां जर राष्ट्रस्वातंत्र्याच्या दिशेनें फिरवाल तर अजूनही अस्पृश्य समाजास लाभ झाल्यावांचून राहणार नाहीं. कारण सध्यांचा हा स्वराज्याचा लढा १०।५ महिन्यांत मिटणारा नसून तो १०।५ वर्षे तरी चालेल असें दोन्ही पक्षांच्या बलाबलावरून वाटतें. तेव्हां अजूनही ह्या संधीचा फायदा घेण्यास अस्पृश्य समाजास पूर्ण अवसर आहे.

आपला,

**अच्युत बळवन्त कोल्हटकर**

# भीष्म पितामह. *

ज्या राष्ट्राला भूतकाल नाहीं त्याला भविष्यकालहि शक्य नाहीं, अशी एक म्हण व्यवहारांत वरीच प्रचलित झाली आहे. ही गोष्ट आमच्या मतें अक्षरशः खरी नाहीं; कारण तेजस्वी भूतकाल नसूनहि एखाद्या राष्ट्राला देदिप्यमान भविष्यकाल प्राप्त करून घेतां येणें अशक्य मानल्यास पुरुषप्रयत्नांची मातब्बरी राहणार नाहीं. तरीसुद्धां ज्या राष्ट्राला अभिमानास्पद भूतकाल आहे, त्या राष्ट्राला उज्वल भविष्यकाल प्राप्त होणें कठीण नाहीं असें, तिचें स्वरूप मर्यादित केल्यास, व्यावहारिक सत्य म्हणून मान्य करण्यास अडचण पडणार नाहीं. सुदैवानें या म्हणीच्या प्रचलित स्वरुपाच्या दृष्टीनेंहि हिंदुस्थानांत कोणास निराशा वाटण्याचें कारण नाहीं. हिंदुस्थानास अभिमानास्पद भूतकाल लाभलेला आहे. हिंदुस्थानचा वर्तमानकालहि आशाजनक आहे, आणि उज्वल भविष्यकाळाचीं प्रभातकिरणें हिंदुस्थानच्या क्षितिजावर डोकावूं लागलेलीं आहेत. जित राष्ट्रांतहि जेत्यांस कांहीं कांहीं गोष्टी तरी शिकविण्याची लायकी असणें हें त्या राष्ट्राच्या जिवंतपणाचें उत्कृष्ट प्रत्यंतर होय. सांप्रतच्या आमच्या आंग्ल प्रभूच्यापूर्वी हिंदुस्थानच्या मध्यंतरीच्या पडत्या काळांत ज्या ज्या ग्रीक, पर्शियन, तार्तर, मोंगलादि राष्ट्रांनीं हिंदुस्थानावर स्वाऱ्या केल्या व मधून मधून आधिपत्यहि गाजविलें, त्या त्या सर्व राष्ट्रांस हिंदुस्थानापासून अनेक गोष्टी शिकावयास सांपडल्या आहेत. धर्म, गणित, वैद्यक वगैरे अनेक शास्त्रें येथूनच प्रथम यूरोपांत जाऊन नंतर त्यांचें तेथें अलिकडील काळांत विशेष परिपोषण झालें, ही गोष्ट आतां इतिहास-संशोधकांस मान्य होत चालली आहे. पण ही झाली पूर्वजांची कीर्ति. वर्तमान परिस्थितींतील मर्यादित क्षेत्रामध्येंहि हिंदुस्थान आपलें डोकें हळुहळु वर काढूं लागलें आहे व दिवसेंदिवस तें पाश्चात्य राष्ट्रांपासून आम्हांस प्राप्त होत असलेल्या ज्ञानाचा अधिकाधिक भरपूर मोबदला त्यास देण्यास समर्थ होत जाईल यांत शंका नाहीं. सारांश, आमचा वर्तमानकालहि आशाजनक दिसत आहे व हिंदुस्थानाला भूतकाल मुळींच नसता तरी केवळ वर्तमान काळाच्या जोरावर उज्वल भविष्यकाळाची अपेक्षा आम्ही करणें कोणत्याहि तऱ्हेनें अवाजवी ठरलें नसतें. पण हिंदुस्थानच्या सुदैवानें या राष्ट्राचा भूतकाल, जगांतील दुसऱ्या कोणत्याहि विद्यमान व

* संदेश ता. ११ फेब्रुवारी १९१६.

अविद्यमान राष्ट्रापेक्षां पुरातन आहे. एवढेंच नाहीं, तर तो सर्वस्वी अभिमानास्पद असल्याचें, आम्हींच जुनें तें सोनें अशा प्रेमातिशयाच्या भावनेनें म्हणतों असें नाहीं. प्रो. मॅक्समुल्लरादि अनेक थोर थोर पाश्चात्य विद्वान ग्रंथकारांनींहि ही गोष्ट प्रांजलपणें कबूल केली आहे.

हिंदुस्थानच्या हजारों वर्षांच्या दीर्घ भूतकालास स्पृहणीय व अभिमानोत्पादक पद प्राप्त करून देण्यास ज्या अनेक विभूती कारणीभूत झाल्या आहेत त्यांत भीष्म पितामहांची योग्यता फार श्रेष्ठ दर्जाची आहे. सर्व हिंदुस्थानांत प्रांतभाषादि दुस्तर भेदांस न जुमानतां ज्या महाभारत ग्रंथश्रेष्ठाचा उपयोग होत आहे, त्या महाभारतांतील भीष्म पितामह ही एक उदात्त विभूति होय. भगवान श्रीकृष्ण आणि पितामह भीष्म हीं महाभारतांतील दोन चरित्रें परस्परपूरक स्वरुपाचीं आहेत हें, या दोन्ही चरित्रांचें सूक्ष्म अवलोकन केलें असतां, कोणाच्याहि लक्षांत सहज येणार आहे. त्यांच्या सद्‌गुणस्वरूपांतील भिन्नतेचें व परस्पर पोषकतेचें शक्य तितकें यथार्थ वर्णन करावयाचें तर विद्युत्‌शास्त्रांतील परिभाषेचा अंगीकार करून असें म्हणतां येईल कीं, भगवान श्रीकृष्ण हे महाभारतांतील धनविद्युत होत आणि पितामह भीष्म हे ऋणविद्युत होत. महाभारताइतकें शोकपर्यवसायी नाटक अद्याप निर्माण झालेंच नाहीं असें म्हटलें तरी चालेल. तें शोकपर्यवसायी होण्याचें मुख्य कारण म्हणजे ज्या विभूती वास्तविक परस्परपूरक असावयाच्या त्या भारतीय युद्धांत परस्पर विरुद्ध उभ्या राहिल्या हेंच होय. हा खडतर योग प्राप्त होण्यास देवव्रताची जी भीष्मप्रतिज्ञा मुख्यतः कारणीभूत झाली ती प्रतिज्ञा करण्याच्या कामीं, प्रो. दिवेकर यांच्या मताप्रमाणें 'भीष्माची भयंकर भूल' झाली किंवा कसें, या प्रश्नाच्या भानगडींत न पडतां, आम्ही एवढें खास सांगू शकतों कीं, भीष्माचार्यांच्या विलक्षण चरित्रापासून तरुण पिढीस अनेक सद्‌गुण शिकतां येण्याजोगे आहेत.

भीष्माचार्यांच्या चरित्रांत–भीष्म या नांवास शोभेल असा प्रारंभच अत्यंत उदात्त अशा स्वार्थत्यागानें झाला आहे. पित्याच्या सुखाकरितां आजन्म ब्रह्मचर्य पाळण्याची देवव्रतानें जी भीष्मप्रतिज्ञा केली, तीविरुद्ध 'सुख असेल त्यांस त्यांत । परि अमुचें मात्र मरण ॥' ही 'शारदे'ची रास्त तक्रार लक्षांत घेऊनही आम्हीं असें म्हणतों कीं, भीष्माचार्यांनीं या प्रसंगीं दाखविलेला विलक्षण स्वार्थत्याग, व पुढें आमरण प्रतिज्ञापालनांत प्रकट केलेला दृढनिश्चय हे दोन्ही गुण तरुणपिढीस केवळ आदर्श-

भूत आहेत. एखादी गोष्ट समाजांत सरसहा रूढ होणें जरी इष्ट नसलें, तरी तेवढ्यामुळें व्यक्तिगत सद्‌गुणांस अमान्यता ठेवणें अथवा त्यांची किंमत कमी मानणें कोणत्याहि दृष्टीनें वाजवी ठरणार नाहीं. या प्रतिज्ञेमुळेंच भीष्माचार्यांच्या आयुष्यांत पुढें दोन महत्त्वाचे प्रसंग उद्भवले. पहिला प्रसंग म्हटला म्हणजे गुरु भार्गवराम यांस, अंबेचा पक्ष उच्च असल्यामुळें व गुरुत्वाचें नातें पुढें आणून त्यांच्या अंगीकृत तत्त्वावर धाड आणिल्यामुळें, गुरूबद्दल सर्वस्वीं पूज्यबुद्धि असूनही, तत्त्वाकरितां गुरूशीं अहोरात्र सत्तावीस दिवस दारुण युद्ध करावें लागलें तो होय. पित्याकरितां ते स्वसुखावर पाणी सोडायला तयार झाले, पण पित्यासमान अथवा पित्याहूनहि अधिक श्रेष्ठ सांगितलेल्या गुरूकरितां तत्त्वाचा त्याग करण्याचें मात्र त्यानीं साफ नाकारिलें व एकवीस वेळ ज्यानें पृथ्वी निःक्षत्रिय केली त्या भार्गव-रामाशीं युद्ध करण्याच्या भीतिप्रद प्रसंगांत, त्यांनीं अत्यंत निर्भय चित्तानें तोंड दिलें. त्यांचा सत्पक्ष होता व सत्पक्षास ईश्वरी इच्छा व पुरुषप्रयत्न यांचा संयोग होऊन यशहि आलें. सत्पक्ष झाला तरी ईश्वर प्रयत्नशील पुरुषांसच यश देतो, हें विसरतां कामा नये. भारतीय युद्धाचे प्रसंगीं त्यांजवर मोठाच प्रसंग गुजरला. आजच्या येथील उत्सवाचे अध्यक्ष रा. ब. चिंतामणराव वैद्य यांच्या मताप्रमाणें, ऐतिहासिक दृष्ट्या कुरु व पांडव हीं दोन भिन्न भिन्न राष्ट्रें मानलीं तर कोणत्याही कारणानें कां होईना, युद्ध उपस्थित झालें असतां देहांत प्राण आहे तों स्वराष्ट्राच्या वतीनें लढणें हें तर आधुनिक राष्ट्रीयत्वाच्या कसोटीनें त्याचें कर्तव्य ठरतेंच. पण कुरु व पांडव हे एकाच वंशांतील बांधव होते, या प्रचलित कल्पनेप्रमाणें पाहिलें तरी भीष्मा-चार्यांनीं स्वीकारलेल्या मार्गाचें उदात्त स्वरूप सर्वस्वीं प्रशंसनीय ठरतें. आपल्या प्रतिज्ञे-प्रमाणें कुरुवंशाचे गादीवरील स्वतःचा हक्क तर त्यांनीं सर्वस्वीं सोडून दिला होताच पण शिवाय गादीवरील पुरुषास कोणत्याहि तऱ्हेनें विरोध न करितां त्याचें सहाय्य करण्यासहि आपणांस बांधून घेतलें होतें. भारतांतील वर्णनाप्रमाणें दुर्योधनाचे वर्तनास आळा घालण्याचें सामर्थ्य असूनहि ही प्रतिज्ञाच शेवटपर्यंत त्यांचे आड आली असें दिसतें. तें कसेंहि असो. नातवांचा हा तंटा जेव्हां विकोपास जाऊन भारतीय युद्ध उत्पन्न झालें, त्यावेळीं त्याचा आपल्यापुरता निकाल लावण्यांत त्यानीं पुनः स्वार्थत्याग प्रकट केला यांत संशय नाहीं. ते इच्छामरणी होते या गोष्टीवर अक्षरशः विश्वास ठेवण्यांत, आधुनिक काळांत जरी फारसा कोणी धजावणार नाहीं, तरी त्या विशेषणाचा सरळ अर्थ एवढाच दिसतो कीं, त्या काळांतील अजिंक्य, त्रैलोक्यवीर व अतएव अमर

पुरुष जो भार्गवराम, त्याचाहि पराभव करण्याचें त्यांस सामर्थ्य असल्यामुळें, त्यांस जिंकणारा वीर त्यावेळीं कोणी नव्हता, म्हणून त्यांची स्वतःचीच तशी इच्छा असल्याशिवाय त्यांस त्यावेळीं युद्धांत शत्रुवीराकडून मरण येण्यासारखें नव्हतें, एवढाच या विशेषणाचा अर्थ दिसतो. असें मानिल्यास प्रतिज्ञेप्रमाणें जीवांत जीव आहे तों लढण्याच्या कर्तव्यास पाठ न देतांहि ‘जिकडे वपु तिकडे मन’ या मोदक सिद्धांतास बळी न पडतां, आपल्या मरणाचें मर्म धर्मराजास सांगण्यांत त्यांनीं दाखविलेला स्वार्थत्याग केवळ लोकोत्तर होय, यांत शंका नाहीं. धर्माचे जड व चेतन असे दोन भिन्न भाग करून दोहोंच्याहि कात्रींत सांपडलेल्या माणसाची स्थिति आपल्या सरस्वतिचंद्र या पुस्तकांत श्रीयुत गोवर्धनराम यांनीं कुमुदसुंदरीच्या तोंडून वदविलेल्या ‘शरीर सद्धर्मी वश राहे। जड तें जड संग’ या उद्गारांत फारच मार्मिकतेनें वर्णिली आहे. भीष्माचार्यांच्या आचरणांतहि हाच मार्मिक सूक्ष्म भेद दिसून येतो. त्यांची इच्छा सिद्धीस गेली असती, तर त्यांच्या स्वार्थत्यागाचें चीज झालें असतें; पण तसें घडलें नाहीं याचा दोष कांहीं त्यांच्यावर येऊं शकत नाहीं. भीष्माचार्य हे केवळ लोकोत्तर स्वार्थत्यागी अद्वितीय होते एवढेंच नाहीं तर ते विख्यात राजनीतिशास्त्रज्ञहि होते. युद्धपर्वांतील भीष्माचार्यांस शांतिपर्वांतील भीष्माचार्यांची जोड दिली म्हणजे शतपट अधिक महत्त्वाचें त्यांचें चरित्र आपल्या दृष्टीपुढें उभें राहातें. महाभारतांत गीतेच्या खालोखाल महत्वाचा दुसरा भाग म्हणजे शांतिपर्वच होय. आणि भारतांत भगवान् श्रीकृष्णांच्या खालोखाल सर्वांस पूज्य व वंद्य विभूति म्हणजे भीष्म पितामहच होत. श्रीकृष्णचरित्राबरोबरच भीष्मचरित्रांतील रहस्याचेंहि उद्घाटन होणें अवश्य आहे. प्रतिज्ञापरिपालन, आजन्म ब्रह्मचर्य, लोकोत्तर स्वार्थत्याग, अलौकिक बुद्धिमत्ता इत्यादि सद्गुणांचें भांडारच अशा भीष्मचरित्राचें तरुण पिढीकडून अधिकाधिक अध्ययन व अनुकरण होणें अवश्य आहे. भगवान् श्रीकृष्ण व पितामह भीष्म हीं आम्हीं प्रारंभींच म्हटल्याप्रमाणें महाभारतांतील दोन प्रमुख चरित्रें होत. हीं एकत्र न येतां भिन्न राहिल्यामुळें महाभारत व त्याबरोबरच भारतवर्ष दुःखपर्यवसायी झालीं आहेत. हीं दोन्हीं परस्परपूरक अंगें एकत्र आणणें हेंच भारतवर्षाच्या अभ्युदयाचें रहस्य होय. आणि म्हणूनच पाठारे प्रभु प्रोग्रेसिव्ह असोसिएशननें भीष्माष्टमीचा उत्सव सुरू करून त्यास दिवसानुदिवस अधिकाधिक लोकप्रिय स्वरूप देण्याचा जो प्रयत्न चालविला आहे, त्याबद्दल आम्हीं सदर संस्थेच्या चालकांचें मनःपूर्वक अभिनंदन करितों.

# तमीळ भाषा

[ श्रीयुत **वी. विश्वनाथन्**, बी. ए. चेन्नै, मद्रास. ]

**" आत्तिचुडि अमरंद् देवनै**
**एत्ति एत्ति तोळुवोम् योम "**

महाराष्ट्रांतील सुधातुल्य सारस्वताचें आकंठ सेवन करण्यास चटावलेल्या 'मनोरंजन'चे वाचकांस आमच्या 'तमोग्रासित' व 'प्रत्यग्रस्थित' इलाख्यांतील सारभाताची गोडी लागणार नाहीं, हें आम्हीं जाणून आहों; परंतु श्रीमंत लोकांनांसुद्धां गरिबाच्या झोंपडीची थोडीशी कल्पना असावी लागते; किंबहुना चोवीस तास श्रीमंतींत लोळण्याचा वीट आल्यामुळें कित्येक गुलहौशी श्रीमंत लोक मुद्दाम दारिद्र्यानुभवाचे गोड 'एक्सपेरिमेंन्ट 'हि घेत असतात. आमच्या तमीळ भाषेनें आपल्या महाराष्ट्र-भाषेपुढें आपली प्रभा फांकविण्याइतकी तिच्या अंगांत कदाचित शक्ति नसली तरी तिचें आणि महाराष्ट्रभाषेचें जें भगिनीत्वाचें नातें आहे तें कधींच अस्तित्वांतून जाणें शक्य नाहीं; आणि असें जोंपर्यंत आहे तोंपर्यंत तमीळ भाषेनें महाराष्ट्र भाषेच्या मंदिरांत कधीं कधीं प्रवेश केला तर तो तिचा अक्षम्य अपराध आहे असें कोणासहि म्हणतां येणार नाहीं. तमीळ आणि मराठी ह्या सख्ख्या वहिणी आहेत असें आम्हीं आजपर्यंत केवळ स्थलैक्याच्या नात्यानेंच समजत होतों; परंतु मराठी व तदनुषक्त ज्या इतर औदीच्य भाषा आहेत त्यांच्याशीं जसजसा आमचा जास्ती परिचय होत गेला, तसतसा आमचा हा समाज भाषाघटनेच्याहि दृष्टीनें दृढ होऊं लागला व आज देशकुटुंबित्वाची जी कल्पना इतके दिवस केवळ आमच्या सुखकर भावना-कोशांतच होती ती तत्वतःसुद्धां खरी असावी असें आमच्या प्रत्ययास बऱ्याच अंशांनीं आलेलें आहे.

तमीळ भाषेला महाराष्ट्रीय लोक जरी कदाचित् सारभातच समजत असले, तरी आम्ही तमीळ लोक आमच्या भाषेचे फारच अभिमानी आहों ! आमच्या भाषेला नांवें ठेविलेलीं आम्हांस मुळींच खपत नाहींत; व खरोखर ज्यानें स्वतः प्रेरणेनें

* अच्युतरावांनीं मद्रास येथें रहात असतांना टोपण नांवानें लिहिलेला लेख. मनोरंजन सप्टेंबर १९११

आपल्या जन्मभाषेशिवाय दहापांच दुसऱ्या भाषांचें अध्ययन केलें असेल त्याला कोणत्याहि भाषेची अवहेलना करावी असें कधींहि वाटणार नाहीं. ज्याप्रमाणें घरोघरीं मातीच्या चुली आहेत, त्याचप्रमाणें घरोघरीं पाकसिद्धीहि आहे व गरीबांच्या घरीं श्रीखंड–जिलब्यांचीं आधणें जरी वर्षानुवर्षे पडत नसलीं तथापि गरीबांच्या चुलींच्या अंगीं श्रीखंड–जिलबी करण्याचें सामर्थ्यच नाहीं, असें म्हणणें चुकीचें आहे. किंबहुना आमटी–भाकरी शिजविणाऱ्या चुली आपल्या मालकांच्या शरीरांचा जितका शक्तिपोष करितात तितका श्रीखंड–जिलबी रांधणाऱ्या चुली करितात कीं नाहीं, ह्याचा आम्हाला संशयच आहे. आमच्या तमीळ भाषेनें शूरांच्या रसनाग्रीं, राजकार्य–धुरंधरांच्या धोरणबाज खलित्यांत, समरश्रांत भूपतींच्या तहनाम्यांत, व्यवहारकुशल व्यापारीवर्गाच्या पत्रलेखनांत अथवा वाग्मिवीरांच्या भाषणचमत्कारांत आपलें स्वामित्व गाजविण्याचें जरी सोडून दिलेलें असलें, तथापि गरीबांच्या झोपडींत, विद्वानांच्या सहेल संभाषणांत, नित्य जरूरीच्या भाजी 'मार्केटांत' आणि संवगड्यांच्या निष्कपट क्रीडाकौतुकांत तिनें आपला निर्बाध संचार कायम ठेवलेला आहे. आणि सर्वांत अतिशय महत्वाची गोष्ट म्हणजे ही कीं, तमीळ देशांत जन्म घेतलेल्या अर्भकांच्या कानांवर ह्या मर्त्य भूमीतील मानवी वाणीचा जो प्रथम उच्चार येऊन पडतो तो तमीळ भाषेंतीलच असतो. आमच्या मातेनें आपल्या वाणीनें परिपूत केलेली जी तमीळ भाषा तिचा आम्हांला कसा विसर पडेल ? आणि ती चांगली नाहीं असें कोणीं म्हटल्यास आम्हांस कसें खपेल ?

आम्ही आमच्या भाषेचे इतके तीव्र अभिमानी असल्यामुळेंच आम्ही तिला 'तमीळ' म्हणजे 'गोड' असें नांव दिलेलें आहे. आम्ही लहान असतांना आमच्या 'गोड' आईनें, आम्हाला रांगतांना पाहून हात पुढें करून, ज्या 'इंगे वा' (इकडे ये–हिके ये) ह्या गोड शब्दांनीं आम्हांला पालविलें, तीं आमच्या मातेच्या अधरस्फुरणानें पवित्र झालेली भाषा आम्हाला 'गोड' कशी वाटणार नाहीं ? संस्कृत लोक आपल्या भाषेस 'देववाणी' म्हणत असत; हिंदी लोक आपल्या भाषेस 'व्रजभाषा' म्हणजे सर्व जगाची भाषा (Language of the majority) असें म्हणतात; मराठीचे अभिमानी आपल्या भाषेस 'महाराष्ट्री' म्हणजे उच्चतम राष्ट्राची भाषा म्हणतात; मग आम्ही तमीळ 'वाल्या'-नींच आपल्या भाषेचे गोडवे कां गाऊं नयेत ? परंतु हे गोडवे गाण्यांत आम्ही

खोट्या मोठेपणांत अथवा पोकळ फुशारकींत मात्र शिरलों नाहीं, हीहि गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. आम्हांला तुमचे ‘ देव ’ हि नकोत, अथवा ‘ मोठें राष्ट्र’हि नको ! आम्ही फक्त आपल्या भाषेस ‘ मधुर ’ भाषा असें म्हणतों, आणि ती इतर लोकांनां कशीहि लागो, आम्हांला ती आमच्या सारभाताप्रमाणेंच मधुर लागते, ह्यांत संशय नाहीं.

परंतु आमची तमीळ भाषा नुसती मधुरच आहे, असें नाहीं. तिचा विस्तार, तिचें महत्त्व आणि तिचें ग्रंथवैभव हें इतकें मोठें आहे कीं, हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याहि भाषेशीं ती सहज स्पर्धा करूं शकेल. आम्ही आपल्या तोंडानें तिला ‘ मोठी ’ म्हटलें नाहीं म्हणून काय झालें ? तो आमचा विनय झाला; परंतु आमची तमीळ भाषा वस्तुस्थितिपूर्वक पहातां नुसती ‘ मधुर ’च नसून खरोखरीच फार मोठी आहे. मराठे लोक गेल्या दोनतीन शतकांत जेव्हां तरवार बहादुरकी करीत होते, तेव्हां ते अस्सल तमीळ मुलखांत आले नाहींत ही शोचनीय गोष्ट होय. नाहीं म्हणावयास श्रीशिवाजी महाराजांचे पुण्यचरण मात्र तंजावरापर्यंत लागले होते. मराठे मर्दांचा सर्व रोंख अटकेकडे होता, आणि म्हणून बंगाल, अयोध्या, पंजाब इकडील प्रांत दणाणून सोडण्याची जशी त्यांना हौस वाटत होती, तशी हौस त्यांना दक्षिणेकडील मुलुखगिऱ्यांत वाटत नसावी, असें दिसतें. हैदर, टिपू वगैरेंच्या धामधुमीमुळें, व निजामाच्या कारस्थानांमुळें मराठे लोक कानडी व तेलंगी मुलखांनां बरेचसे सरावले होते; पण तमीळ मुलखाशीं त्यांचा प्रत्यक्ष संबंध तंजावराखेरीज कधींच आला नाहीं, आणि त्यामुळें मराठे लोक व तमीळ लोक एकमेकांस जे अपरिचित राहिले ते आजपर्यंत तसे आहेत. तमीळ भाषा, तमीळ लोक व तमीळ रीतिरिवाज ह्यांची सध्यां महाराष्ट्रांत फारच थोडी ओळख असावी असें आम्हांला आलेल्या अनुभवावरून आणि थिऑसफी, कॉंग्रेस अथवा रामेश्वर ह्या निमित्तानें जे मराठे प्रवासी गृहस्थ इकडे येतात त्यांच्या संभाषणावरून दिसतें. एकदां एका महाराष्ट्रीय गृहस्थांनीं तर आम्हांला असें सांगितलें कीं, तमीळ नांवाची भाषा अथवा तमीळ नांवाचे लोक हिंदुस्थानांत आहेत अशी महाराष्ट्रांतील पुष्कळ ठिकाणीं कोणाला कल्पनासुद्धां नाहीं. त्यांचें असें मत दिसलें कीं, महाराष्ट्राची दक्षिण हद्द ओलांडली कीं, सर्व कानडी मुलूख ! मग त्यांत कोण तेलंगी व कोण दुसरे, तें तुमचें तुम्ही ओळखून घ्या. आतां ह्यांत अतिशयोक्ति आहे कीं, ही वस्तुस्थितिच आहे, हें आम्हांला सांगतां यावयाचें नाहीं; परंतु आमची माहिती

महाराष्ट्रास असो किंवा नसो, 'आम्हीं आहोंत' ह्यांत तिळमात्र शंका नाहीं व 'आम्ही आहोंत' एवढेंच नव्हे, तर 'आम्ही राष्ट्राच्या प्रेमाचे फार भुकेले आहोंत' हें 'मनोरंजना'चे मार्फत सर्व महाराष्ट्रीयांस आम्हीं विदित करितों.'

महाराष्ट्रांतून दक्षिणेकडे येतांना तुंगभद्रा नदी ओलांडली म्हणजे तमीळ मुलखाला सुरवात होते व तेथपासून तों तहत रामेश्वरापर्यंत तमीळ भाषेचाच मुलुख लागतो, असें म्हणावयास हरकत नाहीं. महाराष्ट्रापासून दक्षिणेकडे पश्चिमेच्या बाजूनें जी पट्टी जाते, तिच्या वरच्या भागांत कानडी व खालच्या भागांत मल्याळी भाषा आहे व निजामच्या राज्यांत सर्वत्र तेलंगी भाषेचा प्रचार आहे. गेल्या मनुष्यगणतींत मराठी भाषा बोलणारांची व तमीळ भाषा बोलणारांची संख्या साधारण सारखीच म्हणजे जवळ जवळ दीड दीड कोटी भरली; परंतु ह्याच आंकड्यावरून तमीळ भाषेच्या प्रचाराचा अजमास बांधणें बरोबर होणार नाहीं. कारण हिंदुस्थानाशिवाय ब्रह्मदेश, सीलोन, मलया द्वीपकल्प, पेनांग, हांगकांग, सायगांव, कोचीन, चायना व दक्षिण आफ्रिका ह्या सर्व प्रदेशांत तमीळ लोकांची अत्यंत मोठी वस्ती आहे, व ही सर्व लक्षांत घेतली म्हणजे हिंदीच्या खालोखाल अत्यंत प्रसार असलेली तमीळ हीच भाषा आहे, असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. हिंदी बोलणाऱ्या मनुष्यास सर्व उत्तर हिंदुस्थानांत कोठेंहि प्रवास करण्यास ज्याप्रमाणें अडचण पडत नाहीं, त्याचप्रमाणें ज्याला तमीळ समजतें, त्याला दक्षिण हिन्दुस्थानच नव्हे, तर दक्षिणेकडील सर्व विस्तीर्ण मुलखांत वाटेल तिकडे संचार करणें फार सोपें पडतें. दक्षिण आफ्रिकेंत गोरे वसाहतवाले आणि हिंदी रहिवासी ह्यांच्यांत जी लढत चाललेली आहे, ती सर्वांना महशूर आहेच; परंतु ह्या हिंदी रहिवाशांत, तेथील अपेष्टांचा भार सोसणारी तमीळ लोकसंख्याच जास्त आहे, हें स्वाभिमानपूर्वक सांगण्यास आम्हांस आनंद वाटतो. हिन्दुस्थानच्या बाहेर मुख्यत्वेंकरून आजपर्यंत गुजराथी व तमीळ ह्या दोनच भाषांनीं भरारी मारलेली आहे व त्यांत गुजराथी भाषेनें आपला मोर्चा पश्चिम दिशेकडे फिरविला असून तमीळ भाषेनें दक्षिण दिशा व्यापून टाकिली आहे.

तमीळ भाषेला महत्त्व येण्यास दुसरें बलवत्तर कारण असें आहे कीं, तमीळ भाषेंतील प्राचीन ग्रंथभांडार व प्राचीन विद्वत्त्व अगाध व अप्रतिम आहे. मराठी, गुजराथी, हिंदुस्थानी, बंगाली, गुरुमुखी, कानडी, तेलंगी वगैरे सर्व भाषांचा उगम अगदीं अर्वाचीन

काळीं झालेला आहे; परंतु तमीळ भाषा ह्या सर्वांहून अतिशय प्राचीन असून तिचा आरंभ कधींपासून झाला ह्यासंबंधानें अजून विद्वान् लोकांत एकमत झालेलें नाहीं. वर निर्दिष्ट केलेल्या भाषा कोणत्या शतकांत निर्माण झाल्या, त्यांच्यांतील आद्य ग्रंथ कोणते, त्यांचा प्रवाह कसकसा वहात गेला, वगैरे शोध सहज लावले गेले आहेत; परंतु तमीळ भाषेचें गूढ अजून कोणास उकललें गेलें नाहीं. संस्कृताच्या ज्या पोटभाषा आहेत, निदान ज्या संस्कृत काळांत उपलब्ध होत्या, मग त्या संस्कृतापासून निघालेल्या असोत कीं, त्या संस्कृताच्या जन्मदात्या असोत, त्यांचें आणि तमीळचें नातेंहि फारसें जुळवितां येत नाहीं. खिस्ती शकाच्या आरंभापासून तों आजतागायत तमीळ ग्रंथरचनेची प्रणालिका अव्याहत लागून गेली आहे, व इंग्रजी भाषेचें आगन्तुक महत्त्व जर कालांतरानें कमी होईल तर ही प्रणालिका आणखीहि अगणित कालापर्यंत टिकेल ह्यांत कांहीं संशय नाहीं. मराठी, गुजराथी, हिन्दी, बंगाली ह्या भाषांचीं व्याकरणें अगदीं अलीकडे तयार झालीं, व ह्या व्याकरणांतहि त्या त्या भाषांची पूर्वपरंपरा अगदीं सुटली गेली असून केवळ इंग्रजी व्याकरणांचे–कालदेशवर्तमानानुसार केलेले फरक वजा जातां–त्यांच्यांत केवळ दासवृत्ति ( Slavish ) अनुकरण झालें आहे. हिंदी, बंगाली, मराठी व गुजराथी वगैरे भाषांनां अजूनपर्यंत सुद्धां कवितावृत्तावर चांगल्याशा प्रमाणभूत ग्रंथाची उणीव आहे. संस्कृतांतील वृत्तें ‘ कॉपी टु कॉपी ’ उतरून घेतलीं कीं, कवितावृत्तावरचा ग्रंथ तयार झाला, अशीच वहुतकरून त्या विषयावर वरील भाषांतून ग्रंथ लिहिणारांची समजूत झालेली दिसते; परंतु वरील भाषांतून जो जी काव्यरचना झालेली आहे ती शेंकडा पाऊणशें हिश्यांनीं संस्कृत वृत्तांतून नसते हें ती कविता वरवर पहाणारास सुद्धां सहज दिसून येणार आहे. कलकत्त्यांतील एका नाटकगृहांत नाटक पहाण्यास वसलों असतांना तेथें म्हटलीं गेलेलीं गीतें कोणत्या वृत्तांतील आहेत असें आम्हीं एकदां आपल्या एका स्नेह्यास विचारलें. तेव्हां त्यांनी असें सांगितलें कीं, हीं वृत्तें पंडित लोकांनीं वृत्तविषयांच्या वाहेर ढकलून दिलीं असून त्यांचा हवाला पण्यांगना, गवई, नाटकवाले व नाचे लोक ह्यांच्याकडे सोंपविण्यांत आलेला आहे ! तमीळ भाषेची अशी शोचनीय अवस्था नाहीं. तमीळ भाषेला स्वतंत्र, स्वयंकृतीचें व स्वयंपद्धतीचें अतिशय प्राचीन असें व्याकरण आहे, व तिच्या मत्तहस्तिनीप्रमाणें उद्धत पदविन्यासांना तिच्या व्याकरणकर्त्यांनीं मोठ्या खुबीनें चुचकारून चुचकारून नियतसंचारी करून सोडलेलें आहे. व्याकरणाप्रमाणेंच तमीळ भाषेंत कोणत्याही

दुसऱ्या भाषेपासून उसनें न घेतलेलें असें अलंकारशास्त्र, वृत्तशास्त्र आणि नाटकशास्त्र आहे व संस्कृत सुभाषितरत्नभांडारालाहि लाजवील इतक्या प्राचीन व स्वतंत्र सुभाषितांचा तमीळ भाषेंत भरणा आहे. तमीळ देशाव्यतिरिक्त इतर प्रांतांत संस्कृत विद्येच्या अध्ययनांत ज्यानें पारंगतता मिळविली त्याला विद्वान अथवा शास्त्री असें म्हणण्याची वहिवाट आहे; परंतु आमच्या तमीळ देशांत जो तमीळ व्याकरण, तमीळ वेदांत व तमीळ काव्य इत्यादि शास्त्रांत प्रवीण झाला त्यालाच विद्वान् असें समजतात, व जरी ह्या विद्वानांनीं संस्कृत भाषेचेंहि अध्ययन बहुशः केलेलें असतें, तथापि ज्यांना संस्कृत विद्येचा गंधहि नाहीं असे तमीळ विद्वान् मुळींच दाखवितां येणार नाहींत, असें नाहीं. तमीळ विद्वानांची आमच्या तमीळ देशांत अत्यंत चहा आहे, व जरी इंग्रजी अंमलाच्या राज्यव्यवहारांत त्यांचे द्रव्यग्रह पूर्वीच्या इतके उच्चीचे राहिलेले नाहींत, तथापि त्यांच्यावरील समाजाची निष्ठा व त्यांचें समाजांत वजन ह्या बाबतींत अजून कोणत्याहि प्रकारें उणीव उत्पन्न झालेली नाहीं. तमीळ भाषेच्या ह्या खंबीर आधारस्तभांनीं तिला तिच्या पडत्या काळांतहि सांवरून धरिली आहे हे त्यांचे आमच्या तमीळ भाषेवर केवढे उपकार आहेत बरें !

ह्याच ठिकाणीं तमीळ भाषेसंबंधाच्या आणखी एका विशेषाविषयीं दोन शब्द लिहिणें जरूर आहे. हिंदुस्थानामध्यें सर्वत्र असा समज प्रचलित आहे, कीं हिंदुस्थानांतील सर्व भाषा–निदान हिंदु लोकांच्या बोलण्यांत येणाऱ्या सर्व भाषा–ह्या संस्कृत भाषेपासून प्रत्यक्ष निघालेल्या अथवा परोक्ष रीतीनें निगडित झालेल्या आहेत. हा समज सर्वथैव अस्थानीं आहे असें नाहीं. कारण हिंदुस्थानांतील बहुतेक भाषांसंबंधानें हा नियम खरा आहे; परंतु तमीळ भाषा मात्र ह्या नियमाला अपवाद आहे, ह्यांत संशय नाहीं. वर लिहिलेंच आहे कीं, तमीळ भाषेमध्यें ख्रिस्ती शकाच्या पूर्वीपासूनचेहि ग्रंथ आहेत आणि संस्कृत भाषेंतील वेदभांडार सोडून दिलें तर संस्कृत भाषेमधील व तमीळ भाषेमधील वाङ्मयांत निदान प्राचीनत्वासंबंधानें तरी फारशी तफावत आढळणार नाहीं. ग्रंथांसंबंधाच्या कालनिर्णयाची पद्धत पाश्चात्य पंडितांनींच प्रथम हिंदुस्थानामध्यें आणली, पाश्चात्य पंडितांनींच प्रथम एतद्देशीय वाङ्मयांतील ग्रंथांचे शक ठरविले व त्या दृष्टीनें विचार करण्याची संवय पाश्चात्य पंडितांनींच प्रथम आपल्यास लाविली. आपल्यांतील शास्त्रीपंडितांना विचारलें, तर त्यांना कोणताच ग्रंथ अर्वाचीन नसतो. एक दहा पांच पानांचें भिकार पुराण जरी घेतलें तरी आपल्या जुन्या शास्त्री-

पंडितांच्या मतानें तें लक्षावधी वर्षांचें जुनें असलेंच पाहिजे! कारण, तें कलियुग येणार असें पाहून ब्रम्हदेवाच्या विनंतीवरून श्रीशंकरांनीं पार्वतीस, अथवा सूतांनीं शौनकाप्रत कथन केलेलें असतें! संस्कृत पुराणांविषयींची ही जुन्या पंडितांची अभिमानवृत्ति तमीळ ग्रंथासंबंधानेंहि खरी आहे, आणि तमीळ पंडितांपुढें कोणताहि तमीळ ग्रंथ अलीकडचा असल्याविषयीं जर कोणीं गोष्ट काढली तर ते तितकेच क्रोधाविष्ट व परमतासहिष्णु होतात. आमच्या तमीळ पंडितांना कोणीं तमीळ ग्रंथांचा काळ विचारला तर वेद दहा हजार वर्षांचे जुने म्हणणारांनासुद्धां त्यांच्यापुढें हात टेंकण्याची पाळी येईल! आमच्या हिंदुस्थानांत ग्रंथांचीं आयुष्यें सर्व मोठीं मोठीं असतात; माणसांचीं आयुष्यें मात्र दिवसानुदिवस अल्प अल्प होत चाललीं आहेत! परंतु तमीळ ग्रंथ अत्यंत जुने आहेत ही गोष्ट सुदैवानें नुसत्या तमीळ पंडितांच्याच मतावर अवलंबून नाहीं; युरोपियन शोधक व इतर विद्वान् व मार्मिक भाषाशास्त्रवेत्ते ह्या सर्वांसहि ही गोष्ट आज निर्विवाद वाटूं लागली आहे. वाद फक्त एका मुद्यासंबंधानें आहे, आणि तो मुद्दा हा, कीं तमीळ भाषा ही संस्कृतावलंबी अथवा संस्कृतानुयायी आहे कीं नाहीं? ह्या मुद्यावर आजपर्यंत पुष्कळ वेळां खडाजंगी वादविवाद झालेला आहे. परंतु ह्याचा समाधानकारक निकाल अजून लागलेला नाहीं. अर्वाचीन तमीळ भाषेमध्यें रोजच्या बोलण्यांतसुद्धां संस्कृत भाषेमधील पुष्कळ शब्द असतात हें कोणासहि प्रांजलपणें कबूल करावें लागेल, व ह्याच मुद्यावर संस्कृतमातृत्ववाद्यांचा जोर असतो. उलट पक्षीं, स्वतंत्रजन्मवादी जो पक्ष आहे तो प्राचीन तमीळ ग्रंथांतून असे शेंकडों शब्द काढून दाखवितो, कीं ज्यांचा संस्कृत शब्दांशीं संबंध जोडणें अशक्य होतें. ह्या दोन पक्षांशिवाय तिसऱ्या एका पक्षाचें असें म्हणणें आहे कीं, संस्कृत व तमीळ ह्या दोन भाषा वहिणीवहिणी आहेत व ह्या दोघींनाही जनन देणारी प्राचीन काळीं एक तिसरीच भाषा असावी. अमुक एक भाषा दुसऱ्या भाषेपासून निघाली आहे कीं नाहीं, हें ठरविण्याचें साधन एक असें असतें कीं, त्या दोन्ही भाषांतील घरगुती व्यवहारासंबंधींचे शब्द सारखे सारखे असतात. हा नियम लावून पाहिला तर 'अहं,' 'त्वं' ('मी,' 'तूं') व त्यांचे तमीळ पर्याय शब्द 'नान्' आणि 'नी' ह्यांचें कांहींच नातें जमवितां येत नाहीं. पण तृतीय पुरुषी सर्वनामें 'अयं,' 'इदं' ('हा,' 'तें') ह्यांचें व 'अवन्' 'इदु' ह्या तमीळ शब्दांचें चांगलेंच नातें जुळतें. आमचें स्वतःचें मत संस्कृतमातृत्वास अनकूल आहे; पण ह्या वादासंबंधानें जास्ती लिहून महाराष्ट्र वाचकांना कंटाळा

आणण्याचें पातक आम्ही ‘ प्रथमग्रासीं ’ तरी करूं इच्छित नाहीं. भूक चांगली लागण्याकरितां सायकलवरचा फेरफटका, घोड्यावरची दौड, मलखांबावरची कसरत, अथवा ‘ डिव्हेलपर ’वरचे व्यायाम करण्याचा प्रचार आहे. त्यांत कोणतीहि नैसर्गिक गोडी असते असें नाहीं; उलट पाय, कंबर, हात ह्यांनां चांगला ताण मात्र बसतो; परंतु भूक चांगली लागून अन्नाला रुचि येण्याकरितां देहाला अशा प्रकारचे कष्ट देणें जसें आवश्यक असतें त्याचप्रमाणें आमच्या ह्या ‘तमीळ’ वर्णनानें वाचकांच्या मनाला थोडाबहुत व्यायाम देण्याचा आमचा विचार आहे. ह्या ‘ त्रासदायकपणा ’बद्दल कांहीं वाचक तरी आम्हांला दोष देण्याचा संभव आहे; पण ‘ मनोरंजनां ’त विद्वान् लोकांनीं लिहिलेले ‘ मनोरंजक ’ लेख जास्ती रुचकर करण्यास आमची ‘ पीडा ’ थोडी तरी कारणीभूत होईल, ह्याच आशेनें हा लेख लिहिला आहे. ह्याचा अपेक्षित परिणाम झाल्यास तमीळ भाषेसंबंधानें पुष्कळ ‘ मनोरंजक ’ गोष्टी पुन्हा लिहिण्याचा विचार आहे.

---

## या अल्ला ! *

**“ आजपर्यन्त मागें हटलां, तसेंच पुढेंही जर मागें पाऊल घ्याल तर तो परमेश्वर तुम्हांस जबरदस्त शिक्षा करील ”—**

कुराण, उल्लास ४७.

वरील प्रकारचे स्फुरण चढविणारे व वीरश्रीचा संचार करविणारे उद्गार ज्या एका अद्वितीय महात्म्याच्या ओजःसंपन्न मुखांतून बाहेर पडले तें मुख परमात्म्याच्या गुणगायनांत तल्लीन होऊनच कीं काय, ऐहिक दृष्ट्या भक्ति-मूक होऊन गेल्यास आज जवळ जवळ तेरा शतकें लोटलीं आहेत. ह्या तेरा शतकांनीं त्या महात्म्याचें नांव जगांतील प्रत्येक महत्त्वाच्या भागांत गाजविलें आहे. अनेक कोटि अन्तःकरणें त्या महात्म्याचें नांव ऐकल्याबरोबर प्रेमानें उचंबळून येत आहेत, अनेक कोटि अंतःकरणांत त्याच्या नामश्रवणाबरोबर भीतीची धडकी भरत आहे; अनेक कोटि अंतःकरणांत त्याच्यासंबंधानें अगदीं खरोखरीचा त्वेष उत्पन्न होत आहे व अनेक

* चित्रमयजगत्–खास अंक.

कोटि अन्तःकरणांनीं त्यास पवित्र परमेश्वराच्या प्रभावशाली भक्तमालिकेमध्यें आदरानें उच्च स्थान देऊन ठेवलेलें आहे. खऱ्या वीर्यवान् व्यक्तींचें हेंच लक्षण असतें कीं, जगांतील प्रत्येक समजदार मनुष्यास ते आपल्याविषयीं प्रीतीचा अथवा द्वेषाचा विकार अनुभवावयास लावून प्रीति अथवा द्वेष ह्यांविषयींचा आपला सरदेशमुखीचा कर त्यांच्या हृदयावर स्थापित करतात. असंख्य लोकांचें त्यांच्यावर प्रेम असणें हें त्यांना जितकें शोभादायक असतें, तितकेंच असंख्य लोकांचा द्वेष हाही त्यांच्या श्रेष्ठत्वांत भर घालून कीर्तिमंदिरांतील त्यांचें आसन स्थिर व सुशोभित करीत असतो. आतां ह्या अशा असामान्य विभूतीचें–अर्थात् महंमद पैगंबराचें यश, ज्याप्रमाणें गेल्या तेरा शतकांनीं वृद्धिंगत केलें आहे, त्याप्रमाणें पुढें येणारीं तेरा अथवा तेराशें शतकें तें वृद्धिंगत करीत राहातील कीं नाहीं हा मोठा वादाचा प्रश्न होणार हें उघडच आहे. कारण, कालासारखा चंचल, लुबरा, अविश्वासी व पुरातनश्रेष्ठ व्यक्तींच्या कीर्तिविषयीं मत्सरी असा ह्या जगांत कोणीहि नाहीं. परंतु महंमद पैगंबराचे अनुयायी आज आपलें अस्तित्व कायम राखण्याकरितां कुस्तुं-नियाच्या आसपासच्या रणभूमिवर उदार होऊन युद्ध करीत असतां ज्या महात्म्यानें त्यांच्या बाहूंत सामर्थ्य, पायांत स्थैर्य व हृदयांत आशा ह्यांचा उद्गम करविला, त्याचें स्मरण होणें अगदीं साहजिक आहे, व तुर्कस्थान नाहींसें होवो, इराण रशियाच्या तावडींत सांपडो, अथवा इजिप्त आपल्या वैभवापासून च्युत होवो, तरी महंमद पैगंबराचें सिंहासन स्वर्गांत शाश्वतचें टिकणार हेंहि खरें आहे.

प्रस्तुत जितके धर्म आपल्या विस्ताराच्या अथवा सत्वाढ्य–पणाच्या योगानें जगांत कौतुकास्पद झालेले आहेत त्या सर्वांत महंमदी धर्माचा एक ध्यानांत ठेवण्या-सारखा विशेष हा आहे कीं महंमदी धर्माचा संस्थापक महंमद हा स्वधर्माचा नुसता उपदेशकच नसून त्याचा फैलाव व जयजयकार करविणारा प्रबल सिंहासनाधीश्वर होता. एका सत्पुरुषानें धर्माचें केवल मुखानें प्रवचन करावयाचें व दुसऱ्या एका सत्पुरुषानें आपल्या तरवारीच्या तिखट धारेनें त्या धर्माचें संवर्धन करावयाचें हा नियम प्रत्येक धर्मसंस्थेसंबंधानें सामान्यतः दिसून येतो. येशू ख्रिस्ताच्या धर्मास रोमन बादशहांच्या सत्तेची गरज लागली, बौद्ध धर्मास अशोक राजाच्या प्रभुत्वाखालीं बाळसें आलें, याज्ञवल्क्याचा तत्त्वोपदेश राजा जनकाच्या योगानें शोभा पावला, असें जें बुद्धि आणि शक्ति ह्यांचें परस्परावलंबित्व आहे त्यामुळें कोणताही नूतन धर्म जन्मतः बहुधा पांगळाच असतो. जो धर्मप्रचारक असेल त्यासच जर राजसत्ताही

आपले हातांत वागवितां येईल अथवा तत्त्वबोधक ज्ञाते जर राजकुलांत उत्पन्न होतील तर कोणत्याही नूतन धर्मावर आपल्या 'तान्हुलेपणांत' दुर्दशेचे भेदक वारे सहन करण्याचा दुर्धर प्रसंग येणार नाहीं. धर्मप्रचारक लोक मेन्दूनें जेतृत्व गाजविण्यास कितीहि योग्य असले तरी एखाद्या पुण्यश्लोक सत्ताधीशास त्यांचें तत्त्व-कथन पटून तो त्यांचा कैवारी बनेपर्यन्त त्यांना कशी अनुकंपनीय दुर्दशा भोगण्याचा प्रसंग येतो ह्याचें हृदयविदारक चित्र "देवा, देवा, मला तूं कां वरें सोडून दिलेंस ?" असे करुणापर विलाप करीत वधस्तंभावर चढणाऱ्या येशू ख्रिस्तानें सर्व जगास उत्तम तऱ्हेनें दाखवून दिलें आहे. कंस, रावण, इत्यादिकांच्या तडाक्यांतून हिन्दुधर्मानें अवतारी पुरुषांच्या सहाय्यानें किती वेळां पुनर्जन्म प्राप्त करून घेतला आहे ह्याचें स्मरण केल्यास येशूख्रिस्ताच्या त्या वेळच्या मनःस्थितीची कोणासही सहज कल्पना करतां येईल. परंतु सुदैवाच्या अनुकूलतेमुळें महंमदी धर्मास अशी खेदजनक दशा कधींच अनुभवावी लागली नाहीं. तो धर्म तेजःपुंज अवस्थेंतच इतिहासाच्या क्षितिजावर उदय पावला व आजपर्यंत त्यास पराक्रमी पुरुषांचें अव्याहत पाठबळ असल्यामुळें अजून त्याचें देदीप्यमान तेज पहिल्याइतकेंच प्रखरपणानें तळपत आहे. महंमदी धर्माचें आजपर्यंतचें चरित्रकथन म्हणजे महाभारतांतील भीष्मपर्व, रजपुतांच्या बखरींतील घनघोर प्रकरण अथवा पाश्चात्त्य हिंमतबहादरांच्या शिलेदारी युगांतील रसभरित कथानकच होय. महंमदी धर्माचा आरंभ महंमदाच्या साम्राज्यामधूनच झालेला आहे व त्याच्यावर कोणताही प्रसंग येवो परंतु महंमदाच्या बाण्यास जिच्या योगानें कलंक लागेल अशी गोष्ट त्या पुण्य-पुरुषाच्या आशिर्वादानें कधींही घडून येणार नाहीं अशी खात्री बाळगण्यास वरीच कारणें आहेत.

मुसलमानी धर्माचा आद्य संस्थापक महंमद हा जरी स्वतः राज्यकर्ता होता, तथापि तें राज्य त्यास परंपरागत हक्कानें प्राप्त झालेलें नसून त्यानें स्वतः संपादन केलेलें होतें ही गोष्टही लक्षांत बाळगिली पाहिजे. महंमद हा जन्मतः गरीब कुळांतला होता व तो राज्यपदावर चढावा असा कोणताही जवळचा अथवा दूरचा संबंध नव्हता. परंतु एका हातानें त्यानें मुसलमानी साम्राज्याचें मंदिर उभारलें व दुसऱ्या हातानें त्यानेंच मुसलमानी धर्माची भव्य इमारत उभी केली. महंमदास वाणी आणि बाहु, शाप आणि शर, भक्ति आणि शक्ति, वैराग्य आणि वैराज्य ह्यांचें सारखेंच आनुकूल्य होतें. तो वारकरी असूनही पक्का धारकरी होता.

तो पंडितांत पंडित पण शूरांत शूर, तो लीनांत लीन पण उग्रांत उग्र, तो सात्त्विकांत सात्त्विक पण तामसीपणांत कमालीचा तामस होता. असलें हें परस्पर व्यस्त गुणद्वय त्याचे अंगीं मोठ्या विलक्षण रीतीनें मिश्र झाल्याकारणानें जगानें तोंडांत बोटेंच घालावीं, असलीं विलक्षण कामगिरी त्यास दहावीस वर्षांचें आंतच दाखवितां आली. शिकंदराच्या मोहिमा, सीझराची मुलुखगिरी अथवा नेपोलियनच्या स्वाऱ्या ह्यांचें वर्णन वाचतांना अद्‌भूत रसाच्या लाटा उसळूं लागून वाचकांचें देहभान नाहींसें होतें. उलटपक्षीं शंकराचार्यांचा दिग्विजय, विवेकानंदांचें अमेरिकाप्रयाण अथवा ख्रिस्ताच्या प्रेषितांचीं कृत्यें ह्यांच्या वृत्तांतानें मन आनन्दलुब्ध होऊन आश्चर्यांत बुडून जातें. परंतु महंमदाच्या चरित्रांत शिकंदर व विवेकानन्द हे दोघेही सारख्याच प्रमाणांत भरले आहेत, तेव्हां त्याच्या चरित्राच्या योगानें एक क्षणभर तरी थक्क होऊन जाणार नाहीं असा कोणी तरी असेल काय ?

महंमदानें स्थापिलेला मुसलमानी धर्म—ज्याला इस्लाम असें खरें नांव आहे—हा वास्तविक जुन्या यहुदी धर्माचेंच अपत्य आहे. यहुदी धर्म फार प्राचीन काळीं बराच वैभवास चढलेला होता. ख्रिस्ती व मुसलमानी धर्म त्याच्यापासूनच निर्माण झाले; परंतु यहुदी धर्माच्या ह्या दोन अपत्यांचेंच प्रस्थ पुढें इतकें वाढलें कीं ह्यांच्या गर्जनेपुढें त्या बिचाऱ्या जरठाची वाणी ऐकूंच येईनाशी झाली. वस्तुतः म्हटलें म्हणजे प्रत्येक ख्रिस्ती मनुष्य अथवा प्रत्येक मुसलमानी धर्माचा अनुयायी हा धर्मानें यहुदीच आहे, कारण ख्रिस्तीधर्मसंस्थापक येशू हा स्वतः यहुदी धर्माचा होता व "मी यहुदीच आहें" असें महंमदानेंही आपल्या कुराणांत अनेक वेळां म्हटलेलें आहे. परंतु ख्रिस्ती व महंमदी धर्म हे पुढें इतके फोफावले कीं त्यांच्यांतील यहुदी अंश जास्त जास्त संपुष्टांत येऊन त्यांना स्वतःला विलक्षण वैशिष्ट्य व महत्व प्राप्त झालें. महंमदी धर्म हा ख्रिस्ती धर्माचेंही एका दृष्टीनें अपत्यच आहे, म्हणजे वंशावळीच गावयास बसलें तर यहुदी धर्मास महंमदी धर्माचें पितामहत्व व ख्रिस्ती धर्मास त्याचें जनकत्व यावें लागेल. परंतु महंमदानें आपल्या अभिनव धर्मपंथांत ज्याप्रमाणें यहुदी धर्माचीं सर्व धर्मतत्वें अंतर्भूत करून घेऊन त्याच्याशीं आपलें तादात्म्य पूर्णपणें प्रस्थापित केलें त्याप्रमाणें ख्रिस्ती धर्माचीं विशिष्ट धर्मतत्वें त्यानें अंगीकृत केलेलीं नसल्यामुळें जरी महंमदी धर्म ख्रिस्ती धर्माच्या मागाहून निघाला तरी त्याचें तो अपत्य आहे असें खात्रीपूर्वक म्हणतां येईलच असें नाहीं. निदान महंमदास तरी ही गोष्ट कधींही पसंत पडली नसती, कारण येशू ख्रिस्ताच्या देव-

पुत्रत्वाविषयीं त्यानें कुराणांत जागोजागीं इतकी थट्टा उडविलेली आहे कीं महंमदास येशू ख्रिस्ताच्या व्यक्तिविषयक उदात्त वर्तनाव्यतिरिक्त त्या धर्मांतील इतर मतें अगदीं अग्राह्य वाटत होतीं हें उघड दिसतें.

महंमदी लोकांचा मूळ धर्मग्रंथ कुराण हा आहे व हा महंमदानें स्वतःच्या प्रतिभेनें रचलेला आहे. मुसलमानी धर्माचें सर्व जीवितसार ह्या ग्रंथांत भरलेलें आहे, व त्याजवर प्रत्येक मुसलमानाची अतिरिक्त प्रीति असते. मुसल्मान लोक मध्ययुगांत जेव्हां युरोपमध्यें धांगडधिंगा घालूं लागले तेव्हांपासून मुसल्मानांचें कुराण व ख्रिस्ती लोकांचें बायबल ह्यांच्यामध्यें अशी विलक्षण चुरस लागून गेली कीं त्या सपाट्यांत कुराणावर ख्रिस्ती धर्मानुयायांनीं बराच फाजील भडीमार केला. परंतु धर्माभिमानाच्या सपाट्यांत असें होणें अगदीं क्षम्य आहे व कोणत्याही धर्माच्या अनुयायांना, आपलें धर्मपुस्तक आपल्या स्वतःस जसें सर्वतो निर्दोष वाटतें तसेंच तें इतर धर्मांच्या लोकांसही दिसलें पाहिजे, असा दुराग्रह कधींही धरतां येणार नाहीं. परंतु कुराणाविषयीं सर्व बाजूनें विचार करितां तो खरोखर एक दिव्य ग्रंथ असून त्याचेविषयीं मुसलमान लोक जो अभिमान बाळगतात तो अगदीं यथार्थ आहे हें प्रत्येक विचारी पुरुषास कबूल करावेंच लागेल.

कुराण हा ग्रंथ फार मोठा आहे. त्याचे एकंदर भाग एकशेंचवदा आहेत. प्रत्येक भागास 'सुरा' असें म्हणतात. ह्या 'सुऱ्यां'ची रचना महंमद मुख्यत्वेंकरून मक्का अथवा मदीना ह्या शहरीं असतांना त्याचे हातून घडली. हा ग्रंथ महंमदानें रचलेला नसून परमेश्वरानें ज्याप्रमाणें तो कथन केला तसा तो त्यानें समजून घेऊन प्रकट केला, अशी मुसलमान लोकांची अगदीं आरंभापासून आतांपर्यंत दृढ भावना आहे. हा ग्रंथ एका बैठकीसरशीं अर्थात्‌च लिहिला गेलेला नाहीं. कांहीं कांहीं प्रकरणें तर महंमदास नित्य व्यवहारांत ज्या ज्या अडचणी आल्या त्यांना उद्देशूनच रचलेलीं आहेत. महंमदाची अयेषा नांवाची एक आवडती बायको होती. तिच्यावर कांहीं कारणामुळें एकदां व्यभिचाराचा लोकापवाद आला असतां महंमदास कुराणांतील चोविसाव्या अध्यायाचा दृष्टांत झाला. त्याचप्रमाणें इतर बरेचसे भाग महंमदास असेच कारणपरत्वें सुचले व त्यांस कुराणांत स्थान मिळालें. कुराण हें आरबी भाषेंत आहे व पुस्तकाची लेखनशैली तज्ज्ञांच्या मतें इतकी मधुर व चटकदार आहे कीं त्यांच्या मतानें ती खरोखर परमेश्वरी वाणी शोभते. महंमदाचे वेळेस कुराणाला खोटें म्हणणारे अनेक

आक्षेपक निघाले होते. परंतु त्या सर्वांना कुराणांत असें उत्तर दिलेलें आहे कीं, " तुम्ही कुराण ईश्वरस्फुरित नाहीं असें म्हणतां ना, तर मग त्यांतील एका ओळी-सारखी तरी सुन्दर ओळ रचा पाहूं, म्हणजे तुमचें तुम्हांलाच कुराण ही मनुष्यकृति-महंमदाची कृति—नाहीं असें निमूटपणें कबूल करावें लगेल. " सुदैवानें कुराणाची ही वाङ्मयसर्वोत्तमता अजूनही कायम आहे व कवींना नेहमीं शिव्या देणाऱ्या महंमदास इतकें उत्कृष्ट अरबी कसें सुचलें हें पाहून त्याच्याविषयीं कुत्सित लोकांनाही आदर वाटूं लागतो.

कुराणांत विषयवैचित्र्य फार आहे. एखाद्या अध्यायांत परमेश्वराचें अत्यंत उदात्त यशोगायन असेल तर दुसरा अध्याय नास्तिकांच्या निंदेनें ओतप्रोत भरलेला असेल; एखादा अध्याय तत्त्वज्ञानानें ओथंबलेला असेल तर एखाद्यांत 'वजनमापांत लबाडी करूं नये ' अशींच साधीं व सामान्यतः क्षुद्र वाटणारीं नीतितत्त्वें सांगित-लेलीं असतील; एखाद्या सुऱ्यांत स्वर्गाचें प्रेमपूरित वर्णन केलेलें असेल तर एखाद्या अध्यायांत अथपासून इतिपर्यंत नरक लोकाचा जगडव्याळ वन्हिच आपल्या ज्वाला पसरून बसलेला दिसेल; एखाद्या अध्यायांत विवाहबंधनाचे नियम घालून दिलेले असतील तर एखाद्या अध्यायांत भविष्यकथनाचें भव्य अवडंबर दृष्टो-त्पत्तीस येईल. " सुऱ्यां "चें शिरोवचन लिहितांना तर महंमदानें उत्कृष्ट कवींना-सुद्धां लाजविलें आहे. ' प्रभात', ' कपाळाला आंठी पडली ', ' जिनें वाद माज-विला तीच ', 'धूर ', ' सैनिक ', 'मेघगर्जना ', ' एक गोष्ट ', असलीं चुणचुणीत, गोड व नाजूक शिरोवचनें पाहून केव्हां केव्हां रे. टिळक, रेन्दाळकर अथवा माध-वानुज ह्यांचें काव्यकुंजांतील मंजु कूजनच चाललेलें आहे कीं काय असा भास होतो. असा प्रासादिक ग्रंथ आरबी भाषेंतील सर्व उत्कृष्ट ग्रंथांत ललामभूत होऊन बसला व त्यानें हजारों स्त्री-पुरुषांना आपल्या अतुल माधुर्यानें वेडें केलें ह्यांत नवल कोणतें ?

कुराणांतील तत्त्वज्ञानात्मक भागही फार उच्च प्रतीचा व मोहक आहे. मुसल-मानाव्यतिरिक्त अन्यधर्मी लोकांना तो पटणार नाहीं हें उघड आहे. परंतु एखाद्या धर्मांतील मतें कोणाच्या दृष्टीनें कितीहि अग्राह्य अथवा चुकीचीं असलीं तरी तीं विचारार्ह नाहींत असें कधींहि म्हणतां यावयाचें नाहीं. किंबहुना स्वधर्माबरोबर दुसऱ्याही धर्मग्रंथांचें ज्या देशांत जास्त अध्ययन होईल त्यांसच धार्मिकपणांत

पहिला नंबर पटकावण्याची संधि मिळेल. हिंदुधर्मांच्या प्राचीन प्रचारकांनीं हिन्दु-धर्मावर आघात करणाऱ्या सर्व ग्रंथांचें परिशीलन करण्याचा प्रशंसनीय मार्ग मागेंच घालून दिलेला आहे व त्याच मार्गानें सध्यांचे हिन्दुधर्माभिमानी पुढें जातील तर हें कुरुक्षेत्र पुन्हां धर्मक्षेत्र बनेल ह्यांत तिळमात्र संशय नाहीं. श्रीमच्छंकराचार्यांच्या ग्रंथांचें ज्यांनीं अवलोकन केलें असेल त्यांना आचार्यांनीं त्या-वेळीं प्रसृत असलेल्या एकूण एक धर्ममतांचें किती उत्तम परिशीलन केलेलें असलें पाहिजे हें सांगावयास नकोच. असे बुद्धिवान् परंतु अकटोविकट परिश्रम करणारे आचार्य आपल्या देशांत पुन्हां निर्माण होऊं लागले पाहिजेत. परधर्माविषयीं कांहीं लोकांची नैसर्गिक तिरस्कारबुद्धि असते. कांहीं लोक परधर्मांतील धर्मग्रंथ वाचले कीं लगेच त्यांस भाळून जातात. ही दोन्ही प्रकारची मनःप्रवृत्ति दूषणीय आहे. परक्या मनुष्याचें द्रव्यभाण्डार पाहिलें कीं त्यांस आग लावीत सुटणारे पुरुष दुष्ट माणसांत जमा होतील, उलटपक्षीं त्यांतील अलंकार भराभर उचलून घेणारे लोक चोरटेच ठरतील. उत्तम पक्ष म्हणजे हा कीं, दुसऱ्याच्या वैभवानें दिपून अथवा संतापून न जातां आपल्या अंगांत तितकें वैभव मिळविण्याचा वकूब आहे कीं नाहीं हें अजमावून पाहणें हा होय. असल्या प्रकारच्या परीक्षणासच 'धर्मतत्त्वांचा तुलनात्मक अभ्यास' असें अर्वाचीन नामाभिधान आहे व असली तुलना करण्यास जो एक प्रकारचा धिमेपणा अंगीं लागत असतो तो हिंदु लोकांस आनुवंशिक संस्कारानेंच प्राप्त झाला आहे व त्याचा फायदा सध्यांच्या हिंदु लोकांनीं घेतला पाहिजे. सध्यां युरोपांत जें युद्ध चाललें आहे त्याचा तुर्क लोकांस प्रतिकूल असा निकाल लागल्यास महंमदानें आपल्या इस्लामी धर्माचें जें सुंदर मंदिर अतिशय मेहनत करून उभारलें त्यास थोडीबहुत इजा पोंचल्यावाचून खास राहणार नाहीं, पण त्याबद्दल महंमदी लोकांबरोबर आपल्याहि डोळ्यांत साहजिक अश्रु उभे राहिले तरच आपण खरे हिंदु होय. सत्य अथवा सत्व कोणत्याही स्वरूपांत असो, त्याबद्दल हिन्दुमात्राच्या मनांत आपोआप प्रेम उत्पन्न झालें पाहिजे. परधर्मांच्या अध्ययनाची कांहीं लोकांना भीति वाटत असते. परधर्मनिरीक्षणानें आपली स्वतःचीं धर्ममतें ढांसळतील असें त्यांना वाटतें; परंतु हिंदुधर्म इतका ढिसूळ नाहीं अशी आमची बालंबाल खात्री आहे व हिंदुधर्मांचे अनुयायी इतके ढिसूळ नसतील तरच त्यांचा हिन्दुधर्मास आधार आहे असें म्हणतां येईल; असो. 'चित्रमय जगत्' च्या अनेक मनोरंजक लेखांत हा केवळ धर्मपर लेख घुसडून देणें—थोडेंसें अप्रशस्तच खरें, परंतु ज्या-

प्रमाणें महंमदानें अनेक धर्मांच्या गर्दीतून आपल्या धर्मास वाट काढली, त्याप्रमाणें त्याच्या कुराणाच्या बाबतींत आम्हांसही करावें लागल्यास तें पूर्वपद्धतीस धरूनच आहे असें म्हटलें पाहिजे. आजचा लेख वाचकांनीं वाचण्याचे श्रम घेतल्यास कुराणाच्या अंतर्भागांची जास्त ओळख करून देण्याचा आमचा विचार आहे. पण युद्धदेवतेप्रमाणें लेखनदेवताही कुराणावर रुष्ट झाल्यास तुर्की शिपायांप्रमाणें "या अल्ला" म्हणून आम्हीही, परमेश्वराच्या चमत्कारांचें कौतुक करीत स्वस्थ बसूं.

---

# जिजा, तूं कां रडतीस ? ×

सातारचे सब इन्स्पेक्टर रा. रा. अडसूळ ह्यांच्यावर चाललेल्या घाणेरड्या मुकद्दम्यांत रा.रा.अडसूळ ह्यांना जबरीच्या आरोपांत पांच वर्षांची व बनावटीच्या आरोपांत दोन वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा झाल्याचें वृत्त आम्ही आपल्या वाचकांस कळविलें आहेच. संकट ही अशी एक बाब आहे कीं, जें उत्पन्न झालें असतां संकटग्रस्त व्यक्तीविषयीं सहानुभूतीची इतकी उसळी मनांत उद्भवते कीं,मग त्याच्या पापपुण्याविषयीं विचार करावयास मनःस्थितिच उरत नाहीं. जिजावर–अनाथ जिजावर–असहाय, दीन, दुर्बळ जिजावर–मी तुमची लेंक आहें असें परोपरीनें विनविणाऱ्या जिजावर–पति मरण पावल्यामुळें त्रस्त दृष्टीनें सर्व जगाकडे पहाणाऱ्या जिजावर–ती देवब्राह्मणांना नमस्कार करण्याकरितां म्हणून वांकली असतां तिचें वस्त्र हिसकावून घेणाऱ्या नराधमाविषयीं एकदम जो दुर्निवार संताप उत्पन्न होतो त्याचे भरांत जगांतील सर्व शिक्षा सौम्य दिसावयास लागतात हें खरें आहे. हा संताप कधींही कमी होणार नाहीं हेंही सहाजिक आहे. जोंपर्यंत शोकविव्हल जिजानें भीतीच्या आवेगांत मारलेल्या आरोळींतील काळीज करपणाऱ्या ध्वनीची तीव्रता कल्पनासृष्टांतून एक रेंसभरही कमी होणार नाहीं, जोंपर्यंत ती माध्यान्हरात्र, ती एकटीच तेवणारी समई, ती उल्लूपणाच्या भर आवेशांत बेफाम झालेली फौजदारी मूर्ति, ती समोरच धाकानें लटलट लटलट कांपणारी निर्वस्त्रा जिजा, हें सर्व करुण चित्र वाचकांच्या मनश्चक्षूंपुढून हलणार नाहीं–आणि हें दारुण चित्र खरोखर अनेक वर्षेपर्यंत महाराष्ट्रांतील वाचकांचें पुढून हाल म्हटल्या

× संदेश १६ एप्रिल १९१७

हालणार नाहीं-तोंपर्यंत हा संताप खात्रीनें कमी होणार नाहीं. तथापि आज रा. अडसूळ हे तुरुंगाच्या कष्टमय जिण्यांत जिणें काढीत आहेत, आज त्यांच्या सफाई-दार, आटपशीर, काडीवजा मिशांवर तुरुंगांतील कातर फिरलेली आहे. आज तो तंगढिला पायजमा व तो रुबाबदार कोट जाऊन आडव्या उभ्या रेघांचा कैदी माण्डचोळणा आणि पैरण त्यांचें शीत निवारण करीत आहे. "च्यलो" म्हटल्या-बरोबर हाताखालच्या शिपायांना मटकन् खालीं बसविणारा त्यांचा हुकुमदार आवाज आज अत्यंत मर्यादित होऊन प्रत्येक वॉर्डरला आपलें नांव-नंबर सांगत आहे. आज त्यांच्या गळ्यांत कडकडीत कॉलर अथवा कितावदर्शक अधिकारी पट्टे नसून एक लांकडाचा तुकडा लोखंडी हंसळींतून त्यांच्या गळ्याभोंवतीं लटकलेला आहे-नको, नको हें चित्र! अडसूळ झाले तरी त्यांचे हे हाल पहावयास नकोत. वरें झालें कीं, सेशन्स जज्जांनी पांच व दोन वर्षांच्या निरनिराळ्या शिक्षा एकाच मापांत भरून पांच वर्षांच्या एकसहा सजेंत दोन्ही शिक्षांचें प्रायश्चित्त आटपून घेतलें. एका शिक्षेंत दुसरी शिक्षाहि भरून घेण्याची ही सवलत जर दयाळू सेशन्स जज्जांनीं अडसूळ ह्यांना ठेवली नसती तर त्यांना सात वर्षें तुरुंगांत रखडण्याचा प्रसंग येता! खरोखर म्हणाल तर हा समय जर पांच सहा शतकें अगोदरचा असता, जर त्यावेळीं जिजासारख्या एका अबलेवर अडसूळ-सारख्याच एखाद्या अविचारी बलिष्ठानें जुलूम केला असता, व जर त्यावेळीं 'कोणती शिक्षा देऊं' असें त्यावेळच्या न्यायाधिशानें आम्हांस विचारलें असतें तर 'ऊठ मेल्या' म्हणे तोंपर्यंत त्या स्त्रीच्या पायांवर डोकें ठेवण्यापलीकडे कोणतीहि शिक्षा न देण्याविषयींच आम्ही न्यायाधिशांची प्रार्थना केली असती.

स्त्रियांची आपत्ति हा कवींना एक कायमचा विषय आहे, किंबहुना स्त्रियांची आपत्ति हाच कवींचा पुण्यप्रभाव आहे, असें म्हटलें तरी चालेल. ह्याचें कारण असें आहे कीं स्त्रियांचा स्वर अंतरिक्षांत इतके असंख्य करुणातरंग उत्पन्न करतो कीं, मानवी सृष्टीचा सर्व मानस-विहार त्याच तरंगांनीं भरून जातो. शतकानुशतकें गेलीं तरी हे तरंग ओसरत नाहींत. पिढ्यांवर पिढ्यांचीं पुटें बसलीं तरी हे तरंग ओसरत नाहींत. स्त्रियांची स्वसंरक्षणाकरितां केविलवाणी आरोळी-हीच ऐकून वाल्मिकीनें रामायण रचलें, हिनेंच द्रवल्यामुळें होमरचें हातून काव्य निर्माण झालें, हिच्याच योगानें ऊर फाटून जाऊन व्यासानें लिहिलेला द्रौपदीचा धांवा हृदयंगम झाला, हीच आरोळी कानावर पडल्यामुळें कालिदासाचा विक्रम धांवत आला,

हिनेंच भवभूतीचा माधव स्तुतिभाक् झाला व हीच आरोळी, हीच नभाची कवटी फोडून टाकणारी दुःखद आरोळी पुण्यप्रभावापर्यंत येऊन पोंचलेली आहे. वाल्मीकी-पासून १९१७ पर्यंत कालाच्या ह्या दोन्ही टोकांतून स्त्रियांच्या आर्तस्वराचे कम्पच चळवळत आहेत. वाघ व शेळी, सर्प व पारडी, राक्षस व मानव ह्या सर्व जोड्या आपल्या मनांत अत्यन्त दया उत्पन्न करीत असतात, परंतु ह्या सर्वांपेक्षां अब्रूच्या रक्षणाकरितां दया भाकणारी स्त्री व अब्रूवर घाला घालणारा पापलम्पट नर, ही जोडी फारच करुणा उत्पन्न करिते. ह्या शेवटच्या जोडींतील विषमतेला ह्या जगांत उपमाच नाहीं. उपमा असती तर व्यास–वाल्मिकी ह्यांसारख्या कवींच्या कल्पनेच्या फटकाऱ्यांस पुरून ती आधुनिक कालांत नवीनता उत्पन्न करूंच शकली नसती.

कवींच्या कल्पना तुम्ही खोट्या म्हणतां काय ? रामायणभारत हे तुम्ही कल्प-नेचे खेळ समजतां काय ? रामही नव्हता व रावणही नव्हता असें तुम्ही मानतां काय ? जानकीला अशोक झाडाखालीं रडत ठेवलें व पांचालीची भर सभेंत वेणी ओढली हें तुम्हांस अशक्य वाटतें काय ? कोठली द्रौपदी व कोठला कीचक असें तुम्ही म्हणतां काय ? अजूनही तुम्ही असें म्हणतां ? जिजा व अडसूळ यांच्या घडलेल्या गोष्टी पाहूनही तुम्ही असें म्हणतां ? छेः, तुम्ही असें कसें म्हणाल ? तुमच्यानें असें म्हणवेल तरी कसें ? कीचकवध नाटक पुन्हां सुरू होणार नाहीं असें तुम्ही कसें मानाल ? पहा ! पहा, ह्या जिजाकडे पहा. अघोरी रात्र झाली आहे आणि पहा ती संरक्षणाकरितां धांवा करीत आहे ! जवळ बाप नाहीं, आई गांवीं राहिलेली आहे. गोपाळ, त्याला सुद्धां घराबाहेर काढून दिलेलें आहे. अशा स्थितींत ही पहा कावरीबावरी ती त्या भिन्तीकडून ह्या भिन्तीकडे कावऱ्याबावऱ्या मुद्रेनें पहात आहे ! काय ? रोशन जवळ आहे ? अगदीं दाराशीं उभा ! पण तो कसा आंत येईल ? वरिष्ठाचा हुकुम तो कसा मोडील ? दाराशीं उभें राहून फक्त पहारा करणें त्याला प्राप्त आहे. रोशन नीट पहारा कर बरें ! कोणा-लाहि घराजवळ येऊं देऊं नको. अडसूळसाहेब आंत आहेत आणि ते चोरीच्या तपासासाठीं जिजाची जबानी घेणार आहेत ! जिजा, बोल ! बोल जिजा ! तूं कोरी आहेस का ? वहा शपथा, वचन दे, मार देव-ब्राह्मणांच्या पायांवर हात ! अरे अरे अरे ! देव आणि ब्राह्मण ! कोठें आहे देव ? कोठें आहेत भूदेव ? हा फौजदार, हा वरिष्ठ अमलदार, हा कनवाळू म्हणून समजलेला अधिकारी. व्हा,

दूर व्हा, अडसूळसाहेब दूर व्हा. मी तुमच्या बहिणीवाणी आहें. मी तुमच्या लेकीवाणी आहें. थोरांनीं असें अमंगळ करूं नये. काय? तुम्ही नाहींच ऐकत? खबरदार माझ्याशीं अतिप्रसंग कराल तर! मोठ्यानें ओरडेन कीं बाबा आतां माडीवरून धांवत येतील. हा बाहेरचा रोशन–काय? तुमच्या हातांत काय आहे? हें काठींतून काय लकाकतें? अगबाई, अग बाऽऽऽई, अग बाऽऽऽऽऽऽई, धाड् धाड् धडक्–धड्!

सकाळची वेळ झाली! सूर्या, थूः तुझ्या तोण्डावर! तूं ही लालडी आपल्या तोण्डाला कितीही फांसलीस तरी माझी अब्रू गेल्यामुळें तुझ्या तोण्डाला लागलेलें हें काळें कधींही जाणार नाहीं. जगावर चोवीस तास रहावयास तुला काय जड जातें? इंग्रज सरकारच्या राज्यावर तूं कधींही मावळत नाहींस, मग गोपाळा आवळ्याच्या घरावरूनच कां तोण्ड लपवून जातोस? चार पांच तास उशीरां मावळला असतास, अगर चारपांच तास अगोदर उगवला असतास तर तुझें काय बिघडलें असतें? तुला काय? कोठेंतरी उगवायचें! मग अमक्या वेळीं अमक्याच जागीं उगवेन हा हट्ट कशाला? नोकर लोकांना असला हट्ट काय कामाचा? जगाच्या नोकरांना तर असला आडमुठेपणा अगदीं वाईट! चल जा! तोण्ड काळें करून कोठेंतरी नाहींसा हो! त्यानें माझा पदर धरला, अंधारी रात्र आणखी अंधारी झाली, काळोख्या वेळेस डोळ्यांत काळोखी आली, त्या वेळेस एक घटकाभर आधीं उगवतास तर त्या–त्या–फौजदाराचें रूप त्याचवेळीं सर्वांना दिसलें असतें! असें करण्याची त्यावेळीं त्याची छातीही झाली नसती! पण आतां काय? तें दुष्ट कृत्य, तो अनाचार, तें लाजिरवाणें कुकर्म होऊन गेलें! आतां मी काय करूं?

जिजा, तूं कां रडतीस? विचारा, वाचकहो, जिजाजवळ बसा आणि जिजाला विचारा, जिजा, तूं कां रडतीस? मी रडतें, कारण मी अशक्त होतें! अशक्तपणा मला बाधक झाला! तो सशक्त आणि मी अशक्त, म्हणून माझी अब्रू गेली! सज्जनहो, खोटें बोलणें हें पातक आहे काय? चोरी करणें हें पातक आहे काय? चंचल वर्तन हें पातक आहे काय? काय? हीं सर्व पातकें आहेत असें तुम्ही म्हणतां? मला नाहीं वाटत! भागू खोटें बोलली. भागूनें चोरी केली, पण तिला इतकी कडक शिक्षा झाली नाहीं. मी तर कुकर्म केलेंही नव्हतें. मी कोरी होतें. पण मी दुबळी म्हणून माझी अब्रू गेली! चोरी, चहाडी, कुकर्म हें या जगांतील

खरें पातक नाहीं, ह्या जगांतील खरें पातक, खरें दुष्कृत्य, खरा अपराध अशक्तपणा हा आहे, आणि हा अपराध ज्याच्या वर्तनांत असेल त्याची अब्रू गेल्याशिवाय कधींहि रहाणार नाहीं. मी कां रडतें असें तुम्ही विचारतां काय? खरेंच, तुम्ही हा प्रश्न विचारालच. माझे बाबाही सकाळीं आल्याबरोबर मला विचारीत होते कीं जिजा, तूं कां रडतेस? काय सांगूं तुम्हांला? मी रडतें, कारण मी दुबळी आहें. मी चोरी केली नाहीं, मी चहाडी केली नाहीं; तुमच्या पायाची शपथ घेऊन सांगतें कीं मी कोरी होतें, पण अशक्तपणा अंगीं असण्याचा हा अपराध–हा घोर अपराध मी केला, आणि म्हणून माझ्या कपाळीं रडें आलें. जे अशक्त असतात त्यांना अशीच शिक्षा भोगावी लागते, त्यांच्या कपाळीं असेंच रडें येतें. तुम्हीं म्हणतां ना कीं बेल्जमचा कांहीं अपराध नव्हता. बेल्जम अगदीं निर्दोषी होता. पण त्याची अशीच अब्रू गेली, त्याला असेंच धाय मोकलून रडावें लागलें. आज बेल्जमला ज्या दुर्धर हाल–अपेष्टा भोगाव्या लागत आहेत, त्याला जे नानाप्रकारचे यमदंड भोगावे लागत आहेत, त्यांच्या घरांवरून जो आज नांगर फिरविला जात आहे, त्यांना जें आपल्या अन्नावर दुसरे लोक थुंकलेलें सहन करावें लागत आहे, ते आज जे गुलामाप्रमाणें वागविले जात आहेत, ते आज जे चाबकांखालीं बडविले जात आहेत, लाथांखालीं तुडविले जात आहेत, ह्या सर्वांचें कारण बेल्जमनें अशक्तपणाचा गुन्हा केला होता. बेल्जम निर्दोषी आहे, बेल्जम निरपराधी आहे, बेल्जम बिनगुन्हेगार आहे, ही तुमची समजूत अगदीं चुकीची होय. जो मनुष्य दुर्बल आहे, जें राष्ट्र दुर्बल आहे, जी जनता दुर्बल आहे, ती निरपराधी असूंच शकत नाहीं, कारण या जगांत अशक्तपणा हाच सर्वांत अत्यन्त घोर अपराध आहे. जिजा! जिजा! ही मी जिजा अशक्त होतें, म्हणून माझ्याकडे रडणें आलें. जिजा, तूं कां रडतीस? मी अशक्त आहें. अशक्तपणाचा अपराध मी केला, म्हणून मी रडतें. हा अपराध जे जे करतील ते ते सर्व रडतील. सागरासारखे त्यांचे विचार विस्तीर्ण असोत, हिमालयाप्रमाणें ते गाढ सद्गुणी असोत, वायुलहरीप्रमाणें ते सर्वप्रिय असोत, शेषाप्रमाणें ते लोकांचा कार्यभार सहन करणारे असोत, ते गंगोदकाप्रमाणें शुद्ध असोत, कमलासनाप्रमाणें निर्मल असोत, पारिजातकाप्रमाणें उज्वल असोत, पण ते जर अशक्त असतील तर कोणत्याही पीनल कोडांत सांगितली नाहीं इतकी शिक्षा त्यांना भोगावी लागेल. पीनल कोडानें आजपर्यंत इतक्या शिक्षा शोधून काढल्या पण मी जी शिक्षा भोगली, त्या काळरात्रीं, अघोर प्रसंगीं मला जी शिक्षा सोसावी

लागली त्याच्या पासंगास तरी वरील शिक्षा लागतील काय? मग बोला, खरा अपराध कोणता? गुन्ह्यांच्या पुस्तकांत वर्णन केलेले अपराध खरे कीं अशक्तपणा हा अपराध खरा? मी म्हणतें मी कोरी होतें, बेल्जम असाच कोरा होता, सर्व्हिया असाच कोरा होता, रुमानिया असाच कोरा होता, पण ह्या जगांत नुसतें कोरें राहून भागत नाहीं, तर ह्या जगांत सशक्त असावें लागतें. जे सशक्त असतील त्यांचाच ह्या जगांत निभाव लागतो; शक्तीवांचून जे नुसतें सद्‌गुणी रहाण्याचा प्रयत्न करतील त्यांना माझ्याप्रमाणें, त्यांना रुमानियाप्रमाणें, त्यांना बेल्ज्यमप्रमाणें आपल्या अब्रूची धूळधाण झालेली पहावी लागेल. मित्र मदत करतात, शेजारी-पाजारी धांवून येतात, सरकार संरक्षणाकरितां येतें, परमेश्वर साह्याला धावून येतो, पण—होय. खुद्द परमेश्वराच्या साह्याला सुद्धां कांहीं मर्यादाच असते. ह्या सर्वांच्या साह्याला भूषण म्हणजे स्वतःच्या अंगचें बळ हेंच मुख्यतः असतें. किंबहुना स्वतःचें सामर्थ्य ही पहिली आवश्यक गोष्ट होय. आईबाप प्रेमाचे खरे, शेजारीपाजारी कनवाळू खरे, सरकार न्यायप्रिय खरें, ईश्वर दयाळू खरा—पण ज्यावेळीं 'त्यानें मला एकटीला बोलावली, ज्यावेळीं त्या क्रूर रात्रीं 'त्या'चे पापी डोळे माझ्याकडे व माझी करुणा भाकणारी नजर त्याचेकडे असा प्रसंग आला, ज्यावेळीं त्यानें देह जमिनीवर हांसडला व तोंडांतून भयंकर धमकी हांसडली, ज्यावेळीं त्याचेजवळील गुप्ती चक्‌चक् करूं लागली व माझ्यापुढें काजवे चमकूं लागले, त्यावेळीं, त्या असहाय्यतेच्या वेळीं त्या निराश्रयपणाच्या परमावधींत, माडीवर निजलेला माझा बाप मला शतयोजनें लांब असल्यासारखा झाला, त्यावेळीं दाराबाहेरचा रोशन समुद्रा-पलीकडे आहे असें वाटलें. त्यावेळीं ऑस्टिनसाहेब बंगल्यावरच राहिले, त्यावेळीं उदारधी चक्रवर्ती लण्डनला दूर राहिले, त्यावेळीं परमेश्वर वैकुंठांत राहिला—त्यावेळीं, त्या संकटाचे वेळीं तो आणि मी ह्याशिवाय दुसरें कोणीही उरलें नाहीं. म्हणून—म्हणून मी रडतें. सज्जनहो, दुर्बळपणा हा दुर्गुण आहे. हें मला समजलें नाहीं म्हणून मी रडतें.

जिजा, तूं कां रडतीस? नको, नको, जिजा! हुंदक्याचा एकही जास्त शब्द तूं काढूं नकोस. तूं कां रडतेस हें आम्हांला आतां पूर्णपणें समजलें, तुझी कहाणी आमच्या अंतःकरणावर सदैव कोरली जाईल. हें बघ जिजा, नेपोलियनच्या जयस्तम्भावरील अक्षरें पुसलीं जातील, समुद्रानें पृथ्वीच्या पृष्ठभागावर ओढलेले ओघ पुसले जातील, सप्त चिरंजीवांच्या नांवाचे ठसे ह्या हिंदभूमींतून पुसले

जातील, फार तर काय, गांधींची दयाशीलता पुसली जाईल, वापटशास्त्र्यांचा गीता-रहस्यद्वेष पुसला जाईल, समर्थांचा घटना-दुराग्रह पुसला जाईल, एवढेंच कशाला ? एकवेळ गोखल्यांची देशभक्तिसुद्धां पुसली जाईल, पण जिजा ! तुझ्या कहाणींतील करुणोद्रेक कधींही पुसला जाणार नाहीं. बेल्जम व रुमानिया ह्यांनीं जी दुःख-कहाणी ऐकविली, तीच तूं निराळ्या रूपानें आवव्यांच्या घरांत बसून आम्हांला ऐकवशील, हें आमच्या कसें लक्षांत यावें बरें ? पण आतां खात्री झाली कीं, युरोपच्या नकाशांत बेल्जमनें ज्या तत्त्वाचें चित्र रंगविलें, त्याच तत्त्वाचें चित्र तूंही आपल्या साध्या अंतःकरणाचे तट फोडणाऱ्या करुण शब्दानें रंगविलेंस. जिजा, तूं कां रडतीस ? असें आम्ही तुला पुन्हां कधीं विचारणार नाहीं. अशक्त लोक, मग ते कितीही सद्गुणी व सदाचारी असोत, ते रडणारच. ते न रडतील तर नवल ! अशा दुःखितांचें अश्रुप्रमार्जन मग मित्रांना, सरकारला व शेवटीं परमेश्वराला करणें भाग पडतें.

---

# मराठींतील लावण्या. *

मराठी भाषेंत ज्या वाङ्मयाचा अशिक्षित जनसमाजावर अत्यंत परिणाम झालेला आहे आणि असें असूनही मराठी वाङ्मयांत ज्याला फारसें सर्वसंमत असें स्थान मिळालेलें नाहीं असें वाङ्मय म्हणजे

**लावण्या**

ह्या होत. मराठी वाङ्मयांत लावण्यांची काय योग्यता आहे ह्याचा विचार ह्यापुढें करण्यांत येईलच. परंतु एवढें मात्र खरें कीं, लावण्या म्हटल्या म्हणजे शिष्ट समाज नाकें मुरडतो व त्यांकडे कानाडोळा करतो. मराठी कवींत सामान्यतः ज्यांना उच्च स्थान देतां येईल असे रामजोशांसारखे कवि लावण्या रचूनच उदयाला आलेले आहेत. रामजोशांनीं ज्यावेळीं डफावर थाप मारली त्यावेळीं महाराष्ट्र समाजास त्यांनीं इतकें वेडें केलें कीं कांहीं वर्षेपर्यंत त्यांचा लावण्यांचा सूर महाराष्ट्रीयांचे कानांत एकसारखा घुमत होता. मराठी साम्राज्याचा प्रारम्भ जर रामदासांच्या

---

* सचित्र करमणूक, वसंत अंक १९२६

प्रौढ, दैदीप्यमान व स्फूर्तिकारक काव्यानें झाला असेल, तर मराठी साम्राज्याचा अखेर रामजोशांच्या लावण्यानीं झाली असें म्हणायला कांहीं हरकत नाहीं ! हा विरोध कोणाला कदाचित् लज्जास्पद वाटेल, पण रामजोशांच्या लावण्यांतील काव्य-गुणाचा जर विचार केला तर महाराष्ट्रांतील अभिमानास्पद व काव्यललामभूत दीर्घ कवि–मालिकेंत बसण्यास रामजोशी हे सर्वतोपरी लायक होते हें कबूल करावें लागेल !

**वर्षे तीन पुण्यांत जो झळकला तो रामजोशी पहा ॥**

असें रामजोशांनीं स्वतःविषयीं म्हटलेलें आहे; पण तीन वर्षेच काय, जवळ जवळ तीस वर्षें रामजोशांनीं सर्व महाराष्ट्र काबीज करून टाकलेला होता ! महाराष्ट्राच्या संगीत नाट्यवाङ्मयांत ज्याप्रमाणें किर्लोस्करयुग, कोल्हटकरयुग असे विभाग पाडतां येतात व ज्याप्रमाणें प्रतिभाशाली गडकरी, प्रतिभावान् वासुदेवशास्त्री व प्रभाववान् देवल ह्यांचा समावेश ह्यापैकीं कोणत्याना कोणत्या युगांत करतां येतो, त्याप्रमाणें स्फूर्तियुग, कथारसयुग व प्रेमयुग असे मराठी वाङ्मयाचे जर विभाग पाडले तर त्याच्या एका बिनीवर तुकाराममहाराज व दुसऱ्या बिनीवर रामजोशी उभे आहेत असें दृश्य नजरेस पडल्यावांचून रहाणार नाहीं !

**भला देवा कुणबी झालों । नाहितर दम्भें असतों मेलों ॥**

असें तुकाराममहाराजांनीं म्हटलेलें आहे ! ते ब्राह्मण नव्हते, ब्राह्मणेतर होते ! ह्याचे उलट रामजोशी ब्राह्मण होते, ब्राह्मणेतर नव्हते. पण त्यांनीं हातांत घेतलेला डफ व रचलेल्या अत्यन्त मनोहर लावण्या पाहिल्या म्हणजे ते बहुतांशीं ब्राह्मणेतरच झाले होते असें म्हटल्यावांचून रहावत नाहीं ! ज्यावेळीं ब्राह्मण मनुष्य आपला अहंकार टाकून ब्राह्मणेतरांत शिरतो, व ज्यावेळीं ब्राह्मणेतर मनुष्य आपलें अज्ञान टाकून विचाराच्या उच्च प्रांतांत शिरतो, त्यावेळीं ब्राह्मण–ब्राह्मणेतरांच्या प्रेमसरितेमधून महाराष्ट्राच्या काव्यवैभवाची लाट उसळते असा आजपर्यंतचा अनुभव आहे. ज्ञानेश्वरांनीं तेंच केलें, नामदेवांनीं तेंच केलें, तुकारामानीं तेंच केलें, रामदासांनीं तेंच केलें व रामजोशांनींही अखेर तेंच केलेलें आहे !

वाङ्मय हें कोणत्या स्वरूपाचें असावें, अशाबद्दल अनेक वेळां चर्चा झालेली आहे. ह्यापैकीं इंग्रजी वाङ्मयाची लज्जत लागलेले बहुतेक लोक वाङ्मय हें सर्वांगीण असावें अशा मताचे असतात ! ह्याचेंच रूपान्तर ‘ आधुनिक कवि व प्राचीन कवि ’ ह्या वादांत झालेलें आहे. पण ह्या वादाचें मुख्य बीज इंग्रजी वाङ्मयावरून काव्या-

दा. ... 

विषयीं जी जास्त विस्तृत कल्पना उत्पन्न झाली, त्या कल्पनेंत आहे ! संस्कृत वाङ्मयाचें रूपही विशाल आहे. किंबहुना संस्कृत वाङ्मयांत

**' सुभाषित ' म्हणून जो अद्भुत प्रकार**

आहे त्याला इंग्रजी वाङ्मयांत मुळींच जोड नाहीं; तथापि, हेंही कबूल केलें पाहिजे कीं काव्याची कल्पना इंग्रजी कवींनीं संस्कृत कवीपेक्षांहि जास्त विस्तृत, सूक्ष्म व नाजूक केलेली आहे ! इंग्रजी काव्याच्या ह्या विस्तृतपणामुळें त्या काव्यांत मुरलेल्या लोकांना साहजिकपणें असा प्रश्न सुचला कीं, मराठींतील काव्यही असें विस्तृत कां नसावें ? मराठी काव्यानें स्वतःला अध्यात्मांतच कां कोंडून घ्यावें ? अध्यात्मरूप परमेश्वरानें बनविलेली जी मनोहर सृष्टि त्या सृष्टीकडे मराठी काव्यानें कां धांव घेऊं नये ?

ह्या प्रश्नाचें प्रेमळपणानें जर ' होय ' असें उत्तर दिलें तर स्फूर्तियुग, कथारस-युग व प्रेमयुग ह्या तीन युगांपैकीं तिसऱ्या युगाचा उदय होतो. पण त्यांतच जर दुरभिमान घातला तर तुकाराम-रामदासांविषयीं विनाकारण द्वेष वाटायला लागून

**" प्रियेच्या बुचड्याकडे पाहून !"**

असल्या वेड्यावांकड्या व विकृत आधुनिक कविपक्षाची स्थापना होते. ह्याचे उलट बुद्धीला बुरसेपणा आणून जर वरील प्रश्नाचें ' नाहीं ' असें उत्तर दिलें तर स्फूर्तीचा वेग तिथल्या तिथें थाम्बतो व तुकारामरामदासांविषयींचा अभिमान आडदांडपणाच्या स्वरूपांत दिसायला लागून ' प्राचीन कविपक्ष ' स्थापन होतो. वस्तुतः

**काव्य ही त्रिपदा गायत्री**

आहे. स्फूर्ति, वीरकथा व प्रेम हीं त्याचीं आवश्यक अंगें आहेत. ह्या अंगांपैकीं एकच अंग असावें असें जो कोणी प्रतिपादन करील तो महाराष्ट्राच्या काव्यकौस्तु-भाचा द्वेष्टाच ठरेल. काव्य हें वरील तिन्ही प्रवाहांतून वाहिलें पाहिजे व ह्या त्रिवेणींत स्नान होऊन महाराष्ट्रीय मनुष्यानें राष्ट्रोन्नतीच्या भवानीचे चरण गांठले पाहिजेत.

स्फूर्ति, वीरकथा व प्रेम अशीं मराठी काव्याचीं जर तीन युगें कल्पिलीं तर स्फूर्तियुगाचे मुकुटमणि श्री तुकाराममहाराज होत हें निर्विवाद आहे ! श्री ज्ञानेश्वर-महाराज हे ह्या युगाचे उत्पादक होते व एकनाथ, नामदेव, रामदास हे सर्व संवर्धक

होते ! पण ह्यांत तुकाराममहाराजांनीं त्या युगाचा कळस केला ! कथारसयुगाचें प्राधान्य कोणी मुक्तेश्वराला देईल, व कोणी मोरोपंतांना देईल ! कृष्णशास्त्री चिपळूणकरांपासून हा वाद चालूच आहे. पण

**जो शम्भर धांवा काढील तो विठ्ठल**

अशी जर क्रिकेटच्या खेळांत व्याख्या केली, तर शम्भरच काय, पण त्यावरही आठ रामायणें रचणाऱ्या मोरोपंतांकडेच काव्यांतील कथारसयुगाचें प्रधानपदत्व जावें हें उचित आहे. बाकी राहिलें प्रेमयुग ! ह्या प्रेमयुगाचें चक्रवर्तित्व आज तरी

**रामजोशांकडेच आहे.**

विशेष लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट ही कीं, आजचे सर्व ‘आधुनिक’ कवि ह्या युगांत येतात ! आपणांवर रामजोशांचें निशाण झळकत आहे हें त्यांपैकीं कित्येकांना कदाचित् माहीतही नसेल, पण त्यामुळें रामजोशांच्या चक्रवर्तित्वाला कोणत्याही तऱ्हेचा बाध येत नाहीं.

पण रामजोशी म्हटलें म्हणजे लावण्या !

**सुन्दरा मनामधिं भरली**
**जरा नाहीं ठरली**
**हवेलींत शिरली**

हा रामजोशीबोवांचा थाट ! त्यांच्या कल्पनेच्या भराऱ्या तर इतक्या गोड आहेत कीं, समरसतेचे कितीही पंख लावले तरी ते अपुरेच पडतात ! त्यांच्या शब्दलालित्यापुढें वामन–मोरोपंतांचेंही शब्दलालित्य कमी वाटायला लागतें ! त्यांचें काव्यमाधुर्य म्हणजे गुलाबदाणींतले सुवासिक फवारे भासतात ! व त्यांच्या सुन्दर जडावाकडे पाहिलें म्हणजे तिथून चित्त हालतच नाहीं ! काव्यामृताचा इतका गोड खजिना कोणत्याही कवीजवळ असणें साहजिकपणेंच अशक्य असतें ! त्यांतही रामजोशीबोवांचें शीघ्र कवित्व व प्रसंगवेधित्व केवळ अलौकिक होतें. इचलकरंजीकर घोरपडे हे रामजोशीबोवांना कोणती बिदागी द्यावी ह्या विचारांत पडले असतां—

**भोजासम कविताप्रिय कर्णासम दानशूर घोरपडे**
**ऐसें असतां माझ्या देणगिचा कां तुम्हांसि घोर पडे ?**

असें कीर्तनाचे ऐन रंगांत रामजोशांनीं विचारलें. त्यावेळीं ह्या समयसूचकतेमुळें

श्रोतृवर्गांत केवढें हंसू लोटलें असेल ह्याची वाचकांनींच कल्पना करावी ! त्याचप्रमाणें एका वाण्याचे तीस रु. देणें झाल्याबरोबर

**दादा, तीस दिल्याशिवाय मजला वाणी कसा सोडितो ?**

असें जें काव्यात्मक पत्र त्यांनीं आपलें बंधूंना लिहिलें त्याबरोबर असल्या काव्यकौतुक-रत्नास तीस रुपयांच्या ऐवजीं तीनशें मोहरा पाठवून द्याव्या असें त्यांचे बन्धूस वाटलें नसेल काय ? अलीकडे सार्वजनिक कामासाठीं फंड जमविण्याचा प्रघात पडलेला आहे ! त्यांतून कोठें कोठें फण्डगुण्डही निर्माण झालेले आहेत ! परंतु काशीयात्रेला जाण्यासाठीं रामजोशीबोवांनीं

**ऐसें मानुनि घ्या यशासह तुम्ही ही याद ही लेखणी**

असें म्हणून पुण्यांतल्या धनिक लोकांपुढें जेव्हां वर्गणीची याद ठेवली त्यावेळीं असला चतुर फण्डगुण्ड पुन्हां पुन्हां वर्गणी मागायला यावा व पुन्हां पुन्हां त्याला ‘ वर्गणी ’ देण्याचा सुप्रसंग सांपडावा असें कोणाला वाटलें नसेल ? समयसूचकता हा काव्यगुणाचा अत्यन्त सुन्दर उत्कर्ष होय व ह्या उत्कर्षानें ज्यावेळी रामजोशीबोवा महाराष्ट्रापुढें झळकले त्यावेळीं रामजोशीबोवांवर महाराष्ट्रीय समाज किती मोहित होऊन गेला असेल हें सांगायला पाहिजे काय ?

तेव्हां ‘ लावणी ’ ही एक हलकी गोष्ट असून त्याज्य आहे असें मानायची जी पद्धत अलीकडे पडलेली आहे ती योग्य नाहीं हें ह्यावरून वाचकांस कळून येईल. स्फूर्ति, कथारस आणि प्रेम ह्या काव्यसुन्दरीच्या तीन रत्नमंजूषांपैकीं तिसऱ्या मंजूषेंत ही चीज जाऊन बसते ! मराठी काव्याचा हा एक मनोहर भाग आहे ! इंग्रजी राज्य स्थापन झाल्यापासून जो एक खोटा लब्धप्रतिष्ठितपणा आपणांत शिरला व ज्याचेमुळें सभ्य मनुष्यानें तालिम करणें हें देखील जसें अग्राह्य वाटतें, त्याचाच परिणाम लावणीला कमी प्रतीचा मानणें हाही झाला ! आतां हिन्दु लोकांना शारीरिक बळाची आवश्यकता उत्पन्न झाल्यामुळें, विशेषतः

**हिन्दू संघटनाविषयीं सध्यां सर्वत्र जागृति**

झाल्यामुळें तालिमखान्यांविषयीं कमीपणा वाटण्याचे ऐवजीं महाराष्ट्रांत आखाडे स्थापन करण्याविषयीं उत्कंठा चोहोंकडे दिसत आहे ! परन्तु एक काळ असा होता कीं त्यावेळीं तालमींत जाणें हें टवाळपणाचें लक्षण समजलें जात असे. ह्याच

काळाची छाया लावण्यांवरही पडली व रामजोशीबोवांनीं पंचवीस तीस वर्षे महाराष्ट्रांत वाजविलेला डफ बन्द पडला !

लावण्यांसंबंधानें रामजोशीबोवांनीं जरी विशेष जागृति केली तरी पूर्वी लावण्या नव्हत्या व त्या रामजोशांनीं आणल्या असें मात्र नाहीं ! स्फूर्ति आणि कथारस ह्यांव्यतिरिक्त ह्यापूर्वींहि थोडथोडी कविता उदयाला येत होती. मराठी वाङ्मयांत होणारा हा जो मोठा बदल त्यांतून मराठी स्फुट काव्यें व छन्द निर्माण झाले. हे छन्द मराठी काव्याच्या सुरवातीपासून शोधायला गेलें तरीहि सांपडणार नाहींत असें नाहीं, कारण मराठी काव्य अगदीं भिकारी कधींहि नव्हतें. तथापि असले शब्द विशेष प्रचारांत आणण्याचा मान अमृतरायांना देणें योग्य आहे ! एका प्रकारें अमृतराय हे रामजोशांचे पूर्वगामीच ( Predecessor ) होते असें म्हटलें तरी चालेल ! आणि जर रामजोशी हे आधुनिक कवींच्या काव्यपन्थाचे जनक असतील तर अमृतरायांना त्यांचे पूर्वज म्हणायला हरकत नाहीं ! अशिक्षित पद्धतीनें रचली जाणारी लावणी ही तर फारच प्राचीन काळापासून महाराष्ट्रांत प्रचारांत असली पाहिजे. परन्तु त्यांतील उत्तान शृंगारामुळें त्यांतील कवित्वाकडे लक्ष देण्यास महाराष्ट्रीय समाजानें नाकारलें ! त्याची जन्मठेप त्याला कायमची भोगावी लागली !

लावण्यांचें विशेष लावण्य असें आहे कीं, त्यांत खरेंखुरें आणि जिवन्त मराठीपण बघायला सांपडतें. लावणी ही महाराष्ट्राच्या मर्मांपासून निघालेली आहे आणि त्यांत खरें मराठी मन आहे ! मराठी हृदयाला मराठी डोळ्यांनीं जगाकडे पाहून ज्या कांहीं कल्पना सुचतात, त्या कल्पना लावण्यांत ग्रथित केलेल्या असल्यामुळें लावण्यांची योग्यता मराठी वाङ्मयांत फार निराळी आहे. मराठी काव्याचा हा जीवन्त झरा आहे व ह्याच्या झुळझुळत्या पाण्यानें मराठी मनें नेहमीं गार केलेलीं आहेत. लावण्यांचा परिणाम मराठी समाजावर जो इतका विलक्षण झालेला आहे त्याचें कारण हेंच होय ! आजपर्यंत लावण्यांचें कौतुक करणारा वाङ्मयोपासक फारसा कोणी भेटलेला नाहीं ! त्याची आजपर्यंत जी आबाळ झालेली आहे, तिचेंहि वर्णन आम्हीं वर केलेंच आहे. तथापि एवढी कोण्डी असतां त्यांतूनही लावण्या अमर झालेल्या आहेत व कालाला न जुमानतां टिकलेल्या आहेत ह्याचें एक कारण त्यांची शृंगारप्रधानता असें कदाचित् म्हणतां येईल, पण त्यापेक्षांहि त्याचें खरें कारण म्हणजे महाराष्ट्राच्या हृदयाशीं लागलेला त्यांचा सूर होय ! लावण्या म्हणायला लागलें म्हणजे त्यांतील कल्पनांचें व हृदयांचें ऐक्य होऊन जातें आणि एकमेकांशीं तीं इतकीं

संलग्न होतात कीं, हृदय त्यांत वसती करून रहायला लागतें. ह्याप्रमाणें लावण्यांत महाराष्ट्रीय हृदय सांठविलें गेल्यामुळें कालाच्या ओघाबरोबर लावण्या मेल्या नाहींत व ह्यापुढेंहि त्या मरतील असें वाटत नाहीं! लावणी ह्याचा व्युत्पत्तिसिद्ध खरा अर्थ काय असेल तो असो, पण सामान्य शब्दोच्चाराकडे लक्ष दिलें तर हृदयाला चटका लावणाऱ्या त्या लावण्या असा त्या शब्दाचा अर्थ करितां येईल! निदान त्यांचा तसा प्रभाव गाजत आहे यांत संशय नाहीं!

## 'नका टाकून जाऊं, डावा डोळा पाण्यानं किहो भरला'

ही बालगंधर्वांची सुप्रसिद्ध लावणी सर्वांच्या परिचयाचीच आहे! ती फोनोग्राफ-मध्यें जाऊन बसल्यामुळें तर ती जास्तच चिरस्थायी होऊन बसलेली आहे! हीच लावणी उदाहरणार्थ घेतली म्हणजे महाराष्ट्रिय अन्तःकरण ह्यांत कसें व्यक्त झालेलें आहे हें आपल्या लक्षांत येईल! ही लावणी वाचली कीं महाराष्ट्रांतील लाजाळू नववधू डोळ्यांपुढें उभी रहाते व ती किती प्रेमळपणानें आपले प्रियकरास निरोप देत आहे इकडे लक्ष वेधतें. यांत भाषेचा शृंगार, कल्पनेची भरारी अथवा उपमा वगैरे साहित्य कांहींएक नाहीं! ही अगदीं साधी ओळ आहे. पण कवींच्या मोठ-मोठ्या अवडम्बरापेक्षां ही फारच नामी लागते. विशेषतः लाजाळू मुली आपल्या पतीजवळ जे शब्द उच्चारतात तेच नेमके शब्द ह्या ओळींत घातल्यामुळें हरिभाऊ आपट्यांच्या साध्या भाषेप्रमाणें ही ओळ हृदयापर्यन्त जाऊन भिनते. 'डावा डोळा' ह्यांत तर कवीनें कमालच केलेली आहे! ह्यांतली खुबी कोणाला वर्णन करतां येईल? किम्बहुना ह्यांत भवभूतीची नाजूक लकेर (Touch) साधलेली आहे असें कोणी म्हटलें तरीही ती अतिशयोक्ति होणार नाहीं.

पण ह्यापेक्षांही महाराष्ट्रिय हृदय व्यक्त करणारी लावणी म्हणजे

## 'कसा पिकला गहुं ग, हरभरा'

ही होय! ही लावणी म्हटली म्हणजे कितीही अरसिक महाराष्ट्रिय अन्तःकरण असो, तें चीत होऊन जातें. कारण ही लावणी ऐकली कीं महाराष्ट्रांतील हिरवींचार शेतें दिसायला लागतात व आपण तिथें उभें असल्याचा भास होतो. कोणतेंही काव्य हृदयाला पटायला त्याची भूमिका आपलीशी वाटायला लागणें फार आवश्यक आहे. परभाषेंतील काव्याचा परिणाम हृदयावर न होण्याचें कारण हेंच कीं, ते ते देखावे व त्या त्या भूमिका आपल्या परिचयाच्या नसतात पण लावण्यांतला प्रकार

त्याच्या अगदीं उलट! लावण्यांची मुख्य मदार ह्या भूमिकेवर! महाराष्ट्रीय मनुष्याच्या रोजच्या ओळखीच्या वस्तु, रोजच्या ओळखीचे देखावे, रोजच्या परिचयांतल्या कल्पना व रोजच्या परिचयांतले प्रसंग हें लावण्यांचें मुख्य सामर्थ्य! मग इतकी सामुग्री असल्यावर लावण्या ऐकून महाराष्ट्रांतल्या मनुष्याचें मन कावरेंबावरें कां होणार नाहीं?

किम्बहुना ज्याला आपण जनसमाज म्हणून म्हणतों त्याचे मनावर असल्या कवनांचा परिणाम फार विलक्षण होतो. गव्हानें आणि हरभऱ्यानें भरलेलीं शेतें कदाचित् सुशिक्षित मनुष्यें फारशीं बघत नसतील, पण बहुजन समाजांतल्या प्रत्येक मनुष्यास हा देखावा रोजच्या वहिवाटींतला आहे! त्यामुळें एखादी ओळखीची जागा आली म्हणजे घोडा जसे आपले कान टवकारतो त्याप्रमाणें

**कसा पिकला गहुं ग, हरभरा**

म्हणून डफ वाजला कीं, बहुजन समाजांतला मनुष्य कान टवकारून उभा राहतो. इतक्या परिचयाची वस्तु पुढें उभी राहिल्यावर ती ओलांडून कोण जाईल? ह्या वस्तूचें स्मरण झालें कीं, महाराष्ट्रांतला मनुष्य तिथल्यातिथें थबकलाच पाहिजे व त्यानें समग्र लावणी ऐकलीच पाहिजे.

**'नका मला उसांमधिं ओढूं'**

ही दुसरी लावणी घ्या! ही लावणी ऐकली म्हणजे बहुजन समाजांतल्या मनुष्याचें डोकें भणाणल्याशिवाय राहील काय? कधींहि नाहीं! तें उंसाचें शेत, त्याला दिलेले पाण्याचे पाट, त्यांत पुरुष पुरुष उंच वाढलेलीं उंसाचीं ताटें, त्यांत राखणीकरितां उभा केलेला माळा, एके बाजूची लहानशी खोप, ती शेतांतील विहीर, तिला लावलेली ती मोट, वान्धावर चरत असलेल्या त्या गायीम्हशी व अस्तमानास चाललेला सूर्य—असा देखावा पाहून विश्वामित्र देखील आपल्या तपश्चर्येपासून चळेल, मग महाराष्ट्रांतील जनसमाजांत समाविष्ट असलेलीं भाबडीं माणसें त्यांत विव्हल होतील ह्यांत काय नवल आहे?

**शरदुत्पलपत्राक्षी शरदुत्पलपुण्यगन्धसमगन्धा**

हें मोरोपंती प्रौढ प्रेम—हें कुणावर 'आसर' करणार? बहुजनसमाजापैकीं एकातरी मनुष्यावर त्याचा परिणाम होईल काय? पण

'नका मला उसांमधिं ओढूं'

म्हटलें म्हणजे हादरला—सर्व गांव हादरला ! पाटील, पाण्डे, पाटीदार, पण्डित, सर्व जनलोक या वर्णनानें हादरला ! त्यांतला एकही मनुष्य शिल्लक राहिला नाहीं !

लावण्यांचें सामर्थ्य हें असें आहे ! ही महाराष्ट्रवाङ्मयाची तरवार आहे व हिचा एकदां वार झाला म्हणजे तिचेपुढें महाराष्ट्रीय हृदय जखम झाल्याशिवाय राहणें शक्य नाहीं !

लावण्यांमधील नुसती भूमिकाच मराठीमय असते असें नव्हे, तर त्याचा थाटही सर्वस्वी मराठी पद्धतीचाच असतो. लावण्यांतून कमळांचें साम्राज्य फारसें कधीं झळकत नाहीं ! कमळ ही वस्तु महाराष्ट्रांतली नव्हे. महाराष्ट्र कमळांचें बनलेलें नाहीं. मराठी काव्यांत कमळ शिरलें तें संस्कृतामधून शिरलें ! संस्कृत काव्याची छाया ज्याचे मनावर पडलेली नाहीं आणि ज्याचें मन निव्वळ मराठी आहे, तो चुकूनदेखील कमळाचें स्मरण करायचा नाहीं ! पण शिक्षणाबरोबर संस्कृतांतील कमळ सुशिक्षितांच्या वाङ्मयांत इतकें शिरलेलें असतें कीं, त्यांत मराठीपणा नसून कृत्रिमपणा आहे हें त्यांच्या लक्षांत येत नाहीं ! सुशिक्षितांचीं काव्यें, किम्बहुना सुशिक्षित लोकांचें बहुतेक लिखाण बहुजनसमाजाच्या हृदयापासून जें अलग राहतें त्याचें कारण हेंच आहे ! त्यांच्यांत मराठीपणा असत नाहीं ! त्यामुळें तें नवखें नवखें व परकें परकें वाटत असतें. पूर्वसंस्कृतींतल्या लोकांचें लिहिणें संस्कृताच्या वातावरणांतलें असतें व इंग्रजी संस्कृतींतल्या लोकांचें लिहिणें इंग्रजी वातावरणांतील असतें. दोन्ही चांगलीं असतात, किम्बहुना त्यांच्या चांगुलपणाबद्दल प्रश्नच नसतो, पण तीं परकीं असतात ! महाराष्ट्रांतील जनसमाजाचे अंतःकरणांत शिरावें ही शक्ति त्यांचे अंगांत नसते.

पण लावण्यांचें तसें नाहीं ! त्यांचा सगळा थाट मराठी ! मराठी लावण्यांची

**कोंकणिं ग वस्ति**
**कोंकणिं ग वस्ति ।**

अशा स्थितींत तिथें परका कृत्रिमपणा शिरणार कोठून ? मराठी शाहिरांनीं कमळांचें वर्णन करायला त्यांची कल्पनाशक्ति संस्कृत काव्यांच्या शर्करेंत घोळायला हवी ! पण मराठी शाहीर संस्कृत शर्करेपासून दूर असल्यामुळें कमळांचा सम्पर्क त्यांना होत नाहीं ! मराठी लावण्या म्हणजे अस्सल मराठी शिक्का ! ती इंग्रजी 'गिनी'

नव्हे, मुसलमानी ‘आश्रफी’ नव्हे, किंवा संस्कृत ‘सुवर्ण’ ही नव्हे. तें अस्सल मराठी नाणें! त्यांत भेसळ सांपडायची नाहीं, आणि त्यामुळें मराठी लावण्यांत संस्कृतांतील कमलाचा धिंगाणा दिसायच्या ऐवजीं सोनचाफा फुललेला, जाइजुई उमललेली व मरवा दरवळलेला दृष्टीस पडतो.

कटिला शालु दिसे हिरवा
शोभे बुचड्यामधिं मरवा
चालणें किती हें बेपरवा

अशा प्रकारचा मराठी लावणीचा थाट! तिनें असल्या संस्कृत किंवा इंग्रजी वाङ्मय–परांगणांत कधीं चुकूनसुद्धां पाऊल टाकलेलें नाहीं मग तिनें कमळें कोठून तोडून आणावीं व भुंगे कोठून जमा करावे? उसन्या कल्पनांवर कृत्रिम बनलेल्या सुशिक्षितांच्या मागें उष्टया उपमांचे भुंगे लागतील. पण अस्सल मराठी हृदयांतून निर्माण झालेल्या मराठी लावणीच्या मागें अनुकरणाचे भुंगे कधींही लागायचे नाहींत!

शरदुत्पल पत्राक्षी
शरदुत्पल पुण्यगन्ध समगन्धा

हें वर सांगितलेलें मोरोपंत कवींचें वर्णन बहारीचें नाहीं असें कोण म्हणेल? त्याची घडण तर फारच धनदौलतीची आहे, पण त्यांत मराठीपण नाहीं. ह्याचे उलट

तुझे नरम गोरे गाल
तुझ्या नथनीवर लाल
पुढें पाहून चाल चाल
आवर चन्देरि शाल
आला महिना फाग फाग
हा आम्ब्याचा बाग
धरूं नको राग राग
सखे वचनाला जाग

ह्या साध्या वर्णनाचा मराठी मनावर केवढा पगडा बसेल?

मराठी लावण्यांत मयुरांचा पिसाराही फारसा डोकावत नाहीं! कारण मराठी प्रांतांत मोर फारसे नाहींत! परन्तु लावण्यांत मोर अगदींच नाहींत असें मात्र नाहीं. कोकिळांचें प्रस्थही मराठी लावण्यांत फारसें नाहीं.

मधुमत्त मधुप हे भ्रमती
गुंजारव बहुतचि करिती
उन्मत्त कोकिला चित्तीं
पंचम स्वरें त्या गाती

हें वर्णन महाराष्ट्राला फारसें लागूं नाहीं. काश्मीर वगैरे ज्या देशांत संस्कृत कवितेचा उदय झाला त्या देशांतलीं हीं वर्णनें आहेत; पण हें काश्मिरी आम्ब्याचें कलम मराठी रंगभूमीवर लावून पराक्रमी मराठी कवींनीं महाराष्ट्रांत नवरंग उभे केलेले आहेत. महाराष्ट्रांतला ऐनजिनसी रंग म्हणजे पोपटाचा आणि त्यामुळें मराठी लावण्या राघूमैनांनीं भरून गेल्या आहेत.

ऐक सजना अरे मनमोहना
राघु बोलला हे मैना

अशा डौलाच्या व अशाच अर्थाच्या मराठी लावण्या जागोजाग आढळतील, किम्बहुना मराठी लावण्यांचा थाट राघूमैनांशिवाय चालेल किंवा नाहीं ह्याबद्दल शंकाच वाटते. वंगवाङ्मयाच्या झोंकाला मोहून ' पराग, ' ' अरविन्द ' वगैरे गुलगुलीत मराठी नांवें भाषेंत वाटेल तितकीं येऊं लागोत–कमलविमलांच्या मालांनीं मराठी नांवांचा बाग झांकला जावो–पण मराठींतील अस्सल नांवें, म्हणजे मैना, साळू, चिमणी, तुळशी, चम्पा, गजरा हींच होत ! आतां हीं नांवें लोकांना नकोशीं झालेलीं आहेत व त्याबद्दल मोठा शोक करीत बसलें पाहिजे असेंही नाहीं. जगाची क्रान्ति एक-सारखी पालटत असणें हा सृष्टीचा धर्मच आहे व त्याप्रमाणें मराठी सृष्टिही पालटली पाहिजे, पण आमचा सांगण्याचा उद्देश एवढाच आहे कीं, मराठी मुलूख अर-विन्दांनीं व कमलांनीं भरलेला नाहीं. इथें मैना, साळुंकी, चिमण्या, राघू हे कायमचे वस्तीदार आहेत व चांफा, तुळस, बकूळ, जाईजुई ह्याच नेहमीं फुलायच्या आहेत. इथें उंस, गहूं, जोन्धळे ह्यांची शेतें पिकायचीं आहेत; व पेरू, केळीं, आम्बे हेच पाडाला लागायचे आहेत. अशा स्थितींत बकुळी, गजरा, जाई वगैरे नांवें हलकीं खास नाहींत. किम्बहुना त्यांत सृष्टिविषयींची प्रीति फार व्यक्त होते. सूक्ष्म विचार केला तर मैना, साळू, चिमणी ह्यांत अत्यन्त कोंवळें काव्य आहे, असेंही म्हटल्या-वांचून रहावत नाहीं.

राघूनें ज्याप्रमाणें मराठी लावणी व्यापून टाकली आहे त्याप्रमाणें आम्ब्यानेंही मराठी लावणीचा कबजा घेतलेला आहे. मराठी लावणींत जेवढ्या आम्बराया आहेत तेवढ्या मोठमोठ्या श्रीमंतांच्या देखील जवळ नसतील! आम्ब्यांवर शाहिरांची फारच भक्ति! त्याच्या पाडाची ते वाट पहात असायचे! त्यामुळें त्यांच्या लावण्यांतही भरपूर आमरस उतरलेला आहे. महाराष्ट्राचा आम्बा व ऊंस म्हणजे त्याचा भगवा झेण्डा व जरीपटका होय! मग मराठी लावणी

**नका मला उसामधिं ओढूं**

अशी प्रार्थना करून भरपूर आमरस पिऊन येत असेल यांत आश्चर्य तें काय?

सर्वांत मोठी गंमत म्हणजे लावण्यांत दृग्गोचर होणारें मराठी हृदय निसर्गाच्याच भाषेंत बोलत असतें व निसर्गाचेच दृष्टान्त देत असतें!

**चार चौघे पाटिल बसा**

अशी लावण्यांची कडवीं ऐकलीं म्हणजे महाराष्ट्रांतलीं गांवें, तिथल्या चावड्या, तिथें कामधाम आटपल्यावर गप्पा झोडीत बसलेली गांवकरी मंडळी व त्यांत शहाणपणानें महत्त्वाच्या गोष्टींचा निर्णय करण्याकरितां सिद्ध असलेले पाटिल, कुळकर्णी ह्यांचें चित्र दृष्टीपुढें उभें राहतें. राघू, आंबा, गहूं, हरभरा ह्याप्रमाणें मराठी लावण्यांतून पाटील कुळकर्णीही फारच झळकलेले आहेत. आणि ह्याचें कारण एवढेंच कीं, मराठी मुलखांतला गांव म्हणजे पाटील कुळकर्णीच पहिल्यांदा दिसायचे! त्यांच्याशिवाय गांव कसा चालेल?

आणि अशा रीतीनें चावडीवर पाटील वगैरे मंडळी येऊन बसली म्हणजे शाहिरानें त्यांच्यापुढें आपले प्रश्न टाकायचे! अशा प्रकारें अनेक लावण्यांचे आरंभ अशा रीतीनें केलेले असल्यामुळें त्यांना कमालीचें रम्यत्व आलेलें आहे.

**तुम्हि आयका अर्ज थोडा**
**जिवाचा धडा**
**गातो पोवाडा**
**उमाजी नायकाचा जी ॥**

असा उमाजी नायकाच्या पोवाड्याचा जो आरंभ केलेला आहे, त्याचा अर्थ आपणा सुशिक्षित लोकांच्या लक्षांत येत नाहीं. कारण, उमाजी नायकाचा पोवाडा गायचा

त्यांत ' अर्ज ' कसला व ' जिवाचा धडा ' तरी कसला? परंतु आपले पुढें गांवचे पाटीलपटवारी चावडीवर येऊन बसलेले आहेत अशी शाहिरानें केलेली कल्पना लक्षांत घेतली म्हणजे ह्या शब्दांची किंमत आपल्या ध्यानांत येते. कुणीकडे गांवचे पाटील व कुणीकडे आपण पोवाडेवाले ! आपणांसारख्या गरीबांचें कवन ही बडीबडी मंडळी ऐकतील का? का आपला ' अर्ज ' ते फेंटाळून लावतील? बरें, आपलें काव्य त्यांना म्हणून दाखविण्याचें धाडस ( ' जिवाचा धडा ' ) आपण केल्यास आपलें काव्य त्यांना रुचकर तरी लागेल का ? आपला पोवाडा नीरस वाटून त्यांना कंटाळा तर येणार नाहीं ना? शाहिरांची ही कल्पना किती नैसर्गिक आहे? व त्यामुळें पोवाडा रचतांना त्यांनीं प्रदर्शित केलेली भीति किती खुलून दिसते?

लावण्यांची भाषा व रचनाही अगदीं नैसर्गिक असते. ह्यामुळेंही लावण्या अतिशय गोड लागतात. एक तरुणी आपल्या प्रियकराची वाट पहात असतां तिनें काढलेले साहजिक उद्गार पहा व त्या उद्गारांची साधी जोडणीही अवलोकन करा. ही लावणी फारच प्रचारांत असल्यामुळें ती येथें जरा जास्त उद्धृत करून घेतलेली आहे !

**वाट पाहोनि**
**तनु माझी थकली**
**आज स्वारी**
**कुणिकडे झुकली ॥ धृ० ॥**
**वय माझें लहान सान**
**नाहिं मला मानपान**
**आणुन देइन पानदान**
**चिकणि सुपारि**
**पानें किहो पिकलीं ॥ १ ॥**
**आज स्वारी०**

साधी भाषा, साध्या कल्पना, साधे शब्द, साधे प्रसंग मग आश्चर्य काय, कीं बहुजनसमाज लावण्यांवर नागाप्रमाणें डुलतो व लावण्या म्हटल्या कीं दहा दहा हजार स्त्रीपुरुषांचा समाज ऐकायला जमतो !

आतां आणखी एका महत्त्वाच्या गोष्टीचा विचार करायचा आहे. ती गोष्ट ही कीं, मराठी लावण्या नेभळट नाहींत ! मराठी राज्याचा मर्दपणा लावण्यांत ओत-

प्रोत भरलेला आहे. शूर मराठ्यांचा मुख्य व्यवसाय म्हणजे मुलूखगिरी ! त्यांची मुख्य सम्पत्ति म्हणजे घोडा ! त्यांची हौस म्हणजे शत्रूवर स्वारी करायला जाणें ! मराठे लोक इतिहासांत जे प्रसिद्ध झाले ते आपल्या मर्दपणाच्या गुणावर झाले ! श्रीशिवाजी महाराजांच्या अगोदरपासून मराठी मनुष्य ह्या मर्दपणाबद्दल प्रसिद्ध आहे ! मारवाडी आणि त्याची वही, पठाण आणि त्याचा सुरा, गुजर आणि त्याची तागडी, तेलंगी आणि त्याची याचना—ह्या गोष्टी जशा एकमेकांशीं संलग्न आहेत त्याप्रमाणें मराठा आणि त्याचा घोडा हेही एकमेकांशीं संलग्न आहेत ! हातांत भाला, पीळदार मिशा, वांकडी पगडी व खन्दा घोडा—म्हणजे मराठा मनुष्य ! महाराष्ट्रावर मुसलमानी अंमल झाला तरी मराठे लोकांनीं हा बाणा सोडला नाहीं ! श्रीशिवाजी महाराजांनीं मराठे लोकांचा हाच गुण विकासाला नेला ! त्यांनीं महाराष्ट्रांत चपळ घोडेस्वार उदयाला आणले व हातांत लाम्ब भाले देऊन त्यांचे बळावर मुसलमानी सत्तेचा मोड केला ! मुसलमानांचें सैन्य मराठे घोडेस्वारांना भ्यायला लागलें. बंगाली लोकांना मराठे घोडेस्वारांची धडकी भरली व मराठे घोडेस्वार इतक्या देशाभिमानानें प्रेरित झाले कीं, मराठ्यांचा भगवा झेण्डा त्यांनीं अटकेपार नेला !

मराठी लावण्यांत सर्वत्र हें चित्र आहे आणि त्यामुळें मराठी लावण्यांचें वाङ्मय फारच देशाभिमानप्रेरक झालेलें आहे ! कै. देवल ह्यांची ‘ कंगणिदार भरजरी पिळाची, पगडी शिरावर ’ ही ‘ मृच्छकटिक ’ नाटकांतील लावणी सर्वांस माहीत आहेच, पण तिची मूळ लावणीही किती झोंकदार आहे पहा—

**पगडि कंगणिदार**
**अंगावर चिलखत**
**शिरपेंच तुरा**
**हिरे पाचुचे हार गळ्यामधिं**
**शोभताति राया चतुरा**
**दोन गोष्टि बोला मजशी**
**घोड्यावरून खालीं उतरा**
**या घरांत जिवलगा मजविशीं**

मनीं ठेवि खातरा
  तुह्मि राव नगरिचे राघू
मी तर बाइ मैना जशी
  तुह्मि गुलाब मी शेवती
शोभे तुमचे पायांपाशीं
  तुह्मि हंस मी तर हंसिणी
सख्या करून पहा चौकशी
  जशि पौर्णिमे निशि चान्दणी
चन्द्र बघुनिं भाळली
  उभी राहून दारांत जिवलगा
किती मूर्ति तुमची न्याहळी

कै. देवल यांची नुसती कंगणिदार पगडीच नव्हे, तर त्यांचें

त्यो मोर तूं मोरिन
  कां जातिस त्याला टाकुन
पोपट आमुच धनी
  बस होऊन मैना रानी

हें सर्व ह्या लावणींतील आहे ! पण मृच्छकटिकांतली लावणी व ही लावणी ह्यांत अन्तर हें आहे कीं, मृच्छकटिकांतल्या लावणीला नुसत्या इष्कबाजीचीच बैठक आहे ! पण ह्या लावणींतल्या शृंगाराला मराठ्यांच्या मर्दपणाची बैठक आहे ! हीच लावणी कशाला ? ही दुसरी लावणी पहा—

माझा प्राणपती जिवलगा
  फुलाचा ग झेला
नाजुक अलबेला
शिपाइ रंगेला
  माझा छान छबेला ।

त्यांतही शृंगाराचा पाया मराठ्यांचा शिपाईबाणा हाच आहे ! शृंगाराला शिपाईबाण्याचा पाया असला तरच शृंगार शोभतो ! नुसता इष्कबाज शृंगार—ऊं हूं ! त्यांत कांहीं शोभा नाहीं ! क्षयरोगी बनलेल्या पाप्यांच्या पितरांना शृंगार काय करायचा

आहे ? त्यांचा शृंगार म्हणजे विषयान्धता ! ती कधींतरी काव्याचा विषय होऊं शकेल काय ?

खरोखर लावण्या म्हटल्या म्हणजे पूर्वीचा मराठी वीर पुढें दिसायला लागतो, हृदय उचम्बळतें, देशभक्तीनें अथांग वाहूं लागतें.

पुढील सर्वप्रसिद्ध थाटदार लावणी घ्या—

**पंचकल्याणी घोडा अबलख ग**
**जिनावर कलाबतु लखलख ग**
**बाई सूर्यपान कळगिचें नाजूक**
**झुकतचि अम्बरिं बसलें**
**छुम छनन छनन**
**पायांत झांजर बोले ॥ ध्रु० ॥**
**झाली बोथाट्यांची गर्दि**
**मार्गेपुढें फौज अर्धी अर्धी**
**बाई शिलंगणाचें**
**सोनें लुटुन आणिलें**
**सण दसऱ्याच्या मुहूर्तानें**
**डेरे किंग दिधले ॥ १ ॥**

हा शृंगार घातुक आहे असें कोण म्हणेल ? तरुण–मराठे–वीरांकरितां महाराष्ट्राच्या तरुणी ज्यावेळीं अशा रीतीनें झुरत बसलेल्या असतील, त्याचवेळीं त्यांचे पोटीं महादजी, दत्ताजी, बापू गोखले, परशुरामभाऊ असे वीर जन्माला येत असतील ! लावण्यांचा हा पोशाख फारच लक्ष देण्याजोगा आहे व त्यावरून हें वाङ्मय किती स्फूर्तिदायक आहे ह्याचीही कल्पना झाल्याशिवाय राहणार नाहीं !

आतांपर्यंत ह्या वाङ्मयाकडे कुणीही लक्ष दिलेलें नाहीं. पुण्याचे रा. रा. अधिकारी, पुण्याची चित्रशाळा वगैरे वाङ्मयप्रेमी पुरुषांनीं व संस्थांनीं कांहीं लावण्या छापलेल्या आहेत, पण हें काम जितकें लक्ष्यपूर्वक व्हायला पाहिजे तितकें झालेलें नाहीं ! सदरील प्रकाशकांना राग येत नसेल तर असें स्पष्टपणें म्हणायला हरकत नाहीं कीं, हें काम हलगर्जीपणानें झालेलें आहे ! मुद्रितांचीं नुसतीं प्रुफें देखील वाचण्याची काळजी घेण्यांत आलेली दिसत नाहीं, मग परिशोधनाची व

टिप्पण्यांची गोष्ट कशाला ? ह्या बाबतींत कांहींतरी टोंचून बोलावें ह्या उद्देशानें हें आम्ही म्हणत नाहीं. आम्ही एवढेंच सांगतों कीं, जर रसिकपणानें त्यांनीं हें काम केलेलें आहे तर तें जरा जास्त काळजीपूर्वक केलें असतें तर बरें झालें असतें. अजून अशा शेंकडों लावण्या राहिलेल्या आहेत कीं, त्यांचें मुद्रण होणें जरुरीचें आहे. हें मुद्रण कोणी केल्यास मराठी वाङ्मयांत फार महत्त्वाची भर पडेल. पण ह्यांत लक्ष्यांत एवढेंच ठेवावयाचें कीं, जशी लावणी म्हणजे त्याज्य अशी कल्पना करणें चुकीचें आहे—त्याचप्रमाणें लावणी म्हणजे संग्राह्य, ही कल्पनाही अगदीं खोटी आहे. सामान्यतः लावणी हें वाङ्मय कितीही मनोहर असलें तथापि रामजोशांसारख्या श्रेष्ठ कवींच्या लावण्यांतही कांहीं लावण्या इतक्या अश्लील असतात कीं त्या मुद्रित करणें म्हणजे मराठी वाङ्मयाची विटम्बना करण्यासारखें आहे. लावण्यांच्या कोणत्याही संग्रहांत असल्या न घालणें हें चांगलें! प्रकाशकांनीं ह्या गोष्टीकडे विशेष लक्ष पुरविणें अवश्य आहे!

ह्याशिवाय लावण्या म्हणजे वाङ्मयाचें सर्वस्व असेंही मानणें योग्य नाहीं! स्फूर्ति, कथारस व प्रेम हीं जीं मराठी काव्याचीं तीन अंगें आहेत त्यांपैकीं लावण्या ह्या शेवटच्या सदरांत येतात! तेव्हां तीन भागांपैकीं एक भाग एवढ्याच नात्यानें लावण्यांची किंमत आहे. काव्याचे बाकीचे दोन्ही भाग अवश्य आहेत, किम्बहुना स्फूर्ति (अथवा ईश्वरभक्ति) हा मराठी काव्याचा एवढा अमोलिक भाग आहे कीं, त्याचेशिवाय मराठी काव्य पूर्णच वाटायचें नाहीं! सुभाषित हा जसा संस्कृत काव्याचा अलौकिक भाग त्याप्रमाणें स्फूर्ति अथवा ईश्वरभक्ति हा मराठी काव्याचा विशिष्ट भाग आहे. तो नाहींसा होईल तर मराठी काव्यक्षेत्रांत केवढा खळगा पडेल ह्याची कल्पनाही करतां यायची नाहीं!

लावण्यांच्या वाङ्मयाचा जो मुख्य उपयोग आहे तो महाराष्ट्रांतल्या जनतेचें हृदय काबीज करण्याकरितां आहे! स्फूर्ति अथवा ईश्वरभक्ति ह्या प्रान्तांतील काव्यानें तुकाराम—रामदासांसारख्या कविमुकुटमणींनीं परमेश्वराचें हृदय काबीज केलें, तसेंच लावण्यांसारख्या काव्यानें जनतेचें हृदय काबीज करण्याची दिशा रामजोशांसारख्या शाहीरांनीं दाखविलेली आहे. ह्याचा अर्थ असा नाहीं, कीं रामजोशांसारख्यांनीं जे छन्द रचले तेच छन्द आपण रचले पाहिजेत—त्यांनीं जे विषय घेतले तेच विषय आपण घेतले पाहिजेत—किंवा त्यांनीं आपल्या काव्यांना शृंगा-

राचा जो शिडकावा दिला तोच आपण दिला पाहिजे. ह्या काव्याला आपण ‘ लावणी ’ हें नांव द्यावें असाही ह्याचा अर्थ नाहीं ! त्याला नवीन नांव व नवीन घाटणी देण्याचाँही आपणांस पूर्ण अधिकार आहे ! फक्त एवढीच गोष्ट आपण लक्ष्यांत ठेवली पाहिजे कीं, आपलें काव्य जनतेच्या हृदयास बिलगावें व त्यांची ‘ लावणी ’ तिथें व्हावी. त्याचे योगानें आपणांस जनतेचें हृदय काबीज करतां यावें !

सुशिक्षितांची भाषा लोकसमाजापासून फार लांब होऊं लागलेली आहे. सुशिक्षितांचीं व्याख्यानें, त्यांचीं वर्तमानपत्रें, त्यांचीं काव्यें व त्यांचे विचार लोकसमाजाचे अन्तःकरणांत मुळींच नसतात ! ते काय बोलतात हें लोकसमाजास मुळींच कळत नाहीं व लोकसमाजाचे अन्तःकरणांत काय चाललेलें आहे ह्याची त्यांना दादही नसते. ह्याप्रमाणें हा एक आंधळ्या कोशिंबिरीचा डाव आहे. हीं दोन अगदीं निरनिराळीं जगें आहेत. ज्या जगांत सुशिक्षित लोक वावरतात त्या जगांत बहुजनसमाज वावरत नाहीं, व ज्या जगांत बहुजनसमाज वावरतो त्या जगांत सुशिक्षित लोक वावरत नाहींत. ह्याप्रमाणें सुशिक्षित लोक व बहुजनसमाज ह्यांचेमध्यें तुटकपणा आलेला आहे. ते एकमेकांपासून अलग झालेले आहेत. एकमेकांची एकमेकांना ओळखही नाहीं !

ही स्थिति कोणत्याही प्रकारें स्पृहणीय नाहीं ! ही राष्ट्राचे ऐक्यास विघातक आहे. हिच्या योगानें एकराष्ट्र बनणें शक्य नाहीं. एकराष्ट्र बनण्यास सुशिक्षित लोकांची नाडी व बहुजनसमाजाची नाडी एका विचारानें उडाली पाहिजे. जनसमाजाचें अन्तःकरण सुशिक्षित लोकांचें अन्तःकरणांत मिसळून गेल्याशिवाय व सुशिक्षित लोकांचें अन्तःकरण बहुजनसमाजाचे अन्तःकरणांत उतरल्याशिवाय दोघांचा मिलाफ जमणें दुर्घट आहे ! पण जर हा मिलाफ नसेल तर स्वराज्य नाहीं, स्वराज्य नसेल तर स्वातंत्र्य नाहीं व स्वातंत्र्य नसेल तर राष्ट्राला अस्तित्वही नाहीं !

श्रीशिवाजी महाराजांनीं हा मिलाफ घडवून आणला ! त्यांनीं स्वातंत्र्य मिळविलें—महाराष्ट्रास सर्व राष्ट्रांत वर चढविलें ! शिवकालोत्तर राजकारणांत लो. टिळकांनीं हा मिलाफ घडवून आणण्याचा प्रयत्न केला. ‘ लोकमान्य ’ ही पदवी त्यांना त्यामुळें लाधली व राजकारण लोकांचे हृदयापर्यन्त नेण्याचा त्यांनीं अनेक परीनें प्रयत्न केला ! पण त्यांच्या ह्या प्रयत्नांत महाराष्ट्रांतील कवींकडून त्यांना फारशी मदत मिळाली नाहीं ! ह्यालाही कांहीं कांहीं थोडे कवि अपवाद निघाले !

परंतु बहुतेक इतर कवि बहुजनसमाजाचे अन्तःकरणापासून अलग राहिले. त्यावेळीं राष्ट्राच्या एकीकरणाचे कामास मदत करण्यासाठीं पुढें येऊन जर बहुजन-समाजाचीं अन्तःकरणें कवींनीं आकर्षून घेतलीं असतीं तर

**लोकमान्यांच्या कार्यास दसपट यश**

आलें असतें. अजूनहीं राष्ट्राच्या ऐक्यास मदत करण्यासाठीं कवींना मदत करतां येण्यासारखी आहे. एका प्रकारें महाराष्ट्रांतील आधुनिक कवींवर ही जबाबदारी आहे व ही जबाबदारी पार पाडण्यास महाराष्ट्रांतील कवि पुढें येतील अशी आम्हांस आशा आहे!

आणि त्यासाठीं लावण्यांचा उपयोग अतिशय करून घेतां येण्यासारखा आहे.

**नका मला उसामधिं ओढूं**

असें ज्यावेळीं मराठी कविता कवींची प्रार्थना करील, त्यावेळी तिचें ऐकतां उपयोगी नाहीं. कारण ज्या उंसाच्या फडांत तिला ओढावें, गहूंहरभऱ्यांच्या शेतांत तिला न्यावी व जोन्धळ्याच्या पिकामधून तिला हिण्डवावी त्याचवेळीं बहुजन समाजाचे अन्तःकरणावर ती छाप पाडील! ती जर लाजेल आणि दूर सरेल तर तिला सांगितलें पाहिजे कीं,

**तुला पाह्यली ग**
**शेताच्या वरती**
**तुला पाहतांना**
**सहि मला होती**

बहुजन समाजाचें अन्तःकरण वेधण्याचा हा मार्ग आहे. हा मार्ग फार सुन्दर आहे व तो आपला परिणाम केल्याशिवाय कधींही रहाणार नाहीं! हा परिणाम झाला म्हणजे मराठी काव्यवधू इतकी शोभायला लागेल कीं तिला पाहून जनलोकच म्हणा-यला लागतील—

**सुन्दरी खरी ही।**
**रूपांत उणिव नाहीं! ॥ धृ० ॥**
**मुख चन्द्रपरी**
**वदे पिकस्वरी**

शुक खेद करी
निज चंचुपरी
नासिका बरी
हिरकण्या दन्तपंक्तीही ॥ १ ॥
मृदु गौरवर्ण
रंगांत पूर्ण
केतकी वर्ण
म्हणे मीहि जीर्ण
वर्णांत खालतें पाही ॥ २ ॥

आमची मराठी काव्यवधू सर्वांगसुन्दर व्हावी अशी जर खरोखरी इच्छा असेल व तिचेंपासून कांहीं राष्ट्रिय कामगिरी करून घ्यायची असेल तर ह्या वाटेनें जाणें इष्ट आहे. सत्यशोधक समाजाचे 'जलशां'चा अनेक लोकांना राग येत असतो. त्यांना वाटत असतें कीं हा काव्याचा दुरुपयोग आहे. परन्तु लावण्यांचा बहुजनसमाजावर काय भयंकर परिणाम होतो हें पाहूनच कै. शाहूमहाराजांनीं ही युक्ति काढली ! त्याचा परिणामही जसा व्हावयास पाहिजे होता तसाच झाला. सत्यशोधक समाजाची ही युक्ति मराठींतील कवींनीं घेण्याजोगी आहे. सत्यशोधक लोकांचीं मतें कोणाला पसन्त असोत किंवा नसोत. पण स्वमतप्रसारार्थ त्यांनीं काढलेला मार्ग अचूक होता यांत संशय नाहीं. पण त्याचेबरोबर स्फूर्तीची ऊर्फ ईश्वरभक्तीची कविताही पाहिजे. ईश्वराला वश करण्याची स्फूर्तिजन्य कविता व बहुजनसमाजाला वश करण्याची कविता हीं मराठी काव्याचीं दोन टोकें होत ! तीं दोन्हीं टोकें आपल्या भरांत असलीं पाहिजेत ! हीं दोन्हीं टोकें हातांत असणारे कवि व वर्णनात्मक काव्यानें त्यांना दुजोरा देणारा मधला कविवर्ग अवतीर्ण झाला म्हणजे काव्य सर्वांगपरिपूर्ण झालें ! ज्ञानेश्वर, तुकाराम, वामन पण्डित, मोरोपंत, रामजोशी, सगनभाऊ ह्यांनीं पूर्वी मराठी कविता सर्वांगसुन्दर केलेली आहे ! पुढेंही सर्वांगपरिपूर्ण काव्य निर्माण व्हायला पाहिजे ! आधुनिक मराठी कवि असा प्रयत्न करतील काय ?

# प. वा. रा. ब. वामनराव कोल्हटकर *

प्रस्तुत लेखकाला लिहावयास अत्यंत आवडतें, पण लिहावयास अत्यंत अवघड असें जर एखादें चरित्र असेल तर तें रा. ब. वामनराव कोल्हटकर ह्यांचें होय. कारण लेखक व परलोकवासी चरित्रनायक ह्यांच्यांतील सार्वजनिक संबंधाविषयीं महाराष्ट्रांत जो विलक्षण गैरसमज पसरलेला आहे, त्यामुळें लेखकानें लिहिलेले रावबहादुरांविषयींचे चार शब्द कसे वठतील या संबंधानें प्रत्येक वाचकाचा निरनिराळा अंदाज असण्याचा संभव आहे. याकरितां फारशी प्रस्तावना न करितां रावबहादुरांच्या चरित्रांत एकदमच अवगाहन करावें हें चांगलें.

रा. ब. वामनराव कोल्हटकर यांचा जन्म वांई येथें इ० स० १८४६ सालीं झाला. त्यांच्या वडिलांचें नांव हरिपंततात्या कोल्हटकर व मातुःश्रींचें नांव रमाबाई असें होतें. कोल्हटकरांचें घराणें कोंकणांतून वांईस आल्यास त्यावेळीं फक्त एकच पिढी झालेली होती. हरिपंत तात्यांचे वडील गोविंदपंत हे प्रथमतः कोंकणांतून वांई येथें आले व वांई येथील वैद्यांच्या खानदानी घराण्यानें त्यांच्यावर कृपा केल्यामुळें लवकरच त्यांना वांई येथें सुखानें राहतां येऊं लागलें. वैद्यांच्या घराण्याविषयीं कोल्हटकर कुळांतील प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणीं जन्मसिद्ध स्वामिभक्ति वागत असतें याचें कारण गोविंदपंत काकांवर त्या घराण्याचे झालेले उपकार हेंच होय. या उपकारांची फेड करण्याकरितां गोविंदपंत काका व त्यांचे चिरंजीव नारोपंत, हरिपंत, चिमणाजीपंत, व महादेवशास्त्री यांनीं आपलें तन मन धन खर्च केलें व रा. ब. वामनराव यांनांहि वैद्य घराण्यांतील मुलांना शिक्षण देण्याच्या कामीं आर्थिक साह्य करण्यांत अत्यंत आनंद वाटत असे. वैद्य घराण्यांतील एका दत्तविधानासंबंधीं भाऊबंदांच्या विरुद्ध खटपटीमुळें एकदां एक आणीबाणीचा प्रसंग आला असतांना तो केवळ कोल्हटकर मंडळींनीं अविश्रांत मेहनत व अनेक युक्तिप्रयुक्ति केल्यामुळेंच टळला.

वामनरावजींचे वडील हरिपन्त हे अतिशय भोळे व साधे असत. अगोदर हे नाकांत बोलत व त्यामुळेंहि अव्यावहारिकपणाचा त्यांच्यावर शिक्का येण्यास तितकी जास्त मदत होत असे. त्यांचे वडील बंधु नारोपंत हे अत्यंत व्यवहारचतुर होते,

* मनोरंजन.

व कनिष्ठ बन्धु महादेवशास्त्री हे त्यावेळच्या नामांकित लोकांत प्रमुख होते. त्यामुळें हरिपन्त तात्यांकडे घरची व्यवस्था, देवाची अर्चा व वैद्यघराण्यांतील खाजगी देखरेख हींच कामें साहजिकपणें आलीं. हीं कामें ते फार सचोटीनें व भाविकपणानें करीत. त्यांची सचोटी इतकी असे कीं, वैद्यांच्या देवाकरितां वैद्यांच्या बागेंत तोडलेलीं फुलें ते आपल्या देवाकरितां कधींहि घरीं आणीत नसत. ते रात्रीं चाल बांधून भजन करीत व त्यावेळीं फार प्रेमानें गात. ह्यांनीं आपलें आयुष्यहि संन्यास घेऊनच संपविलें.

वामनरावजींना आपल्या मातापित्यांचा विरह साधारणतः लवकरच झाला. त्यांच्या वेळेपर्यन्त कोल्हटकर घराण्याचा पसारा वांईत बराच वाढला होता व वडील माणसें, मुलेंबाळें, सोयरीं धायरीं मिळून चाळीस माणसें कोल्हटकरांच्या घरांत असत. या चाळीस माणसांत वामनराव हेच सर्वांत धाकटे असत व त्यामुळें ते सर्वांचेच लाडके होते. ते मोठे होण्याच्या सुमारास त्यांचे चुलते महादेवशास्त्री कोल्हटकर हे अकालीं मृत्यु पावले व त्यामुळें कोल्हटकर घराण्यांत मोठाच आकांत उडाला. कौटुंबिक व नागरिक प्रतिष्ठेहून एक पायरी वर चढून सार्वजनिक कार्यांत पुढाकार घेणारे महादेवशास्त्री हेच कोल्हटकर घराण्यांत पहिले झाले. पूर्वपद्धतिप्रमाणें उत्तम प्रकारचें शास्त्राध्ययन करून महादेवशास्त्री आपल्या प्रपंचास सुरवात करणार तोंच सुप्रसिद्ध कॅण्डीसाहेब यांनीं त्यांना उपदेश केला कीं, “ महादेव, तूं असा अंगावर शालजोडी घेऊन फिरलास तर लोक तुला विद्वान् म्हणतील, परंतु तुझ्या गुणांचें खरें चीज व्हावयाचें नाहीं. यासाठीं तूं इंग्रजी शीक व आधुनिक विद्यांत पारंगत होऊन जगाच्या समोर ये. ” महादेवशास्त्र्यांना हा उपदेश तंतोतंत पटला व प्रौढ वयांत इंग्रजी शिकण्याला सुरवात करून ते झपाट्यानें पुढें सरसावले. त्यावेळीं महादेवशास्त्र्यांचें नांव माहित नाहीं असा एकहि सुशिक्षित मनुष्य नव्हता, व अजूनहि त्यांची आठवण करून गहिंवरून जाणारे लोक वृद्ध पिढींत आढळतात.

महादेवशास्त्री हे विद्याखात्यांत नोकरी करावयास लागून डेप्यूटी इन्स्पेक्टर जागेपर्यंत चढले, व त्या जागेवर असतानांच त्यांचा अकाली अन्त झाला. तथापि महाराष्ट्रांत जो त्यांचा त्या वेळीं लौकिक झाला तो ते “ लोकोत्तर वक्ते ” या नात्यानें झाला. त्यांच्या वक्तृत्वाचीं पुष्कळ वर्णनें मागें ऐकूं येत व ‘ निबंधमाले ’-तसुद्धां त्यांच्या वक्तृत्वाबद्दल उल्लेख आलेले आहेत. त्यांच्या वक्तृत्वाचा मुख्य गुण

म्हणजे वाणीचा अप्रतिहत प्रवाह आणि बोलण्यांतील अप्रतिम माधुर्य हें होय. त्यांच्या बोलण्यानें श्रोत्यांचें मन इतकें तल्लीन होऊन जात असे, कीं, त्यांचें भाषण कितीहि वेळां ऐकलें तरी त्यांची तृप्ति होत नसे. आपल्या महाराष्ट्रांत वक्तृत्व-गुणाचा साधारणतः तुटवडाच आहे. या कामांत फार पुढें गेलेले म्हणजे बंगाली लोकच. पण अशा तुटवड्यांतसुद्धां ज्यांनीं वक्तृत्वाबद्दल आपलें नांव गाजविलें अशा लोकांत महादेवशास्त्री यांची गणना आहे.

हा त्यांचा लौकिक हल्लींच्या पिढीपर्यंत चालत येणें अर्थातच शक्य नाहीं. कारण वक्तृत्व व गायन यांना असा शापच आहे, कीं, त्यामुळें त्यावेळचे लोक थक्क व्हावयाचे, पण तो लौकिक त्याच पिढींत लुप्त व्हावयाचा. प. वा. भाऊराव कोल्हटकर यांच्या गायनानें एकेकाळीं महाराष्ट्र देश नागासारखा डुलत होता, त्यांच्यासारख्या गाण्याच्या सुधाधारा महाराष्ट्रास आजपर्यंत पुन्हां लाभल्या नाहींत, पण त्यांच्या या लौकिकाची आज काय खूण आहे? आज त्यांच्या गुणाची फारच थोड्या लोकांना कल्पना आहे, व आणखी एक पिढी जाऊं द्या म्हणजे कुठले भाऊराव आणि कुठले कोण? वक्तृत्व व गायन यांच्यावर असा शाप असल्यामुळें महादेवशास्त्र्यांचें नांव आज जवळ जवळ लुप्तच झालेलें आहे. त्यांचें नांव महाराष्ट्रांत जर कांहीं कारणानें रहाणार असेल तर त्यांनीं केलेल्या "अथेल्लो" नाटकाच्या सर्वमान्य भाषांतरामुळेंच होय. हें भाषांतर अत्यंत सुरस व समर्पक झालेलें आहे, व देवलांच्या अथेल्लो नाटकाच्या रंगावृत्तीचा पायाहि महादेवशास्त्र्यांचें भाषांतर आहे. शोकाची गोष्ट ही कीं, या भाषांतराचा लौकिक अनुभवण्यास शास्त्रीबुवा जगले नाहींत. भाषांतर छापखान्यापर्यंत जाण्याच्या आंतच त्यांना मृत्यूनें गांठलें व त्यांच्या पश्चात् त्यांचे भाचे प. वा. जनार्दन सखाराम गाडगीळ यांनीं तें भाषांतर छापून प्रसिद्ध केलें.

महादेवशास्त्री वारले तेव्हां त्यांची अल्पवयी द्वितीय पत्नी हयात होती. तिला कांहींएक मूलबाळ नसल्यामुळें सर्वांचा लाडका वामन याला तिच्या मांडीवर दत्तक देण्यांत आलें. वामनरावांचे वडील बंधु कृष्णराव हे त्या वेळीं प्रौढ झाले होते, आणि वामनराव हे प्रवेशपरीक्षा संपवून एलफिन्स्टन् कॉलेजमध्यें शिरावयाच्या बेतांत होते. महादेवशास्त्र्यांच्या मृत्यूमुळें कोल्हटकरांच्या घरांत पैशाचा ओघ जरी कमी झाला तरी वामनरावांच्या चुलत्यांनीं त्यांची कोणत्याहि प्रकारें नाउमेद होऊं दिली

नाहीं. तथापि एकदोन वर्षांच्या आंतच त्यांना प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें कॉलेज सोडून द्यावें लागलें. यावेळीं मुंबईत डॉ० भाऊ दाजी हे होते, व त्यांचा आणि महादेवशास्त्र्यांचा फार स्नेह असल्यामुळें वामनराव हे त्यांच्याकडे नेहमीं जात. एके दिवशीं वामनरावांची तब्येत बिघडल्यामुळें ते प्रकृति दाखविण्याकरितां भाऊ दाजी यांजकडे गेले. भाऊ दाजी यांनीं त्यांची तब्येत पाहून अतिशय भ्यालेला चेहरा केला व ते म्हणाले " वामन, तूं आत्तांच्या आतां वाईस आपल्या घरीं जा. तुझ्या छातींत बिघडलेलें आहे व तूं एकदोन महिन्यांचाच सोबती आहेस. " यावेळीं वामनराव जे घरीं गेले ते पुन्हां कॉलेजमध्यें आले नाहींत. यापुढें ते सरकारी नोकरींत शिरले व म्हातारपणापर्यंत त्यांची निकोप प्रकृती होती. यामुळें भाऊ दाजींची ही गोष्ट ते मोठ्या विनोदानें सांगत, व भाऊ दाजींच्या " छातीच्या दुखण्याचें " व " एक दोन महिन्यांच्या " धास्तीचें अत्यन्त गंमतीनें वर्णन करीत.

ह्याच सुमारास वामनरावजींचे दुसरे चुलते चिमणाजीपंत हेहि वारले, आणि त्यांचे सर्वांत वडील चुलते नारोपंत यांनीं उतार वयामुळें संसार सोडून चतुर्थाश्रम घेतला. भाऊदाजींच्या चिकित्सेमुळें वामनराव घाबरलेले, पत्नी प्रौढ होत चाललेली आणि नोकरी बघण्याची आवश्यकता उत्पन्न झालेली, तेव्हां ह्याच वेळीं त्यांच्या एकएक वडील माणसाचा आधार तुटावा ही मोठीच आपत्ति होती; परंतु त्यावेळीं नारोपंतांचे चिरंजीव बळवंतराव ह्यांनीं आपल्या अंगावर सर्व कुटुंबाचा भार घेऊन कुटुंबांतील माणसांची नीट काळजी घेतली व वामनरावांना वडिलांप्रमाणें वात्सल्य दाखवून त्यांना सर्वप्रकारें धीर व द्रव्याचा आधार दिला. ही आणीबाणीची वेळ बळवंतरावांच्या मदतीमुळेंच निभावली गेली या गोष्टींचें स्मरण वामनरावांना शेवटपर्यंत होत असे व बळवंतरावांना ते नेहमीं वडिलांप्रमाणें मान देत. बळवंतरावांच्या व त्यांच्या वयांत अंतरहि फार असल्यामुळें या प्रेमळबंधूंच्या जोडींत एकापक्षीं वात्सल्य व दुसऱ्या पक्षीं सन्मानबुद्धि फार शोभत असे. बळवंतरावांचीं व वामनरावांचीं मतें फारशीं कधींच जुळलीं नाहींत व ते दोघे जेव्हां वर्ष सहा महिन्यांनीं एकमेकांना भेटत, त्यावेळीं आवेशाच्या वादविवादांत त्यांचा दिवसच्या दिवस मोडे, तथापि, या मतभेदामुळें त्यांच्यांत द्विधाभाव कधींच आला नाहीं. ते शेवटपर्यंत एकमेकांवर अतिशय प्रेम करीत व बळवंतरावांच्या वृद्धपणाचीं शेवटचीं दहा–पंधरा वर्षे वामनरावांच्या आधारामुळेंच सुखांत गेलीं.

बळवंतरावांना शिक्षणाचा लाभ फारसा झालेला नव्हता. ते आणि महादेव-शास्त्री हे जरी चुलते-पुतणे होते तरी त्यांचीं वयें जवळजवळ सारखींच होतीं. घरांतील गरीबीमुळें ते तेराव्या वर्षी नोकरीकरितां बाहेर पडले, व बेळगांव वगैरे ठिकाणीं वारीकसारीक सरकारी नोकऱ्या करून पुढें ते प्रसिद्ध इनामकमिशनमध्यें कारकून झाले. यावेळच्या रा. ब. गोपाळराव हरि देशमुख वगैरे मंडळीच्या व जुन्या पेशवाई कागदपत्रांच्या पुष्कळ गमतीच्या गोष्टी ते सांगत असत. सत्तावन सालच्या बंडाच्या वेळीं ते बेळगांव येथेंच होते, व एके दिवशीं 'ज्ञानप्रकाशांत'ल्या बंडाच्या बातम्यांविषयीं गप्पा मारीत बसल्यामुळें तोफेच्या तोंडीं जावयाची आपणांवर पाळी कशी आली व ती वरिष्ठ युरोपियन अधिकाऱ्याच्या मध्यस्तीमुळें कशी टळली ही भीतिप्रद हकीगत ते वर्णन करीत. यानंतर ते सांगली संस्थानांत मामलतीवर गेले व तेथें बरींच वर्षें होते. पुढें तात्यासाहेब सांगलीकर यांच्यावर गंडांतर येऊन त्यांचीं अधिकारसूत्रें जेव्हां कांहीं काळपर्यंत काढून घेण्यांत आलीं तेव्हां यांचा व नोकरीचा संबंध जो सुटला तो कायमचा सुटला. यावेळीं एक बडे ब्राह्मण अधिकारी व एक बडे युरोपियन गृहस्थ यांनीं तात्यासाहेब सांगली-करांच्या विरुद्ध साक्ष देण्यासाठीं बळवन्तरावांचें मन वळविण्याचा अतिशय प्रयत्न केला, व ज्यावेळीं बळवंतराव त्या गोष्टीला कबूल होईनात त्यावेळीं "बळवंतराव लक्षांत ठेवा, यामुळें तुमचें मोठें नुकसान होईल" अशी त्यांना धमकी देऊं लागले. बळवंतरावांनीं उत्तर केलें, "माझें नुकसान तें तुम्ही काय करणार? माझी मामलेदारी काढाल हेंच कीं नाहीं? पण त्याची मला कांहींच भीति वाटत नाहीं. लोक मला उद्यांपासून कदाचित् मामलेदार म्हणणार नाहींत, पण बळवन्तराव कोल्हटकर येवढें खास म्हणतील."

बळवंतराव जरी शिकलेले नव्हते, तरी अतिशय बहुश्रुत होते, त्यामुळें हे शिक-लेले नाहींत, असा कोणालाहि संशय येत नसे. त्यांच्याशीं निकट संबंध येणाऱ्या मनुष्यांना सुद्धां त्यांना इंग्रजी येत नाहीं हें लवकर उमगत नसे. शिवाय वक्तृत्वाबद्दल त्यांचीहि फार प्रसिद्धी होती. दहा दहा हजार लोकांच्या प्रेक्षकसमुदायाला त्यांनीं आपल्या खुल्या व तडफदार वक्तृत्वानें शांत केल्याचीं उदाहरणें आहेत. त्यांनीं आपल्या उत्तर वयाचीं शेवटचीं वीस पंचवीस वर्षें स्वतंत्र उद्योग, सार्वजनिक कार्यें, काव्य, वक्तृत्व आणि वर्तमान-पत्रांत लेखन यांत घालविलीं. यावेळीं वामनरावांच्या द्रव्यसहाय्याचा त्यांना मोठा आधार असे. ते वामनरावांना नेहमीं एकेरी हांका

मारीत व वामनराव एवढे समाजसुधारक, पण बळवंतरावांचा सहवास त्यांना फार आनन्दाचा वाटे.

वामनराव नोकरी शोधावयास लागले त्यावेळीं इकडच्या माणसांना नागपूर वऱ्हाडाकडे सरकारी नोकऱ्या लवकर लागत, यामुळें त्यांनीं नागपुरचाच मार्ग सुधारला व तेथील नील सिटी स्कूलचे ते हेडमास्तर झाले. शिक्षक या नात्यानें त्यांचा लौकिक चांगला झाला, पण पुढें त्यांचा न्यायखात्यांत शिरकाव झाल्यामुळें ती नोकरी त्यांनीं सोडून दिली. ती जागा पुढें प. वा. वामन दाजी ओक यांनां मिळाली. पुढें दोन तीन वर्षें ते न्यायखात्यांत होते, पण पुढें एक युरोपियन अधिकारी त्यांनां कांहीं अपशब्द बोलल्यामुळें त्यांनीं त्या जागेचा राजीनामा दिला. यापुढें त्यांनीं वकीलीचा अभ्यास करून वकीलीची परीक्षा दिली व कांहीं वर्षें वकीलीहि केली; पण वकीलीच्या धंद्याशीं ते कधींच तन्मय झाले नाहींत. संकोची स्वभाव व बिनवर्दळी वृत्ति यामुळें वकीलीच्या व्यवसायास ते स्वभावतःच योग्य नव्हते व जरी त्यांना वकीलींत पैसा मिळाला तरी वकीली केव्हां सोडीन असें त्यांना वाटत असे. आपल्या वकीलीच्या पहिल्या ‘ केस ’ची हकिगत ते मोठ्या मौजेनें सांगत. केस पुकारल्याबरोबर ते कोर्टांत गेले व घरीं तयारी करून ठेवल्याप्रमाणें त्यांनीं आपली केस कोर्टापुढें माण्डली, येथपर्यंत ठीक झालें पण पुढें विरुद्ध वकीलाचें भाषण झाल्यावर त्याला प्रत्युत्तर द्यावयास जेव्हां कोर्टानें बोलावलें त्यावेळीं वामनराव सांगत, कीं मी अगदींच गडबडलों, कारण उत्तराला प्रत्युत्तर द्यावें लागतें ही कल्पनाच मला नव्हती व म्हणून त्याची तयारी घरीं कांहींच केलेली नव्हती.

वकीलीवर प्रेम नसल्यामुळें वामनराव पुनः नोकरी शोधावयास लागले व लवकरच त्यांना एक्स्ट्रा असिस्टन्ट कमिशनरची म्हणजे हुजुर डेप्युटी कलेक्टरची जागा मिळाली. या जागेवर त्यांनीं दहा बारा वर्षें घालविलीं व इतक्या मुदतींत मध्यप्रांतांतील पुष्कळ शहरीं त्यांना काम करण्याचा प्रसंग आला. यापुढें ते स्मॉल-कॉज कोर्टाचे जज्ज झाले आणि एतद्देशीय लोकांना सेशन्स जज्ज नेमण्याचा ठराव ज्यावेळीं मध्यप्रांतांत प्रथम अंमलांत आला त्यावेळीं त्यांना सेशन्स जज्जाची जागा मिळाली. यावेळीं त्यांना बाराशें रुपये पगार होता व या जागेचें काम दक्षतेनें करून युरोपियन लोकांपेक्षां आपले लोक या कामाला यत्किंचितही कमी लायख नाहींत अशी त्यांनीं सरकारची खात्री पटवून दिली. वामनरावांनीं यावेळीं दाखविलेल्या

हुषारीमुळेंच सेशन्स जज्जाची जागा आपल्या लोकांच्या पदरांत कायमची पडली. आतां नागपुरच्या हायकोर्टांतहि आपल्या लोकांची नेमणूक होऊं लागलेली आहे.

तथापि सेशन्स जज्जाच्या कामाची दगदग त्यांना पुढें पुढें सोसवेनाशी झाली व सरकारला विनंती करून त्यांनीं त्या जागेवरून स्मॉलकॉज कोर्टाच्या जज्जाच्या आठशें रुपये पगाराच्या जागेवर आपली बदली करवून घेतली व तेथें ते पेन्शन घेईपर्यंत होते. त्यांनीं पेन्शन घेतल्यानंतर सरकारनें त्यांच्या सन्मानार्थ एक स्पेशल ठराव काढला व त्यांचा उत्तम शब्दांनीं गौरव केला. हिंदु अम्मलदाराच्या सन्मानार्थ असा गौरवपर ठराव यापूर्वी कधींहि निघाला नव्हता. ते कांहीं दिवस बस्तर संस्थानचे दिवाण होते व इ. स. १८९७ सालीं त्यांना सरकारनें रावबहादुर ही पदवी दिलेली होती.

वामनरावांचें नोकरीपेशाचें चरित्र याप्रमाणें आहे. हें सुद्धां कांहीं कमी अभिमानास्पद नाहीं व त्यांतल्याहि बऱ्याचशा गोष्टी लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत. तथापि त्यांचें मध्यप्रांताच्या इतिहासांत जें महत्त्व आहे, तें यामुळें नव्हे तर ते कळकळीचे समाजसुधारक होते म्हणून होय. वकिली सोडून ते एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर झाले. त्या सुमारास त्यांची प्रथम पत्नी वारली व त्यांना पुनः लग्न करण्याचा प्रसंग आला. यावेळीं त्यांचें वय ऐन तारुण्याचें होतें, नुकतीच चांगल्या दर्जाची नोकरी लागलेली होती व सर्वप्रकारें त्यांची भरभराट होती. त्यावेळीं एखाद्या कुमारीशीं जर त्यांनीं लग्न केलें असतें तर त्यांचा वयाच्या दृष्टीनें सुद्धां तें विलग दिसलें नसतें. पण मुंबईत एल्फिन्स्टन कॉलेजमध्यें असतांना सामाजिक सुधारणेचें जें ध्येय त्यांच्या मनावर बिंबलेलें होतें तें इतकें प्रबल होतें, कीं कुमारीशीं लग्न करावयास त्यांचें मन मुळींच तयार होईना. आपण इतके दिवस समाजसुधारक म्हणून नाचलों आणि आतां ऐनवेळीं माघार घेणें म्हणजे अतिशय कमीपणा आहे असें त्यांना वाटूं लागलें व एकीकडे वडीलधारे लोक त्यांच्याकरितां नववधू शोधीत असतां त्यांनीं गतभर्तृकेशींच विवाह करावयाचा आपला निश्चय कायम केला. या कामीं त्यांना अडचणी फार होत्या. कारण, मागें सांगितल्याप्रमाणें त्यांचे चुलते नारोपंत ह्यांनीं संन्यास घेतलेला होता. बळवंतराव अनुकूल नव्हते, कृष्णराव अत्यंत प्रतिकूल होते, व त्यांच्यावर अपत्याप्रमाणें प्रेम करणारी त्यांची आत एसू आत्याबाई म्हणजे महादेवशास्त्र्यांची गतभर्तृका भगिनी, हिचें मन दुखविणें म्हणजे

एका प्रेमळ अंतःकरणाला जबरदस्त धक्का दिल्याप्रमाणें होतें. पण हे विचार बाजूला ठेवून त्यांनीं पुनर्विवाह करण्याचाच आपला निश्चय कायम केला, व तो अमलांतहि आणला.

त्यांनीं जी वधू शोधून काढली ती देशस्थ घराण्यांतली होती. सोलापुराजवळ एका खेड्यांत एका कुलकर्ण्याची मुलगी बालविधवा झालेली होती व तिच्या मावशीनें तिचें मन पुनर्विवाह करण्यास उद्युक्त केलें होतें. वामनराव पुनर्विवाह करण्यास कबूल आहेत असें कळल्यावरून तिनें हें लग्न जमविलें, व भाचीला तिकडे पाठविण्याची तजवीज केली. वामनरावांची ही नववधू गौरवर्ण नव्हती. रूपानेंहि ती अगदीं सामान्य होती. ती पुनर्विवाह होऊन घरीं आली तेव्हां खेडवळ भाषा बोले व पानी, लोनी, तुम्हांस्नी, आम्हांस्नी, इद्या, इचार असे शब्द उच्चारी. उलटपक्षीं वामनराव अतिशय देखणे व उमदे असत. त्यांची राहण्याची पद्धतीहि रुबाबदार होती. तेव्हां अशा अशिक्षित वधूबरोबर संसार थाटण्यांत त्यांना प्रथम पुष्कळ कष्ट पडले. तथापि त्यांनीं तिकडे दुर्लक्ष्य करून आपलें तत्त्व कृतींत आणलें, व आपल्या मनाची शाबासकी मिळविली.

हें इतक्या विस्तारानें सांगण्याचें कारण इतकेंच, कीं, वामनरावांचा पुनर्विवाह हें कोणत्याहि अगोदरच्या अविचाराचें निराकरण नव्हतें. हा तत्त्वप्रतिपालनाकरितां स्वतःचे असुख पत्करूनसुद्धां बुद्धिपुरस्सर केलेला विवाह होता. वामनराव नागपूरचे होते, वधू सोलापुराकडील होती; वामनराव कोकणस्थ होते, वधू देशस्थ होती; वामनराव देखणे होते, वधू कुरूप होती; वामनराव सुशिक्षित होते, वधू अशिक्षित होती; पूर्वीं एकमेकांचीच काय पण उभयतांच्या कुळांतीलसुद्धां एकमेकांची दृष्टभेट होण्याचा संभव नव्हता. तथापि केवळ तत्त्व म्हणून वामनरावांनीं हा पुनर्विवाह केला. आपल्या पत्नीची शिकण्याची वगैरे व्यवस्था करून कांहीं काळानें वामनरावांनीं तिला उत्तम सुविद्य बनविली, पण ह्या गोष्टीलासुद्धां दहा पंधरा वर्षें लागलीं.

ज्या एका गोष्टीमुळें वामनरावांच्या चरित्राला सार्वजनिक स्वरूप आलेलें आहे व जी गोष्ट घडली नसती तर कदाचित् वामनरावांच्या मनोधैर्याची कसोटी कधींहि लागली नसती त्या गोष्टीचा व लेखकाच्या आयुष्यांतील दुर्धरतम आपत्तीचा अत्यंत निकट संबंध असल्यामुळें ह्या गोष्टीसंबंधानें समतोल मनानें लिहिणें खरोखर अशक्य आहे. कारण वामनरावांची प्रथम पत्नी हीच लेखकाची माता होय.

व लेखकाचा जन्म होऊन दोन वर्षे झालीं नाहींत तोंच तिला मृत्यूनें बोलावून नेल्यामुळें ‘ माता ’ या पवित्र शब्दांत कविवर्णनांतील ज्या सहस्रावधी मधुर कल्पना असतात त्या सर्वांना पारखें होऊन त्यांबद्दल निर्वेदाचे जड निःश्वास टाकण्यापलीकडे त्याच्या विव्हळ चित्तांत दुसरें कांहींएक साधन राहिलें नाहीं. जेथें वामनरावांच्या चरित्राचें अत्यंत उदात्त स्थल तेथेंच लेखकाच्या अत्यंत हृदयद्रावक आपत्तींचा संबंध, अशी वस्तुस्थिति असल्यामुळें हा प्रसंग लिहीत असतां लेखकाचें मन ठिकाणावर नसावें हें साहजिक आहे. तथापि हृदयाची ही चलबिचल व वामनरावांच्या द्वितीय पत्नीशीं असलेलें त्याचें सापत्न मातृत्वाचें नातें हीं लक्षांत ठेवूनसुद्धां लेखकास असें आनंदानें सांगावेसें वाटतें कीं वामनरावांची ही द्वितीय पत्नी अत्यंत थोर होती. वामनरावांच्या शिक्षणाखालीं ती उत्कृष्ट रीतीनें तयार झाली, व त्यांच्या संगतीनें तिचे सर्व उत्तम गुण विकास पावले. तिची ती पूर्वीची अशिक्षित भाषा तर बदललीच, परंतु तिची पोक्त चालचलणूक, तिचें प्रतिष्ठित वर्तन, तिचा नैतिक दरारा, तिची शिस्तीची राहणी, तिची टापटिपीची करणी, तिचा दयाळू स्वभाव व तिची तीव्र बुद्धि, यांचा वामनरावांच्या संसारावर इतका सुरेख परिणाम झाला कीं वामनरावांची पत्नी स्त्रियांना आदर्शभूत होऊन बसली. साधारणतः पुनर्विवाहित स्त्रियांसंबंधानें अशी समजूत आहे, कीं, त्या चवचाल, नटव्या व चोचलेखोर असतात. पण वामनरावांच्या पुनर्विवाहित पत्नीचें वर्तन या सर्व आरोपांना अगदीं हाणून पाडण्यासारखें होतें. तिच्या वर्तनांत चोचलेलर मुळीं नव्हतेच पण उलट ती इतक्या उदार वृत्तीनें वागे, कीं, चोचलेदार स्त्रियांना तिच्यापुढें येण्याची सुद्धां भीति वाटत असे. वामनरावांचा स्वतःचा पुनर्विवाह झाल्यानंतर पुनर्विवाहाच्या चळवळीचा त्यांनीं पुढाकार घेऊन निदान चाळीस पन्नास पुनर्विवाह तरी घडवून आणले असतील. या पुनर्विवाहित स्त्रियांना वामनरावांची स्त्री आईप्रमाणें वाटे, व त्यांपैकीं बहुतेक स्त्रिया माहेरपणाकरितां वामनरावांच्या घरीं येत. या सर्वांशीं वामनरावांची स्त्री फार प्रेमळपणानें वागे व इतर स्त्रियांचाहि तिनें आपण सुधारक या अभिमानानें कधींहि अपमान केला नाहीं. लेखकाचा व या थोर स्त्रीचा सापत्न मातृत्वाचा संबंध असतांहि त्याच्याशीं ती इतक्या चांगुलपणानें वागली, कीं, तिची स्मृति त्याच्या पुढून हलणें कधींहि शक्य नाहीं. अगदीं खरें बोलावयाचें म्हणजे वडिलांच्यापेक्षां हिच्याचपुढें आम्हाला मोकळेपणा वाटे व ती जेव्हां जेव्हां अगदीं खुल्या अंतःकरणानें बोले, आपल्या सर्व काळज्या संकोच न बाळगतां सांगे, मनाच्या अगदीं खोल

पडद्यांत लेखकास विश्वासानें घेई, त्याच्या भावी आयुष्याविषयीं प्रेमळपणानें चर्चा करी, काव्यव्यासंगांत त्याच्याबरोबर रमे, सार्वजनिक प्रश्नांवर निर्भीडपणें बोले, राष्ट्राविषयीं स्वाभिमानाच्या गोष्टी काढी आणि परमेश्वराच्या थोरवीविषयीं अंतःकरण ठिपकण्याइतक्या भक्तीनें बोले, त्यावेळीं उच्च वातावरणांतील पवित्र झोंपाळ्यावर आपण आनंदानें झोंकेच घेत आहोंत कीं काय, असें वाटे.

वामनराव कोल्हटकरांनीं पुनर्विवाह करण्यांत एवढासा मोठा पुरुषार्थ कोणता केला असें सध्यांच्या तरुण लोकांना वाटण्याचा संभव आहे. कारण सध्यां पुनर्विवाह होणें हें फारसें कठिण राहिलेलें नाहीं. या कामास पुरुष व स्त्रिया आतां विशेष प्रयासावांचून तयार होतात व पुनर्विवाहित जोडप्यांवर आतां समाजशिक्षेचीं दुःसह संकटें कुठेंहि येत नाहींत. आतां पुनर्विवाहाच्याहि पलीकडच्या सुधारणा कीं, ज्या त्या वेळच्या अत्यंत आशावादी सुधारकांच्या सुद्धां कल्पनेंत येत नव्हत्या, त्याहि प्रत्यक्ष घडून येऊं लागल्या आहेत. वामनरावांनीं पुनर्विवाह केला त्यावेळीं तरी मार्टिन् ल्यूथरप्रमाणें पुनर्विवाहित जोडप्यांचा छळ व यमयातना होत होत्या असें आमचें म्हणणें नाहीं. इंग्रजी अमलाखालीं सामाजिक सुधारणा करण्यापेक्षां पूर्वीच्या स्वराज्याच्या अमलांत समाजसुधारणा करावयास निघालेल्या लोकांवर जास्त संकटें आलीं असतीं व तीं सहन करणें मात्र खरें वीरत्वाचें झालें असतें. इंग्रजी अमलाचा जबरदस्त जोर समाजसुधारणेला असल्यामुळें समाजसुधारकांचा जो 'छळ, छळ,' असें म्हणतात तें नुसतें खरचटणें असतें; त्याच्या योगानें प्राणघातक जखमा होत नाहीत असेंच आम्हांला वाटतें. इंग्रजी अमलाखालीं समाजसुधारकांनां भोगावा लागणारा त्रास व राजकीय सुधारणाप्रवर्तकांवर याच अमलाखालीं ओढवणारे प्रसंग यांत जमीन–अस्मानाचें अंतर आहे यांतहि संशय नाहीं. पुनर्विवाह केल्यामुळें रा. ब. वामनराव यांनां अत्यंत छळ सहन करावा लागला व त्यामुळें मार्टिन् ल्यूथरप्रमाणें त्यांना प्राण बचावण्यासाठीं धांवपळ करावी लागली असेंहि आमचें म्हणणें नाहीं; पण या सर्व गोष्टी कबूल केल्या तरी रा. ब. वामनराव यांच्या पुनर्विवाहांत एक अत्यंत उच्च तत्त्व शिल्लक राहतें, आणि तें हें कीं ते बोलल्याप्रमाणें चालले.

आणि मागें सांगितल्याप्रमाणें बोलण्याप्रमाणें चालण्यास भाग पडेल असेंहि त्यांच्या परिस्थितींत कांहीं एक नव्हतें. ते जे बोलल्याप्रमाणें चालले ते केवळ स्वसंतोषानें, व कर्तव्य म्हणून चालले. आपण बोलल्याप्रमाणें चाललों नाहीं तर आपली विवेकदेवता आपल्याला दोष देईल या एवढ्याच बुद्धीनें ते बोलल्याप्रमाणें

चालले. विवेकबुद्धीची शाबासकी या पलीकडे त्यांनां या पुनर्विवाहांत कांहींएक मिळावयाचें नव्हतें. केलेल्या पत्नीपेक्षां जास्ती सुस्वरूप, सुसंपन्न व उच्च कुळांतील प्रथम वधू त्यांना सहज मिळण्यासारख्या होत्या. ते तरुण होते, श्रीमंत होते, त्यांनां लग्नाची कोणतीच अडचण नव्हती; पुनर्विवाह करून त्यांना आर्थिक व व्यावहारिक दृष्ट्या कांहींएक मिळवावयाचें नव्हतें; उलट वृद्ध चुलते, बन्धु, आप्तवर्ग, मित्र आणि स्नेही यांची सहानुभूति गमवावयाची होती. पण आपण जें बोललों तें खरें करून दाखविण्याकरितां, स्वतःशीं इमानी राहण्याकरितां, आपल्या तत्त्वांनां जागण्याकरितां, त्यांनीं सर्व इतर मोह बाजूला सारून पुनर्विवाह केला. आणि हा पुनर्विवाह करण्याकरितां त्यांना प. वा. महादेव गोविन्द रानडे यांच्याकडून उत्तम प्रोत्साहन मिळालें. प. वा. रानडे यांच्यासंबंधानें त्यांची अत्यंत भक्ति होती. या पृथ्वीवर जें जें कांहीं उज्वल, ज्ञानयुक्त, प्रणतियोग्य, तळपणारें व सर्वोत्कृष्ट असें देशप्रेमाचें लेणें आहे तें सर्व महादेव गोविन्द रानडे हेच आहेत अशी त्यांची दृढ समजूत होती व या समजूतीस अनुसरून ते पृथ्वींत रानड्यांना किंवा स्वर्गात देवाला मानीत असत. रानडे सार्वजनिक आयुष्यांत शिरले त्या वेळेपासून त्यांच्याविषयीं ही वामनरावांची कल्पना होती व ती आमरणान्त टिकली. मध्यंतरीं पुष्कळ लोक माधवराव रानडयांच्या संबंधांत चाहत्यांचे निंदक बनले व मित्रांचे शत्रु झाले, पण वामनरावांची माधवरावांविषयींची अढळ निष्ठा कधींहि ढळली नाहीं. ना. गोखले यांजविषयींहि वामनरावांची आमरणान्त श्रद्धा होती, पण तीसुद्धां ते महादेव गोविंद रानडे यांचे शिष्य म्हणून जडली, व्यक्तिदृष्ट्या गोखल्यांवर जडली नाहीं. ना. गोखले यांनीं रानड्यांच्या पाठीमागें त्यांच्यापेक्षांहि उत्तम काम चालविलें व स्वतःची व गुरूची कीर्ति अजरामर केली हें पाहून वामनरावांना अत्यंत संतोष होत असे व त्यामुळें गुरुशिष्यांबद्दल ते किती अभिमान बाळगीत याचें वर्णन करतां येणें अशक्य आहे. रानडेगोखल्यांचा वामनरावांइतका अभिमानी कोणी असेल कीं नाहीं याविषयीं संशयच आहे.

याबरोबर येथें हेंहि सांगितलें पाहिजें, कीं, श्रीयुत बा. गं. टिळकांचा द्वेष्टा व तिरस्कार बाळगणाराहि वामनरावांइतका दुसरा कोणी नसेल. टिळकांचे द्वेष्टे व शत्रु आम्ही पुष्कळ पाहिलेले आहेत, व त्यांच्या भक्तांत आमचें सर्व सार्वजनिक आयुष्य गेलेलें आहे. तथापि टिळक हें नांव ऐकल्याबरोबर कपाळाला आठ्या पाडणारा व टिळकांना अंतःकरणापासून क्षुल्लक व मूर्ख गणणारा वामनरावांइतका

आमच्या कोणीहि पहाण्यांत आला नाहीं. बाकीच्या लोकांनीं टिळकांचा द्वेष केला तरी त्यांत थोडीतरी ‘ तर ’ असते. कोणी त्यांना विद्वान् म्हणून तरी मान देतात, कोणी त्यांना खाजगी पवित्रतेबद्दल वाखाणतात, कोणी त्यांची सहिष्णुता लक्ष्यांत घेतात व कोणी त्यांच्या स्वार्थत्यागापुढें नमतात, परंतु त्यांच्या कोणत्याच गुणाचा वामनरावांवर परिणाम झालेला आमच्या पहाण्यांत आला नाहीं. वामनरावांना टिळक एकाच स्वरूपांत दिसत–कीं, ते एक उपद्यापी, मूर्ख, दुटप्पी गृहस्थ असून त्यांच्या आवाडावामुळें राष्ट्रावर आपत्ति मात्र कोसळल्या आहेत.

तुम्हांला कां नाहीं-‘तरुण लोकांचा जमाव त्यांच्या भोंवतीं जमला म्हणजे ते लाडीक-पणानें म्हणत–तुम्हां तरुण लोकांनां अक्कल नाहीं. टिळकांत जर थोडा मुत्सद्दीपणा असता तर या पायरीला गोष्टी आल्याच नसत्या. परिस्थितीचा राग टिळकांना येतो आणि दुसऱ्यांना येत नाहीं असें नाहीं. एवढेंच कशाला, मी सरकारी नोकरींत आहें ना, पण मला सुद्धां अन्यायाच्या गोष्टींची चीड येते; परंतु दगडाखालीं सांपडलेला हात युक्तियुक्तीनेंच काढला पाहिजे. तेथें दण्डेली चालावयाची नाहीं. पण ही खुबी जाणली रानड्यांनीं ! टिळकांचें अडाणी काम ! त्यांत दरबारीपणा, मुत्सद्देगिरी, पुढचा पाचपेंच हें कांहीं नाहीं. ज्या अज्ञानामुळें आपल्या देशाला ही परिस्थिति आली तो अज्ञानीपणा नाहींसा झाला तरच ही परिस्थिति पालटेल, तोंपर्यन्त पालटायची नाहीं; पण याकरितां देश सुशिक्षित केला पाहिजे, बालविवाहाची चाल मोडून प्रजा सशक्त केली पाहिजे, स्त्रिया म्हणजे घरांतले श्रेष्ठ वर्गाचे नोकर ही स्थिति बदलून त्यांच्यांत परिस्थितीची जाणीव उत्पन्न केली पाहिजे व उगीच अभिमानातिरेकानें राज्यकर्त्यांशीं तेढ उत्पन्न न करतां त्यांचें शहाणपण शिकून त्यांच्याच गळ्यांत घातलें पाहिजे. म्हणून मी तुम्हांला म्हणतों, कीं, या विकट परिस्थितींत टिळकांचें “ रावणराजमहाराज ” ( जहाल पक्षाची ओरडाओरड वर्णन करण्याचा हा वामनरावांचा लाडका शब्द असे ) कांहीं उपयोगी पडायचें नाहीं, तेथें रानड्यांप्रमाणें युक्तीनें व मुत्सद्दीपणानेंच वागलें पाहिजे.

टिळकांवर १८९७ सालीं जेव्हां पहिला मोठा खटला झाला, त्यावेळीं त्यांना हिणविणाऱ्या पुष्कळ लोकांचें त्यांच्याविषयीं मत बदललें व ते त्यांना थोर मानूं लागले. प. वा. जनार्दन सखाराम गाडगीळ हे यांपैकीं एक होते. पूर्वी ते टिळकांना पोरकट समजत, पण वरील खटल्यानंतर त्यांच्या संबंधानें त्यांच्या मनांत पूज्य-

बुद्धि उत्पन्न झाली; पण वामनरावांच्या मनांत मात्र त्यामुळें कांहींएक फरक झाला नाहीं. एखादें वेडें पोर घडवंचीशीं खेळतां खेळतां ज्याप्रमाणें साऱ्या बरण्या आपल्या अंगावर पाडून घेतें, त्याप्रमाणेंच ते टिळकांचें कृत्य समजत. याबद्दल टिळकांच्या धैर्याची किंवा कष्टांची कोणी तारीफ केली तर त्यांना तिटकारा येत असे. १८९८ सालीं टिळक तुरुंगांतून सुटले व लगेच मद्रास येथील राष्ट्रीय सभेच्या बैठकीला हजर राहिले, तेव्हां तेथील लोकांच्या मनांत त्यांच्याविषयीं उत्पन्न झालेली भावना वर्तमानपत्रांत वर्णनाच्या रूपानें प्रसिद्ध झाली होती; पण त्या वर्णनावरून वामनरावांना जी चीड आली व त्याबद्दल त्यांच्या मनांतून जे टाकून उद्गार निघाले ते प्रस्तुत लेखकाला त्यांच्या एका पत्रांतून वाचावयास मिळाले होते. हे उद्गार लेखकाच्या पत्राला उत्तर म्हणून होते हें सांगावयास नकोच !

एकदां सहज टिळकांच्या विद्वत्तेसंबंधानें चर्चा निघाली. मध्यप्रांतांतील बड्या हुद्यावरील एक तरुण गृहस्थ आमचे घरीं पाहुणे म्हणून आले होते. त्यांचा पुनर्विवाह वामनरावांनींच लावून दिला होता व त्यांना नोकरीवरहि त्यांनींच लावून दिलें होतें. आमच्या घरीं त्यावेळीं टिळकांचें ( Arctic Home in the Vedas ) नुकतेंच आलें होतें, व आमचे पाहुणे शेल्फवरील हेंच पुस्तक घेऊन वाचूं लागले होते. गोष्टी याच पुस्तकावरून निघाल्या, पण आमचे पाहुणे टिळकांच्या विद्वत्तेनें जेव्हां चकित होऊन गेल्यासारखे दिसले, तेव्हां वामनराव त्यांना समजुतीवर आणण्याकरितां म्हणाले, " अहो, टिळकांची विद्वत्ता कसली घेऊन बसलां ? रानडे असते तर त्यांनीं एका खिशांत एक टिळक व दुसऱ्या खिशांत दुसरे टिळक घातले असते ! "

टिळकांच्या संबंधानें वामनरावांचें इतकें वाईट मत होतें कीं, टिळकांची एकहि गोष्ट त्यांना चांगली वाटत नसे. त्यांचें बोलणें वाईट, त्यांचें चालणें वाईट, त्यांची कृति वाईट, त्यांचे लेख वाईट, इतकेंच काय पण त्यांचें घर व घरांचें दारसुद्धां त्यांना वाईट दिसत असे ! दाजीसाहेब खरे व टिळक यांनीं सिंहगडावर जोडीनें बंगले बांधलेले आहेत हें पुष्कळांना माहीत असेलच ! टिळकांचा एक स्वतःचा बंगला अशा चांगल्या ठिकाणीं असल्याचा पुष्कळांना आनन्द वाटतो व आमच्या राष्ट्रीय पक्षांतील लोक प्रायः लक्ष्मीच्या अवकृपेंतले असल्याकारणानें आपल्या पुढाऱ्याचा एक बंगला असल्याबद्दल त्यांना अभिमानहि वाटतो. एकदां एका मेजवानीच्या प्रसंगीं आमच्या

घरीं अशाच गोष्टी निघाल्या व त्यांत एका गृहस्थानीं टिळकांच्या सिंहगडावरील बंगल्याचा उल्लेख केला. तो ऐकून वामनराव थट्टेनें हांसले व म्हणाले, " काय ? असल्या भिकार इमारतीला तुम्ही ' बंगला ' हें मानाचें नांव देतां ? "

वामनराव, टिळकांना नुसतें मूर्ख व उपद्यापी समजत असत एवढेंच नाहीं तर त्यांना लटपटे व अप्रामाणिकहि समजत असत. टिळकांवरील हा दुटप्पीपणाचा —उर्फ लबाडपणाचा आरोप आम्ही पुष्कळ नेमस्त लोकांच्या तोंडून ऐकलेला आहे, व प. वा. गोखल्यांच्या सुरतेनंतरच्या एका लेखांत त्यांनीं तो उघडपणेंहि केलेला आहे. वामनरावांचा हा समजहि असाच एखाद्या दिशेकडून आला असल्याचा संभव आहे; कारण टिळकांचा व त्यांचा प्रत्यक्ष संबंध फारच थोड्या व्यवहारांत आला होता व त्यांत तरी टिळकांच्या खऱ्या स्वभावाची परीक्षा करण्याइतकी त्यांना संधि मिळाली असेल कीं नसेल याचा संशयच आहे. तथापि दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, ज्या एका गोष्टींत त्यांचा टिळकांशीं निकट संबंध आला त्या गोष्टी-वरून त्यांची वरील समजूत नाहींशी होण्याच्या ऐवजीं त्यांत भरच पडली. वामनरावांची थोरली मुलगी—आमची धाकटी ( सावत्र ) बहीण—हिचा विवाह-समारंभ पुणें येथें होण्याचें ठरलें व त्यावेळीं पुण्यांतील सर्व मोठमोठ्या मंडळी-प्रमाणें टिळकांनाहि वामनरावांनीं आमंत्रण दिलें. या लग्नामुळें त्यावेळीं पुण्यांतील मंडळींत फारच खळबळ उडून गेली होती. कारण वामनरावांच्या पुनर्विवाहित कुटुंबापासून झालेल्या मुलीचें हें लग्न होतें. या लग्नाच्या वेळीं जे लोक पानसुपारीला किंवा भोजनाला हजर राहिले त्यांच्यावर पुढें ग्रामण्येंहि निघालीं. वामनरावांची अशी स्वाभाविक समजूत होती, कीं, टिळक बहुधा आमंत्रणाचा स्वीकार करणार नाहींत; कारण त्यांनीं आपल्या मनाची अशी समजूत करून घेतली होती कीं, स्वतःला पसंत असलेल्या सुधारणांचा उघडपणें स्वीकार करण्याइतकें नीतिधैर्य टिळकांच्या अंगांत नाहीं; पण टिळकांनीं आमंत्रणाचा ज्यावेळीं स्वीकार केला त्यावेळीं त्यांना फार आश्चर्य वाटलें व थोडाबहुत संतोषहि वाटला; पण हा संतोष फार वेळ टिकला नाहीं. त्याचें पर्यवसान तिरस्कारांत व वर निर्दिष्ट केलेल्या गैरसमजाच्या दृढीकर-णांत झालें, कारण टिळक लग्नाच्या वेळीं इतर मंडळीबरोबर पानसुपारीला न येतां दुसऱ्या दिवशीं सकाळीं एकटेच पानसुपारीला आले ! झालें, मग काय विचारतां ? टिळक दुटप्पी, टिळक अप्रामाणिक, हें अगदीं कायमचें ठरून गेलें ! ! !

एक गोष्ट मात्र आम्हांला मुद्दाम सांगितली पाहिजे, कीं, टिळकांसंबंधानें वामनरावांना जरी एवढा भयंकर तिरस्कार होता तथापि त्यांच्या संकटाच्या वेळीं त्यांना मदत करावयास त्यांनी कधींहि कमी केले नाहीं. १८९७ सालीं त्यांच्या मदतीकरितां जो फण्ड जमविण्यांत आला त्यावेळीं वामनराव जबलपूर येथें सेशन-जज्ज होते. तथापि अशा मोठ्या जागेवर असतांनाहि त्यांनीं त्या फण्डास चांगली वर्गणी दिली. एवढेंच नव्हे तर जेव्हां जेव्हां त्यांच्या पक्षाच्या लोकांवर संकटें येत, तेव्हां तेव्हां त्यांना द्रव्याची मदत केल्याशिवाय ते कधींहि रहात नसत. टिळकांचें प्रत्येक नवीन पुस्तक त्यांच्या टेबलावर येऊन पडे व टिळकांची मोठी फ्रेमदार तसबीरहि त्यांच्या घरांत लावलेली असे. टिळकांचा प्रत्येक महत्वाचा लेख त्यांनीं वाचलेला असे व त्यांचें गीतारहस्यहि—पण येथें आणखी एक हकीकत सांगितली पाहिजे.

वामनरावांनीं भगवद्गीतेचा फार उत्तम अभ्यास केलेला होता. त्यांना भगवद्गीतेचा नाद प्रथम थिऑसफीनें लावला व पुढें पुढें ते गीताध्ययनांत इतके रमून गेले, कीं, कॉलेजमध्यें लॅटिन ही दुसरी भाषा घेतलेली असतांनाहि भगवद्गीता समजून घेण्याकरितां त्यांनी उतारवयांत संस्कृताचा अभ्यास केला. वामनराव भगवद्गीता फार उत्तम सांगत. वक्तृत्वाचें आणि त्यांचें मूळपासून वांकडें असतांनाहि त्यांच्या भगवद्गीतेच्या प्रवचनाला इतका रंग येत असे, कीं, त्यांच्या वाणींत अमृत ओतलें आहे कीं काय असें वाटे. भगवद्गीतेनें त्यांचें चित्त ईश्वरप्रवण केलें होतें व आपलें वर्तन भगवद्गीतेंतील उच्च उपदेशाशीं हरघडी तोलून पहाण्याचा ते एकसारखा प्रयत्न करीत. टिळक भगवद्गीतेवर एक ग्रंथ लिहीत आहेत हें त्यांनां बरेच दिवसांपासून माहीत होतें, यामुळें ज्यावेळीं टिळकांचें 'भगवद्गीतारहस्य' प्रकट झालें त्यावेळीं त्याची एक प्रत अर्थातच त्यांनीं तावडतोब विकत घेतली. विद्वत्ता, स्वार्थत्याग, कष्टशीलता, खाजगी वर्तन इत्यादि गोष्टींतहि वामनरावांच्या जवळ टिळकांचा नंबर लागत नाहीं म्हणून हताश झालेले त्यांचे प्रशंसक, निदान गीतारहस्यावर तरी त्यांना कांहीं मार्क मिळतील या आशेवर, वामनरावांच्याकडे गेले, पण काय? याहि बाबतींत त्यांची फजितीच झाली! कारण टिळकांचें गीतारहस्य वाचून वामनराव एवढेंच म्हणाले, कीं, "बेट्याला अजून गीता कळलीच नाहीं!"

वामनराव थिऑसॅफीचे भक्त होते व नागपूरांतील थिऑसॉफीकल सोसायटीहि ते प्रसंगवशात् चालवीत; पण ॲनी बेझण्टसंबंधानें मात्र त्यांची मुळींच भक्ति नव्हती. त्यांना असें वाटे, कीं, हिंदुस्थानची परवशता कायम टिकावी म्हणून धर्माची बावळीं तत्त्वें ही बाई येथल्या लोकांना मुद्दाम शिकवितेे. वामनरावांना बाईचा अत्यंत राग येत असे व तिनें काशी येथें काढलेल्या हिन्दु कॉलेजवर त्यांचा अतिशय कटाक्ष होता. इंग्रज लोक श्रेष्ठ, हिन्दु लोक कनिष्ठ; इंग्रज लोक पुढारी, हिंदु लोक अनुयायी; इंग्रज लोक सुधारलेले, हिंदु लोक जुनेपुराणे; ही भावना धरून तिनें ही संस्था काढलेली आहे अशी वामनरावांची समजूत होती. ॲनी बेझण्टबाई हिन्दुधर्माचे गोडवे गाऊन जुन्या हिंदु संस्कारांनाच चिकटून बसण्याचा जो उपदेश लोकानां करीत असे त्यांतील हेतु आपण हिंदु लोक सदैव इंग्रज लोकांच्या मागें रहावें, त्यांच्या बरोबरीला कधीं येऊं नये, हाच होता, हिंदु संस्कृती-विषयीं प्रेम हा नव्हता असें वामनरावांना मनःपूर्वक वाटत असे. हिंदु परम्परेची स्तुति गाण्यांत बाईचा हेतु हिंदु लोक जगाच्या मागें रहावें व शिवाय त्यांच्यांत स्वतःची प्रौढी वाढावी असा होता अशी वामनरावांची दृढ कल्पना होती, व पंचवीस वर्षें राजकारणापासून अलग राहिलेली बेझण्टबाई ज्या वेळीं १९१३–१४ सालीं एकदम राजकारणाच्या भडक कल्पना बोलूं लागली त्यावेळीं तर आत्मप्रौढीची त्यांची समजूत अतिशयच वृद्धिंगत झाली.

इंग्रज लोक आणि हिन्दु लोक यांच्यांतील परस्पर मानापमानासंबंधानें वामन-रावजींच्या भावना अत्यंत तीव्र होत्या. हिन्दु लोक कनिष्ठ आहेत असें लक्षणेनें सुद्धां कबूल करण्यास वामनराव कबूल नव्हते, आणि ज्या ज्या वेळीं हिन्दुसमाजावर कनिष्ठतेचा शिक्का मारण्याचा कांहीं इंग्रज अधिकारी प्रयत्न करीत, त्या त्या वेळीं हे त्याचा जोरानें प्रतिकार करीत. मुंबई इलाख्यांत व नागपूर–वऱ्हाड प्रांतांत सरकारी कागदोपत्रीं व जाहीर हुकमांतून युरोपियन व हिन्दु अधिकारी या दोघांनाहि Mister (मिस्टर) हें उपपद लावतात. Mr. Curtis आणि Mr. Balakram असें इकडील सरकारी गॅझेटांत आपणांस वाचावयास मिळतें व त्याबद्दल आप-णास आश्चर्यही वाटत नाहीं. परंतु अलाहाबादप्रांतांत तसें नाहीं. तिकडे उपपद लावण्यांतहि युरोपियन आणि हिन्दु यांच्यांत फरक करून हिंदूंना "पंडित" म्हणतात आणि Mr. हें उपपद फक्त युरोपियन् लोकांकरितांच राखून ठेवतात. तिकडील सरकारी गॅझेटांत Mr. Curtis आणि Mr. Balakram असें

कधींहि वाचावयास सांपडावयाचें नाहीं तर त्याचेऐवजीं Mr. Curtis आणि Pandit Balakram असें लिहिलें जाईल. वामनराव सरकारी नोकरींत असतांना मध्यप्रांतांतील कांहीं अधिकाऱ्यांनीं हिंदु व युरोपियन अम्मलदारांत हा भेद चालू करण्याचा प्रयत्न केला व हिंदु अम्मलदारांनीं या भेदभावास संमति द्यावी म्हणून "पण्डित हेंच नांव तुम्हांला फार शोभतें, त्यांतच देशाभिमान आहे. Mr. हें परकीय उपपद लावणें तुम्हांला शोभत नाहीं," अशा प्रकारच्या मानभावी समजावणीनें त्यांचा भलताच देशाभिमान जागृत करण्याचा प्रयत्न केला. कांहीं हिंदु अम्मलदार या मानभावी समजावणीस बळीहि पडले व Mr. या उपपदावरील आपला हक्क सोडून देऊन Pandit या उपपदावर तृप्त होण्यास तयार झाले. पण वामनरावांनीं या सूचनेस जोराचा विरोध केला. त्यांनीं सांगितलें कीं, Mr. हें परकी उपपद लावून घेणें हें आम्हांला कमीपणाचें आहे कीं नाहीं याचा विचार आमचा आम्हीं करूं. त्यांत सरकारनें पडावयाचें कांहीं कारण नाहीं. तूर्त युरोपियन व आम्हीं यांच्यांत फरक केला जावा कीं नाहीं, एवढाच प्रश्न आहे; व असा फरक आम्हीं करूं देणार नाहीं. वामनरावांच्या या म्हणण्याचा पुष्कळ हिन्दु अम्मलदारांवर चांगला परिणाम झाला व अखेर सरकारला हा प्रयत्न अजीबाद सोडून द्यावा लागला.

वामनरावजींच्या स्वाभिमानासंबंधानें अशाच दुसऱ्याहि गोष्टी आहेत. एकदां मुंबईहून जबलपूरला जात असतां मध्यप्रांतांतीलच त्यांच्या ओळखीचा एक युरोपियन अधिकारी बोरीबन्दरवर ते डब्यांत शिरत असतां नाक मुरडतांना दिसला. त्याबरोबर ते व त्यांची पत्नी त्या अधिकाऱ्याकडे जीं रागानें पाठ फिरवून बसलीं तें अखेरपर्यंत त्यांनीं त्यांचें मुखावलोकन केलें नाहीं. प्रांताधिपाची अथवा वरिष्ठाची गांठ घ्यावयास जात असतांना कांहीं हिन्दु अंमलदारांप्रमाणें ते आपली गाडी कधींहि बंगल्याच्या आवाराबाहेर उभी करीत नसत, तर ज्याप्रमाणें युरोपियन लोक आंतील कमानीपर्यंत आपल्या गाड्या नेत त्याप्रमाणें ते आंतपर्यंत आपली गाडी घेऊन जात. एकदां एका अधिकाऱ्याच्या बंगल्यावर जात असतांना ह्याबद्दल त्यांची पुष्कळ कटकट झाली, पण त्यांनीं एकच उत्तर केलें, कीं, मी जर बंगल्यावर येईन तर जसे युरोपियन लोक येतात तसा येईन, नाहींतर येणार नाहीं.

वामनरावांच्या न्यायनिःस्पृहतेच्या सुद्धां बऱ्याच गोष्टी आहेत. एकदां त्यांच्यापुढें एका मिशनरीचा खटला आलेला होता. या खटल्यांत बहुतकरून मिशनरीवरच

बाजू शेकेल असा रंग दिसूं लागला व त्यामुळें त्यांचा एक वरिष्ठ अधिकारी सहज मित्रत्वाच्या भाषणांत 'तो मिशनरी सुटेल तर मला फार आनंद होईल' अशा अर्थाचें सूचक वाक्य बोलला, पण या सूचनेचा वामनरावांवर कांहीं एक परिणाम झाला नाहीं. त्यांनीं पुराव्याप्रमाणेंच निकाल केला, व मिशनरीस दोषी ठरविलें. युरोपियन सोल्जरांच्या एका खुनी केसमध्यें त्यांनीं जें विनमोल धैर्य दाखविलें त्याची हकीगत वर्तमानपत्रांतून त्यावेळीं येऊन गेलेलीच आहे. पण अशा न्यायशील निकालामुळें त्यांच्यावर कसकसे प्रसंग गुजरत याचें मात्र येथें एक उदाहरण देणें इष्ट वाटतें. जबलपूरास असतांना एका दिवाणी मुकदम्यांत त्यांनीं एका युरोपियनविरुद्ध निकाल दिला; पण त्याचा परिणाम असा झाला, कीं, ते क्लबमधून घरीं परत येत असतांना तो मनुष्य एका नाल्याच्या आड एक भला मोठा बाम्बूचा सोटा घेऊन बसला व वामनराव तेथें आल्याबरोबर त्यानें तो त्यांच्या डोक्यांत घातला. सुदैवानें त्यांची सायकल तितक्यांत पुढें सरली म्हणून बरें झालें, नाहींतर त्या दिवशीं भयंकर अनर्थ गुदरला असता.

वामनरावांसंबंधीं अशा आणखी पुष्कळच गोष्टी आहेत. युरोपियन व हिन्दु यांच्यांतील परस्पर संबंधासंबंधानें ते फारच सावध रहात व हिंदु लोकांकडे यत्किंचित् सुद्धां हीनत्व येऊं नये याविषयीं फार जपत. त्यांच्या मनांत ही गोष्ट फारच घोळत असल्यामुळें पण्डित ईश्वरचंद्र विद्यासागरांच्या त्यांनीं लिहिलेल्या त्रोटक चरित्रांत अशीच एक गोष्ट त्यांच्या लेखणींतून बाहेर पडलेली आहे. मिसेस ॲनी बेझण्ट यांनीं थिऑसफीवर लिहिलेलीं सर्व पुस्तकें त्यांनीं वाचलेलीं होतीं व बेझण्टबाईचीं कांहीं पुस्तकें तर त्यांच्या टेबलावर नेहमीं असत, तथापि मिसेस बेझण्ट यांचा सर्व प्रयत्न हिन्दु लोकांचें हीनत्व कायम ठेवण्याकडे व स्वतःचें महत्व वाढविण्याकडे आहे अशी त्यांची ठाम समजूत असल्यामुळें व्यक्तिशः त्यांनां त्यांच्याबद्दल कधींहि आदर वाटला नाहीं व त्यांच्यावरील त्यांचा रोष आजन्मांत कमी झाला नाहीं.

या हतभागी हिंदु जातीला अत्यंत थोर, उदात्त व उन्नतिकारक दर्जामध्यें बसविण्याकरितां कोणीतरी श्रेष्ठ पुढारी उत्पन्न व्हावा अशी त्यांची रात्रंदिवस तळमळ असे व महादेव गोविंद रानडे यांच्यावर त्यांची जी इतकी अनिवार भक्ति जडली याचें कारण ते अशा कोटींपैकीं मार्गदर्शक आहेत अशी त्यांची समजूत होती. रा. ब. वामनराव यांनीं जो पुनर्विवाह केला त्यास कारण रानड्यांची प्रेरणा ही

मुख्य होती हें आम्ही मागें सांगितलेंच आहे. वामनरावांचा पुनर्विवाह घडून यावा याबद्दल त्यांनीं उत्कट इच्छा प्रदर्शित केली होती व वामनरावांनीं पुनर्विवाह केल्या-नंतर त्यांनां अगदीं प्रेमळपणानें शाबासकी देणारे न्या. रानडे हेच प्रमुख होते. गुरूच्या हातून असली शाबासकी मिळाल्यावर वामनरावांसारख्या सद्गदित भक्ताला कितीतरी धन्यता वाटली असेल ! वामनरावांना पुनर्विवाह करण्याला कोणतीहि खाजगी आवश्यकता नव्हती. त्यांची पत्नीहि ते जितके गौरवर्ण व सुन्दर होते तितकीच काळी आणि कुरूप होती—त्यांनीं जो पुनर्विवाह केला तो केवळ अंगीकृत कार्याची प्रगति व्हावी म्हणूनच केला हें वर सांगितलेंच आहे. वामनरावांवर जो हा पुनर्विवाहाचा प्रसंग आला तोच प्रसंग खुद्द त्यांचे पुरस्कर्ते, उत्तेजक व गुरु प. वा. रानडे यांच्यावरहि कांहीं वर्षांनीं आला; पण त्या प्रसंगीं वामनरावांनीं जितकें मनो-धैर्य व कार्यप्रेम दाखविलें तितकें रानड्यांनीं दाखविलें नाहीं. आपले गुरु या कामांत आपल्यापेक्षां हीणकस ठरले ही जाणीव वामनरावांनां पूर्णपणें असलीच पाहिजे; पण त्यामुळें या गोष्टीचा त्यांनीं कधींहि अनादरपूर्वक उच्चार केला नाहीं, व त्यामुळें त्यांची गुरुभक्तिहि ढळली नाहीं. थोर पुरुषांच्या चरित्रांतील अशा प्रकारचे अवगुण म्हणजे त्यांनां एक सुन्दर गालबोटच आहे अशी त्यांची कल्पना असली पाहिजे. एरवीं त्यांचें सर्व मनोवातावरण जें अखेरपर्यंत रानड्यांच्या गुणांनीं भरून राहिलें त राहिलें नसतें.

रानड्यांच्या चरित्रांतील गुणावगुणांचें परीक्षण करण्याचें हें स्थळ नव्हे; परंतु रानडे व वामनराव कोल्हटकर ही जोडी पाहिली म्हणजे सत्कृतींत अथवा दुष्कृतींत गुरूपेक्षां शिष्य हा जास्त तीव्र भावनेचा असला पाहिजे या सिद्धांताचें पूर्ण आविष्करण होतें. गुरु नानक हा बिचारा साधासुधा होता, पण तोच गुरु गोविंदाचा विक्रमावतार पाहिला म्हणजे गुरूच्या विचारांतील बीज-कल्पनांनां शिष्याच्या चरित्रांत कसें भरघोंस पीक येतें हें चांगलें दिसून येतें. महंमदानें आपल्या धर्मांत मूर्तींचा निषेध केला खरा, पण गझनीच्या मूर्तिविध्वंसकाइतका विध्वंसीपणा त्याच्या सबंध आयुष्यांत तरी घडला असेल कीं नाहीं याची शंकाच आहे. रानडे हे विविध विचारांचे पुंज असल्यामुळें ते प्रत्येक विषयांत महाराष्ट्रीय जनतेपुढें विचार फेंकीत गेले, परंतु ते विचार सामाजिक सुधारणेच्या बाबतींत रा. ब. वामनरावांनीं कृतींत आणले व राजकीय बाबींतात ना. गोखले यांनीं आचरणांत आणले. वामनराव कोल्हटकर अथवा

गोपाळराव गोखले या व्यक्ति आपण आपल्या डोळ्यापुढें ठेवल्या म्हणजे कृति, प्राधान्यें करून, मुख्यत्वें करून, सर्वत्वें करून, आपणांस कृतिच दिसावयास लागते. कपाळावर तत्वज्ञाप्रमाणें हात टेकून विचारांत निमग्न झालेली एखादी आकृति काढल्यास ती गोपाळ कृष्ण गोखले यांची आकृति असणें आपणांस अशक्य वाटतें. गोपाळराव म्हणजे कृति–गोपाळराव म्हणजे धांवपळ–गोपाळराव म्हणजे मेल-ट्रेन–गोपाळराव म्हणजे वायुवेगानें झडप झडप करीत येणारें विमान–ही कल्पना गोपाळराव गोखल्यांसंबंधानें आपणांस पटते. थोडक्यांत बोलावयाचें म्हणजे रानडे हा दिवा होता, वामनराव–गोपाळराव हीं त्या दिव्याचीं किरणें होतीं. रानडे ही एक किल्ली होती व ती चावी दिल्याबरोबर फडफड फडफड हालूं लागणारे वामनराव–गोपाळराव हे यांत्रिक भाग होते. वामनराव हे रानड्यांकडून केवळ स्फूर्ती-चीच अपेक्षा करीत असले पाहिजेत. ते रानड्यांत कृति पहात नव्हते. फक्त प्रेरणा पहात होते. पुनर्विवाहाच्या कार्यांत रानड्यांनीं प्रेरणा दिली, वामनरावांनीं कृति केली, याचें कारण हेंच आणि कदाचित् याच विचारसरणीमुळें रानड्यांच्या कृतिविन्मुखतेबद्दल वामनरावांच्या मुखांतून असंतोषप्रदर्शक उद्गार कधींहि निघाले नाहींत.

रा. ब. वामनराव कोल्हटकर यांनीं पुनर्विवाहाच्या बाबतींत खरोखर अत्यंत श्रम केले. सर्व प्रकारच्या सामाजिक सुधारणांकरितांच ते प्रयत्न करीत असत, पण त्यांतल्या त्यांत पुनर्विवाह हा त्यांच्या आवडीचा विषय होता. मध्यप्रांतांतील पुनर्विवाहित मुलींना व युवतींना वामनरावजींचें घर म्हणजे खरोखर माहेरघर होतें. कोणीहि गतभर्तृका स्त्री असो–तिनें आपली करुण कहाणी कळविल्याबरोबर वामनराव तिच्या सहाय्यासाठीं सिद्ध होत. वामनराव यांनीं स्वतःच्या खर्चानें अनेक पुनर्विवाह लावून दिले होते व या किंवा दुसऱ्या पुनर्विवाहित कुटुंबांपैकीं कोणीही अडचणींत आले तर वामनरावांकडून त्यांना खात्रीपूर्वक मदत मिळत असे. याशिवाय सामाजिक सुधारणांपैकीं अशी कोणतीहि बाब नव्हती कीं तिच्या सबंधांत बोलल्याप्रमाणें कृति न झाल्यामुळें वामनरावांना खालीं मान घालण्याचा प्रसंग आला. मुलांची प्रौढ वयांत लग्नें करणें, मुलींना शिक्षण देणें, अपंक्तांशीं पंक्तिव्यवहार करणें, जातिभेदाला थारा न देणें, अस्पृश्यांना स्पृश्य मानणें व वेडगळ आचारविचारांना फांटा देणें यांपैकीं एकहि गोष्ट अशी नव्हती, कीं, जिच्या बाबतींत वामनरावजींच्या हातून बोलल्याप्रमाणें कृति झाली नाहीं. वामन-

रावांचा पुनर्विवाह झाल्यानंतर त्यांचे संन्यास घेतलेले वृद्ध चुलते यांना त्यांच्याशीं संपर्क सोडावाच लागला; परन्तु पुनर्विवाह झाल्यानन्तरहि वामनरावांनीं इतकें नम्रतेचें व गोड आचरण केलें कीं, त्यांची वृद्ध आत्याबाई, त्यांचे थोरले बन्धु कृष्णराव, त्यांचे थोरले चुलत बंधु बळवन्तराव आणि कुटुंबांतील इतर जुन्या समजुतीचीं माणसें हीं सर्व हळुहळू त्यांच्याकडे आकर्षिलीं जाऊन त्यांच्यामधील व वामनरावांमधील अव्यवहारतेचा जाड पडदा बहुतेक नाहींसा, निदानपक्षीं अतिशय झिरझिरीत तरी खचित झाला. त्यांचे संन्यासाश्रमीय वृद्ध चुलते हेहि नाइलाजानें असें बोलत, कीं " वामनानें एवढा पुनर्विवाह केला नसता म्हणजे त्याच्यासारखा मुलगा नव्हता. "

या वेळच्या कांहीं कांहीं गमती येथें सांगण्याजोग्या आहेत; त्यांच्यावरून कालांत केवढा पालट पडलेला आहे याची अलीकडील लोकांना कल्पना येईल. वामनरावांनीं पुनर्विवाह केल्यानंतर त्यांचे बंधु कृष्णराव त्यांच्यावर अतिशय चिडले व पुनः वामनाचें तोण्ड पहावयाचें नाहीं असा त्यांनीं निश्चय केला. बळवन्तराव हे वामनरावांच्या विश्वासांत व प्रेमांत जास्त होते. त्यांना वामनरावांनीं सर्व हकीगत कळविली व जुन्या चालीचे गृहस्थ असतांहि त्यांनीं वामनरावांना दूर लेखलें नाहीं, तथापि पुनर्विवाह ही एकच गोष्ट त्यावेळच्या जुन्या समजुतींना एवढा धक्का देणारी होती, कीं, त्यावेळच्या लोकांना ती परिचयांत घ्यावयास कांहीं काल लोटावाच लागत असे. वामनरावांचा पुनर्विवाह झाल्यानंतर त्यांचीं कुटुम्बीय माणसें पुष्कळ दिवसपर्यंत साहजिकपणेंच दूर दूर होतीं; पण बराच काळ लोटल्यानंतर कुटुम्बीय प्रेम जास्त ओढ घेऊं लागलें व प्रथमतः त्यांची वृद्ध एसू आत्याबाई व आणखी कांहीं वृद्ध मंडळी त्यांना भेटण्याकरितां निघाली. तो प्रसंग मोठा चमत्कारिक होता. वामनरावांच्या आत्याबाईच्या मनांत वामन आतां कोणत्या स्थितींत सांपडेल याबद्दल निरनिराळ्या कल्पना चाललेल्या होत्या; कारण, त्यावेळीं पुनर्विवाह ही इतकी विलक्षण गोष्ट होती कीं, पुनर्विवाह करणें म्हणजे बाटणें असेंच जवळ जवळ लोक समजत असत. आत्याबाई वामनरावांच्या गांवीं येऊन पोंचली. ती त्यांच्या घरापर्यंत आली. घरांत पाऊल ठेवतांना तिच्या पोटांत धडधड होऊं लागलें. आंत शिरल्यावर आतां कायकाय प्रकार पहावे लागतील याची तिला कल्पना होईना. आंत देवधर्माचा उच्छेद केलेला असेल, मूर्ति फेकून दिलेल्या आढळतील, कदाचित् मद्यमांसाचा उघडउघड व्यवहार चाललेला असेल, व आतां वामनहि आपल्याला

ओळखील कीं नाहीं, कीं कांहींतरी विचक्र बोलेल, असे एक ना हजारों तर्क तिच्या पोटांत उभें रहात होते. शेवटीं ती घरांत गेली व तिला आश्चर्य व आनंद वाटला, कीं, वामन पूर्वीप्रमाणेंच सुशील व गोड आहे. तिला समजून चुकलें, कीं, पुनर्विवाह केल्यावरही माणसें हीं माणसेंच रहातात, पिशाच्च अथवा सैतान बनत नाहींत.

ज्यावेळीं रा. ब. वामनराव कोल्हटकर यांचा पुनर्विवाह झाला, त्यावेळीं प्रस्तुत लेखक अत्यंत अल्पवयी असून वांई येथें होता. वांई म्हणजे धर्माचें, धर्माभिमानाचें, जुन्या परम्परेचें, ब्राम्हण्याचें व सोंवळेपणाचें माहेरघर, त्यामुळें पुनर्विवाह या शब्दाचा उच्चारसुद्धां तेथें एखाद्या पातकी आणि अमंगळ शब्दाप्रमाणें अत्यंत हळू करीत असत. लेखकाच्या कानांवर घरांतील वडील माणसांनीं ही कल्पना अतिशय सौम्य व मृदु शब्दांत घालावी. ज्याप्रमाणें मृत्यूसारखी एखादी भीतिप्रद गोष्ट लहान मुलांच्या कानांवर कांहींतरी मृदु स्वरूपांत घालतात, अथवा ज्याप्रमाणें एखाद्या विषयप्रधान कल्पनेचें रूप मुद्दाम पालटून ती लहान मुलांना समजावतात, त्याप्रमाणें वामनरावांच्या संन्यास घेतलेल्या चुलत्यांनीं व इतर वडील मनुष्यांनीं प्रस्तुत लेखकाला कोणत्या तरी अप्रत्यक्ष वर्णनानें वामनरावांच्या पुनर्विवाहाचा वृत्तांत सांगावा व त्याची कशीतरी समजूत घालावी. वांईतलि मनुष्यें, विशेषतः स्त्रिया, वामनरावांच्या पुनर्विवाहित स्त्रीसंबंधानें अत्यंत भीतीनें व आडपडद्यानें बोलत असत. ज्याप्रमाणें स्त्रिया साप वगैरे हिंस्र जीवांचें नांव घेत नाहींत, त्यांचा कांहींतरी अप्रत्यक्ष शब्दयोजनेनें उल्लेख करितात, त्याप्रमाणें वांईतील बायका वामनरावांच्या पुनर्विवाहित पत्नीचा जपून निर्देश करीत. तिचें पत्नीत्वपदसुद्धां कबूल करावयास त्या नाखुष असत. तथापि वामनराव आणि त्यांची पत्नी यांनीं घरांतील सदाचार इतके कायम राखले आणि वर्तन इतकें प्रेमळ, शान्त आणि सुस्वभावी ठेवलें कीं, कालान्तरानें वरील गैरसमजूती बऱ्याच अंशीं पालटल्या आणि अखेर पुनर्विवाह म्हणजे आचारान्तराचा एक प्रकार एवढाच अर्थ त्यास येऊन बसला.

वामनरावांच्या पुनर्विवाहित पत्नीचें वर्तन अगदीं बालबोध वळणाचें असे. सण, वार, पाहुणे, अतीत, अभ्यागत, यांविषयीं तर पवित्र हिन्दु आचार ती घरांत ठेवीतच असे, पण वामनराव इतके सुधारक विचारांचे असतांनाहि त्यांची पुनर्विवाहित पत्नी घरांत देव बाळगी. घरांतील वागणुकीवरून ही स्त्री पुनर्विवाहित आहे अशी कोणाला कल्पनाहि येत नसे. वामनरावांची उदार वृत्ति यास वरीलशी सहाय्यभूत होत असे. वामनरावांचीं स्वतःचीं मतें कोणतींहि असलीं तथापि

दुसऱ्यांचीं धार्मिक मतें पालटण्याचा ते वादविवादानें व समजूत घालून प्रयत्न करीत, स्वतःच्या धार्मिक मतांचा दुसऱ्यावर कधींहि जुलूम करीत नसत. यामुळें घरांत तुळस, देव, ब्राह्मण हे दिसत असत; एवढेंच नव्हे, तर बळवन्तराव घरीं आले असतांना घरांत वैश्वदेवहि होत असे. बळवन्तराव घरीं आलेले असले म्हणजे धर्माच्या बाजूनें ते, व सुधारणांच्या बाजूनें वामनराव; टिळकांच्या बाजूनें ते, रानड्यांच्या बाजूनें वामनराव; जहाल राजकारणाच्या बाजूनें ते, सौम्य राजकारणाच्या बाजूनें वामनराव; असे तासच्या तास जोराजोरानें खटके चालत. पण दोघेहि सुस्वभावी व गोड अन्तःकरणाचे असल्यामुळें या वादविवादाचा परिणाम एकत्र फिरावयास जाण्यांत अथवा सोंगट्यांचा डाव माण्डण्यांत होत असे. दोघांत अखेरपर्यन्त अणुमात्रहि किल्मिष आलें नाहीं.

वामनराव जसे सुस्वभावी होते तसेच द्रव्याच्या कामांत उदार होते. त्यांचा दातृत्वाचा हात फार सढळ असे. पुनर्विवाहित जोडपीं हा तर त्यांच्या दातृत्वाचा मुख्य विषय होताच. त्यांचें सार्वजनिक आयुष्यच पुनर्विवाहाच्या कार्याकरितां होतें. तथापि असहाय्य विद्यार्थी, विद्वान् ब्राम्हण, सार्वजनिक चळवळी व राष्ट्रीय आवश्यकता याहि त्यांच्या दातृत्वाचा तितकाच विषय असत. इतर सार्वजनिक पुढारी आणि वामनराव यांतील हा विशेष फरक होता. ते कोणत्याही कार्याशीं नुसती तोण्डची सहानुभूति दाखवित नसत, तर सढळ हातानें त्यास पैसा देत. मध्यप्रांतांत अशी एकहि सार्वजनिक स्वरूपाची गोष्ट नव्हती, कीं जिला वामनरावांचा पैसा लागलेला नाहीं. पुष्कळ पुढारी लोकांना पुष्कळ वेळां कार्याविषयीं फार उत्साह वाटतो, पण पैसा देण्याचें नांव निघालें, कीं, त्यांना संकट पडतें. वामनरावांचें तसें नव्हतें. कार्याकरितां पैसा देण्यांत त्यांना आनंद होत असे.

वामनरावांच्या पुढारीपणाचा अतिशय भरभराटीचा काळ म्हणजे ज्यावेळीं राष्ट्राच्या विचारांचा मुख्य विषय सामाजिक सुधारणा हा होता तेव्हांचा होय. हा काळ महाराष्ट्रांत साधारणतः १८९५ पर्यंत टिकला. या वर्षी आगरकर हे शेवटचे बादबहाद्दर सुधारक मृत्यु पावले, व सुधारणेचें निशाण फडकवावयास दुसरा कोणी पराक्रमी पुरुष यापुढें उरला नाहीं. महाराष्ट्रांत सुधारणांचा वाद प. वा. विष्णुशास्त्री पण्डित यांच्या काळापासून सुरू झाला होता व आगरकरांच्या वेळेपर्यंत सुधारणेला कोणी ना कोणी पराक्रमी पाठीराखे मिळत गेले होते; पण आगरकर वारल्या-

नंतर सुधारणेचें अतिक्रामी ( Aggresive ) पुरस्कर्तृत्व बंद पडलें, व १८९७ सालच्या टिळकांवरील राजद्रोहाच्या खटल्यामुळें महाराष्ट्राचें लक्ष सामाजिक सुधारणेवरून राजकीय परिस्थितीकडे जास्त वेधत गेलें. या ध्येयक्रांतीचा स्पर्श नागपूर प्रांताला होण्यास मात्र आणखी आठ दहा वर्षे लागलीं. या आठदहा वर्षांत म्हणजे सुमारें १९०५ पर्यंत नागपूर वऱ्हाडप्रांत अजून सामाजिक सुधारणेच्याच ध्येयांत होता. गेलीं कांहीं वर्षे राजकीय बाबतींत अत्यंत पुढें आलेले व श्रीयुत टिळकांचा उजवा हात झालेले दादासाहेब खापर्डे हेहि १९०४–५ पर्यंत सामाजिक सुधारणेंतील अग्रेसर याच नात्यानें ओळखले जात असत. इतकेंच काय, पण नागपूरांतील सामाजिक परिषदेंतून टिळकांना हांकलून देण्यांत दादासाहेब खापर्डे हेच प्रमुख होते. १८९६–९७ पासून महाराष्ट्रांत झालेली विचारक्रांति जरी नागपूर–वऱ्हाडांत तावडतोब झाली नाहीं, तथापि वंगभंग व स्वदेशीचा पुकारा यांच्या संस्कारांतून नागपूर–वऱ्हाडप्रांत मुक्त राहूं शकला नाहीं. १९०५ सालीं सर्व हिन्दुस्थानभर नवीन हिन्दुस्थान झालें व याच सालीं नागपूर–वऱ्हाडप्रांतांतहि नवीन दुनिया सुरू झाली.

या नवीन दुनियेचा वामनरावांच्या चरित्रावर फार अनिष्ट परिणाम झाला. पंचवीस तीस वर्षे सरकारी बहुमानाची नोकरी करून व एतद्देशीयांस दुष्प्राप्य अशाहि अधिकाराच्या जागा सम्पादन करून रा. ब. वामनराव यांनीं त्यावेळीं नुक्तेंच पेनशन् घेतलें होतें. हें पेनशन् घेतांना त्यांच्या डोळ्यांपुढें मोठमोठ्या नवीन आशा होत्या व पुष्कळ नवीन नवीन योजना त्यांनीं योजून ठेवल्या होत्या. पेनशन् घेतल्यानंतर आपणास मुबलक वेळ मिळेल आणि त्यावेळीं आपण अमुक सार्वजनिक कार्य करूं, तमुक सार्वजनिक कामाची व्यवस्था लावूं, असे त्यांनीं हजारों बेत करून ठेवलेलें होते. वाचनव्यासंगाचीं तर त्यांनीं एवढालीं मनोराज्यें केलेलीं होतीं, कीं, तीं करतांनासुद्धां त्यांना तीं सुखप्रद वाटत असत. वामनरावांनीं ग्रंथसंग्रह मोठा करून ठेवला होता व एक टोलेजंग घर बांधून ठेवलें होतें. हेतु हा कीं, या घरांत येऊन रहावयाचें, पुष्कळ वाचन करावयाचें व आपल्या सार्वजनिक हव्यासाच्या सर्व इच्छा पुरवून घ्यावयाच्या. यांपैकीं पेनशन् घेण्यापूर्वीच एक प्रतिकूळ गोष्ट घडली, ती त्यांच्या पुनर्विवाहित पत्नीचा १९०२ मध्यें झालेला मृत्यु ही होय. उठावदार मनोराज्यांवर जरी याप्रमाणें अचानक अभ्र आलें तथापि त्यांच्या इच्छेंत कोणतांहि

कमतरता आली नाहीं. तथापि १९०५ हें साल सार्वजनिक इच्छांचा उदय ठरण्याचे ऐवजीं अस्तच ठरलें.

आजपर्यंत वामनरावांनीं जें जग पाहिलेलें होतें तें सामाजिक सुधारणा बोलणारें, सामाजिक सुधारणांकरितां भांडणारें व सामाजिक सुधारणांचाच प्रमुखपणानें विचार करणारें पाहिलेलें होतें. त्या जगांत जरी राजकीय गोष्टी होत्या तरी त्या दुय्यम होत्या. १८९५ च्या पुण्याच्या कांग्रेसमधील मारामारी व १९०७ च्या सुरतेच्या कॉंग्रेसमधील मारामारी या दोहोंवरून जुनें जग व नवीन जग—यांतील अंतर स्पष्टपणें दिसून येतें. १८९५ची मारामारी सामाजिक सुधारणेला कांग्रेसचा मण्डप द्यावा कीं नाहीं याबद्दलची होती, व १९०७ ची मारामारी राजकीय कार्यक्रमांत पीछेहाट न व्हावी याबद्दलची होती. हें नवीन जग वामनरावांनां अपूर्व होतें. त्यांत ते रुळलेले नव्हते. असल्या जगाला ते तयार नव्हते. ज्याप्रमाणें पुनर्विवाह हें नवीन तत्त्व समाजांत आणून त्यांनीं जुन्या पिढीला धक्का दिला, त्याचप्रमाणें १९०५ पासून सुरू झालेल्या नवीन जगानें त्यांनां धक्का दिला. पूर्वीं ते धक्का देणारे होते. आतां ते धक्का खाणारे झाले. हा धक्का त्यांना सोसवला नाहीं. या धक्काबुक्कींत त्यांच्या सर्व सार्वजनिक मनोराज्यांचा चुराडा उडून गेला.

वास्तविक पहातां टिळक व खापर्डे हेहि जुन्या पिढींतलेच लोक आहेत. यावेळीं ते वस्तुतः ‘ माजी,’ ‘ पुराणे’ व्हावयास पाहिजे होते. मिसेस बेझण्ट यांच्या चावटुकी भाषेंत बोलावयाचें म्हणजे सर्व Yesterday अथवा “ कालचा माल ” ठरावयास हवें होतें. टिळकांनीं आपल्या सार्वजनिक आयुष्याला सुरवात केली त्या वेळची भाषा व आजच्या जगांतली भाषा यांतलें अंतर पाहूं गेलें तर त्यांचें त्यांनां सुद्धां आश्चर्य वाटेल; पण आजच्या जगांतहि हे ताजेतवानें वाटतात, याचें कारण टिळकांच्या अंगांत भयंकर पाचकशक्ति (Receptive Capacity) असून जी जी नवीन चळवळ निघेल तिनें ते चकित होऊन न जातां तिला पचनीं पाडूं शकतात. जगांत नेहमीं नवे रहाण्याचा हाच एक मार्ग आहे. पण तो फारच क्वचित् लोकांना साधतो. इतर लोक हे त्यांच्या परिचयाचीं ध्येयें बदललीं, कीं, लगेच जगाच्या मागें पडतात. रा. ब. कोल्हटकर यांचेंहि असेंच झालें. १९०५ सालीं सरकारी नोकरींतून पेनशन् घेऊन ते मोठ्या उमेदीनें सार्वजनिक आयुष्यांत शिरण्याकरितां आले. पण त्याच सालीं जगाचें स्वरूप पालटल्यामुळें त्यांना गोंधळल्यासारखें झालें, व त्यांच्या इच्छा जागच्या जागींच राहिल्या.

वर जी पाचकशक्ति सांगितली त्यालाच व्यावहारिक मराठी भाषेंत निगरगट्टपणा म्हणतात. टिळकांच्या अंगांत हा निगरगट्टपणा आहे; कर्वे यांच्याहि अंगांत हा निगरगट्टपणा आहे; त्यामुळें मनुष्य नवा असो कीं जुना असो, त्याच्याकडून ते पैसे काढूं शकतात. ज्याला जगांत टिकावयाचें असेल त्याच्या अंगांत हा निगरगट्टपणा लागतो. हा अंगांत असला तरच मनुष्य जगाशीं झोंब्या खाऊं शकतो. नाहींतर त्याची ताबडतोब उचलबांगडी होते. वामनरावांच्या अंगीं हा निगरगट्टपणा नव्हता. जगाशीं झोंब्या खावयाचा गुण त्यांच्या अंगांत नव्हता. चार रट्टे बसले तरी हरकत नाहीं, पण या जगाला मी एक तरी रट्टा चढवीनच चढवीन अशी मगरूरी अंगांत असल्याशिवाय जगांत निभाव लागत नाहीं. ही मगरूरी ( Defiant attitude ) रा. ब. वामनराव यांच्या ठिकाणीं नव्हती. नवीन जग व त्यांतले नवीन प्रकार पाहून ते गोंधळले व त्यामुळें जगाच्या आखाड्यांत शिरत असतांनाच त्यानां परतावें लागलें.

जगाच्या टक्क्याटोणप्यांत हें गोंधळणें, हा घाबरटपणा कांहीं चालत नाहीं. जगाच्या उलाढालींत निर्धोक शांतपणा (Cool courage) लागतो. हा वामन-रावांच्या अंगीं नव्हता. त्यांचा स्वभावच घाबरट ( Nervous ) होता, व हा त्यांच्या इतर कृतींतहि दिसून येत असे. वामनराव प्रवासास निघावयाचे म्हणजे तास दीड तास अगोदरच स्टेशनवर जाऊन बसत. शिवाय त्यांचा प्रवास फर्स्ट अथवा सेकंड क्लासनेंच होत असे व जागाहि अगोदर रिझर्व्ह करून ठेवलेली असे. या नर्व्हसनेस्मुळेंच वामनरावांना वक्तृत्व कधीं साधलें नाहीं. ते उत्कृष्ट बोलत असत व त्यांची जी कांहीं थोडीं भाषणें झालीं ती फारच श्रवणीय व मुद्देसूद होतीं. तथापि त्यांची भाषणेंच फार थोडी झालीं. सभेंत उभें राहण्यास ते अतिशय कचरत. आपला गोंधळ उडेल कीं काय याची त्यांना भीति वाटे. त्यांच्या सार्वजनिक कार्यांतील प्रवेशहि याच भीतिग्रस्ततेनें ( Nervousness ) अल्पायुषी करून टाकला.

वामनरावांचा हा भीतिग्रस्तपणा स्वाभाविक व निसर्गप्राप्त होता खरा. तथापि आयुष्याचीं पंचवीस तीस वर्षें नोकरींत घालविल्यामुळें यांत भर पडली. सर्व जन्म सरकारी नोकरींत घालवून जे अखेरी अखेरीस सार्वजनिक कार्यांत पडतात त्यांच्यांत हा भीतिग्रस्तपणा बहुशः असाच दिसून येतो. त्यांचें आयुष्य हुकमत चालविण्यांत

गेलेलें असतें. आपल्या शब्दाच्या विरुद्ध शब्द ऐकण्याची त्यांना संवय नसते. आपल्या इच्छेच्या उलट एखाद्याची कृति चाललेली तर त्यांना बिलकूल खपत नाहीं. पण सार्वजनिक आयुष्यांत असला हुकमतीपणा चालणें कधींच शक्य नसतें. तेथें हजार तऱ्हेचीं हजार माणसें येणार व तीं हजार तऱ्हेनें बोलणार. शिवाय हे बोलणारे सारे एकाच योग्यतेचे असतात असेंहि नाहीं. सार्वजनिक पटांगणावर उभा राहिला म्हणजे एखादा मजूरहि एखाद्या मुख्य प्रधानाला महामूर्ख म्हणतो. जे सार्वजनिक आयुष्यांत पडतात त्यांना या साऱ्या गोष्टींची संवय करून घ्यावीच लागते. पण सर्व जन्म सरकारी नोकरींत गेलेल्या माणसांना ही संवय होत नाहीं. आणि त्यांतून तो मनुष्य जर न्यायखात्यांत नोकरी केलेला असेल तर मग बोला-वयासच नको. एखादा वकीलहि जास्ती लाम्ब बोललेला ज्यांना खपत नाहीं त्यांनां सार्वजनिक वादविवादांतील टीका कशी सहन होणार ?

वरील दोषामुळें रा. ब. वामनराव कोल्हटकर यांच्या पेन्शनोत्तर सार्वजनिक आयुष्याचा आरंभच वाईट झाला, व एकदोन वर्षें कशींबशीं काढून ते १९०८ च्या सुमारास सार्वजनिक आयुष्यामधूनहि पेन्शनींत निघाले. त्यांची शेवटचीं दहा वर्षें एकांत-वासोपम आयुष्यांत गेलीं. मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था, मुलींचीं काळजी, मित्रांचा सहवास, सुखकर स्थळीं प्रवास व ग्रंथालयाची आराधना यांत त्यांचे शेवटचे दिवस गेले. पुण्यामुंबईकडे आले म्हणजे त्यांना ना. पारख, ना. हरि सिताराम दिक्षीत व प. वा. गोडबोले, यशवंतराव घारपुरे व सर्व्हंटस् ऑफ इण्डिया सोसायटी यांच्या-कडे राहणें आवडे. ते वांईस नेहमीं आदरानें जात व तेथें श्री. नानासाहेब वैद्य यांची भेट घेत. वैद्यघराण्याचा आणि रा. ब. कोल्हटकर यांच्या कुळाचा कोणत्या प्रकारचा संबंध आहे तें मागें सांगितलेंच आहे. फर्ग्युसन कॉलेजमधील लोकांवर त्यांची बहाल मर्जी असे. प्रो. कर्वे यांनाहि ते चाहत, पण जुन्या लोकांची सहानु-भूति मिळविण्याकरितां प्रो. कर्व्यांनीं पुनर्विवाहाच्या बाबतींत जाहीर केलेली तटस्थ-वृत्ति त्यांना पसंत नसे. कुटुंबांतल्या पुढील पिढींतील माणसांपैकीं त्यांचे पुतणे श्रीयुत श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्यासंबंधानें त्यांना अत्यंत महत्त्वाचा अभिमान वाटे व त्यांच्या बुद्धिमत्तेबद्दल त्यांची कमालीची गौरवबुद्धि असे. वामनरावांची उंच शरीरयष्टि, गौरकांति, व उमदा चेहरा यांच्या योगानें हे कुटुंबीय माणसांत कुल-पतीप्रमाणें शोभत व त्यांचें वर्तनहि तसेंच उदार व मायाळूपणाचें असे.

त्यांच्या पेन्शनोत्तर सार्वजनिक आयुष्याची जीं दोन–तीन वर्षें वर सांगितलीं, त्यांतच १९०७ ची नागपूर येथील कॉंग्रेस व तिच्या अनुषंगानें वादविवादाचा उसळलेला गहजब ह्यांचा उल्लेख केला पाहिजे. या वादविवादांत एका पक्षाचें म्हणणें श्रीयुत टिळकांना कॉंग्रेसचे अध्यक्ष करावें असें होतें व दुसऱ्या पक्षाचें म्हणणें राशविहारी घोष यांना अध्यक्ष नेमावें असें होतें. हा वाद वाढतां वाढतां इतका वाढला, कीं, या प्रश्नावर रणें पडलीं. २२ सप्टेंबर १९०७ रोजीं नागपूरच्या टाऊन हॉल-शेजारीं हजारों लोकांचा जमाव जमून त्यांनीं टिळकांनाच अध्यक्ष नेमावें अशी आपली इच्छा व्यक्त केली. असल्या गडबडीचा रा. ब. वामनराव यांना कधींच सराव नव्हता; याशिवाय या चळवळींत ते राशविहारी–पक्षाला असून त्यांची सर्व निकटचीं माणसें टिळकपक्षाला होतीं. त्यांचे सर्व स्नेही, विश्वासांतले लोकहि टिळक-पक्षालाच होते. याचवेळी पुर्वी नागपुरचे डॉ. गद्रे हे त्यांच्या अत्यंत प्रेमांतले होते व डॉ. मुंजे तर त्यांचे फॅमिली डॉक्टरच होते. नागपुरचे डॉ० परांजपे वगैरे मंडळी त्यांच्या मुलांप्रमाणें होती; पण या चळवळीनें त्यांना एका बाजूला व या साऱ्या माणसांना दुसऱ्या बाजूला केलें. त्यांच्या मृदु मनावर याचा फारच विलक्षण परिणाम झाला व त्यांनीं सार्वजनिक चळवळींना ह्यावेळीं जो 'रामराम' ठोकला तो कायमचाच ठोकला.

रा. ब. वामनराव आतां दिवंगत झालेले आहेत. त्यांच्याकडे आतां स्मृतिरूपी नेत्रांनीं पाहिलें व या सर्व गोष्टी आठवल्या म्हणजे जग हें केवढें स्वप्न आहे याचा प्रत्यय येतो. आतां ते वामनराव, तो त्यांचा पुनर्विवाह, तीं त्यांची भयभीत झालेलीं वडील माणसें, तो त्यांचा आवेश, तो त्यांचा राग, ती बावीस सप्टेंबरची दंगल, तो अभिमान, तो सन्ताप, ते मित्र, ते शत्रु, हे सर्व आतां एकरूप झालेले आहेत व आतां गतकालाच्या शून्यरूपांत त्यांचें परिवर्तन झालेलें आहे. या परिवर्तनानंतर ते रागद्वेष, ते विकारांचे बुद्बुद, ते भावनांचे कल्लोल आपल्याला दिसत नाहींत, तर कांहींतरी राष्ट्रोपयुक्त कार्य व्हावें याकरितां धडपडणारा जीवात्मा या सर्व खळबळीच्या वरतीं आपणांस दिसूं लागतो. रा. ब. वामनरावांच्या चरित्रांत जर आपणांस कांहीं पहावयाचें असेल तर हेंच पहावयाचें आहे, आणि त्यांचें चरित्र जर आपण या स्वरूपांत पाहूं तरच त्याची रम्यता आपल्या डोळ्यांना आनन्द देईल. त्यांनीं पुनर्विवाह केला–कदाचित् भावी काल असा येईल, कीं, त्यांत पुनर्विवाह हें अत्यंत बालिश कार्य अथवा ओजस्वी कृत्य दिसेल. त्यांनीं रानड्यांची

भक्ति केली–कदाचित् भावी काळ असा येईल, कीं त्यावेळीं रानड्यांचें कार्यमापन लघूहून लघु अथवा महत्तमाहून महत्तम ठरेल. त्यांनीं राजकारणाच्या आंदोलनांत अमुक एक पक्ष स्वीकारला–कदाचित् भावी काळ असा येईल, कीं, त्यावेळीं बावीस सप्टेंबर ही तारीख स्मरणविषयसुद्धां राहणार नाहीं. पण इतिहासांत विदित असो कीं नसो, चरित्ररूपानें विलसो किंवा न विलसो, विश्वाच्या विशाल हिशेबांत लोकसमूहाच्या हिताकरितां धडपडणारा वामनरावांचा जीवात्मा नमूद केलाच जाईल. वामनरावांच्याच काय, कोणाच्याहि चरित्रांत हीच काय ती रम्यता! नाहीं तर मुलेंबाळें, संसार व सुखदुःखें प्रत्येकाच्या चरित्रांत असतातच.

वामनरावांनीं हिन्दु जग–ज्यांत पुनर्विवाह नाहीं असें–पाहिलें व वामनरावांनीं हिन्दु जग–ज्यांत पुनर्विवाह आहे असें–सोडून दिलें. वामनरावांनीं स्वतःचा प्रांत–ज्यांत रानड्यांच्या तत्त्वांनां कोणी विचारीत नाहीं असा–पाहिला व वामनरावांनीं तो प्रांत–ज्यांत रानड्यांच्या तत्त्वांचा प्रसार करण्याचा त्यांनीं जिवेंभावें प्रयत्न केलेला आहे असा–सोडून दिला. जग जसें आहे तसेंच तें कबूल (accept) केलें, तें उपयुक्त दिशेनें फिरविलें नाहीं–अथवा फिरविण्याचा यत्न केला नाहीं–म्हणजे तें चरित्र बेचव, त्यांत कांहीं अर्थ नाहीं, तें खुशाल सोडून द्यावें. मग तें कितीहि श्रीमन्त अथवा भाग्यवान् पुरुषाचें असो. ह्याच्या उलट, जग फिरविण्याचा, जग पालटण्याचा इमानानें यत्न केला म्हणजे तें चरित्र मनोरम, मग कितीहि विपद्-ग्रस्त व्यक्तींचें असो. वामनराव विपद्ग्रस्त नव्हते. त्यांचें सर्व आयुष्य सुखांत, भाग्यांत, उत्कर्षांत गेलें. त्यांच्या आयुष्यांत एवढीच गोष्ट असती तर हें चरित्र लिहिण्याचा या लेखकालाहि अधिकार नव्हता आणि वाचकांना तें वाचण्याचाहि अधिकार नव्हता. पण असलेली परिस्थिति पालटण्याचा मनोभावानें यत्न करणारा एक जीवात्मा वामनरावांच्या चरित्रांत आहे; आणि म्हणूनच मनोरंजनाच्या वाचकांना तें चरित्र उत्कट लालसेनें अर्पण केलें आहे.

---

स्थळ प्रत
सं. ...... नं. ......
ता. ......

# मेथांचें सुस्मरण *

सर फिरोजशहा मेथा यांच्या पार्थिव कुडींतून प्राणज्योति निघून गेल्यापासून काल सकाळपर्यंत त्यांची मूर्तितरी ह्या जगांत होती, परंतु मुंबई नगरींतील **हजारों लोकांच्या** प्रेतयात्रेस बरोबर घेऊन त्या मूर्तीनें पार्शी लोकांच्या वहिवाटीप्रमाणें निःशब्द दुर्गांत (Tower of Silence मध्यें) प्रवेश केल्यामुळें आतां सर फेरोजशहा मेथांच्या पावन कृत्यांच्या सुस्मरणावांचून ह्या जगांत कांहीं एक राहिलेलें नाहीं. सर फेरोजशहा मेथांच्या आत्म्यानें सुमारें पाउणशें वर्षांपूर्वी ह्या जगांत पाऊल टाकल्यापासून तों काल त्यांचा ऐहिक देह गृध्रराजांच्या बुभुक्षित उदरांस स्वतःला वाहून घेईपर्यंत जो काल गेला, त्याच्याकडे साकल्यानें दृष्टी फेंकली म्हणजे खरोखर मन प्रमुदित होतें व कालाच्या अवाढव्य खाणींतून हा सोन्याचा तुकडा जर हिंदुस्थानास लाभला नसता, तर हिंदुस्थानचा गेल्या शतकांतील अगोदरच तिमिरमय असलेला वृत्तांत आणखी किती तिमिरमय झाला असता ह्याची बरोबर कल्पना येते. पार्शी लोकांत प्रेत–देह अग्निसमर्पण अथवा भूमिप्रच्छादित करीत नाहींत. तों स्मशानाचे जागीं नेऊन तेथें मनुष्यमांसाकरितां हपापलेल्या गिधाडांना अर्पण करतात. पार्शी धर्मांत असें सांगितलेलें आहे कीं, प्रेत न जाळण्याचें कारण अग्नीला प्रेताचा विटाळ होऊं नये; प्रेत न पुरण्याचें कारण भूमीला प्रेताचा संसर्ग होऊं नये; प्रेत नदींत न सोडण्याचें कारण, त्याचा अपवित्र स्पर्श उदकास होऊं नये, व प्रेताचा वायु व आकाश यांच्याशीं संबंध न आणूं देण्याचें कारण प्रेतामुळें हीं दोन तत्त्वेंहि विटाळूं नयेत. पार्शी धर्माची ही जी समजूत आहे, ती पार्शी धर्मानें एकंदर मानवी अनुभवावरून करून घेतली असेल. पण सर फिरोजशहा मेथांच्या संबंधांत पंचमहाभूतांना शपथ घालून जर विचारलें असतें तर फिरोजशहांच्या देहांचा आपणांस विटाळ होतो असें त्यांनीं म्हटलें नसतें, एवढेंच नव्हे, तर मुंबईत पंचमहाभूतांचें प्रबल अस्तित्व प्रस्थापित करण्याचें श्रेय सर्वस्वीं सर फिरोजशहा मेथा यांचेकडेच आहे अशी त्यांनीं आनंदानें कबुली दिली असती. मुंबई नगरी ही अठरा पगड जातींची उतारपेठ आणि अठरा धान्यांचें कडबोळें

* संदेश, ता. ७ नोव्हेंबर १९१५.

असल्यामुळें मुंबईत जिवंतपणा असावा असा तिचा नैसर्गिक योगायोगच नाहीं. परंतु ह्या नैसर्गिक योजनेला फेंटाळून लावून मुंबईत अति बलाढ्य प्राणतत्त्व आहे हें गेल्या चाळीस पन्नास वर्षांत एकट्या सर फिरोजशहा मेथांमुळेंच जाणविलें जात होतें. पंचभूतांना ज्यायोगें पंचप्राणत्व आलें त्यांस, सर फिरोजशहांच्या आत्म्यानें जगांतून निघून जातांना भूमिवरच पसरून ठेवलेली जडदेहाची गादी आनंदानें स्वीकृत करण्यास कृतज्ञताच वाटली असती. त्यांचा हा स्वाभाविक हक्क हिरावून घेऊन पारशी धर्माच्या अनुल्लंघनीय अनुशासनानें भावनाहीन क्रूर गृध्रांना सर फिरोजशहांच्या देहाचा **दिवाळसण दिला** हें पाहून पंचमहाभूतांपैकीं प्रत्येक तत्व मात्सर्यानें संतप्त होऊन गेलें असेल ह्यांत संशय नाहीं. सर फिरोजशहांचा पवित्र देह पाहून भूमीला हें रत्न आपल्या उदरांत सांठवावें, अग्नीला हा तेजस्वी देह जास्त तेजोव्याप्त करावा, अशी लालसा उत्पन्न होणें अगदीं साहजिक होतें. ह्या कामांत फक्त पारशी धर्माच्या आज्ञेमुळेंच नृशंस अशा गृध्रांचा जास्त वशिला लागला हें पाहून मानवकृत नियम कितीहि सद्बुद्धीनें केलेले असले तरी त्या नियमांच्या चांगुलपणावर कांहीं एक अवलंबून नाहीं, जें काय आहे तें त्यांच्या अंमल-बजावणीवर आहे, ह्या तत्त्वाची दुष्ट सत्यता मनास पटल्यावांचून रहात नाहीं. पण सर फिरोजशहा मेथांचें एकंदर चरित्र पाहिलें म्हणजे मृत्यूनंतरहि त्यांच्या देहाचा स्वार्थत्याग व्हावा हेंच त्यांच्या एकंदर वर्तनक्रमाशीं सुसंगत दिसतें. ह्या स्वार्थ-त्यागाचा फायदा गिधाडांना न मिळतां दुसऱ्या कोणालातरी मिळाला असता तर खात्रीनें बरें झालें असतें पण स्वार्थत्यागाचें कपाळच असें आहे कीं, जन्मभर मनुष्याला त्यांत पीडा व्हावी व मृत्यूनंतरहि त्याचा फायदा, तो सफल करण्यांत ज्यांचें यत्किंचितहि अंग नव्हतें, किंबहुना त्या स्वार्थत्यागास निंदेनें कलंकित करण्याचाच त्यांनीं प्रयत्न केला, असल्याच गिधाडांना मिळावा, हें नशीब पारशी धर्म झाला तरी तो कसें विफल करणार ?

सर फिरोजशहा मेथांच्या एकंदर जीवित—चरित्राकडे पाहिलें म्हणजे जी गोष्ट विशेषतः नजरेपुढें येते ती ही कीं, सर फिरोजशहा मेथा हे मुख्यतः 'सर' नसून 'नामदार' नसून, ' डॉक्टर ' नसून, ' बॅरिस्टर ' नसून, **केवळ हिंदुस्थानचे कार्य-कारीच** होते. सर फिरोजशहांच्या मृत्युमुळें आज सर्व हिंदुस्थान जो विव्हल झालेला आहे, ह्याचें कारण एक उत्तम बॅरिस्टर हिंदुस्थानांतून गमावला म्हणून नव्हे, अथवा ते ' सर ', ' नामदार ' अथवा ' बॅरिस्टर ' होते म्हणूनहि नाहीं.

हिंदुस्थान काय अथवा दुसरा कोणताहि देश काय, तो जो एखाद्या मृत पुरुषासंबंधें विलाप करितो तो आपल्यांतील एखादा ' बॅरिस्टर ' अथवा ' डॉक्टर ' गमावला म्हणून नव्हे, तर आपल्याकरितां तळमळणारा एक पुरुष नाहींसा झाला म्हणून होय. एखाद्या गाडींत उत्तम गाद्या, सुंदर ' उशा, ' छानदार ' टेंकण्या ' असल्यामुळें गाडीला शोभा येते हें खरें पण **गाडीचा कणा** मोडला म्हणजे ती गाडी जशी दुःखानें मटकन् बसते, तशी एखादी ' टेंकणी ' हरवली अथवा एखादी गादी हरवली म्हणजे बसत नाहीं. सर फिरोजशहा मेथांसारखे लोक म्हणजे हिंदुस्थानविषयक सार्वजनिक गाड्याचा कणाच होत. ते पुरुष गेले म्हणजे हिंदुस्थानचें ' गाडें ' खरोखरच अडावयाचें. डॉक्टर, सर, किंवा नामदार आम्हांस नको आहेत असें नाहीं. ते जितके होतील तितके आम्हांस पाहिजेच आहेत व आमची तर अशी इच्छा आहे कीं, असे विशिष्ट पुरुष हिंदुस्थानांत इतके उत्पन्न व्हावे कीं एखाद्याला युनिव्हर्सिटीनें एल्. एल्. डी. ची पदवी दिली किंवा एखादा मनुष्य कौन्सिलांत निवडून आला म्हणजे तो रोजचाच क्रम आहे असें सर्व लोकांना वाटावें. हिंदुस्थानची राज्यव्यवस्था दिवसेंदिवस जास्त जनताभिमुख होऊन राजा आणि प्रजा यांच्या कल्याणाची अधिकाधिक अभिवृद्धी होत जावी ही जी आमच्या मनांतील उत्कट आशा, तिला पूर्ण साफल्य येण्यास अशा विशिष्ट व्यक्तींची संख्या अपरिमित वाढणें अवश्यच आहे. म्हणूनच आम्हीं जें सर फिरोजशहा मेथा ह्यांचें सामोद स्मरण करितों ह्याचें कारण ते ' डॉक्टर ' ' सर ' अथवा ' नामदार ' होते म्हणून नव्हे, तर ह्या सर्व गोष्टी त्यांना करतलामलकवत् असून हिंदुस्थानच्याच हिताकडे चोवीस तास ध्यान ठेवणाऱ्या अत्यंत विरल व्यक्तींपैकीं ते एक होते म्हणून होय. सर फिरोजशहा मेथांना हिंदुस्थानांतील जनता जी ओळखीत होती ती ते कोर्टांत केसेस चांगल्या चालवीत असत म्हणून नव्हे, कारण सर मेथांच्या अनेक व्यक्तिगुणांपैकींच हा एक संस्मरणीय गुण होता, पण देशांतील लोकसमुदाय दर घटकेला जास्त जास्त सुखी व्हावा एतदर्थ ते प्रयत्न करणारे होते ह्या कारणांमुळेंच ती त्यास ओळखत होती. हिंदुस्थानचें कल्याण हेंच ध्येय असें सर्वात्मभावनेनें मानणाऱ्यांची संख्या मोजण्याकरितां अखिल हिंदुस्थानांत जर बोटें घातलीं तर त्यांपैकीं एक अंगुली सर फिरोजशहांच्या पुण्यनामापुढें खात्रीनें विनीत झाली असती. सर फिरोजशहांच्या इतर गुणांतील देदिप्यमान प्रकाशाला भुलून त्यांचा मुख्य गुण जर आपण ओळखा-

ग्रंथ संग्रहालय ठाणे

वयास विसरलों तर सर फिरोजशहा आपल्यांत साठ सत्तर वर्षे वावरून आपण त्यांची कांहींच पारख केली नाहीं असें म्हणावें लागेल. सर फेरोजशहांचे सर्वच गुण लोकोत्तर होते ह्यांत संशय नाहीं. त्यांची विद्वत्ता, त्यांचें वक्तृत्व, त्यांचा दृढनिश्चयीपणा, त्यांची तेजस्विता हे सर्वच गुण सामान्य लोकांपेक्षां फारच उच्च दर्जाचे होते. त्यांच्या एकेका गुणाकडे पाहिलें म्हणजे खरोखर मनाला मोह पडून तेथून नेत्र हालवूं नयेत असें वाटेल. पण राजदर्शनाला गेलें म्हणजे ज्याप्रमाणें देवडीवर असलेल्या चोपदारापासून तों थेट सिंहासनाच्या छतापर्यंत जरी प्रत्येक गोष्ट चमत्कारजनक वाटत असली तरी भूपालाचें दर्शन घेणें विसरतां उपयोगी नाहीं, त्याचप्रमाणें सर फिरोजशहा मेथांचे अंगांत एकापेक्षां एक जबरे गुण जरी वास करीत असले, तरी त्यांचा सर्वोत्तम व सर्व हिंदुस्थानाला उपयुक्त आणि अभिनंदनीय गुण म्हणजे सर फिरोजशहा मेथांची देशप्रीति हाच होय हें नेहमीं लक्षांत ठेवलें पाहिजे.

मोठ्या लोकांच्या चरित्रांत जी गोष्ट अत्यंत कठीण असते व जी पदोपदीं नडते ती हीच कीं त्यांचे अंगांत एकमेकांशीं स्पर्धा करणारे असंख्य गुण असतात आणि त्यांपैकीं एखाद्यानेंच आपली दृष्टी जर अगोदर वेधली तर तिकडेच आपण वाहवत जाऊन ज्या गुणांमुळें त्यास समाजांत अग्रस्थान प्राप्त होतें, तो आपल्या अवलोकनांतून अजिवात वगळतो. सर फेरोजशहा मेथा हे कारपोरेशनचे एकनिष्ठ सेवक होते, युनिव्हर्सिटीचे आधारस्तंभ होते, हे कौन्सिलांत अत्युत्तम विवादक होते, हे काँग्रेसचे अध्वर्यु होते, अथवा सर फेरोजशहा मेथा हे नेमस्त पक्षाच्या शीर्षफुलांतील पृथ्वीमोल लोलक होते, असे सर फेरोजशहांचे एकदम सर्व गुण आमच्यापुढें प्रकट झाले म्हणजे आपण चकित होऊन जाणें अगदीं साहजिक आहे, परंतु शंकराच्या दरबारांत शृंगी, भृंगी, नारद–तुंबर, गजानन–षडानन वगैरे सर्व जरी दिसत असले, तरी ज्याप्रमाणें मुमुक्षु फक्त शंकराच्याच चरणयुग्मावर आपला लय लावून घेतो, त्याचप्रमाणें सर फेरोजशहा मेथांच्या गुणांच्या गर्दीतून त्यांच्या देशभक्तीच्याच भालप्रदेशावर आपण नेमकें स्तुति–कुंकुम लावावयास कधींहि चुकतां उपयोगी नाहीं. संक्षिप्त भाषेंत वाचकांना पुन्हां सांगावयाचें म्हणजे इतकेंच कीं, सर फेरोजशहा म्युनिसिपालिटीचे व्हाइस चान्सेलर होते अथवा कांग्रेसचे सूत्रधार होते, ह्या किंवा अशाच गोष्टींत आपण त्यांचा मोठेपणा पाहतां उपयोगी नाहीं. ह्या गोष्टींत त्यांचा मोठेपणा आहेच व ह्या गोष्टी जो करील तो मोठा होईलच, पण ह्या गोष्टींतच त्यांचा मोठेपणा समाविष्ट न होतां, वरीलपैकीं ते एकहि नसते तरी त्यांचा

मोठेपणा ज्या एका गोष्टीमुळें त्रिकालाबाधित कायमच राहिला असता, तरी मुख्य गोष्ट–ती सर फेरोजशहाची खरी देशप्रीति—आपण कधींच डोळ्यांआड होऊं देतां उपयोगी नाहीं. आम्हीं आपल्या सन्मानमंदिरांत सर फेरोजशहांच्या संस्मरणास जें अग्रस्थान देतों ह्याचें कारण त्यांचें चरित्र स्वदेशभक्तीच्या पावन कथेनें भरलेलें आहे म्हणूनच होय. ज्याप्रमाणें एखादी नवलकथा कोठेंहि घडली, तरी त्यांतील प्रत्येक पृष्ठ अद्‌भुत प्रकारांनीं रम्य झालेलें असतें त्याप्रमाणें सर फेरोजशहा मेथांच्या चरित्रांतील प्रत्येक पृष्ठ स्वदेशभक्तीनें रंगलें गेलेलें आहे.

सर फेरोजशहांची वेळ आणि आपला हल्लींचा काळ ह्यांत जमीनअस्मानाचा फरक आहे. सर फेरोजशहा मेथा हे नवीन मन्वंतरांतील आद्य पुरुषांपैकींच एक पुरुष होते. सर फेरोजशहा मेथांच्या वेळीं हिंदुस्थान देश नुकताच आपली पहिली कात टाकून देऊन नवीन संस्कृतीचें ‘ पांघरूण ’ घेण्याच्या तजविजीमध्यें होता. पूर्वीच्या, पेशवाई अथवा मुसलमानी अमदानीच्या अमलांत स्वदेशाची सेवा करण्याचे मार्ग त्या वेळेच्या परिस्थितीप्रमाणें निश्चित होते, परंतु सर फेरोजशहांच्या वेळीं नवीन अमदानी नुकतीच परंतु दृढ पायावर सुरू झाल्यामुळें ह्या अमदानींतील स्वदेशसेवेचे मार्ग निश्चित व्हावयाचे राहिलेलेच होते. सर फेरोजशहा मेथांच्या वेळेस कुटुंबकल्याणाचें घरासभोंवारचें रम्य उपवन सोडून सार्वजनिक हितवृद्धीच्या पुष्पवाटिकेंतील कमळें तोडण्याकरितां स्वार्थपरित्यागाचा लांबच लांब रस्ता तुडविण्यास सिद्ध झालेले श्री.दादाभाइ नवरोजी हे एकटेच होते. दादाभाई नवरोजींचा हा कंटाळवाणा मार्ग सोडून इतर माणसांप्रमाणें घराभोंवतालच्याच बागेंतले नारळ फोडीत बसणें सर फिरोजशहा मेथा ह्यांना अशक्य नव्हतें. सर फेरोजशहा मेथांनीं त्याप्रमाणें केलें असतें तर त्यांना कोणीं नांवेंहि ठेवलीं नसतीं. कारण प्रत्येकजण तसेंच करीत होता. लोकहिताच्या सरोवरांतील कलमें किती सुगंधित असतात ह्याचीहि कोणास कल्पना नव्हती. ज्याप्रमाणें कोंकणांतील कांहीं मनुष्यें आपलें आवार व आपल्या आवारांतील नारळींचें झाड ह्यांच्यावरच तुष्ट राहून देशांत येण्याचें कधींहि नांव काढीत नाहींत, त्याप्रमाणें आपलें “ प्रॅक्टिस ” व आपला संसार ह्यांतच गर्क होऊन सर फेरोजशहा मेथा “देशा”ला विसरले असते तरी त्यांना त्याबद्दल कोणी दोष दिला नसता. पण सदर फेरोजशहा मेथा, ह्यांनीं हा सोईचा पण क्षुद्र मार्ग न स्वीकारतां आपल्या कुटुंबसौख्यालाच देश करण्याचे ऐवजीं देशाच्या संसारालाच खाजगी संसार केला, हेंच सर फेरोजशहा मेथांच्या उदात्त जीविताचें सार होय. सर फेरोजशहांच्या ह्या सर्व-

संकलित उच्च राष्ट्रगुणांमुळें फेरोजशहांची चेम्बर म्हणजे राष्ट्रीय विचारांच्या चर्चेचें कॅबिनेटच बनून गेलेली होती. मेथांच्या मृत्यूमुळें मुंबईतील हें राष्ट्रीय कॅबिनेट आतां मोडून गेलेलें आहे. आतां मुंबईचा छत्रभंग झालेला आहे. आतां मुंबई-सुंदरीनें सदर फेरोजशहाचें संस्मरण करून कितीहि अश्रु-मौक्तिकें खर्च केलीं, तथापि तें भाग्य, तें महत्त्व, तें "स्थानिक स्वराज्य" आतां तिला कोठून प्राप्त होणार?

सरा फेरोजशहांच्या चेम्बरला आम्हीं मुंबईचें स्थानिक स्वराज्य समजतों. ह्यावरून फेरोजशहांच्या शोकामुळें व्याग्रचित्त होऊन आम्ही ही अतिशयोक्ति करतों असें कोणास वाटेल, परंतु असें नाहीं. 'He was a prince amongst men' तो सरदार होता, असें जर कोणत्याहि व्यक्तीसंबंधानें यथार्थतः म्हणणें शक्य असेल तर ते सर फिरोजशहा मेथा ह्यांच्या संबंधानें होतें. फेरोजशहा मेथा हे जात्याच "लोकांचे पुढारी" उत्पन्न झालेले होते. दुसऱ्यांवर वजन बसविणें हें त्यांना जणुं बाळकडूच होतें. दुसऱ्यांवर त्यांची तावडतोब छाप बसत असे, व त्याकरितां त्यांना कोणतेहि कृत्रिम प्रयत्न करावे लागत नसत. दुसऱ्यावर आपली हुकमत चालवून, सर्व ग्रहमंडळ ज्याप्रमाणें सूर्याच्या भोंवतीं फिरत असतें त्याप्रमाणें सर्व अनुयायांना आपल्या भोंवतीं फिरावयास लावण्याची कला सर फिरोजशहा मेथा ह्यांस इतक्या उत्तम रीतीनें साधलेली होती कीं, लोकांना त्याबद्दल कांहीं आश्चर्य वाटत नसे, एवढेंच नव्हे तर तो त्यांचा जन्मसिद्ध हक्कच आहे असें प्रत्येकास वाटत असे. सर फिरोजशहा मेथा यांच्या पुढारीपणाच्या कक्षेखालीं जो एकदां आला तो त्यांतून कधीं सुटत नसे, फार काय, तो त्यांत संतुष्टपणानें रहात असे. राष्ट्रीय पक्ष व नेमस्त पक्ष हे पक्षभेद अलीकडे सात आठ वर्षांतच उत्पन्न झालेले आहेत. त्यापूर्वी ते नव्हते आणि त्यावेळीं सर्व राष्ट्र सर फिरोजशहांचें पुढारीपण कबूल करण्यास इतक्या आनंदानें तयार असे कीं, त्यांत जुलमाच्या रामरामाचा गन्धहि नव्हता. सर फिरोजशहांचे कांहीं अनुयायी तर त्यांना देवाप्रमाणें भजत असत व त्यांच्याविरुद्ध एक शब्दहि कोणी बोलला तर त्यांना स्वतःचा अपमान केल्यापेक्षांहि जास्त चीड येत असे. सर फिरोजशहा मेथा ह्यांच्या इतका नैसर्गिकपणानें बनलेला पुढारी कोणत्याहि राष्ट्रांत क्वचित्च असतो आणि म्हणूनच "अनभिषिक्त नृपति" अथवा 'सिंह' हें अभिधान सर फिरोजशहांना जितकें शोभिवंत दिसे तितकें तें दुसऱ्या कोणासहि त्यांच्या भरभराटीच्या काळीं शोभलें नाहीं.

आपल्या नैसर्गिक गुणांनीं ज्याप्रमाणें सर फिरोजशहा मेथा राष्ट्राचे पुढारी

होण्यास योग्य होते त्याचप्रमाणें त्यांचें खाजगी वर्तनहि तसेंच होतें. त्यांची वृत्ति प्रेमळ होती, त्यांचा स्वभाव मोकळा होता, ते वर्तनानें दिलदार होते व अन्तःकरणानें दयाळु होते, तथापि, त्यांच्यापुढें जावयाचें अथवा त्यांच्याशीं बोलावयाचें म्हणजे कोणाचीहि एकदम छाती होत नसे. सर फिरोजशहांपुढें मोठमोठ्या हंबीररावांचीहि तिरपीट उडालेली आम्हांस माहित आहे. त्यांच्यापुढें कोणाचीहि मात्रा कधीं चालली नाहीं; पण ह्यांस कारण त्यांचा कर्कशपणा अथवा उर्मट वृत्ति नव्हे, हें नेहमीं लक्षांत ठेवलें पाहिजे. खाजगी वर्तनांत सर फिरोजशहासारखे मृदु अन्तःकरणाचे कोणीहि नव्हते, परंतु त्यांच्या नैसर्गिक पुढारीपणाचें प्रतिबिंबच त्यांच्या चेहऱ्यावर इतकें झळकत असे कीं, त्यांचेपुढें तोंड चालविण्याची सहसा कोणास छातीच होत नसे. खुद्द त्यांची मुद्राच एक प्रकारानें अशी हवेलंडी उडविण्यासारखी रुबाबदार होती कीं, त्यांनीं एकदां मनुष्याकडे निरखून पाहिलें कीं, आपल्यापुढें फक्त वर्णनात्मकच सिंह नसून खरोखरच सिंह आहे कीं काय, अशी भीतीनें तिऱ्हाइताची गाळण उडे. त्याचा तो उग्र चेहरा, त्यांचे ते भीतिप्रद कल्ले, त्यांचा तो भरपूर आवाज, हें पाहिलें म्हणजे मनुष्याचा जीव अर्धा उडून जाई व अर्धामुर्धा तो शिल्लक राहिलाच, तर भाषणानें गार होऊन जात असे.

लोकांचा पुढारी होण्याच्या दोन तऱ्हा आहेत. पहिली, त्यांच्यांत मिळून मिसळून त्यांच्यांत एकहृदय होऊन व त्यांचें प्रेम संपादन करून. दुसरी, त्यांच्यावर वजन बसवून, त्यांना कह्यांत ठेवून व त्यांच्यावर भीतिचें दडपण पाडून. सर फिरोजशहा मेथा हे दुसऱ्या पक्षापैकीं पुढारी होते. त्यांच्या पुढारीपणाच्या कक्षेंत जो कोणी सांपडे तो कधींहि निसटून जात नसे, हें वर सांगितलेंच आहे. तथापि, त्यांच्यावर प्रेम जडण्यास त्यांच्याशीं बराच निकट संबंध यावा लागत असे. जनतेस त्यांची जी माहिती होती ती त्यांच्या प्रेमापेक्षां त्यांच्यावर बसणाऱ्या अथवा बसलेल्या विलक्षण वजनामुळेंच होती. जो एक प्रकारचा भीतिमूलक सन्मान ज्ञानी पुरुष, राजा अथवा पराक्रमी वीर ह्यांचेसंबंधानें जनतेस वाटत असतो, तशाच प्रकारचा भीतियुक्त सन्मान लोकांना सर फिरोजशहा मेथांसंबंधानें वाटत असे. सर फिरोजशहांना लोकसमूहाविषयीं फारशी आवड नसून त्यांच्यांत मिसळणें त्यांच्या प्रकृतीलाच कधीं आवडत नसे. ज्या प्रकारचीं श्रेष्ठतेची कल्पना सरदार घराण्यांतील लोकांना उपजतच असते, तशाच प्रकारें आपण कोणीतरी श्रेष्ठ आहोंत आणि सर्व जनता आपल्यापेक्षां कनिष्ठ आहे, आपण दरबारी आहोंत आणि

जनता चावडीवरील आहे, आपण अश्वारूढ आहोंत व जनता पादाचारी आहे, असें सर फिरोजशहा मेथा यांना वाटत असे. जनतेचें कल्याण करावयाचें, त्यांची जास्त जास्त उन्नति होईल अशी खटपट करावयाची, पण त्यांना आपल्या पदवीला पाय लावूं देतां उपयोगी नाहीं, अशी एका प्रकारें सर फिरोजशहा ह्यांची वागण्याची तऱ्हा होती. ज्याप्रमाणें वर्गांवरील शिक्षक, मुलांस जास्त सज्ञान करण्याचा एक-सारखा प्रयत्न करीत असतो, परंतु ज्याप्रमाणें त्यांना कधीं आंगसरवटी येऊं देत नाहीं, त्याचप्रमाणें सर फिरोजशहा मेथा हे जनतेपासून दूर राहून त्यांच्या कल्याणाकरितां खटपट करण्यांत आनंद मानीत असत. जनतेपासून दूर राहिल्या-कारणानें जनतेच्या अंतःकरणाचे धागे सर फिरोजशहांचे अंतःकरणांत कधींहि गुंफले गेले नाहींत. अंतःकरणांत अंतःकरण गुंफून गेल्यामुळें एका हृदयाला आचका बसल्याबरोबर दुसरें हृदय व्याकुळ व्हावयाचें हा तो आश्चर्यकारक चमत्कार, कांहीं कांहीं थोर व्यक्तींच्या चरित्रग्रंथांत सांपडतो, तशा प्रकारच्या चमत्कारानें सर फिरोजशहांचें चरित्र जास्त चमत्कृतिजन्य झालें नाहीं. शेतकऱ्यांजवळ बसावयाचें, मजुराला पाटी उचलावयास लावावयाचें; गांवच्या शाळामास्तरास आपल्याच सतरंजीवर जागा द्यायची, गरीब कारकुनानें साधी दशमी आणून दिली तरी खावयाची, प्रेमळ मंडळी भेटली कीं त्यांच्याबरोबर एखादा आट्या-पाट्याचा डावही खेळावयाचा, मळकट सदरा कोणी घालून बसला तरी खंत वाळगावयाची नाहीं; आणि इतकेंहि करून, विद्वत्ता, ज्ञान, निश्चय, खटपट, निर्भयता, इत्यादि सर्व गुणांनीं राष्ट्रांतील सर्वांपेक्षां दहा अंगळें जास्त श्रेष्ठत्व संपादन करावयाचें हा जो राष्ट्रसेवेचा एक उत्कृष्ट मार्ग आहे तो मार्ग पत्करण्याइतकी नैसर्गिक तयारीच सर फेरोजशहांचे अंगीं नव्हती. खटपट्यांत खटपटी, व्हॉलंटियरांत व्हॉलंटियर, संवगड्यांत संवगडी, गरीबांत गरीब, साध्यांत साधा, आणि तरीही शहाण्यांत शहाणा, विद्वानांत विद्वान, श्रीमंतांत श्रीमंत, मुकुटमण्यांत मुकुटमणि हा जो लोकांचें मन आपल्याकडे ओढून घेऊन लोक-कल्याण करण्याचा एक अत्युत्कृष्ट संप्रदाय आहे, तो सर फेरोजशहा मेथा यांना कधींहि साधला नाहीं. ह्या संप्रदायांत व्यक्तिविषयक छानछोक बाजूस ठेवावी लागते. चिखलांत पाय भरावे लागतात. गाडीघोड्याशिवाय चालण्याचा प्रसंग येतो. वाळूंत अथवा जमिनीवर बसण्याला तयार व्हावें लागतें, पण ह्यामुळें जनतेस ती व्यक्ति म्हणजे आपल्या कुडींतील जीवच आहे असें वाटावयास लागून तिच्याविषयीं विल-

क्षण ऐक्यभाव तिच्या पोटांत उत्पन्न होतो. आम्हीं मागील एका लेखांत सांगितल्याप्रमाणें गवळ्यांच्या पोरांबरोबर गोरस खावयास जाऊन इकडे मथुरेच्या गादीवर शहाणपणानें राज्य करणारा श्रीकृष्ण हा लोकांतील लोकमान्यतेचा आद्यप्रवर्तक होय व श्रीकृष्णाच्या वेळेपासून आजपर्यंत जरी इतिहासाचे अनेक लोंढे कालाच्या महानदींत येऊन गेलेले आहेत, तथापि हा मार्ग साधलेल्या व्यक्ति जगांत फारच थोड्या झाल्या आहेत ह्यांत संशय नाहीं.

सर फेरोजशहा मेथांचा पुढारीपणाचा मार्ग ह्याहून भिन्न असल्याकारणानें सुरतेच्या बखेड्यांत त्यांचेपासून पलिकडे सरलेल्या लोकमताच्या प्रवाहांत त्यांना पुन्हां आपल्या राजकारणाकडे खेंचून आणतां आलें नाहीं. सर फेरोजशहा मेथांचा पुढारीपणा इ. स. १९०७ पासून सामान्यतः संपलाच असें म्हणावयास हरकत नाहीं. ह्यापुढें, ज्याप्रमाणें एखादा भव्य खडक आपल्यासमोर अफाट पसरलेल्या महासागराला तुच्छ मानून त्याच्याकडे टवकारून बघत एके बाजूस मानीपणानें बसलेला असतो त्याप्रमाणें स्वतःच्याच मानीपणांत, पण कोणापुढेंहि न बसतां सर फेरोशहांनीं आपल्या आयुष्याचा उत्तरभाग घालविला. ज्या पुरुषास जन्मभर पुढारीपणा करण्याची संवय, त्याचा अनुयायी वर्ग एकदम तुटल्याकारणानें त्याच्या मनास थोडासा त्रास वाटून त्याचा मानीपणा उत्कट स्थितीस पोंचावा हें अगदीं साहजिक आहे. १९०८ सालच्या कॉंग्रेसचे अगोदर बंगाली लोकांसंबंधानें जे कठोर उद्गार सर फिरोजशहांच्या मुखांतून निघाले व इ. स. १९०९ सालच्या लाहोरच्या कॉंग्रेसचे अध्यक्षत्व प्रथम मान्य केलेलें असूनहि कॉंग्रेसच्या बैठकीचे ऐन वेळेस त्यांनीं जो एकदम नकार कळविला तो ह्या उत्कटपणाचाच परिणाम होता. तथापि फिरोजशहा मेथांवर त्यामुळें जनता कधींहि रागावली नाहीं. आपल्या भोंवतालचे लोखंडी गज कडकडून चावणाऱ्या सिंहाविषयीं ज्याप्रमाणें कोणाला क्रोध येत नाहीं, उलट त्याचेविषयीं जास्त आदरच वाटतो, त्याप्रमाणें लोकसमाज व सर फिरोजशहा ह्यांच्या दरम्यान पडलेल्या तुटकपणाचें जाळें पाहून सर फिरोजशहांना भोंवणाऱ्या संतापयुक्त निराशेमुळें लोकसमाजाचें अंतःकरणांत त्यांचेविषयीं जास्त आदरबुद्धीच उत्पन्न झाली. ह्या आदरबुद्धींत जास्त भर पडण्यास हें कारण झालें कीं, आपल्या हातून लोकसमाज निसटला ही पक्की जाणीव मनांत बाळगून त्यास पुन्हां कबजांत आणण्याचें कृत्रिम प्रयत्न करणें किंवा त्यास शरण जाणें ह्यांपैकीं कोणतीहि मानहानीची गोष्ट करावयास उद्युक्त न होतां, आत्मविश्वास, आत्मतृप्ति व स्वाभि-

-मान ह्यांतच त्यांनीं आपला कालक्षेप केला. सर फिरोजशहा मेथा ह्यांचेविषयीं ते मृत्युवश होईपर्यंत जी एक प्रकारची असामान्य आदरबुद्धि जनतेच्या मनांत कायम राहिली ती ह्याच त्यांच्या उदार स्वभावामुळें होय. हा स्वाभिमानी सिंह हा राष्ट्राचा नैसर्गिक पुढारी, हा देशाचा एकनिष्ठ हितचिंतक, हा मुंबईचा नायक, आपलें अनेक वर्षांचें तप पुरें करून आज ईश्वराचे दरबारीं विश्रांति घेण्याकरितां गेला आहे. हिंदुस्थानांतील लोकांनों, त्याच्यासारखा दुसरा एखादा पुतळा असेल तर दाखवा व त्याचें पुण्ययश, त्याचे पुण्यकार्य, त्याचें पुण्यहेतु व त्याचें पुण्यनाम तुम्हीं कधींतरी विसराल काय, हें सांगा.

---

# तात्या फडके वारले !

पंचाऽऽजोबा आणि त्यांचा तो तिखट, बिकट आणि मार्मिक विनोद महाराष्ट्र-वाचक इतक्यांत कधींही विसरणार नाहींत; "गोट्याच्या गोष्टी", "महा-राजांचा दरबार" आणि "विक्षिप्त बजरबट्टू" ह्यांच्या त्या अक्षरपरिचित अज्ञानी लोकांसमुद्धां वाचनाची अभिरुची लावून प्रचलित विषयाशीं त्यांचा परिचय करून देणाऱ्या विनोदाचा विसर महाराष्ट्र वाचकांस लवकरच पडणें अशक्य आहे. महाराष्ट्रांतील विनोदी लेखन व हास्यचित्रें हीं प्रचलित व सार्वत्रिक करण्याच्या कामीं प्रथमच पुढें येऊन बरींच वर्षे स्थिर झालेल्या हिंदुपंचांचें स्मरण महाराष्ट्र वाचकांतील चालू पिढीला तरी कायम राहीलच. हिंदुपंचानें विनोदी लेखनकला व हास्यचित्रें यांचा अगदींच पहिल्यानें उपक्रम केला नाहीं; परंतु अशा रितीनें स्थिर व परिणामकारक प्रयत्न करण्यांत हिंदुपंच प्रमुख होता. तो केवळ प्रमुखच होता इतकेंच नव्हे तर त्याचें हें प्रामुख्य शेवटपर्यंत त्याच्याकडे कायम राहिलें आणि हें प्रामुख्यच हिंदुपंचाकडे कायम राहिले असें नसून त्याला नांव घेण्यासारखें प्रतिस्पर्धी पत्र महाराष्ट्रांत चालू झालें नाहीं व टिकलें नाहीं. अशा त्या पंचाचे फडके उर्फ त्या हिंदुपंचाचे संपादक फडके, ठाण्याच्या त्या एकवेळ अलौकिक गणल्या गेलेल्या पत्राचे संपादक श्री. कृष्णाजी

काशिनाथ फडके हे परवां एकाएकीं परलोकवासी झाले. रविवारच्या विदुषकाच्या अंकांतील मजकूर त्यांनीं स्वतः लिहिला; व विदुषकाच्या अकराव्या तारखेच्या चवदाव्या अंकाची तयारी करून ते पुण्याला गेले. पुण्याला जाऊन ते केसरी ऑफिसमध्यें गेले. तेथें त्यांस लोकमान्यांची भेट घ्यावयाची होती. परंतु त्यावेळीं लोकमान्यांची भेट झाली नाहीं. म्हणून ते " लोकमान्य झोंपेंतून उठल्यावर पुन्हां येईन भेटायला " म्हणून गायकवाडांच्या वाड्यांतून निघाले. निघतांना त्यांच्या मनांत असेच विचार चालले असावेत कीं कांहीं वेळ इकडे तिकडे जाऊन इतर कांहीं कामें उरकावींत आणि मग योग्य वेळीं परत फिरून लोकमान्यांची भेट घ्यावी. अशाच विचारांत ते बहुधा गायकवाडांच्या वाड्यांतून बाहेर पडले असतील, परंतु तेथून कांहीं मिनिटांच्या आंत, पुन्हां येणार कोठून आणि भेटणार कोठून, अशा परलोकींच ते एकाएकीं निघून गेले !

तात्या फडक्यांचा हिंदुपंच हा तात्या फडक्यांच्या आधीं नष्ट झाला असला तरी तात्या फडक्यांच्या मागें कित्येक वर्षे तो तात्या फडक्यांचें स्मरण महाराष्ट्र वाचकांस दिल्यावांचून रहाणार नाहीं ! हिंदुपंचाच्या सुरवातीचा व भरभराटीचा काळ हा हिंदी किंवा महाराष्ट्रीय सार्वजनिक आयुष्यांतील मध्यकाळ होता. त्यावेळीं अनेक नवनव्या कल्पनांचा, मतांचा व चळवळींचा उपक्रम होऊन गेलेला होता, फक्त त्या सध्यांइतक्या स्थिर झालेल्या नव्हत्या. त्यानंतरचा काळ फारच झपाट्यानें बदलत गेला आणि त्याबरोबरच एकंदर महाराष्ट्राची वाचनाभिरुचीहि पुष्कळच बदलली. तरी पण इतकें मात्र खरें कीं, त्यावेळचा तो हिंदुपंचाचा प्रसार, दरारा, वाचकवर्गांमधील त्याचा सुस्वभाव व प्रेम, हीं सर्व कांहीं कोणाही लेखकास अभिमानास्पद व स्पृहणीय होतीं यांत शंका नाहीं. सुशिक्षितांस हिंदूपंच वाचावासा वाटे, हिंदुपंचांतील हास्यचित्रें सुशिक्षितांसही पहावीशीं वाटत व अशिक्षितांस तर तें एक अत्युत्कृष्ट शिक्षणच होत असे व आवडत असे. त्यावेळच्या नवीन राजकीय चळवळीला हिंदुपंचाच्या अशा या दुधारी लोकप्रियतेमुळें फारच उपयोग झाला व लोकजागृतीचें पुष्कळसें श्रेय त्यांस मिळालें ! त्यावेळचीं तीं पंचांचीं हास्यचित्रें अद्यापही कित्येकांस हांसवीत असतील. हास्यविनोदांत तर ते वाकबगार होतेच, परंतु त्यांचीं हास्यचित्रें त्यांस त्यांच्या हास्यलेखांपेक्षांही अधिक भूषणास्पद असत. त्यांनीं हास्यचित्रांना केवळ इंग्रजी वळणावर न नेतां त्यांना स्वतंत्र वळण लाविलें. पंचाच्या चित्रांतील कल्पना ' विक्षिप्त ' असत परंतु त्याबरोबर चित्रांची रूपरेषाही

सर्वस्वी विचित्र काढण्याची पाश्चात्य पद्धती त्यांनीं न स्वीकारतां विक्षिप्त कल्पना च वस्तुस्थितीदर्शक चित्रें ह्यांचा उत्कृष्ट मिलाफ त्यांनीं घातला होता. त्यांच्या ह्या हास्यचित्रांतील कल्पकतेची ओळख त्यांच्या नुक्त्याच निघालेल्या विदूषकांतील चित्रेंसुद्धां चांगल्या रीतीनें पटविल्यावांचून रहाणार नाहींत.

फडक्यांचा हास्यविनोद अगदीं सरळ आणि अगदीं सामान्य अशा पद्धतीचा असे. आणि म्हणूनच तो अगदीं सामान्य लोकांतही लोकप्रिय होऊं शकत होता. त्याप्रमाणें तो अगदीं तिखटही असे. ते एकेकावर, एकेका मतावर, एकेका बाजूवर तुटून पडले, म्हणजे क्षमा, दया, माया वगैरेचें नांव नसे. ह्यामुळें त्यांचा विनोद मार्मिक असूनही चांगलाच बोंचल्यावांचून रहात नसे. वंगभंगाच्या वेळीं नेमरत पक्ष, ना. गोखले वगैरे जेव्हां त्यांच्या ह्या विनोदाच्या झपाट्यांत सांपडले तेव्हां त्यांसही हा झणझणीत विनोद सहन करण्याइतकें दिलदार सौजन्य दाखविणें कठीण पडलें आणि अखेर ना. गोखल्यांच्या फिर्यादीनें पंच जो बुडाला तो कायमचाच बुडाला. त्यानंतर तात्या फडके राहिले व त्यांचा लेखनव्यवसायहि मधूनमधून चालू राहिलाच. परंतु हिंदुपंच मात्र बुडालाच आणि त्याबरोबर तात्यांच्या लेखनकुशलतेचा व हास्य-चित्रलेखनाचा बहर कमी होऊं लागला. हिंदुपंचाचे अखेर अखेरचे दिवस हा त्यांचा लेखनव्यवसायांतील बहारीचा काळ होता. हिंदुपंच बुडाला आणि त्याबरो-बरच तात्यांच्या आयुष्यांतील बहारही गेली. हिंदुपंचाबरोबरच भरभराटलेली त्यांची स्थिती हिंदुपंचाबरोबरच खालावली आणि त्यांस पुढील दिवस त्रासांत, कष्टांत, व हालांत काढावे लागले. प्रथम प्रथम तर त्यांस फारच क्लेशांत दिवस काढावे लागले आणि ह्या क्लेशांत त्यांस त्यांच्या सहधर्मचारिणी तेवढ्याच सह-विभागी होत्या. त्या खरोखरच सहधर्मचारिणी होत्या. सहधर्मचारिणी हें नांव त्यांच्या बाबतींत सर्वस्वीं सार्थ होतें. आणि ही सहविभागिनी त्यांस पुढील कष्टद काळांत जवळजवळ अखेरपर्यंत दुःखांत सुख देत होती. ह्या आपत्तिमय काळांतही त्यांच्या लेखणीला स्वस्थ बसणें आवडत नव्हतें. त्यांचे प्रयत्न सारखे सुरूच होते. आणि पुढें कांहीं काळानें सुरूं झालेल्या विनोद पत्रांतून ते पुन्हां पुन्हां महाराष्ट्र वर्तमानपत्रीय वाङ्मयांत चमकूं लागले. परंतु विनोदाचा सहवास त्यांस फार दिवस लाभला नाहीं. तथापि तात्यांचे प्रयत्न दांडगे. त्यांनी आपत्तींशीं झगडतां झगडतां आपल्या लेखणीला कायमचा विसांवा देण्याची कल्पना कधींच स्वीकारली नाहीं.

विनोदांतून निघून त्यांची लेखणी “ विक्षिप्त ” पत्रांत चमकूं लागली. परंतु दुर्दैव हात धुवून मागें लागलेल्या तात्यांस विक्षिप्तामधून सुद्धां महाराष्ट्रवाचकांची सेवा फार दिवस करतां आली नाहीं. त्यानंतर मधूनमधून कोठेंतरी कशीतरी त्यांची लेखन-कुशलता व चित्रकल्पना महाराष्ट्रवाचकांपुढें मध्येंच येई, परंतु त्याला स्थिर व स्वतंत्र अवसर मात्र मिळाला नव्हता. परंतु ह्यावेळींही त्यांनीं बरेच दिवसपर्यंत कसून मेहनत करून अखेर अगदीं अलिकडे खास आपल्या नावानें व आपल्या नेतृत्वाखालीं बॅ. बॅप्टीस्टांच्या मदतीनें विदुषक साप्ताहिक सुरू केलें व त्याचे चौदा अंक स्वतः लिहून महाराष्ट्र वाचकांपुढें ठेवले. परंतु आतां पंधरावा अंक त्यांच्या लेखणींतून बाहेर पडलेला दिसणार नाहीं ! त्यांच्या कल्पनेंतून नवीं उतरलेलीं चित्रें पहावयाचीं असतील तर सक्षौर प्रायश्चित्त किंवा शुक–रंभा ह्यांच्यावरच तृप्त रहावें लागेल.

तात्यांचीं अखेरचीं वर्षें हालांत व कष्टांत गेलीं तरी अखेर ते आपल्या इच्छे-प्रमाणें ‘ आपलें ’ वर्तमानपत्र सुरू करून आपल्या वैभवांत गेले. त्यांच्या आयुष्यां-तील बहर संपल्यानंतर त्यांच्या आयुष्यांतलि हालअपेष्टांच्यावेळीं जवळजवळ अखेरपर्यंत त्यांची पत्नी हयात होती व त्यांचा दुःखद आयुष्यक्रम थोडातरी सह्य व सुखी करण्यासाठीं झटत होती. परंतु ती कांहीं काळापूर्वी परलोकवासी झाली. तिला त्यांनीं आणखीं अखेरच्या आपत्तींत पडूं दिलें नाहीं आणि आपल्या महाराष्ट्रीय सार्वजनिक आयुष्यक्रमांत चांगल्याच चमकलेल्या लेखणीला अस्तंगत होऊं न देतांच तात्या स्वतःच अस्तंगत झाले.

तात्या फडके ह्यांचा विसर महाराष्ट्र वाचकांस लवकर पडणार नाहीं. त्यांच्या वर्तमानपत्रीं जीवनक्रमांतील कामगिरीचें महत्व दुहेरी आहे. त्यांनीं सचित्र वर्तमान-पत्राला एक स्वतंत्र असें स्थळ आणून देऊन तें त्याच्या अंगवळणी पाडलें आणि ह्या कामीं तात्यांच्या त्या अभिरुचीस धरून कां होईना, परंतु महाराष्ट्रीय वाचकांवर त्यांच्याइतकी आपली छाप पाडणारा त्यांच्याच वळणावर प्रयत्न करणारांत एकही लेखक पुढें आला नाहीं. ह्याप्रमाणें त्यांनीं महाराष्ट्रीय वर्तमानपत्र संस्थेंतील एका अंगांत आपला चांगलाच जम बसविला आणि शिवाय अगदीं सामान्य आणि अशिक्षित वाचकवर्गांतही सार्वजनिक प्रश्नाची आवड उत्पन्न कर-ण्याचें श्रेय मिळविलें.

तात्या फडक्यांची ही कामगिरी बहुमोल नाहीं असें कोण म्हणेल ? तात्या फडक्यांच्या ह्या कामगिरीचें विस्मरण महाराष्ट्राला कसें पडेल ? महाराष्ट्र वाङ्मयांतील हिंदुपंची लेखनपद्धति आणि महाराष्ट्र वर्तमानपत्रीं वाङ्मयावरील हिंदुपंची छाप हेंच तात्या फडक्यांचें महाराष्ट्रांतील कायमचें स्मारक आहे.

# गेल्या ! लक्ष्मीबाई गेल्या ! *

लक्ष्मीबाई जग सोडून गेल्या, लक्ष्मीबाई पुत्रपौत्र सोडून गेल्या ! लक्ष्मीबाई आपला प्रियपति सोडून गेल्या ! लक्ष्मीबाईंना जाऊन फार थोडे दिवस झालेले आहेत, अजून त्या आमच्यांतून गेल्या असें आम्हांला खरेंसुद्धां वाटत नाहीं, पण खरें न वाटून काय उपयोग ? सत्य हें सत्यच ! सत्याइतकें क्रूर कुणी नाहीं ! सत्या-इतकें निर्दय कुणी नाहीं ! त्याच्या रखरखीत निर्दयपणापासून मनुष्यप्राणी तोंडावर हात ठेवून तोंड लपविण्याचा यत्न करतो, त्याचा अतिशय निपट व अतिशय निर्भीड निर्दयपणा न बाधावा म्हणून नाना प्रकारच्या खोट्या कल्पनांचें आवरण आपल्याभोंवतीं उत्पन्न करून सत्याचें सत्यस्वरूप अस्पष्ट करण्याचा मनुष्यप्राणी यत्न करतो. पण छेः, अशा खोट्या प्रयत्नांनीं सत्य कधीं थांबलें आहे काय ? नाहीं. तें सत्य, तें अकाळविकाळ सत्य, तें अत्यंत भेसूर आणि तें अत्यन्त भीषण सत्य, एखाद्या विचकट पिशाच्चानें अंधाऱ्या रात्रीं एखाद्या पडक्या वाड्याच्या खिडकींतून आपले हाडकासारखे पांढरे शुभ्र दांत बाहेर काढावे त्याप्रमाणें खोट्या कल्पनांतून आपलें विचकट दांत बाहेर काढून, ' मी असें इथें आहे, मी असें इथें आहे, मी असें इथें आहे, ' असें भीषण सत्य हें दाखवीत असतें. मी असें इथें आहे ? मी असें इथें आहे ? अरे चांडाळा, जरा दूर हो कीं ! तूं असें तिथें आहेस, हें आम्हांला माहीत आहे पण—पण जरा खैर कर ! जरा खोट्या कल्पनांत गुंडाळला जा ! थोडा खोट्या कल्पनांच्या अंथरुणांत रुतून बस ! थोडासा खोट्या कल्पनांच्या उश्यांत दिसेनासा हो ! आपल्या भीषणतेनें लोकांना भेवडावण्यांत तुला काय मजा वाटते ?

पण नाहीं ! सत्याला ती खोडच ! लोकांना भीतीची धडकी बसवावी ही सत्याला खोडच ! लोकांना गर्भगळीत करावें ही त्याला हौसच ! पण हें निर्दय सत्य आहे

* संदेश ता. ४ फेब्रुवारी सन १९२०

कीं लक्ष्मीबाई आपल्यांतून गेल्या. जगाला, नातवाला, पुत्राला, त्या परमप्रिय पतीला टाकून लक्ष्मीबाई आपल्यांतून गेल्या.

आणि ते पति कोण हें तुम्हांला कळलें कां? पण तें कशाला तुम्हांला सांगायला पाहिजे? ती म्लान मूर्ति, ती म्लान व्यक्ति, हाय! हाय! तें सर नारायणराव चंदावरकरांचें म्लान वदन आज आठवडाभर एकसारखें दाखवीत आहे कीं कै. लक्ष्मीबाईंचे प्रिय पति म्हणजे सर नारायणराव चंदावरकर हेच होत! आज लक्ष्मीबाई गेल्या म्हणजे सर नारायणरावांचा आनंद मावळला, स्फूर्ति मावळली, त्यांची गृहलक्ष्मी आज चालती झाली! आतां नारायणरावांचें मन उदास, जन उदास, त्यांचें भुवनही उदासच!

लक्ष्मीबाई गेल्यामुळें सर नारायणरावांचें जें अपरिमित नुकसान झालेलें आहे त्याबद्दल आम्ही कोणत्या तऱ्हेनें त्यांचें शांतवन करावें हेंच आम्हांला कळत नाहीं. आणि त्यांतून लक्ष्मीबाई अशा वेळीं वारल्या कीं, ज्यावेळीं मुंबईतील संपाची खणाखणी चाललेली होती! आज शुभदिवशीं, कीं ज्या दिवशीं आज सर्व संपवाले आपखुषीनें कामावर जात आहेत, त्या दिवशीं जर लेडी लक्ष्मीबाई असत्या तर आनंदानें चमकल्या असत्या! आज त्यांनीं सोन्याचा दिवस मानला असता! आज त्यांना नारायणरावांवर लिंबलोण ओंवाळावें असें वाटलें असतें! नारायणराव विजयी मुद्रेनें टाइम्स खालीं ठेवीत आहेत तोंच, सौ. लक्ष्मीबाईंनी त्यांच्याकडे एका अति मधुरहास्याचा किरण फेंकून असें सुचविलें असतें, कीं, हा माझा हिरा या कामांत पडला म्हणून तरी बॅप्टिस्टाकाकांना यश आलें! अहाहा! हें हास्य म्हणजेच निर्वाण, म्हणजेच स्वर्ग, म्हणजेच आनंदभुवन!

तें हास्य आतां नारायणरावांना मिळणार नाहीं! होमरूलची मीटिंग आटपून बॅप्टिस्टाकाका जरी पुण्याहून परत आले आणि इकडे होमरूलच्या सभेंत कायम धाऱ्याची जमीनपद्धत सुरू करण्याबद्दल सतत चळवळ चालू ठेवण्याचा ठराव करून घेतल्यामुळें व दुसरीकडे संपवाल्यांबरोबर प्रेमानें आणि विश्वासानें 'ग्यानबा तुकाराम' करून त्यांना विजयश्रीबरोबर पुन्हां कामावर गेलेले पाहिल्यामुळें, जरी त्यांनीं रिस्पॉन्सिव्ह आनंदाकरितां सर नारायण ह्यांच्या मुखाकडे पाहिलें तरी आतां तें हास्य नसल्यामुळें सर नारायणरावांचा आनंदसुद्धां स्मशानयात्रेंमधील शोकगायनच होईल! सर नारायण साधे वकील असतांना कायदेकौन्सिलचे जेव्हां

सभासद झाले, त्यावेळीं लक्ष्मीबाईंचें त्यांना मिळालेलें हास्य-सर नारायणराव हायकोर्टाचे जज्ज झाले त्यावेळीं सर नारायण ह्यांना मिळालेलें हास्य–सर नारायण 'सर' झाले त्यावेळीं त्यांना मिळालेलें 'लेडी' लक्ष्मीबाईंचें हास्य, सर नारायण दिवाण होऊन इंदूरच्या गादींत बसले, त्यावेळीं त्यांना मिळालेलें ह्या गृहलक्ष्मीचें हास्य–हाय ! हाय ! सर नारायण, आतां तुम्हांला कुठलें तें हास्य ! सर नारायण, दैवाची रेषा उमटली तर तुम्ही यापुढें दिवाणच काय, एखाद्या राज्यावरही कदाचित् बसाल, पण सर नारायण, तें हास्य, तुमच्या गृहलक्ष्मीचें तें हास्य, आतां तुम्हांला कधीं मिळायचें नाहीं.

पती आणि पत्नी ही खरोखर अशी कांहीं अजब चीज आहे कीं, तिची नीट जोपासना केल्यास खरोखर दत्तात्रेयांना आपल्या खडावा फेंकून द्याव्याश्या वाटतील आणि गृहस्थाश्रम पत्करावासा वाटेल. 'धन्यो गृहस्थाश्रमः,' धन्य, धन्य, खरोखर हा गृहस्थाश्रम फार धन्य, असें जें आपल्या प्राचीन कवींनीं म्हटलेलें आहे तें उगीच नाहीं. उत्तम रीतीनें संसार चालविला तर गृहस्थाश्रमांत जेवढी उन्नति आहे तेवढी वैराग्यांत नाहीं पण 'उत्तम रीतीनें चालविला तर' हे आमचे शब्द मात्र लक्षांत ठेवा, ते वगळून बाकीचें वाक्य घेऊं नका, कारण उत्तम रीतीनें तो चालविला नाहीं तर गृहस्थाश्रमाइतकी नरकाची जागाही दुसरी नाहीं. पण ह्याला नरकाची जागा करा कां ? त्याला स्वर्ग बनविणें हें जर आपल्या हातीं आहे तर गृहस्थाश्रमाचा इतका दुरुपयोग करा कशाला ?

गृहस्थाश्रम उत्तम रीतीनें चालविला म्हणजे त्याच्याइतकें उन्नतीचें साधन दुसरें नाहीं असें जें आम्हीं म्हटलें त्यांत मुख्य जादू स्त्री ही आहे. स्त्रियांची योग्यता ज्या कुणाला कमी समजावयाची असेल तो तशी ती खुशाल समजो. वस्तुतः पहातां स्त्री म्हणजे उन्नतीची विजली आहे, आत्मविकासाची जादु आहे, पुण्यसंवर्धनाचा परीस आहे. पुरुष सद्‌गुणांच्या मंदिरांत केव्हां शिरतो ? तो स्त्रीच्या रम्य सहवासांत येतो तेव्हां. स्त्रीचा सहवास नसतांनाहि मनुष्य सद्‌गुणी ? छेः, हें कदाचित पूर्वजन्मीचें पुण्य, शुक, शंकराचार्य अथवा रामदास ह्यांच्या बाबतींत खरें असेल ! पण इतर पुरुषांच्या बाबतींत स्त्रीच्या पुण्यसहवासाची सुरवात म्हणजेच पुरुषाच्या सद्‌गुणी आयुष्याचा आरंभ ! स्त्रीप्रेमाचा परीस जर खरोखरी नसेल, तर पुरुषाच्या चरित्राचें अथवा चारित्र्याचें सोनें कधींही व्हावयाचें नाहीं.

स्त्रीपुरुषांच्या संबंधाचें विवाहाच्या योगानें जें पवित्रीकरण केलें जातें त्याचें कारण हें आहे, भिन्नजातीय दोन व्यक्तींनीं एका ठिकाणीं येणें ह्यांत कांहींएक महत्त्व नाहीं! अर्धोन्मीलित जीवछायेपासून तों हत्तीएवढ्या मोठ्या पशुपर्यंत सर्वांच्याच मागें हें लागलेलें आहे! पण दोन व्यक्तींचा समागम, हा आत्मिक आयुष्याचा प्रारंभ, हें एक मानवी जीवितांतच शक्य आहे! ही शक्यता प्रत्यक्ष कृतींत उतरविणें हेंच मानवी आयुष्याचें ध्येय व हीच मानवी आयुष्याची शोभा! विवाहासारख्या संबंधाला जी अत्यंत पवित्रता आहे ती ह्यामुळें होय! विवाह म्हणजे सौख्याचा प्रारंभ नव्हे, तो सद्‌गुणाचा प्रारंभ होय आणि विवाहापासून जर सौख्य प्राप्त होत असेल तर तो शारिरीक इच्छांच्या तृप्तीचा आनंद नव्हे, तर परमेश्वराच्या चरणसेवेपासून ज्या प्रकारचा सात्विक आनंद होत असतो, त्यांतलाच हा सात्विक आनंद होय.

खुद्द नारायणरावांनाच विचारा, कीं सौ. लक्ष्मीबाईचा अंत जर पंधरा वर्षांपूर्वी झाला असता, तर तुम्ही दुसरी पत्नी केली असती काय? ते खात्रीनें म्हणतील कीं नाहीं, एकदां लक्ष्मीचा हात धरल्यानंतर मी दुसऱ्या स्त्रीचा हात धरला नसता! एक, दोन, तीन, चार, ह्याला काय विवाह म्हणायचें कीं अधःपतन म्हणायचें? लज्जासंकोचन म्हणायचें कीं क्रमांकगुणन म्हणायचें? ह्याला काय म्हणायचें? ज्या अभागी जीवांना विवाहांतील स्वर्ग कळलेला नाहीं, ज्या दरिद्री प्राण्यांना विवाहाचें पवित्र स्वरूप समजलेलें नाहीं, ज्या क्षुद्रतम जीवांना विवाहांतील पुण्यजादु लक्षांत आली नाहीं, तेच विवाहाची अशी विटंबना करतात, ते विवाहाला बाजारांतील तोंडच्या हिशोबांत नेऊन ठेवतात! हें करणें किती असमंजस व अज्ञानाचें आहे, हें सर नारायणरावांनाच विचारा! नारायणराव सोशल कॉन्फरन्सचे सेक्रेटरी असले तरी ते खोटें बोलणार नाहींत ही आमची खात्री आहे.

कारण स्त्रीच्या साहचर्याच्या सद्‌गुणांना अत्यंत पोषक असा जर परिणाम कोठें पहायचा असेल तर तो सर नारायण ह्यांच्या चरित्रांतच होय. सार्वजनिक कार्यांत पडणाऱ्या अत्यंत नामांकित व्यक्तींत जर कुणाची खाजगी सद्‌गुणाबद्दल कीर्ति असेल, तर तशा व्यक्ति दोनच! श्री. बाळ गंगाधर टिळक ह्यांच्या चरित्राची कीर्ति लोकविश्रुत आहेच! पण सर चंदावरकरहि खाजगी वर्तनांत तितकेच पवित्र असल्याबदलची ख्याती आहे. आजपर्यंत सुधारक लोकांविषयीं असा संशय

असे कीं, ते वर्तनांत स्वैर असतात ! लोकांचा हा अतिशय वळकट संशय आहे. आणि त्यामुळेंच सुधारक म्हणजे स्वच्छंदी अथवा चंगीभंगी असा लौकिक अर्थ रूढ झालेला आहे. परंतु सर नारायण हे या दोषाला अपवाद आहेत. त्यांचें खाजगी वर्तन अत्यंत पवित्र, अत्यंत सात्विक, अत्यंत सोज्वळ असें आहे आणि हा कशाचा परिणाम ? खुद्द सर नारायणराव चंदावरकरही असें कबूल करतील कीं, ज्या गुण-वती स्त्रीच्या सहवासांत अनेक वर्षे काढण्याचें भाग्य त्यांना प्राप्त झालेलें होतें, तिच्या पवित्र सहवासाचा हा परिणाम आहे ! ज्याला विवाह म्हणतात तो हा ! ज्याला विवाहमंगल म्हणतात तें हें ! ज्याला सौभाग्य म्हणतात तें हें !

आणि म्हणूनच तर सौ. लक्ष्मीबाई चंदावरकर ह्या स्वर्गवासी झाल्याबद्दल आम्हांला अत्यंत दुःख होत आहे. सौ. लक्ष्मीबाई आणि संदेश ह्यांचा कोणत्याही प्रकारचा संबंध नव्हता. सौ. लक्ष्मीबाईच्या करकमलांच्या स्पर्शाचें भाग्य संदेशला कधीं मिळालें होतें कीं नाहीं, ह्याबद्दलही आम्हांस संशय आहे. ज्याप्रमाणें शुक्राची चांदणी दूरवर आकाशांत चमकत असते त्याप्रमाणें सौ. लक्ष्मीबाईची तारका संदेशपासून अत्यंत दूर अशा विचारप्रांतांत चमकत होती, पण तो विचारप्रांत दूर असला म्हणून काय झालें ? संदेशच्या आदरभावना, संदेशच्या सन्मानभावना, संदेशच्या पूज्यतम भावना त्या तारके-पासून फार लांब नव्हत्या ! त्या तिच्या निकट होत्या ! तिला कदाचित् हें माहीत नसेल !—आपणांला कोण नमस्कार करतो हें शुक्राच्या चांदणीला कुठें माहीत असतें ?—तथापि, त्यामुळें संदेशच्या पूज्यभावनेंत कांहींच कमतरता नाहीं ! आणि म्हणून ह्या मृत साध्वीचें, ह्या दिवंगत तारकेचें, ह्या परमेश्वरविलीन गुणवतीचें पावनस्मरण हा संदेश आपल्या स्पेशल अंकांत वाचकांना देत आहे !

# दाजीसाहेब वारले !*

मुंबई इलाख्यांतील आबालवृद्धांच्या परिचयाचे असलेले आणि कॉंग्रेसमधील कामगिरीच्या योगानें सर्व हिंदुस्थानभर कीर्ति पावलेले रा. दाजीसाहेब खरे हे सोमवारीं रात्रीं एक वाजण्याच्या सुमारास परलोकवासी झाल्याची बातमी ऐकून प्रत्येक हिंदी मनुष्याचें मन विषण्ण झाल्याशिवाय राहावयाचें नाहीं. हिंदी राजकारणांत मनापासून लक्ष घालून आपल्या मातृभूमीच्या उद्धारार्थ झटणाऱ्या लोकांची आधींच दुर्मिळता आहे; त्यांतल्या त्यांत एका वर्षां–सव्वा–वर्षाच्या अवधींत, गोखले, मेथा, दाजीसाहेब खरे असे मोहरे दिवंगत होऊं लागले, तर हिंदी जनतेनें आपलीं मनें कितीहि कठोर करून पाहिलीं तरी तीं असल्या संकटांपुढें मऊ झाल्याशिवाय राहावयाचीं नाहींत. विशेषतः दाजीसाहेब हे राजकारणांतील विकोपास जाऊं पहाणाऱ्या पक्षभेदाचें निर्मूलन करण्याची खटपट करणाऱ्यांपैकीं, एक अत्यंत कळकळीचे व दोन्ही पक्षांस सन्माननीय असे गृहस्थ असल्यामुळें त्यांच्या कामगिरीची या काळीं तरी अत्यंत आवश्यकता होती; व बेळगांवच्या प्रांतिक परिषदेंत समेट करण्याचें राष्ट्रीय पक्षानें ठरविल्यामुळें ते आतां लखनौ कॉंग्रेसला जातील तर त्याला आतां दाजीसाहेब खरे नाहींत या विचारानें पराकाष्ठेचें दुःख होईल यांत शंका नाहीं; तथापि ईश्वरी संकेताच्या बाहेर कोणासच जातां येत नाहीं, म्हणून ईश्वराच्या इच्छेशीं तादात्म्य करण्यांतच शहाणपणा व हित आहे असें मानून विवेकाच्या बळावर झाल्या गोष्टीचा शोक न करितां पुढील मार्ग सुधारणेंच योग्य आहे.

कै. दाजीसाहेब खरे यांच्याबद्दल महाराष्ट्रीयांस अभिमान वाटण्यास **अनेक कारणें** आहेत. युनिव्हर्सिटींतील ऑनर्स, पदव्या व पदकें मिळवून उच्च पदाप्त पोंचणारे गृहस्थ महाराष्ट्रांत कांहीं थोडे नाहींत; परंतु आपल्या बुद्धीचा, आपल्या कर्तृत्वाचा व आपल्या शहाणपणाचा उपयोग आपल्या देशाच्या हितार्थ करणारे जे थोडे गृहस्थ निपजतात त्यांत दाजीसाहेबांची गणना होते. महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनक्रमांत चैतन्य उत्पन्न करणाऱ्या ज्या व्यक्ति गेल्या शतकाच्या शेवटच्या भागांत उदयास आल्या, त्यांपैकीं कै. दाजीसाहेब हे एक होते. लो. टिळकांचें आणि दाजीसाहेबांचें फक्त सहा महिन्यांचें वडील–धाकुटपण होतें.

---

*संदेश २३ आ. १९१६

त्यांचा अभ्यासही एक वर्षाच्याच अंतरानें झाला. टिळक सन १८७८ सालीं बी. ए. झाले व दाजीसाहेब १८७९ सालीं झाले. याच वर्षीचे दुसरे नामांकित पदवीधर म्हणजे कै. वामन शिवराम आपटे होते व ना. मुधोळकर, लो. खापर्डे हे सुद्धां याच वर्षी बी. ए. पास झाले. तेथून दोन वर्षांनीं दाजीसाहेब एल्. एल्. बी. ची परीक्षा पास होऊन ते वकीली करूं लागले. एल्. एल्. बी. च्या परीक्षेंत दाजीसाहेब आणि सर नारायणराव चंदावरकर हे एकाच वर्षी, एकाच वर्गात पास झालेले दोघे उमेदवार असून दाजीसाहेब यांचा पहिला आणि चंदावरकरांचा दुसरा नंबर होता. त्यांनीं १८८१ सालींच वकिलीस प्रारंभ केला. सर नारायणराव यांस २४ फेब्रुवारीं रोजीं आणि दाजीसाहेबांस ८ मार्च रोजीं सनदा मिळाल्या. या प्रकारें **बारा दिवसांनीं** दाजीसाहेब हे सर नारायणरावांच्या पाठीमागें न पडते तर कदाचित् दाजीसाहेब हे न्यायमूर्ति होण्याचाहि बराच संभव होता. कारण दाजीसाहेब हे इतर सर्व बाबतींत सर नारायणरावांच्या बरोबरीचे—नव्हे एल्. एल्. बी. च्या परीक्षेंत वर आल्यामुळें त्यांच्यापेक्षां कांकणभर वरिष्ठच होते; पण त्यांची बारा दिवसांची " सिनिऑरिटी " त्यांना नडली.

परंतु दाजीसाहेबांविषयीं महाराष्ट्रीयांस जी हळहळ वाटते ती आपल्यांतील एक अत्यंत बुद्धिमान वकील नाहींसा झाला म्हणून नव्हे, तर त्यांनीं आपल्या तारुण्यांतील ऐन उमेदीच्या काळापासून मरणाच्या घटकेपर्यंत जी लोकसेवा केली तिजबद्दल होय. दाजीसाहेबांनीं सार्वजनिक प्रश्नांचा व्यासंग अतिशय मेहनतीनें करावा, विचाराकरितां हातीं घेतलेल्या विषयाची खडान् खडा माहिती करून घ्यावी आणि त्या विषयाचें सर्व बाजूंनीं आकलन करावें. यामुळें त्यांचें प्रतिपादन नेहमीं भारदस्त व कोटिक्रम बिनतोड असे. त्यांनीं मुंबईच्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्यें तीनदां निवडून येऊन एकंदर नऊ दहा वर्षें काम केलें, व खोती ॲक्टासंबंधानें त्यांनीं केलेले परिश्रम तर प्रत्येकाच्या अंतःकरणावर खोदून ठेवण्याइतके आहेत. दाजीसाहेबांनीं वक्तृत्व ही कला समजून, तिचा अभ्यास केला नाहीं; पण त्या कलेपेक्षां आपणांस जें कांहीं प्रतिपादन करावयाचें आहे, त्या विषयाशीं एकात्म्य करण्यांतच त्यांना आपण देशसेवा करीत आहोंत असें वाटे व म्हणून त्यांच्या व्याख्यानांत वक्तृत्वाच्या चमकीपेक्षां, भाषेच्या अलंकारापेक्षां व दर्शनी अंगविक्षेपापेक्षां **खरी कळकळच** जास्त दिसून येई, आणि त्यामुळें त्यांचें भाषण नेहमीं परिणामकारक होत असे. त्यांचें सार्वजनिक चळवळीशीं इतकें तादात्म्य झालेलें

होतें कीं, या शहरांतील एखाद्या सार्वजनिक संस्थेंत कोणत्या ना कोणत्या रूपानें, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणें त्यांनीं साह्य केलें नाहीं असें कधीं झालें नाहीं. लायब्ररी, ग्रंथसंग्रहालय, स्टूडंटस् लिटररी अँड सायन्टिफिक सोसायटी, प्रेसिडेन्सी असोसिएशन, पैसाफंड कमिटी, शिवाजी उत्सव, शिवाजी फंड, हिंदु एज्युकेशन फंड इत्यादि संस्थांस त्यांनीं प्रमुखत्वेंकरून साहाय्य केलें आहे. कॉंग्रेसचे जनरल सेक्रेटरी या नात्यानें त्यांनीं बरींच वर्षे ना. वाच्छा यांच्या बरोबरीनें काम केलें आहे. यावरून लहान लहान संस्थांपासून कॉंग्रेसपर्यंत प्रत्येक संस्थेंत लक्ष घालून तिची कशी जोपासना केली आहे हें व्यक्त होतें. दाजीसाहेब हे धारवाड येथें भरलेल्या मुंबई प्रांतिक परिषदेचे अध्यक्ष होतें आणि दोन वर्षे त्यांनीं तो मान नाकारला यावरून त्यांच्यासंबंधानें या इलाख्यांतील लोकांच्या अंतःकरणांत किती आदर आणि विश्वास बसत आहे हें निदर्शनास येतें. त्यांची कामगिरी महाराष्ट्रापुरतीच मर्यादित झालेली नव्हती तर त्यांच्या बुद्धिमत्तेचें, विद्वत्तेचें, राजकारणपटुत्वाचें तेज इतर प्रांतांतील लोकांवर पडलें असून आजकाल हिंदी लोकांच्या हातांत असलेला **सर्वांत उच्च मान** म्हणजे कॉंग्रेसचे अध्यक्ष करणें, तोहि मान त्यांस मिळाला असता. यंदाचेच सालीं तीन प्रांतांनीं त्यांचें नांव अध्यक्षपदाकरितां सुचविलें होतें व यंदा नाहीं तरी पुढच्या वर्षी ते निवडून येण्याचा पुष्कळ संभव होता; पण ईश्वरी संकेत तसा नव्हता व त्यांच्या कामगिरीस साजेसें पारितोषिक त्यांना मिळण्यापूर्वीच निर्घृण काळानें त्यांस ओढून नेलें, हें महाराष्ट्राचेंच नव्हे तर हिंदुस्थानचें दुर्भाग्य होय!

कै. दाजीसाहेबांचा स्वभाव अतिशय मधुर असून त्यांच्याकडे कोणी गेला असतां त्याच्याशीं ते बोलले नाहींत असें कधीं घडलें नाहीं. दृढनिश्चय, उद्योगशीलता, सत्वनिष्ठा इत्यादि उच्च पदावर चढण्यास अवश्य असणारे गुण त्यांच्या अंगीं असून त्यांचा एक अतिशय प्रशंसा करण्यासारखा अद्वितीय सद्गुण म्हटला म्हणजे त्यांनीं ज्यास आपला स्नेही म्हणविलें त्याचा स्नेहसंबंध आमरणान्त कायम ठेवण्याचा होय. लो. टिळक व दाजीसाहेब यांचा बालपणापासून जो प्रेमसंबंध जुळून आला तो त्यांनीं कोणत्याहि व्यवसायांत न जुमानतां आमरणांत कायम ठेवला. टिळकांचें व दाजीसाहेबांचें राजकीय बाबतींत **बऱ्याच वेळीं पटेना** एवढेंच नव्हे, तर हे दोघे वीर परस्परविरुद्ध पक्षाचे होते असें म्हटलें तरी चालेल. पण त्यांचें मतयुद्ध कितीहि प्रचंड असलें तरी तें त्या

कार्यापुरतें असे; खाजगी व्यवहारांत किंवा स्नेहसंबंधांत त्याच्या योगानें मुळींच अंतराय उत्पन्न झाला नाहीं. या दोघांचें राजकीय मतासंबंधानें केवढेंहि वैमनस्य असलें तरी दाजीसाहेबांस कौन्सिलमध्यें निवडून यावयाचें असलें म्हणजे टिळकांची लेखणी दाजीसाहेबांच्या सेवेस असावयाचीच, आणि उलटपक्षीं टिळकांवर राजकीय खटला असो कीं ताईमहाराज प्रकरणासारखें खाजगी अब्रूस वट्टा आणूं पहाणारें किटाळ असो, त्या प्रसंगीं त्यांस मनोभावें मदत करण्यास दाजीसाहेब एका पाया-वर तयार असावयाचेच. लोकमान्यांकरितांच दाजीसाहेबांनीं विलायतची दोनदां वारी केली व त्याचवेळीं त्यांचें टिळकांसंबंधानें असलेलें अत्यंत शुद्ध प्रेम कसोटीस लागलें. टिळक व दाजीसाहेब यांच्यामधील प्रेम हें शुद्ध प्रेमाचें एक अत्यंत उज्वल उदा-हरण होय, व ज्यांस त्यांच्यामधील संबंधाची विशेष खोल माहिती नसे त्यांना राजकीय प्रश्नासंबंधानें दक्षिण व उत्तर ध्रुवाइतकीं विरुद्ध मतें धारण करणाऱ्या या दोन व्यक्तींच्या प्रेमाची उपपत्तीच लावतां येईना. त्यांच्या प्रेमास अलौकिक हें नांव सार्थकतेनें देतां येईल. दाजीसाहेबांचा करारी मानमरातब, तर टिळकांच्या संबं-धानें त्यांचा स्नेह; दाजीसाहेब हे नेमस्तांनीं ठरविलेल्या कॉंग्रेसच्या घटनेचे कट्टे पुर-स्कर्ते, तर टिळक हे तिजमध्यें सुधारणा घडवून आणणारांचे पुढारी; असे हे दोघे परस्परविरोधी पक्षाचे पुढारी होते, तरी त्यांचा विरोध त्यांच्या खाजगी संबंधाच्या आड कधींच येऊं शकला नाहीं. यास कारण दोघांचीहि स्वमतनिष्ठा आणि अंतः-करणाचा थोरपणा आणि दिलदारपणा होय. दाजीसाहेबांच्या मृत्यूमुळें सर्व महा-राष्ट्रीयांस आज दुःख होत आहे, यांत शंका नाहीं, पण खुद्द लोकमान्यांस हें दुःख जितक्या तीव्रतेनें भासत असेल तितकें तें दुसऱ्या कोणास क्वचितच होत असेल. दहा दिवसांपासून लोकमान्य हे येथेंच होते; दाजीसाहेब पक्षघात झाल्यापासून दुर्दैवानें ते शेवटपर्यंत बोलूं शकले नाहींत, तरी लोकमान्यांनीं त्यांचा पलंग रात्रं-दिवस सोडला नाहीं. सोमवारीं संध्याकाळपासून जेव्हां दाजीसाहेबांविषयीं निराशा होत चालली तेव्हां लोकमान्यांच्या चेहेऱ्यावर दुःखाची इतकी छटा उठली कीं त्यांचा इतका उद्विग्न चेहरा कधींहि कोणाच्या दृष्टीस पडला नसेल. टिळकांवर आजपर्यंत थोडीं संकटें आलीं नाहींत. मुलांचा वियोग, कुटुंबाचें निधन, आप्त व मित्र यांचे मृत्यु आणि स्वतःवरील संकटें यांच्या योगानें त्यांचें सर्व आयुष्य संकटमय होऊन गेलेलें आहे. तथापि परवांच्या प्रसंगीं त्यांच्या ठिकाणीं इतकी विमनस्कता उत्पन्न झाली कीं, दाजीसाहेबांचें प्राणोत्क्रमण होतांच त्यांच्या नेत्रावाटे अश्रुबिंदुच्या धारा

वाहूं लागल्या ! बरोबर एक महिन्यापूर्वीच टिळकांना एक लक्षाचा आहेर सार्व-जनिक रीतीनें करण्यांत आला, ते दिवशीं दाजीसाहेबांनीं गंहिवरून भाषण करून लोकमान्यांविषयींचा आपला लोकोत्तर प्रेमभाव व्यक्त केला होता व त्यानंतर एवढ्या थोड्या अवधींतच दाजीसाहेबांना पक्षघात होऊन त्यांची इहयात्रा संपेल अशी कोणालाही कल्पना नव्हती. दाजीसाहेबांस वाताचा झटका सिंहगडास असतांना ता. २९ मे रोजीं आला होता पण त्याबद्दल त्यांस विशेष श्रम झाले नाहींत; पण तेथून बरोबर दोन महिन्यांनीं म्हणजे ता. २९ जुले रोजीं त्यांस पक्षघातानें पुनः पछाडिलें आणि सुमारें तीन आठवड्यांच्या आंतच त्यांना इह-लोकांतून उचलून नेलें !

# राजाला माकड चावलें ! *

ग्रीसच्या राजाला माकड चावल्यामुळें त्याची तब्येत आज बरेच दिवस अस्वस्थ होती. शेवटीं हें दुखणें विकोपाला जाऊन ग्रीसच्या राजाचा ह्यांतच अंत झाल्याची बातमी आली आहे. माकडाच्या दंशामुळें प्राण जाऊं नये म्हणून फ्रान्स-मधून मोठमोठे विषवैद्य मुद्दाम ग्रीसमध्यें नेण्यांत आलेले होते. ह्यापैकीं एक डॉक्टर त्याचा निरुपाय झाल्यामुळें पखालीभर पैसा घेऊन नुकाच ग्रीसमधून परत आला व दुसरा इतक्या जलदीनें पॅरीसमधून निघाला कीं वाटेंत ह्याची एका क्षणाची खोटी होऊं नये अशी मुद्दाम व्यवस्था करण्यांत आलेली होती. पण हा डॉक्टर राज-वाड्यांत जाऊन पोंचला असेल नसेल तोंच राजाचें प्राणोत्क्रमण झाल्याची वार्ता आलेली आहे. एका माकडानें अशा रीतीनें एका राजाचा प्राण घेतल्याची हकीकत खरोखर अत्यंत करुणास्पद आहे ! ग्रीसचा राजा तरुण होता. आपला बाप कॉन्स्टन्टाईन ह्याला लोकांनीं पदच्युत केल्यानंतर हा गादीवर आलेला होता. त्याच्या थोरल्या भावानें गादीचा वारसा सोडून दिल्यामुळें ह्याला गादी मिळालेली होती. ह्याचें गतवर्षी नुकतेंच लग्न झालेलें होतें व ते लग्न झाल्याचें प्रजेला पुरतें समजलेंही नव्हतें. संपत्ति, सौख्य, वैभव, राज्य, तरुणपणा ह्या सर्वांना एका माकडाच्या माकडचेष्टांमुळें ग्रीसचा राजा मुकला; ह्याबद्दल आम्हांला अत्यन्त वाईट वाटतें व निदान

* संदेश २९ ऑक्टो. १९२०.

राजवाड्यांत तरी माकडाच्या चेष्टांना वाव मिळाल्याबद्दल आम्हांस दुःख होतें. माकड-चेष्टांची पुष्कळ विषादकारक उदाहरणें आम्हीं आजपर्यंत ऐकलेलीं आहेत, परंतु माकडानें राजाचा जीव घेतल्याचें हें पहिलेंच उदाहरण असावें असें आम्हांस वाटतें ! हें माकड जर एखादा सोशालिस्ट असता, एखादा निहीलिस्ट असता, एखादा बोल्शेव्हिक असता अथवा एखादा दुसरा कोणी माथेफिरू असता तर त्याला ताबड-तोब फांसावर चढवा अशी कोणीही शिफारस केली असती. १२१, १२४ वगैरे जे राजाविरुद्ध भयंकर गुन्हे आहेत त्याला अनुसरून त्यावेळीं त्याला असें बजावतां आलें असतें कीं असल्या निंद्य माकडचेष्टांबद्दल तुला फांशीचीच शिक्षा योग्य आहे ! पण ह्या बाबतींत तेंही समाधान नाहीं. कारण तेथें ही माकडचेष्टा करणारें खुद्द माकडच आहे. तेव्हां सर्व समाधानें खुंटल्यामुळें तीव्रता झालेल्या दुःखांत आम्ही ग्रीसच्या राजाला शुभ परलोक इच्छितों व इतःपर कोणताही राजा अशा हृदयद्रावक माकड-चेष्टांना बळी पडणार नाहीं अशी ईश्वराची प्रार्थना करतों.

ग्रीसच्या राजाला हें माकड कसें चावलें हाही एक मनोरंजकच इतिहास आहे. ह्या राजाचा एक आवडता कुत्रा होता ! त्या कुत्र्याच्या मागें हें माकड लागलें व त्याचा चावा घेण्याचा त्यानें प्रयत्न केला ! राजेसाहेबांना हें अर्थात्च पाहवलें नाहीं ! कुत्रा माकडाच्या तावडींत सांपडतो असें पाहतांक्षणींच राजेसाहेबांचें हृदय द्रवलें आणि कुत्र्याला सोडविण्यासाठीं ते माकडाच्या पाठीस लागले ! त्या माकडाला हें कसचें रुचणार? कुत्रा हातांतून निसटतो हें पाहतांच त्या माकडानें आपलें चावण्याचें शौर्य राजेसाहेबांवरच चालविलें. खरोखर माकडाच्या तावडींत सांपडलेल्या कुत्र्याची करुणा आल्यामुळेंच राजेसाहेब या भानगडींत पडले. राजेसाहेब केवळ दयाशीलपणामुळेंच कुत्र्याला माकडापासून सोडवूं लागले. पण ह्या दयाळूपणाचा कांहीं उपयोग झाला नाहीं. हा दयाळूपणाच त्यांना भोंवला. माकडाच्या तावडींत सांपडलेल्या कुत्र्याविषयीं उत्पन्न झालेल्या दयाळूपणालाच ते बळी पडले ! हर, हर, काय ही विधिघटना ! काय ही नियति ! काय हा बनाव ! इतका दयाळू राजा शेवटीं माकडाच्या पाशांत सांपडावा काय ? एवढ्या दयाळू राजाचा एका माकडानें प्राण घ्यावा काय ? कुत्रा, माकड आणि राजा ह्या तिघांच्याकडे ह्या संबंधांत पाहिलें म्हणजे राजाविषयीं खरोखर अत्यंत वाईट वाटतें व तितकीच ह्या माकडांविषयीं संतापबुद्धी उत्पन्न होऊन करुणबुद्धीचा कडेलोट होतो !

कारण राजे लोकांना माकडांपासून मरण यावें ह्यापरती आणखी करुणास्पद गोष्ट दुसरी कोणतीच नाहीं. जे भाग्यवान् राजे आपल्या भाग्याच्या परिवेषांतच परलोकीं प्रयाण करतात त्यांची गोष्ट सोडून दिली व इतकें भाग्य सरासरी प्रत्येक राजाचें असतें तरी, धोक्यानें मरणाऱ्या राजांचींही उदाहरणें नाहींत असें नाहीं. कोणी कोणी राजे समरांगणावर मेल्याचीं उदाहरणें आहेत ! कोणी नेपोलियनप्रमाणें बंदिवासांत मेलेले आहेत. कोणा कोणा राजांचा ज्युलीअस सीझरप्रमाणें खून झालेला आहे व दुसऱ्या विल्यमप्रमाणें कोणी राजे शिकारीचे वेळीं लागलेल्या बाणांमुळें मेलेले आहेत, पहिल्या चार्लस्प्रमाणें फांशी गेले तेही प्रसंगानुसार आढळत असतात, पण माकडामुळें मेलेला हाच पहिला राजा असावा अशी आमची समजूत आहे. राजे लोक वैभवांत गेलेले शोभतात, शिकारींत गेलेले शोभतात, किंबहुना बंदीवासांत खितपत पडून मेलेले शोभतात ! पण एका राजाला माकडामुळें मरण यावें याबद्दल खरोखर आमचें अंतःकरण तुटतें ! ग्रीसच्या राजाला त्या कुत्र्याची व्यर्थ कींव आली ! ग्रीसचा राजा व्यर्थ त्या माकडाच्या भानगडींत पडला. राजे लोक कितीही दयाळू अथवा दिलदार झाले तरी त्यांनीं कुत्र्यांपासून आणि माकडांपासून जितकें लांब रहावें तितकें चांगलें ! कारण कितीहि दयाळुपणा दाखविला तरी बोलून चालून तीं कुत्रीं व माकडेंच. हीं कुत्रीं-माकडें जितकीं नोकरचाकरांच्या ताब्यांत रहातील तितकें चांगलें. राजे लोकांनीं या कामांत पडून दयाळूपणा उत्पन्न होऊं देण्यापेक्षां होतां होईल तितका कुत्र्यांचा, माकडांचा व नोकरांचा संबंध येऊं देणें दूरदर्शीपणाचें आहे. राजांनीं आपले चोवीस तास मुत्सद्दी, सैन्य, मंत्रि, सभाजन, न्यायशास्त्री, राजकारणी ह्याच परिवारांत घालणें हें इष्ट आहे. कुत्र्याच्या मागें लागणाऱ्या एका माकडाच्या भांडणांत पडून ग्रीसच्या राजाचा एखादा खिजमतगार मेला असता तर त्याचें इतकें दुःख वाटलें नसतें, पण दुर्दैवानें खुद्द ग्रीसचें राजेसाहेब वारले आहेत. ते ऐन तारुण्यांत वारले आहेत. ते माकडाच्या दंशानें वारले आहेत. खरोखर इथें आमचें मन करुण भावनेनें भडभडून जातें व त्या दुःखावेगांत एक अक्षरही आम्हाला ज्यास्ती लिहवत नाहीं.

# टिळकांची कविता *

हात जोडितों
पदर पसरितों
दन्तीं धरितों
तृण, चुम्बितों चरणाला
नका शिवूं मम कवनाला
(कवीची विनवणी)

आधुनिक कवि रेव्हरंड श्रीयुत नारायण वामन टिळक ह्यांच्या काव्याचा प्रथम भाग 'टिळकांची कविता' या एकेरी नांवानें नुक्ताच प्रसिद्ध झाला आहे. ह्या भागांत टिळकांच्या कवितेचे ८७ गुच्छ प्रसिद्ध झालेले आहेत व असेच आणखी कांहीं भाग ह्या भागाचे प्रकाशक रा. रा. भास्कर कृष्ण उजगरे, हे महाराष्ट्र वाचकांपुढें मांडणार आहेत. प्रस्तुत भागांतील कवितांची निवड करतांना श्री. त्र्यंबक बापूजी ठोमरे ह्यांनीं आपलें सहाय्य दिलें व प्रुफें तपासण्याचें काम श्रीयुत एकनाथ पांडुरंग रेंदाळकर ह्यांनीं "सर्वस्वीं" आपणांवर घेतलें. अमेरिकन मराठी मिशन ह्या ख्रिस्ती संस्थेनें श्री. टिळकांस प्रोत्साहन देऊन त्यांचेकडून गद्यपद्यात्मक वाङ्मय तयार करविलें. श्रीयुत टिळकांची कविता इंग्रजींतही भाषांतरित होऊन 'बहुधा याच नांवानें' प्रसिद्ध होणार आहे. श्रीयुत टिळक ह्यांचे "विद्वान मित्र" नरसिंह चिंतामण केळकर ह्यांनीं या पुस्तकाचा उपोद्घात लिहिला व ह्याशिवाय जे चार शब्द राहिले ते श्रीयुत उजगरे ह्यांनीं पुरते करून टिळकांची कविता करग्रहण-योग्य केली आहे.

इतक्या शिफारसी घेऊन "टिळकांची कविता" जगापुढें आल्यामुळें एखादा साधारण वाचक गोंधळून जाऊन "मेलों रे बाप्पा" असेच उद्गार काढील व कवितेचें गुणदोषनिरीक्षण करण्याचें त्यास भानच रहाणार नाहीं. काव्यवाङ्मयांत रे. टिळक हा शब्द इतका भीतिप्रद झालेला आहे कीं तो ऐकल्याबरोबर सर्व टीकाकार आपापल्या लेखण्या कलमदानांत ठेवून दौतवाळूदाणासकट पोबारा करतील.

* संदेश, १७ मे १९१५

ज्यूलिअस सीझर ज्याप्रमाणें I went, I saw, I conquered, "मी गेलों, डोळा टाकला, कीं चीत केलें" अशाच भरारीनें परकीय राष्ट्रांना चीत करीत असे, त्याप्रमाणें टिळकांची कविता एखाद्या मासिकांत अवतीर्ण व्हावयाचा अवकाश कीं तिच्यावर, अहा कविते, अहा कविते, अशा प्रेमप्रशंसेच्या अञ्जलि येऊन पडावयाच्याच. ज्या कवीला विजयसंचाराची एवढीं संवय त्यानें शिरोभागीं उद्धृत केलेल्या वृत्तखंडांत म्हटल्याप्रमाणें 'पदर पसरावयाची' व 'दातीं तृण धरावयाची' कोणती गरज? कवीच्या विनयशालित्वाच्याच स्फूर्तीची ही एखादी ठिणगी नसेल ना?

परंतु टिळकांच्या कवितेंतील 'कवीच्या विनवणी'पासून तों त्यांतील शेवटचा 'बोंबाबोंब' वाचीपर्यंत विनयशालित्वाची फारशी खूण सांपडेल अशी जर कोणाची कल्पना असेल, तर ती मात्र चुकीची आहे. कवीनें विनयशालित्वाच्या मोहापासून स्वतःस फार विवेकानें आवरून धरलें आहे, आणि त्यामुळें ह्यांतील प्रदीप्ताग्नी कोळशावर कोणीहि पाऊल टाकलें तरी त्याच्या पायास चटके बसून शिवाय त्यामुळें काळे मिचकूट झालेले पाय धुवून काढण्यास तुकारामबोवांच्या 'आधुनिक वेदां'त लीनतेचा बराचसा साबण खर्ची घालावा लागेल.

"प्राचिन कवि" व "अर्वाचिन कवि" असा जो अलीकडे तंटा सुरू झालेला आहे, व ज्यांतील एक पथकाचें धूरीणत्व रे. टिळक व पूर्वोक्त "ठोंबरे (बालकवि)" आणि "रेंदाळकर" ह्यांचेकडे आहे, व ज्यांतील दुसऱ्या पथकाचें पुरस्कर्तृत्व श्री. पांगारकर, आजगांवकर, इत्यादि मंडळींनीं आपल्याकडे घेतलें आहे, त्या तंट्यांतील पहिल्या पक्षाची "विजयपताका" म्हणून कित्येक लोक प्रस्तुत पुस्तकाचा उपयोग करीत आहेत. वास्तविक पाहतां "प्राचीन कविता व अर्वाचीन कविता" हा भेदच अत्यंत चुकीचा आहे. कालगणनेचें लाकडी 'पार्टिशन' अथवा कूड मध्यंतरी घालून एक कविता दुसरीपासून भिन्न आहे असें म्हणणें ह्यासारखा भेदकर्तृत्वाचा दुसरा कोणताहि दुरुपयोग नाहीं व हाच भेदविचार कडेलोटापर्यंत नेला म्हणजे कवितेच्या नूपुरांपुढें नाच घालण्याकरितां कंबर कसणारा प्रत्येक नवीन कवि रोजच्या रोज अर्वाचीन ठरून "काल"च्या कवीला प्राचीन म्हणूं लागेल. सर्व काल एकदम मोजतां येत नाहीं. म्हणून कालाचे शतकांच्या अगर युगांच्या रूपानें तुकडे पाडीत असतात. ह्या तुकड्यांच्या मिषानें कवितेच्या रमणीय रूपावर घाव घालून

त्यांची "प्राचीन" व "अर्वाचीन" अशीं शकलें पाडणें हा कुठला 'जर्मनपणा'? कवींचे, पंधराव्या शतकांतले कवि, अठराव्या शतकांतले कवि, असे वर्ग करण्याचा वाङ्मयव्यासंगी लोकांचा संप्रदाय आहे, पण त्याचें कारण त्यांच्यांत खराच 'जातिभेद' आहे असें नव्हे तर सर्व रत्नें एकाच थैलींत न मावल्यामुळें त्यांस नव्या नव्या थैल्या खोलाव्या लागतात हें होय. परंतु ह्या एवढ्याच वरून एकूणीसाव्या थैलींतही रत्नें अठराव्या थैलीपेक्षां जास्त किंमतवान् असतात असा सिद्धांत बांधणें अथवा ह्याच्या उलट अनुमान काढणें ह्यासारखी दुसरी प्रमादशील कल्पना कोणतीही नसेल. काल हा अबाध आहे, काल हा अनुबंधी आहे. तो ही कविता वामनानें लिहिली किंवा वामनपुत्रानें केली ह्याची कशाला व्यर्थ पंचाईत करील?

आधुनिक कवितेचें एखादें लक्षण बांधावयाचें असेल तर गर्विष्ठपणाच्या मुद्यावर मात्र बांधतां येईल, कारण गर्विष्ठपणाच्या स्फूर्तीला जसा आधुनिक काळांत महापूर आलेला आहे तसा पूर्वी कधीं तरी आला असेल कीं नाहीं याविषयीं शंकाच वाटते. गर्विष्ठपणा हा धार्मिक नीतिबंधनाप्रमाणें षड्रिपूंपैकीं एक रिपु गणलेला आहे; परंतु आधुनिक युगांतील कवि त्यास रिपु मानीत नाहींत एवढेंच नव्हे तर त्याचें व गर्विष्ठपणाचें चांगलेंच सूत असावेंसें वाटतें. आधुनिक काळांतील कित्येक कवींना आपली स्फूर्ति अत्यंत ओजस्वी "मूकपणा"ची (हें originalityचें भाषांतर आम्हीं एका आधुनिकाकडून घेतलें आहे) दिव्य व अशंकनीय वाटतें व एवढ्या भावनेवर त्यांची काव्यस्फूर्ति इतकी बेफामपणानें भरधांव धांवत सुटते कीं त्याखालीं समंजसपणाचा अगदीं चुराडा होऊन जातो. गर्विष्ठपणाची व आधुनिक कवींची इतकी सोयरिक कां जमली हें सांगणें फारसें कठीण नाहीं. जेथें गर्विष्ठपणाला आदरानें खुर्ची दिली जाते तेथें त्याच्या आगमनाविषयीं चर्चा करून तरी काय फायदा?

अत्युग्र गर्विष्ठपणाचा असह्य गंध रे. टिळकांच्या कवितेंत पदोपदीं येत असल्यामुळें तिचें सौंदर्य फार महाग झालें आहे हें टिळकांची कविता हातीं घेणाऱ्या प्रत्येक वाचकास आढळून येईल अशी आमची समजूत आहे. टिळक कवि नाहींत किंवा नसावेत असें आमचें मुळींच म्हणणें नाहीं. टिळकांनीं कविराजत्वाचा बहुमान मिळवावा, आतांप्रमाणेंच आणखी पुष्कळ कवित्वप्रबंध लिहावेत. त्यांच्या पांढऱ्या शुभ्र दाढीप्रमाणें त्यांचें शुभ्र यश महाराष्ट्रभर पसरावें व सर्वांनीं त्यांच्या कवितेचें

कौतुक करावें ह्यांत आम्हाला आनंद आहे. परंतु एखादा मनुष्य कवि असला तर त्यानें लगेच लोकांना दणके द्यावयास कशाला आरंभ करावा? तुम्हीं कवि असलांत तर खुशाल चांगली कविता करा. पण त्याची वर्दळ शेजाऱ्यापाजाऱ्यांना काय म्हणून? तुम्हीं कवि असलां तर सत्काव्य हेंच तुमच्या काव्यशक्तीचें प्रमाण आहे. पण अशीं काव्यें मोठ्या प्रमाणावर निर्माण करावयाचीं सोडून जेव्हां ह्याला ढोस, त्याला चिमटे घे, तिसऱ्याला अरसिक म्हण, चवथ्याला फालतूंत काढ, अशा बेफाम रीतीनें तुम्हीं सुंदर काव्योपवनांत धिंगाणा घालूं लागतां त्यावेळीं एखाद्या दर्पोद्धत दन्तीप्रमाणें प्रत्येक काव्यरसिकाला तुमच्या कवितेविषयीं भय वाटूं लागून, काव्योपवन कमी फुललेलें पत्करलें, पण ही हेंगडमस्ती नको असें त्यास होऊं लागतें.

अर्वाचीन कवितेंत रे. टिळकांना जें अग्रस्थान प्राप्त झालेलें आहे तें केवळ त्यांच्या काव्यगुणांमुळें नव्हे हें सहज कोणासहि कळून येणारें आहे. रे. टिळक हे चांगल्यापैकीं कवि नाहींत असें आमचें मुळींच म्हणणें नाहीं. त्यांच्या कवितेसंबंधानें आमचें मनांत अत्यंत प्रेम व सन्मान आहे व हें त्यांच्या "माझी भार्या" पासून तों त्यांच्या "वीररसप्रधान" "बोम्बाबोंबी"पर्यंत अक्षय टिकलेलें आहे. टिळकांच्या कवितेंत सहजपणा, गोडी, सुलभता, मोकळेपणा, विषयानुवृत्तित्व appropriateness, हे गुण असतात हें कोणीहि कबूल करील आणि ह्या गुणांमुळें टिळकांची कविता जी जन्म पावली ती वरिष्ठ पदवीस पात्र होण्याकरितांच जन्म पावली ह्या संबंधानें आम्हांस कांहींएक संशय नाहीं. टिळक ब्राम्हणपणाचा त्याग करून ख्रिस्ती झाले नसते तरीहि त्यांची कविता महाराष्ट्रांत लौकिकास चढली असती आणि टिळक उद्यां ख्रिस्ती धर्म सोडून एखादे मुसलमान मौलवी बनले तरीहि त्यांच्या कवितेस महाराष्ट्रांत सत्कीर्तिहि प्राप्त झालीच पाहिजे. परंतु टिळकांची कविता निसर्गतः कितीहि उज्वल असली तथापि त्यांच्या ख्रिस्ती-धर्म-स्वीकारानें त्यांच्या कवितेच्या उज्वलपणांत भर पडलेली नाहीं असें मात्र म्हणतां येणार नाहीं. ख्रिस्ती-धर्म-स्वीकारानें त्यांच्या एकंदर परिस्थितीस जें एक प्रकारचें गौरव प्राप्त झालें व ज्यामुळें दुरभिमानाच्या घट्ट चाकीनें वळकटपणें बंद केलेलीं सन्मान-कपाटें त्यांच्याकरितां एकदम उघडलीं गेलीं, त्याचा परिणाम त्यांच्या काव्यउज्वलतेवरहि कांहींएक झालेला नाहीं असें म्हणणें म्हणजे वस्तुस्थितीविषयीं अज्ञान प्रकट करणेंच होय. रे. टिळक हे ख्रिस्ती होण्याऐवजीं जर ब्राह्मणच राहिले असते तर त्यांच्या कवितेस प्रकाशांत येण्यास सध्यांपेक्षां कितीतरी जास्त प्रयास पडले

असते. रे. टिळकांची कविता प्रकाशांत येण्याजोगी आहे याविषयीं कोणाचाच वाद नाहीं, परंतु त्यांच्या ख्रिस्तीपणानें, प्रकाशाचे किरण त्यांच्यावर फार लौकर व फार सौकर्यानें पडले हें निःसंशय आहे. आज प्रत्येक मासिककर्ता व प्रत्येक काव्यसंग्राहक रे. टिळकांचे उंबरठे झिजवीत आहेत. परंतु रे. टिळक रेव्हरण्ड असण्याच्या ऐवजीं जर महामहोपाध्याय अथवा वेदमूर्तीच राहिले असते तर त्यांचे उम्बरठे झिजवाव-याचे राहोच, पण प्रकाशांत येण्याकरितां त्यांनाच लोकांचे किती उम्बरठे झिजवावे लागले असते ह्याची गणति करितां येणें कठीण आहे. रे. टिळक हे कवि आहेत हें तर खरेंच, पण ते ख्रिस्ती आहेत हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे, आणि हें सर्व लक्षांत ठेवूनच त्यांच्या काव्यकीर्तीचें प्रमाण बांधलें पाहिजे.

कांहीं कांहीं काळांत कांहीं कांहीं व्यक्तींना कीर्तिद्वार जास्त सुलभ होतें हा कालाचा गुण आहे व ह्यावद्दल त्या कालाचें प्रसंगीं अभिनन्दन करावें लागतें. सध्यांचा काळ असा आहे कीं पुरुष असण्यापेक्षां स्त्री असण्यानें जास्त लवकर कीर्ति पसरते, आणि हिंदु समाजांत जर कीर्ति हवी असेल तर हिंदु असण्यापेक्षां अहिंदु असल्यानें ती जास्त लवकर प्राप्त होते. आपल्या बरोबरीच्या शिक्षणाच्या युवतींचे निबन्ध अथवा भाषणें लोकसमाजांत जास्त मान्य अथवा वाचनीय ठरलेलीं पाहून अथवा त्यांच्या वाचनावर मोठमोठे सन्मान्य वृद्ध विद्वानसुद्धां मिटक्या देत बसलेले पाहून कितीतरी अल्पवयी कुमारांना ' बाबांच्या पोटीं मी कपाळकरंटा बन्या जन्मलों त्यापेक्षां एखादी सुंदर बबी जन्मलों असतों तर किती उत्तम झालें असतें ' असें वाटत असेल. सजातीयासंबंधानें सुद्धां पाहतां एखाद्या परजातीय ॲनी बेझण्टच्या वचनानें जितके लोक प्रीति–भोजनाला उत्सुक होतात तितके रानडे अथवा भाण्डारकर ह्यानीं कानीं कपाळीं सारखी ओरड केली तर होत नाहींत असा अनुभव जास्त दिसून येतो. ह्या अनुभवाचा रे. टिळकांच्या कवितेला पूर्ण फायदा मिळालेला आहे आणि आमची खात्री आहे, कीं रे. टिळकांचें ' ख्रिस्तायन ' प्रसिद्ध होतें न होतें तों त्यांच्यांतील काव्यरसाची इतकी वाहवा होईल कीं त्याचे पाट मुंबई–पुणें येथील मासिकांच्या पृष्ठांतून प्रचंड ओघानें वाहूं लागतील.

वास्तविक पाहिलें कीं, रे. टिळक जी जी कविता लिहितात त्यांत रसाचा इतका ओलावा असतो कीं त्यामुळें त्यांच्या कवितेंत जी जी मनोवृत्ति ग्रथित झालेली असेल तिला पाझर फुटून तिच्यामुळें वाचकांचें हृदय सद्गदित झाल्यावांचून रहात

नाहीं. भक्तिरसाची भट्टीही रे. टिळकांना अत्युत्तम साधते व "वेडा झालों खरा" वगैरे त्यांचीं जीं अत्युत्तम पद्यें आम्हीं अवलोकन केलेलीं आहेत, त्यांवरून भक्तिरसानें हृदयाचें काठिण्य सर्वथैव विरघळून टाकण्याचें अत्युत्कृष्ट सामर्थ्य त्यांच्या कवितेंत आहे हें आम्हीं आनंदानें निवेदन करतों. परंतु टिळकांची ही भक्तिप्रभावता अनन्य ( Exclusive ) आहे व भक्तीच्या अतिरेकानें महाराष्ट्रांतील दुसऱ्या कोणाचेंहि हृदय भरून जात नाहीं असें मात्र नाहीं. महाराष्ट्रांत असे कित्येक कवि आहेत कीं एखाद्या एकान्तनिष्ठ ख्रिस्ती मनुष्यास ख्रिस्ती नामोच्चाराबरोबर जितकें प्रेमाचें भरतें येईल तितकेंच त्यांस 'पाण्डुरंग' अथवा 'रामचंद्र' ह्यांच्या नामोच्चाराबरोबरहि येईल. परंतु हिंदु समाजाची व हिंदु अभिरुचीची अशी विचित्र स्थिती झालेली आहे, कीं रे. टिळकांच्या ख्रिस्तायनाची प्रशंसा करण्याकरतां ज्या मासिकाची पृष्ठें उत्कंठेनें वाट पहात बसलेलीं असतील त्याच मासिकांकडे एखादें 'पांडुरंगाष्टक' जाऊं द्या म्हणजे त्यास गचांडी मिळेल इतकेंच नाहीं, तर त्या मूर्खत्वाबद्दल त्यास दुष्ट उपहासाचें बक्षिस मिळाल्यावांचून कधींहि रहाणार नाहीं.

आमच्या म्हणण्याचा आशय इतकाच कीं, रे. टिळकांचें काव्यतेज स्वभावतःच जरी बरेंच धवल आहे तरी त्याचा धवलिमा जास्त प्रखर करण्यास त्यांच्या ख्रिस्तीपणाचाहि चांगला उपयोग झालेला आहे. रे. टिळकांच्या कवितेचा विचार करतांना काव्यसुकीर्तींत त्यांच्या ख्रिस्तीपणाचा विचार अवश्य केला पाहिजे व काव्यगुणपरीक्षणांत ते ख्रिस्ती आहेत हें निखालस विसरलें पाहिजे. रे. टिळक हे कोणत्या प्रकारचे कवि आहेत हें पारखतांना ते ख्रिस्ती आहेत कीं मुसलमान आहेत ह्या गोष्टीचा शोध करणें अत्यन्त अनुचित होय. परंतु रे. टिळक यांच्या प्रसिद्धीचा विचार करीत असतांना ते ख्रिस्ती आहेत हें कधींहि विसरून भागावयाचें नाहीं. आम्हीं टिळकांच्या कवितेचें जें परीक्षण केलेलें आहे तें टिळक हे ख्रिस्ती आहेत हें पूर्णपणें विसरून केलेलें आहे. परंतु टिळकांच्या कीर्तिची भराभर मापें पडतांना पाहून ज्या वाचकांना सानंद विस्मय वाटत असेल त्यांना आम्हीं एवढेंच सांगतों कीं त्यांची कीर्ति अजमवतांना टिळक हे ख्रिस्ती आहेत हें कधींहि विसरूं नका.

बाळबोध सोपे शब्द, बाळबोध भल्या कल्पना, बाळबोध साधी रचना, आणि बाळबोध लाजाळू प्रतिभा हे रे. टिळकांच्या कवितेंतील विशेष गुण आहेत आणि ह्या गुणांमुळें फारसें ललित–नर्तन न करतांना सुद्धां टिळकांच्या कवितेवर रसिकांना लोभ

करावासा वाटतो. टिळकांची कविता म्हणजे खेडेगांवांतील पाटलाची मुलगी होय. उच्च कुळ, परंतु फार श्रीमंत नाहीं; गांवांत दरारा, परंतु फार अधिकार नाहीं; सर्व अवयव गोंडस, पण फार अंगराग नाहींत; प्रेमळपणानें नेत्र डबडबलेले, परंतु फार तिरवे कटाक्ष नाहींत; हृदयांत मधुर विकार फार, परंतु फार वाक्चातुर्य नाहीं; अशी साधी, देखणी, सशक्त, पाणीदार अशी रे. टिळकांची कविता आहे. रे. टिळकांची कविता म्हणजे कोणी राजकन्या नव्हे कीं मानवी कल्पनेनें निर्माण केलेली सर्व भूषणें तिच्या अंगावर सांपडतील. रे. टिळकांची कविता म्हणजे कोणी वसंतसेनाहि नव्हे कीं तिच्या केवळ नूपुरनादानें सद्‌गुणी चारुदत्तसुद्धां व्याकुळ होऊन जातील. रे. टिळकांची कविता ही पाटलाची मुलगी आहे. तिचा स्वीकार केला तर प्रेमाचें पारणें फिटेल, अनुराग सार्थ होईल, स्मृतीची धन्यता वाटेल व संसार सुखाचा होईल. परंतु राजकन्येशीं विवाह केल्याचा बडेजाव, कविकन्येशीं विवाह केल्याची बुद्धिकुशाग्रता अथवा वसन्तसेना फिदा झाल्याचा आनंदकल्लोळ, तिच्या योगानें कधींहि प्राप्त होणार नाहीं.

आणि म्हणूनच टिळकांची कविता आपली खरी चारुता विसरून ज्यावेळीं गर्वानें नाक चढवूं लागते त्यावेळीं तिच्यापासून सौंदर्याधिक्य दिसून येण्याचें ऐवजीं तिचें नाक मात्र वांकडें दिसतें. रे. टिळकांनीं कविता लिहिलेली आहे व सत्कविताहि लिहिलेली आहे हें आम्हास मान्य आहे, परंतु ह्या कवितेनें सौंदर्याचे कांहीं विशेष ध्वज लावलेले आहेत अथवा लावण्याची कांहीं विशेष ज्योति पाजळलेली आहे असें मात्र कधीं म्हणतां येणार नाहीं. किम्बहुना, कल्पनाप्राधान्य हेंच कवितेचें सर्वस्व आहे असें मानणारा जो रसिकवर्ग आहे तो टिळकांच्या कवितेला ‘ कविता ’ म्हणावयास सुद्धां कबूल होणार नाहीं. आम्हांस हें मत अर्थात्‌च मान्य नाहीं. भावना–प्राधान्य ( Depth of Sentiment ) हें सुद्धां कविता होऊं शकतें; इतकेंच काय, परंतु आविष्करण–चारुता ( Beauty of Expression ) हें देखील एखाद्या पद्यावर कवित्वाचा शिक्का मारावयास पुरेसें होतें, ह्या म्हणण्यांतही पुष्कळसा समर्पकपणा आहे आणि टिळकांचें काव्य, त्यास जर काव्य म्हणवून घ्यावयाचें असेल तर, रसिकांच्या पहिल्या वर्गापेक्षां दुसऱ्या वर्गाकडेच त्यांना आपली शिफारस लावून घेतली पाहिजे, हें उघड आहे. परंतु एवढ्यानें टिळकांची कविता आपल्या स्थानापासून कधींहि भ्रष्ट होणार नाहीं. पहिल्या वर्गांतील रसिकांच्या निन्देमुळें रुसून जाऊन टिळकांची कविताकन्या जर माहेरीं जाऊं म्हणेल तर

महाराष्ट्र–सरस्वती तिला तसें कधींहि करूं देणार नाहीं. ' पाटलाची मुलगी झाली म्हणून ' तिजला पतिसुख नसेल का ? ' असें विचारण्याचा प्रत्येक मातेस अधिकारच आहे आणि हा अधिकार गाजवून महाराष्ट्रसरस्वती टिळकांच्या कवितेस आग्रहानें रसिकमंदिरांत बसवील असा आम्हांस पूर्ण विश्वास आहे.

परंतु टिळकांची कविता ही ह्या मानधनत्वाच्या रुसव्याचे फार पलिकडे गेलेली आहे. तिला असें वाटूं लागलें आहे कीं मी सर्वतः परिपूर्ण आहें, मलाच काय तें सर्व समजतें आहे, माझ्याइतकें नाजुक कोणी नाहीं, आणि मी आज्ञा करीन ती सर्वांनीं शिरसामान्य केली पाहिजे. आपल्या कन्येचा हा तोरा पाहून तिच्या म्हाताऱ्या बापाला–टिळकांनाहि भोळेपणानें असें वाटूं लागलें आहे कीं ह्या माझ्या मुलीला मी कुठें ठेवूं आणि कुठें न ठेवूं ? मुलीच्या बापाला तिचें सौंदर्य म्हणजे रतीचें सौंदर्य वाटावें हें योग्यच आहे व त्यांत त्याच्या आंधळेपणापेक्षां प्रेमळपणाच जास्त व्यक्त होतो, परन्तु बापाला जरी आपली कन्या सेमिरामिस राणी वाटत असली तरी त्यानें चारचौघांत तसले उद्गार काढावें आणि कोणी तिच्यासंबंधानें जरा भिन्न मत प्रदर्शित केल्याबरोबर प्रतिशब्द बोलावयास लागावें हें अत्यंत विचित्र आहे. " हात जोडितों, पदर पसरितों, दन्तीं धरितां, तृण चुम्बितों, चरणाला, नका शिवूं मम कवनाला " हे रे. टिळकांचे जे उद्गार आम्हीं आरंभींच उद्धृत केलेले आहेत ते ह्याच मासल्याचे होत, आणि असल्या निष्कारण बावचळलेल्या उद्गारांनीं टिळकांच्या कवितेंतील रसोद्गमावर पाणी पडत आहे हें कोणासहि वाटल्यावांचून रहाणार नाहीं. कवीला आपल्या कवितेचा कितीहि अभिमान असला तरी तो प्रमाणांत असला तरच शोभतो, हें प्रमाण बिघडलें कीं कवीचे जितके गुण असतील तितके ते हास्यालाच पात्र होतात. आम्हीं पुन्हां म्हणतों कीं रे. टिळकांची कविता खरोखर मनोरम आहे, परंतु हें मनोरमत्व एका विशिष्ट परिमितीचें आहे. टिळकांच्या कवितेचें सौंदर्य पाटलाच्या मुलीसारखें आहे. परंतु हें विसरून जर टिळकांची कविता गर्वाचा झणत्कार अथवा आढ्यतेचा फणत्कार करूं लागेल तर, " पोरी, तूं पाटलाची पोर आहेस " असें रे. टिळकांच्या कवितेला बजावल्यावांचून कोणीहि रहाणार नाहीं.

परंतु एके ठिकाणीं तर हा प्रकार अत्यंत विचित्र कोटीला गेलेला आहे व त्याबद्दल काय बोलावें आणि काय लिहावें हेंच आम्हास समजत नाहीं. रे. टिळक म्हणतात—

कारण कवनें नच माझीं
नच तुमचीं मीं गातों जीं
हीं निश्वसितें
कोण सोडितें
मम हृदयीं तें
विचारुनी भिउनी त्याला
पुढें करा मग कर अपुला

काय हे आश्चर्यकारक उद्गार? काय हें तोंडांत बोट घालण्याजोगें धारिष्ट? रे. टिळकांचीं काव्यें म्हणजे हीं परमेश्वराचीं निःश्वसितें आहेत काय? आणि रे. टिळकांच्या काव्याची चिकित्सा करणें म्हणजे परमेश्वराविरुद्ध अपराध करण्यासारखें आहे काय? वाङ्मयभक्तांनों, तुम्हीं सर्व सारस्वताचें आलोडन करा आणि रे. टिळकांच्या ह्या विलक्षण उद्गारासारखे उद्गार किती सांपडतील तें मोजून आम्हांस सांगा. रे. टिळकांचे उद्गार म्हणजे परमेश्वराचीं निःश्वसितें! गोविंद, गोविंद! वेद-वेदांगांना इतके दिवस परमेश्वराचीं निःश्वसितें समजत असत, भगवद्गितादि ग्रंथाला इतके दिवस परमेश्वराचीं निःश्वसितें समजत असत, एब्राहाम, डेव्हिड, मोझेस इत्यादि महापुरुषांच्या उद्गारांना इतके दिवस परमेश्वराचीं निःश्वसितें समजत असत, मॅथ्यू, जॉन, सेंट पॉल, पीटर इत्यादि पावन व्यक्तींच्या उद्गारांना इतके दिवस परमेश्वराचीं निःश्वसितें समजत असत, महंमद पैगंबरानें एकान्तांत सत्स्फूर्तीनें काढलेल्या उद्गारांना इतके दिवस परमेश्वराचीं निःश्वासितें समजत असत, झोरास्टारला दिव्य स्फूर्तीपासून प्राप्त झालेल्या ज्ञानाला इतके दिवस निःश्वसितें समजत असत; गोविन्द, गोविन्द! आतां चार भिन्न विषयांवर चार कविता केल्याबरोबर रे. टिळक त्यांस परमेश्वराचीं निःश्वसितें म्हणावयास सिद्ध झाले आहेत. वाङ्मय-भक्तांनों, रे. टिळकांच्या या उद्गारांविषयीं तुम्हीं काय मत द्याल? काव्यरसिकांनों, रे. टिळकांच्या ह्या उद्गारांविषयीं तुमचा काय अभिप्राय पडेल? आम्ही तर वरील उद्गार वाचून स्तिमित, चकित, आश्चर्य-हत, थक्क होऊन गेलों आहोंत. त्यानन्तर आमची लेखणीच चालत नाहीं. आम्हीं ह्या अद्भूत प्रकाराचा निर्देश करितों आणि 'गोविन्द, गोविन्द' असें म्हणून स्वस्थ बसतों.

# नाटक झालें जन्माचें ! *

आजचा विषय अत्यंत अवघड आहे. कारण बालगंधर्वांचा विषय आणि त्यावर सबंध आर्टिकल ? शांतं पापं ! शांतं पापं ! शांतं पापं ! संदेशकार, काय हें ? तुम्ही अगदींच बावचळत चाललां ! एकाद्या नाच्या पोरावर तुम्ही वर्तमानपत्राचा अंक भरून काढणार ? मग त्यापेक्षां तुम्ही एखादा तमाशा कां काढीत नाहीं ? बाकी, तुम्ही तेवढेंही कराल म्हणा ! नारिंगी निशाण काढलेंत ! गांवोगांव रंग फांशीत फिरलांत ! लुगड्यांचीन् शालूंची बासनें बरोबर मिरविलींत ! एवढेंच काय, पण आम्ही असें ऐकलेलें आहे कीं तुम्ही आपल्या पत्नीला " नटी बनविणार होतां ! " बरें झालें तिनें तुमचे कान पकडून तुम्हांला अक्कल शिकविली, नाहींतर तुमची अक्कल गिरसप्पाच्या धबधब्यापेक्षां वहावली असती !

× × × ×

आम्हांला माहीत आहे कीं असे आक्षेप काढणारे धुवट धोटे जगांत आहेत. त्यांच्या मतानें नाटक हा विषय इतका खराब आहे कीं ' ना ' म्हटलें कीं बद्रीनारायणाला उडून जावें, ' ट ' म्हटलें कीं टोकीयो गांठावें, आणि ' क ' म्हटलें कीं कुठल्याशा एका काळ्या समुद्रांत जीव द्यावा ! बाकी नाटकाचा इतका कंटाळा करणारे हे धुवट धोटे कधीं नाटकाला जात नाहींत असें मात्र नाहीं. नाटकाला जाणें हें त्यांचें एक आनंदाचें कार्य असतें, विशेषतः नाटकाला फुकट जायला मिळालें म्हणजे तर ह्यांचा आनंद गगनांत मावत नाहीं. बाकी, नाटकाला चला म्हटलें ( अर्थात फुकट ) तर हे पहिल्यांदा म्हणायचेच कीं मला जाग्रणाचा कंटाळा आहे. पोशाखी आग्रह करून घेतल्याशिवाय हे घरून हालायचे नाहींत. बाकी जेव्हां निघतील तेव्हां मात्र एक हातावर त्यांची " ती " असायचीच, आणि त्या ' ती 'च्या कडेवर, आजुबाजूला मागें, पुढें, दाम्या, चिंत्या, एशी, ठकी, सखी यांचें सैन्य असायचेंच.

× × × ×

ज्यांची खरोखर अशीच समजूत आहे कीं नाटक हें पाप आहे, जे ह्या समजुतीनुसार प्रामाणिकपणानें चालतात, जे स्वतः कधींही नाटकें पहात नाहींत, वाचीत

* संदेश ३१ मार्च १९२०

नाहींत, एवढेंच काय पण नाटकांपासून होणाऱ्या पैशाला, धर्मदायाला, फंडाला, जे कधीं हात लावीत नाहींत, ते पुरुष खरोखरच वंदनीय आहेत. त्यांचीं मतें कुणाला पटण्याजोगीं नसलीं तरी त्यांचा निश्चय प्रशंसेला पात्र आहे, जरी ते कदाचित् एककल्ली भासले, तथापि त्यांचा निर्धार हा तारीफ करण्याजोगा आहे. जरी त्यांचा समज आकुंचितपणाचा दिसला तरी त्यांच्या त्या दृढनिश्चयाला एवढे ' मार्क ' आहेत कीं त्या दृढ निश्चयाची कुणीही झालें तरी वाखाणणीच करील. " सती " जाणें ही गोष्ट आजकाल वेडगळपणाची आहे, कायद्याप्रमाणें तो गुन्हा आहे; परंतु पतीच्या धगधगलेल्या चितेंत प्रेममूलक मनोनिग्रहामुळें ऐन तारुण्याच्या विलासांत जी उडी घालील—काय, तिच्या पायाचें तीर्थ तुम्ही घेणार नाहीं ?

× × × ×

खरोखर अशा दृढनिश्चयानें जे नाटकांचा तिटकारा करतात ते आम्हांला शिरोधार्य आहेत. आम्ही त्यांना सांगूं कीं तुमचीं आमचीं मतें पटत नाहींत, पण तुम्ही आम्हांला शिरोधार्य आहांत ! थट्टा नव्हे कीं, गावांत बालगंधर्वांचें नाटक उतरावें व नाटकाला न जाण्याचा निर्धार टिकावा ! थट्टा नव्हे कीं " स्वयंवर " " स्वयंवर " अशा जाहिराती प्रत्येक भिंतीवर फडकाव्या आणि तें " स्वयंवर " पहाण्याकरतां मनाची गडबड उडूं नये ! वाचकहो, थट्टा नव्हे, बिलकूल थट्टा नव्हे, कीं हजारों लोक जेवणाची शुद्ध विसरून बालगंधर्वांकरतां थिएटरकडे पळत सुटावे, आणि हा दृढनिश्चयी पुरुष सर्व व्यामोह निश्चयाच्या खडकावर आपटून ' राष्ट्रहितैषी 'चे अंक वाचीत अंथरुणावर पडावा ! थट्टा नव्हे, खरोखरच ही थट्टा नव्हे ! असला निश्चय म्हणजे अप्सरा पुढें उभी असतांना लवमात्र योगासन न ढळविणाऱ्या योगीजनापेक्षांहि जास्त कठीण आहे ! आम्ही त्याला सांगूं कीं सुजना, तुझें म्हणणें मनाला पटत नाहीं, पण तूं आम्हांला शिरोधार्य आहेस !

× × × ×

येथें अर्थातच स्वतःसंबंधानें आम्हांला कांहींएक लिहावयाचें नाहीं ! मनुष्यानें स्वतःसंबंधानें मरेपर्यंत लिहूं नये ! तो जेव्हां मरणाच्या द्वारीं उभा राहील त्याच वेळेस स्वतःच्या संबंधानें कांहींतरी लिहिण्याचा त्याला अधिकार पोंचतो; तोंपर्यंत पवित्र उपदेश, श्रेष्ठ कार्य आणि उच्च ध्येय हीं नजरेपुढें ठेऊन त्यानें श्रम करीत रहावें हेंच उत्तम ! आणि मरणाच्या वेळीं तरी त्यानें कां लिहावें ? तर ज्या

न्यायशील जनतेपुढें तो उभा असतो आणि ज्या जनतेच्या चरणसेवेचा सुखास्वाद त्याला मरेपर्यंत मिळण्याचा संभव असतो त्या जनतेचें, त्या जनतारुपी जनार्दनाचें दर्शन त्याला पुन्हा घडणार नसतें म्हणून, आणि त्याही वेळीं तो जर तेवढेंहि न बोलेल तर उत्तमच ! ज्यानें सर्व जन्म कर्तव्याचरणांत घालविला आणि मरायच्या वेळेलासुद्धां आत्मसमर्थन केलें नाहीं ! वाहवा ! त्याची योग्यता काय विचारायची आहे ? सर्व जन्म दुसऱ्यांच्या इच्छा तृप्त करून स्वतःच्या थोरवीसंबंधानें चकार शब्दही न काढणारा कल्पवृक्षच तो ! आणि आम्ही म्हणतों कीं मनुष्यानें स्वतः-संबंधानें चार शब्द तरी काढण्याची जरूर काय ? त्यानें जर सत्कृत्यें केलेलीं असलीं तर तीं सत्कृत्यें इतकीं वक्तृत्ववान् होतील कीं नारदाच्या ब्रह्मवीण्यावरील बोला-प्रमाणें तीं सर्व जगत्काटह दुमदुमवून टाकतील !

× × × ×

तेव्हां स्वतःसंबंधानें येथें कांहींएक न बोलतां आम्ही नाटकांच्या तर्फेनें साधा सवाल टाकतों तो असा कीं, जर नाटकें इतकीं पापिष्ट, अमंगळ, त्याज्य तर कालीदासासारख्या कवींनीं जीं इतकीं नाटकें लिहिलीं त्याचें कारण काय ? काय, तो असा हलका मनुष्य होता कीं आपली ईश्वरदत्त वाग्वधू तो असल्या कुलटोपम कार्याला लावील ? बरें, तो कालिदास तसा होता म्हणावें तर तो भरतमुनि ? तोही असाच हलका मनुष्य ? त्यानेंही आपली वाक्शक्ति विषयाच्या कर्दमांत गलिच्छ केली अं ? बरें, तोही तसा होता म्हणावें तर–तर काय तो वाल्मीकि ऋषीही तसा होता कीं श्रीरामचंद्राच्या देखत प्रत्यक्ष त्याचीं दोन सुकुमार मुलें त्यानें रंगभूमीवर उभी केलीं ? आणि तुम्ही त्यालाही असें म्हणाल तर मग ईश्वराच्या संबंधानें तुम्ही काय म्हणाल ? कारण त्यालाही जगन्नाटकसूत्रधार असें म्हणतात ! काय ? हिला तुम्ही ग्राम्य उपमा म्हणतां ? अहो, पण ईश्वराच्या निष्पाप भक्तांनीं ती त्याला दिलेली आहे आणि ती त्याचें देखलें वैगुण्य झांकण्याकरितां नव्हे, तर त्याला आळ-विण्याकरितां, त्याचें कौतुक करण्याकरितां !

× × × ×

बरें, तेंही असो; कारण ईश्वर स्वर्गांत आणि तुम्ही घरांत ! डोंगरचे आंवळे आणि समुद्राचें मीठ यांची गांठ पडते कशाला ? पण आम्ही असें विचारतों कीं नाटक ही जर इतकी लज्जा बाळगण्याजोगी गोष्ट, कीं प्रत्येक अब्रूदार मनुष्यानें त्याच्या-

पासून दहा पावलें दूर रहावें तर अलीकडच्या काळांत शेक्सपीअरनें नाटकें लिहिलीं कशीं ? काय ? तो इंग्रज मनुष्य ? त्याचें उदाहरण नको ? इंग्रजांची व आपली नीतीची कल्पना निराळी आहे ? बरें आहे, तसेंही असेल ! पण त्या अण्णा किर्लो-स्करांनीं, त्यांनींही नाटकें लिहिलीं, त्या देवलांनींही नाटकें लिहिलीं—त्या आगर-करांनींही नाटकें लिहिलीं—आणखीही एक नांव तुम्हांला सांगतों; पहा बरें, पटणार तें तुम्हांला ! पटणार, खात्रीनें पटणार ! त्या गडकऱ्यांनींही नाटकें लिहिलीं ! तुम्हांला हें शेवटचें नांव खात्रीनें पटणार ! त्यांच्या अकालीं मृत्यूमुळें तुमच्या नेत्रांत उभे राहिलेले अश्रू अजून नीट पुसले गेलेले नाहींत ! त्यांच्या अकालीं मृत्यूमुळें तुमचा भरून आलेला कंठ अजून मोकळा झालेला नाहीं.

× × × ×

छेः, नाटकी, नाटकी ! हे सारे लोक नाटकी ! अण्णा किर्लोस्कर तोहि नाटकी तो देवल तोहि नाटकी, आणि तो गडकरी का फडकरी कोण म्हणतां तो—आतां मेल्या म्हशीला पुष्कळ दुध फार होतें म्हणायचें इतकेंच—बाकी तुम्हांला सांगतों कीं तोहि पण नाटकीच ! मेला म्हणजे कुणाला वाईट म्हणूं नये—तो गडकरी मेला तेव्हां त्याच्याबद्दल चार अश्रू ढाळायला काय जातें ? पण जर खरें म्हणाल तर तो गडकरी म्हणजे निव्वळ नाटकी ! साऱ्या जन्मांत त्यानें केलें काय, तर "बाळकराम" ह्या नांवाखालीं छटेबाजी केली, " गोविंदाग्रज " म्हणून फुटकी तपेली फुंकली आणि " गडकरी " ह्या नांवाखालीं दोनचार चावटपणाचीं नाटकें लिहिलीं ! त्याला एखादें ध्येय, कार्य, अथवा राष्ट्रीय साध्य कांहीं होतें काय ? अहो तो नाटकीच ! स्वभावाचाच नाटकी ! आतां तो मेला म्हणून फार बोलूं नये झालें !

× × × ×

परंतु नाटकांशीं संबंध ठेवणाऱ्या लोकांची यादी इतक्याच नांवानें संपली असें नाहीं. ह्यापेक्षांहि मोठमोठ्या नांवांचा नाटकांशीं संबन्ध आहे आणि तो संबन्ध सहजगत्या जोडलेला नव्हे तर जाणूनबुजून व नाटक म्हणजे निर्दोष वस्तु ह्या समजुतीवर जोडलेला आहे. ह्यापैकीं पहिलें नांव म्हणजे अर्थात्च वामनराव जोशी हें होय. त्यांची " राक्षसी महत्वाकांक्षा " इतक्या वेळां झालेली आहे कीं, नाटक लिहिल्याबद्दल वामनरावांना पश्चात्ताप झालेला आहे असें कधींहि म्हणतां यावयाचें नाहीं. आणि तरी वामनराव जोशी म्हणजे एवढा गृहस्थ कीं खापर्ज्यांच्या खालो-

खाल देशाकरितां अहर्निश झटलेला वऱ्हाडांत वामनरावांशिवाय दुसरा कोणी नाहीं. पण हे गृहस्थ असे आहेत कीं, जे स्वतः नाटक लिहिणारे आहेत आणि आठवण झाली म्हणूनच सांगतों कीं खापर्डे हेही राष्ट्रीय पुरुष असे आहेत कीं जे नेहमीं नाटकांना उत्तेजन देत असतात!

× × × ×

आणि ह्यांचेंही नांव तुम्हांला मानायचें नसेल तर नका मानूं! पण खाडीलकर? काय त्यांच्या देशभक्तीसंबन्धानें तुम्हांला संशय आहे! ज्यानें "केसरी" मोठ्या यशस्वीपणानें चालविला, ज्यानें देशाकरितां आजन्म स्वार्थत्याग केला, ज्यानें देशसेवेचें व्रत घेतलें आणि जो लोकमान्यांचा केवळ उजवा हात, त्यानेंहि नाटकें लिहिलेलीं आहेत! काय? तुम्हीं बालगंधर्वाला नाच्या पोऱ्या म्हणतां? अहो, पण हा उगीच नाचला नाहीं! त्याला खाडीलकरांनीं नाचविला! खाडीलकरांच्या शब्दावर तो नाचला! खाडीलकरांच्या रागांवर त्यानें नाच माण्डला!

× × × ×

आणि ह्या खाडीलकरांच्याच जोडीला ते पहा केळकर! हेहि नाटकांचे असेच प्रवर्तक! नाटकांचे मोठे अभिमानी! लोकमान्य त्यांचे गुरु व हे लोकमान्यांचे शिष्य! लोकमान्य पुढारी, हे लोकमान्यांचे अनुयायी! लोकमान्य देह, हे लोकमान्यांची छाया! ह्यांची कृति हा लोकमान्यांचा उपदेश! ह्यांचे शब्द हे लोकमान्यांचें हृदय! लोकमान्यांच्या मण्डाले–कारागृहवासांत त्यांनीं लोकमान्यांचें कार्य पुढें चालविलें. लोकमान्यांच्या डेप्युटेशनमध्यें ह्यांनीं विलायतेस प्रयाण केलें आणि लोकमान्यांच्या राजकारणांत हे सोलापुरच्या प्रान्तिक परिषदेंत सोलापुरला अध्यक्ष निवडले गेले! परंतु हे सोलापुरला उगीच चालले नाहींत, हे उगीच अध्यक्ष बनलेले नाहींत! हे पांच नाटकें लिहून सोलापुरला चालले आहेत! पांच नाटकांची जबाबदारी शिरावर घेऊन ते प्रान्तिक परिषदेचे अध्यक्ष बनलेले आहेत!

× × × ×

मग ह्याचें तात्पर्य काय आहे? ह्याचें तात्पर्य हेंच कीं परमेश्वरापासून खाडीलकरांपर्यंत प्रत्येकाचा नाटकाशीं संबंध आहे! भरतमुनीपासून खाडीलकर–केळकरांपर्यंत प्रत्येकानें नटांचा अभिमान धरलेला आहे! कालिदासापासून वामनराव जोशांपर्यंत प्रत्येकानें नाटकें लिहिलेलीं आहेत!

× × × ×

तेव्हां नाटकें ही इतकीं पातकी गोष्ट नाहीं तर? नाटकें हीं निदान चिळस बाळगण्याजोगी गोष्ट नाहीं ! नाटकें ही शहारा येण्याजोगी गोष्ट नाहीं. नाटकें ही अशी गोष्ट नाहीं कीं जिच्या हारीमोरीस प्रतिष्ठित लोकांनीं उभें राहूं नये. नाटकें ही अशी गोष्ट नाहीं कीं त्याबद्दल लज्जेनें मान खालीं घालावी ! प्रतिष्ठित मनुष्यें-सुद्धां नाटकें करितात. एकीकडे राष्ट्रमातेच्या चरणीं खिळून गेलेलें मन, दुसरीकडे नाटकाच्या आभिरुचींत खिळून जाऊं शकतें ! नाटक संभावितपणाच्या विरुद्ध नाहीं, प्रतिष्ठितपणाच्या विरुद्ध नाहीं, अब्रूदारपणाच्या विरुद्ध नाहीं, नाटक हें राष्ट्र-भक्तीच्या विरुद्ध नाहीं, देशभक्त लोक नाटकें लिहितात, ऋषिमुनी नाटकांत रमतात ! ह्या विश्वनाटकाचा सूत्रधारपणा कोण करतो? तो निष्पाप, निष्कलंक, निर्विकार, निर्विषय परमेश्वर !

× × × ×

कारण नाटक हें काव्याचा भाग आहे, नाटक ह्या नांवाची एक स्वतंत्र वाईट अशी वस्तु नाहींच. नाटक हें काव्याचा एक भाग आहे ! जर काव्य वाईट तर नाटक वाईट ! जर काव्य चांगलें असेल तर नाटकही पण चांगलेंच !

× × × ×

आणि नाटक हें नुसतें चांगलें नसून काव्यांचा अतिशय चांगला मासला म्हणजेच नाटक ! काव्य मेघदर्शनानें होतें ! काव्य इतिहासस्फुरणानें होतें, काव्य ईश्वर-स्मरणानें होतें, काव्य रणांत शिरण्यानें होतें ! पण काव्याला उत्कृष्ट स्वरूप द्यायचें असेल तर तें नाटकरूपांत लिहा. ‘ कव्येषु नाटकं रम्यं.’ काव्याचें अत्यन्त मनोहर स्वरूप म्हणजेच नाटक होय. काव्यांतलें अत्यन्त मधुर काव्य, काव्यांतलें अत्यन्त गोड काव्य, काव्यांतलें अत्यन्त रमणीय काव्य, काव्यांतलें अत्यन्त, अत्यन्त मनोरम काव्य म्हणजेच नाटक ! नाटक हें पातकी कसें असेल? नाटक म्हणजे रसाळ काव्य ! काव्य कधीं पातकी असतें कां?

× × × ×

आणि काव्य म्हणजे काय? जें मनुष्याच्या मनाला चटका लावतें तें काव्य ! बाण जसा हृदयांत घुसतो तसें जें हृदयांत घुसतें तें काव्य ! मनुष्याच्या मनावर छापा घालणारें तें काव्य ! मनुष्याच्या मनाचा कबजा घेणारें तें काव्य ! मनुष्याच्या मनाची सुरतेची लूट करणारें तें काव्य ! कवि काय करतात तुम्हांला माहीत आहे?

ते मानवी अंतःकरणें आपल्या अंकित करतात! शेंकडों, हजारों, लाखों मनुष्यें पृथ्वींत असतात, होऊन गेलेलीं असतात, पुढें व्हायचीं असतात! पण कवि काय करतो? तो आपल्या काव्याचा बाण जो सणणण्ण् सणणण्ण् करीत फेंकतों तो ह्या गत–प्रस्तुत–भावी ह्या सर्व मनुष्यांच्या हृदयांना घायाळ करतो, त्यांना मूर्च्छित करतो, ह्या सर्वांचा मालक होतो!

× × × ×

सप्पदिशीं लोकांच्या हृदयाचा कबजा घेणारा तो कवि! जो एका सटक्यांत लोकांचीं अंतःकरणें आत्मवश करील तो कवि! एका झांपेंत लोकांचीं हृदयें लुटील तो कवि! एका तिरपींत लोकांच्या हृदयांवर स्वतःची मुद्रा ठोकणारा तो कवि! एका धांवेंत जनतेच्या मतांवर आपलें निशाण उभारणारा तो कवि! 'ट' ला 'ट' जोडणारा तो कवि हें तुम्हांला कोणी सांगितलें? अहो, कवि व्हायला 'ट' ला 'ट' कशाला जोडायला पाहिजे? साधें गद्यांतच बोलाना–साधेंच लिहाना –किंवा नच बोलाना–नच लिहाना, तुम्ही जर लोकांच्या हृदयाचा कबजा घेऊं शकलां तर तुम्ही कविच!

× × × ×

आपले शिवरामपन्त परांजपे, त्यांनीं कधीं कविता केल्या आहेत? ते 'ट' ला 'ट' न जोडतांना बोलतात, 'ट' ला 'ट' न जोडतांना लिहितात, पण ते कवि, उत्कृष्ट कवि आहेत! कवितेंत कोण त्यांचा हात पकडील? आज–कालच्या कवींचे ते मुकुटमणी आहेत! आधुनिक कवींनों, राग नका येऊं देऊं! पण तुम्हांपैकीं एकालाही शिवरामपन्तांची काव्यशक्ति नाहीं!

× × × ×

आणि तो दुसरा एक कवि बसला आहे तो? शिवरामपन्तांवर कुणी कदाचित् कवित्वाचा आळ तरी घालील पण त्याचेवर कुणी कवित्वाचा आरोपही करीत नाहीं! आपण कवि आहोंत हें त्याला माहीतही नाहीं! पण लोकांचीं हृदयें मुठींत गवसण्याची त्याची एवढी शक्ती कीं हा दिल्लींत गेला तरी ह्याच्या मिरवणुकी निघतात, रहिमतपुरलाही ह्याची लोक वाट पाहतात, सिन्धमध्यें गेला तरी ह्याला लोक चिकटतात, हा सोलापुरला जायचा असला तरी त्याची मार्गप्रतिक्षा करतात. हा सांगलीच्या

लोकांच्या गळ्यांतला ताईत आहे, हा नागपूरच्या लोकांच्या हृदयाचा ठोका आहे, हा पुण्याच्या लोकांच्या नाकींचा बाल आहे, हा लाहोरच्या लोकांच्या रत्नांतला लाल आहे, हा बोलो अथवा न बोलो, हा कवि! हा हालो अथवा डोलो, हा कवि! हा हांसो अथवा बसो, हा कवि! अशा कवीचें जें लोकचित्ताकर्षक सामर्थ्य तें काव्य आणि हें काव्य जेव्हां हृदयंगम स्वरूपांत मांडलें जातें तेव्हां तें नाटक.

× × × ×

ह्या नाटकाच्याच पायरीशीं बालगंधर्व उभा आहे! तो नाच्या पोऱ्या नव्हे! तें काव्याचें आविष्करण आहे! तो स्त्रीपार्टी नव्हे, तें थोर कवीचें आकर्षणसामर्थ्य रंगभूमीवर उभें केलेलें आहे. नाटकाचें हेंच गम्य, हेंच इंगित, हेंच गुपित. पवित्र संस्कारांनीं मन पवित्रतर बनवायचें असेल तर नाटकाचें हें मर्म पहा, म्हणजेच तुम्हांला खाडीलकर कळेल, कालिदास कळेल, भरतमुनि कळेल, विश्वात्मा कळेल; नाहींतर साखर ही माती व बालगंधर्व हा नाच्या पोऱ्या!

# महाराष्ट्र नाट्यकलेचा शृंगारसाज. *

महाराष्ट्रांत नाट्यकलेला सुरवात कै. भावे यांनीं केली ही गोष्ट सर्व-श्रुतच आहे. ही सुरवात सांगली येथें झाली व बरेच दिवस महाराष्ट्रांत अशी पद्धति पडून गेलेली होती कीं, नटाच्या धंद्यांत जीं माणसें शिरायचीं तीं सांगली, मिरज, कोल्हापुर, कुरुंदवाड इकडचीं असायचीं. अजूनसुद्धां ही पद्धति अजिबात मोडलेली नाहीं, पण अलिकडे गोवा हें नटांचें नवीन बंदर खोललें गेलेलें आहे, आणि जरी ह्याचीही परंपरा कै. दत्तोपंत हल्याळकर ह्यांच्या गोवा संगीत मंडळीपर्यंत नेऊन भिडवितां आली, तथापि आजकाल अशिक्षित आणि सुशिक्षित अशा दोन्ही प्रकारच्या लोकांचा ओढा नाट्यकलेकडे 'धंदा' या दृष्टीनें ज्यास्त सुरू झाल्यामुळें नाट्यव्यवसायी लोकांचा एकच मुख्य "सेण्टर" आतां राहिलेला नाहीं. सर्कशीच्या धंद्यांत मात्र अजून तासगांवकडेच अग्रमान आहे. हा अग्रमान हिसकावून घ्यायला अजून एकही महत्त्वाचें शहर तयार झालेलें नाहीं.

* करमणूक, दीपावली-अंक १९२५.

के. भावे ह्यांच्यापासून तों के. अण्णासाहेब किर्लोस्कर ह्यांच्यापर्यंतचा मराठी रंगभूमीचा इतिहास जरी बराच मनोरंजक आणि महत्वाचा असला आणि ह्या काळांत रंगभूमीवर पराक्रम गाजवून गेलेले जरी अनेक महाराष्ट्रीय नट झालेले असले तथापि एक गोष्ट निर्विवाद आहे ती ही कीं, के. अण्णासाहेब किर्लोस्कर ह्यांनीं मराठी नाट्यकलेचा एक नवीन अंक सुरू केला. ह्यास नाट्यसंगीताचा मोहनांक म्हणावें, महाराष्ट्र रंगभूमीचा वाङ्मयांक ( Classical act of Marathi Drama ) म्हणावें, रुचिरत्वाचा सुरुचिर अंक म्हणावें कीं नाट्यमाधुर्याचा मधुरसांक म्हणावें ह्याविषयीं बराच मतभेद होईल. कारण ह्यांत हे सर्व गुण होते, किंबहुना ह्यापेक्षांही अनेक अधिक गुण ह्यांत होते. परंतु तूर्त आम्ही ह्यांस महाराष्ट्र रंगभूमीचा शृंगारांक म्हणतों. कारण के. अण्णासाहेबांनीं जर कांहीं विशेष कामगिरी केलेली असली तर त्यांनीं महाराष्ट्र रंगभूमीवर उदात्त शृंगाररसाची मनोहर छाया पसरविली असें म्हणावयाला हरकत नाहीं. संस्कृत नाट्यदेवीचा जणूं कांहीं विलासच असा जो कालिदास, त्या कालिदासाचें शाकुंतल नाटक के. अण्णासाहेब ह्यांनीं मराठी नाट्यपेहेरावांत आणलें आणि " सौभद्र " नाटकाच्या योगानें " शाकुंतला "चीच ज्यास्त सुंदर आवृत्ती काढली. त्यांचें " रामराज्यवियोग " हें बऱ्याच निराळ्या प्रकारचें नाटक आहे व तें पूर्ण झालें असतें तर त्यांच्या तिन्ही नाटकांत सर्वोत्कृष्ट गणलें गेलें असतें, परंतु त्यांतही के. अण्णासाहेबांची शृंगारसुधामय लेखणी दशरथ-कैकयीच्या महालांतल्या प्रवेशांत थोडीशीच कां होईना, पण हिंडून आलेलीच आहे.

शृंगार हा मधुर रस आहे. आणि माधुर्याचा अतिरेक झाला म्हणजेच एक प्रकारचें शैथिल्य मनास व शरीरास येत असतें. किर्लोस्कर संगीत मंडळी स्थापन होऊन बरींच वर्षें झालीं, तसें तें शैथिल्य महाराष्ट्रास जास्त जास्त जाणवूं लागलें व ही भेंड्यांची भाजी आतां कांहीं उपयोग नाहीं अशी भावना महाराष्ट्राचे सामुदायिक मनांत उत्पन्न होऊं लागली. राष्ट्रास सामुदायिक इच्छा उत्पन्न होऊं लागल्या म्हणजे त्यांची पूर्तता करणारा कोणीतरी राष्ट्रपुरुष निर्माण होतो असा निसर्गाचा नियम आहे व त्या नियमाप्रमाणें महाराष्ट्राच्या तीव्र भावना तृप्त करणारा विख्यात नट के. गणपतराव जोशी हा महाराष्ट्राच्या रंगभूमीवर आला. ह्या नटानें महाराष्ट्राच्या रंगभूमीवरील वीररसांक सुरू केला असें म्हणतां येईल. गणपतरावांची ' कंपनी ' गावांत आली म्हणजे एकदांतरी त्यांचा " राणा भीमदेव " पाहिल्यावांचून प्रेक्षकांच्या मनाची शांति होत नसे. कालिदासकृत पंच-

पक्वान्नाची मिठी बसल्यामुळें प्रेक्षकांच्या जिभेला थोडीशी तिखट चटणी लावावी आणि त्यांची क्षुधा पुन्हां प्रदीप्त करावी म्हणून कै. अण्णासाहेब किर्लोस्कर यांनीं 'सौभद्र' नाटक रचायला घेतलें, पण ही चटणी कालिदासाच्या पंचपक्वान्नापेक्षांही मिष्ट झाली. ती खायला लागल्यापासून तोंडाला जास्तच मिठी बसली. प्रेक्षकांच्या या करुण स्थितींतून त्यांची सोडवणूक करणारा नट म्हणजे कै. गणपतराव जोशी हे होत. ह्यांचे इतका वीररस उठविणारा नट अजून दुसरा झालेला नाहीं. आणि म्हणून कै. गणपतराव जोशी म्हणजेच महाराष्ट्र रंगभूमीचा वीररसांक असें अभिमानानें व आनंदानें म्हणतां येतें.

कै. अण्णासाहेब किर्लोस्कर ह्यांच्या शृंगाररसानें महाराष्ट्र रंगभूमीवर किती मिठी बसलेली होती ह्याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे किर्लोस्कर कंपनीचें "वीरतनय" नाटक होय. हें नाटक इ. स. १८९५ सालीं म्हणजे किर्लोस्कर नाटक मंडळी निघाल्यापासून बारा पंधरा वर्षांनीं गडकरीगुरु कवि श्री. श्रीपाद कृष्ण ह्यांचेंकडून किर्लोस्कर मंडळीनें लिहून घेतलें. कारण रंगभूमीवर एकच एक रस एकसारखा सुरू राहिल्यामुळें व त्यांत कै. गोविंद बल्लाळ देवलसारख्या कवींनीं "शापसंभ्रम" वगैरे नाटकांतून शृंगाररसाचे आणखी प्रवाह वाहविल्यामुळें प्रेक्षकांना असें वाटायला लागलें कीं 'नको हा शृंगार रस !' वीरतनय नाटकांत खरा वीररस किती आहे ह्याविषयीं पुष्कळ वेळां वादविवाद उपस्थित होतो, परंतु त्यावेळीं वीररसाची भूक प्रेक्षकांना उत्पन्न झालेली असली पाहिजे हें त्यांच्या नांवावरून सुद्धां उत्तम रीतीनें दिसून येतें. परंतु ती भूक तृप्त करण्याचा मान कै. गणपतराव जोशी ह्यांनीच संपादन केला. कै. गणपतराव हे ज्या प्रकारचीं नाटकें करीत तशा प्रकारचे प्रेक्षकांच्या मनोवृत्तींची खळबळाट उडवून देणारे वाक्य-कटाक्ष ( Paragraphs ) 'वीरतनय' नाटकांत जागोजागीं आहेत हेंही ह्या विवेचनाच्या वेळीं लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

रा. रा. श्रीपाद कृष्ण हे महाराष्ट्रीय नाटककारांतील अग्रमणी होत. ह्यांच्या लेखनांतील प्रसन्नता केवळ अवर्णनीय आहे. त्यांचें कल्पनाचातुर्य व कल्पकत्व ( Originality ) यांची सर तर कोणासही येणार नाहीं. त्यांच्यावर श्री. खाडिलकर, खरे, गडकरी, वरेरकर हे अतिप्रसिद्ध नाट्यलेखक झाले व त्यापैकीं प्रत्येकानें श्री. श्रीपाद कृष्ण ह्यांना खो देतां देतां शेवटीं नाट्यसृष्टींत बसायला श्रीपाद कृष्णांना

स्थानही उरविलें नाहीं. तथापि एक गोष्ट प्रांजलपणें कबूल केलीच पाहिजे कीं, नाट्यरण–रंगांतील हा नेपोलियन बोनापार्ट जरी जळगांव–जामोदच्या सेण्ट हेलेना बेटांत आपल्या उत्तर आयुष्याचे दिवस घालवीत असला आणि जरी एखादा गडकरी वळणावरील बाल अभिमन्यूही त्याचा पराभव केल्याचें आज सुख उपभोगीत असला तथापि अजूनही नाट्यलेखनांत श्री. श्रीपाद कृष्ण हेच सर्वापेक्षां खास वरिष्ट आहेत व त्यांचे तोडीस उभा राहणारा आधुनिक नाटककार अजून तरी एकही नाहीं.

श्री. श्रीपाद कृष्ण ह्यांना महाराष्ट्र नाट्येतिहासांतील युगकर्तृत्व सहज मिळवितां आलें असतें. किंबहुना युगकर्तृत्वाचा राजमुकुट त्यांचेकडे आपण होऊन चालत आलेला होता. परंतु संकोची स्वभाव, रंगभूमीपासूनची दूरदूरता व त्यामुळें समरसतेंत आलेलें न्यूनत्व हे तीन दोष त्यांना बाधले व त्यांच्या हातीं आलेला राज्यमुकुट दिल्लीच्या वृद्ध बादशहाप्रमाणें त्यांना गडकऱ्यांसारख्या शूर महादजी शिंद्याकडे सोंपवावा लागला. आपल्या उमद्या हयातींत श्रीपाद कृष्ण हे रंगभूमीपासून इतके दूर (Out of touch) राहिले कीं, अजूनही ते २५।३० वर्षांपूर्वींचीच भाषा बोलतात व २५।३० वर्षांपूर्वींच्याच सृष्टींत वावरतात. महाराष्ट्रांतील नाट्यसृष्टी इतर सृष्टीच्या हेलकाव्याबरोबर त्या २५।३० वर्षांत कुणीकडच्या कुणीकडे गेली ! पण लहान गांवीं वास्तव्य केल्यामुळें व तिथल्या लहान परिस्थितींतच–वावरल्यामुळें त्यांचे हेलकावे रा. रा. श्रीपाद कृष्णांच्या अचाट व अफाट कल्पनाशक्तीवर फारसे बसले नाहींत ! ती जिथें होती तिथेंच ती कमीजास्ती प्रमाणांत राहिली.

अर्थातच इतर लेखक पुढें सरले. ह्यांत कै. गडकरी ह्यांनीं महाराष्ट्र रंगभूमीवरील हास्यरसांक रसविण्याचें काम आपलेकडे घेतलें व तें पूर्णतेस नेलें. सुंदर, सोज्वल, सुरस व सोत्कट हास्यरस कै. गडकरी ह्यांनी जितका सजविला तितका तो कोणीहि सजविला नाहीं व तितका तो कोणांस सजवितांही आला नाहीं. मराठी नाटकांत स्वतंत्र हास्यरस घालण्याची सुरवात श्री. श्रीपाद कृष्ण ह्यांनीं केली. पण ती पूर्णतेस नेण्याचें कार्य रा. रा. गडकरी ह्यांनीं केलें. कै. गडकरी हास्यरसाचे बादशहा होते. “ भावबन्धन ” नाटकांत तर त्यांनीं कमालीचा हास्यरस ओतलेला आहे. इतका हास्यरस मराठी भाषेंतल्याच काय, पण इतर हिंदी भाषेंतील नाटकांतून क्वचितच सांपडत असेल.

पण कै. गडकरी हे नुसते हास्यरसाचेच बादशहा होते असें नाहीं. इतर रसही त्यांना उत्कृष्ट रीतीनें रंगवितां येत असत. विशेषतः उदात्त रस रंगविण्यांत त्यांचा

हातखण्डा होता. करुण रसही त्यांचा फार पटाईतपणाचा रस असे. भावना उदात्त झाल्या आणि पवित्रपणाच्या भरारींत अत्युच्च टोकाला पोंचल्या म्हणजेच अंतःकरणाला चटका बसतो व तें पाझरूं लागतें. करुणरस म्हणजे नुसता रडकेपणा नव्हे— तो अन्तःकरणाचा पाझर आहे—हें लक्षांत ठेवलें म्हणजे गडकरी ह्यांचा करुण रस व इतर नाटककारांचा करुण रस ह्यांच्यामधील अंतर लक्षांत येतें.

महाराष्ट्र नाट्यभूमी कसकशी सजत गेली व तिच्यांत शृंगाररस, वीररस, हास्यरस व करुणरस हे कसकसे येत गेले ह्याचें त्रोटक वर्णन आतांपर्यंत केलें. आतां ह्यासंबंधीं श्री. खाडिलकर ह्यांचीं कामगिरी कोणती ह्याचा आपण विचार करूं. ह्याचा विचार करायला गेलें म्हणजे जी गोष्ट आपणांस प्रथम भासते ती ही कीं, श्री. खाडिलकर हे एकच नाहींत, ते दोन तीन खाडिलकर आहेत. किंबहुना खाडिलकरांचा स्वभाव गंगोदकाप्रमाणें स्वच्छ असल्यामुळें आजूबाजूच्या परिस्थितींत ते इतके जाऊन मिसळतात कीं, त्या परिस्थितीचे रंग त्यांचे मनःस्थितीवर उमटूं लागतात. श्री. खाडिलकर ह्यांची ही वृत्ति नुसती नाट्यसृष्टींतच दिसून येत नसून राजकीय सृष्टींतही दिसून येते व त्यामुळेंच अनेक वेळां त्यांचें स्वतःचें अस्तित्व पार लोपून गेल्याचा भास होतो. श्री. खाडिलकर हे जोंपर्यंत महाराष्ट्र नाटक मंडळीशीं संलग्न होते तोंपर्यंत त्यांची नाट्यरचनेची धाटणी निराळी होती. ते किर्लोस्कर नाटक कम्पनीशीं येऊन मिसळले त्यावेळीं ती निराळी झाली व ज्यावेळीं ते केवळ बालगंधर्वांच्याच अभ्युदयासाठीं नाटकें लिहायला लागले त्यावेळीं त्यांची लेखनशैली आणखी निराळी बनली. ह्या भिन्न भिन्न लेखनशैलीचे महाराष्ट्रावर निरनिराळे परिणाम झाले व त्यांतच बालगंधर्वांच्या धन्देविषयक आवश्यकतांची फार चमत्कारिक भर पडली.

खाडिलकरांची मूळ नाट्यलेखनशैली फारच उत्कृष्ट आहे. त्यांचा अस्सल थाट म्हणजे अनेक मनोहर प्रसंग उत्पन्न करायचे, अनेक पात्रांच्या परस्परविरुद्ध जोड्या घालायच्या आणि नाटकांत विविधरस उत्पन्न करून त्या सर्वांचा परिपोष राष्ट्रोन्नती, राष्ट्रस्वातंत्र्य, स्वदेशाभिमान किंवा राष्ट्रासाठीं स्वार्थत्याग अशासारख्या एखाद्या अत्युच्च मनोभावनेमध्यें करायचा ! त्यामुळें ह्या वेळचीं खाडिलकरांचीं नाटकें म्हणजे एखाद्या श्रीमंत मालकाच्या कारखान्यासारखीं वाटत ! त्यांत भिकारपणा नव्हता दास—दासी—आश्रित,—पण्डित—वीर—मुत्सद्दी—उच्च—नीच ह्या सर्वांचा श्रींमंती अजबखाना खाडिल-

करांच्या नाटकांत असे व तीं करायला फार पात्रें लागत. पण नाटक कधीं "फेल" व्हायची भीति नसे. कारण पात्रें व प्रसंग ह्यांची भरपूर खैरात, कोणालाच जीवापलीकडे ताण नाहीं व प्रत्येकाला कौशल्य दाखवायला वाटेल तितका वाव ! खाडिलकरांचें अगदीं हलकें पात्र असलें तरी तें मन रमवून जायचें आणि त्यांत कांहींतरी विशेष खुबी असायची !

खाडिलकरांची नाट्यलेखनाची पद्धती जोंपर्यन्त अशा प्रकारची होती तोंपर्यन्त त्यांत खाडिलकरी वैशिष्ट्य होतें. विशेषतः पात्रांच्या तोण्डचे वाक्यांतून राजकीय परिस्थितीला अनुलक्षून दुहेरी ध्वनि काढण्याचें जें अप्रतिम कौशल्य रा. रा. खाडिलकरांना साधलेलें होतें व ज्या कौशल्यामुळेंच त्यांच्या " कीचक–वधास " सरकारचे रोषाला बळी पडावें लागलें, त्या कौशल्याचा जनसमाजाच्या मनावर विलक्षण परिणाम होत असे. रा. रा. खाडिलकरांना महाराष्ट्रीय जनसमाज कांहीं काळपर्यंत आपल्या डोक्यावर घेऊन नाचला तो ह्याच कौशल्यावर फिदा होऊन नाचला. रा. रा. शिवरामपंत परांजपे ह्यांनीं वर्तमानपत्रें व व्याख्यानें ह्यांत ध्वनिकाव्याची चटकदार पद्धति आणली परंतु रा. रा. खाडिलकर ह्यांनीं हें ध्वनिकाव्य प्रत्यक्ष रंगभूमीवर उभें केलें ! ही हातोटी अगदीं नवी होती व तिनें कांहीं काळ महाराष्ट्रीय प्रेक्षकांना गुंगवून सोडलें.

परंतु ज्यावेळीं रा. रा. खाडिलकर ह्यांचा व किर्लोस्कर कंपनीचा संबन्ध जुळला त्यावेळीं रा. रा. खाडिलकरांनीं आपली ही खाडिलकरी खुबी सोडून दिली व ध्वनिकाव्य सोडून ते चारु संगीतांत शिरले. किंबहुना किर्लोस्कर व खाडिलकर ह्यांच्या सहवासांत खाडिलकरांनीं किर्लोस्कर संगीत मण्डळीवर आपली छाप बसविण्याचे ऐवजीं किर्लोस्कर मण्डळीची छाप आपलेवर वसूं दिली ! गंगोदकाचा हाच स्वभाव आहे. " पानी तेरा रंग कैसा ? तर जिसमे मिला वैसा ! " ‘ मानापमान ’ नाटकांत खाडिलकरी वळण बिलकूल दिसत नसून किर्लोस्करी वळण मात्र पूर्ण आहे. उत्तम चाली, उत्कृष्ट ढंग, शृंगाराचा उठाव, व सौभद्राचे धर्तीवर आत्मगोपनयुक्त वधूवरांचे संमेलन वगैरे किर्लोस्करी गुण ‘ मानापमानांत ’ पूर्ण आहेत, पण खाडिलकरी गुण मात्र नाहींत. अण्णासाहेब किर्लोस्करांप्रमाणें काव्यपदलालित्याचा गुणही खाडिलकरांचे अंगांत जर नैसर्गिकरीत्या असता तर ‘ मानापमानां ’ तील पदें रागरागिण्यांच्या माधुर्याप्रमाणें शब्दार्थरचनेच्या दृष्टीनेंही बहारीचीं झालीं

असतीं, परन्तु नैसर्गिक शब्दसौष्ठवाचा गुण कै. अण्णासाहेब किर्लोस्करांबरोबरच मावळला. कै. देवलांचीं कांहीं पदें किर्लोस्करांच्या पदांपेक्षांही गोड आहेत, पण त्यांत नैसर्गिक कल्पनाभरतीपेक्षां संस्कृताध्ययनापासून उत्पन्न झालेल्या कृत्रिम कुशलतेचीच ज्यास्त झांक मारते.

खाडिलकर आणि किर्लोस्कर संगीत मंडळी यांच्या समागमापासून खाडिलकर किर्लोस्करी वळणावर कसे गेले हें यावरून दिसून येईल, पण ह्यानन्तर दोनचार वर्षांच्या आंत किर्लोस्कर मंडळींतून रा. रा. बालगंधर्व हे फुटून निघाले व त्यांनीं स्वतःची गंधर्व नाटक मंडळी काढली. त्यांतही दोनचार वर्षांच्या आंत बालगंधर्वांचे भागिदार रा. रा. टेम्बे व बोडस ह्यांची आणि बालगंधर्वांची तेढ आली. अशा वेळीं जें नाटक केवळ बालगंधर्वांवरच अवलंबून आहे व ज्याचा उठाव केवळ त्यांच्याच गाण्यावर किंवा नटण्यामुरडण्यावर उभारलेला आहे अशा नाटकाची आवश्यकता रा. रा. बालगंधर्वांना भासूं लागली आणि त्यांची ही हौस पुरविण्यासाठीं रा. रा. खाडिलकर ह्यांनीं " स्वयंवर " नाटक लिहिलें. 'मानापमान' नाटकांत रा खाडिलकर जर खाडिलकरी वळणापासून दहा मैल लांब गेलेले असले तर ' स्वयंवरांत ' खाडिलकरी वळणाचा पत्ताही नाहीं. ' स्वयंवर ' नाटक हें ' नाटक ' ह्या दृष्टीनें किती नंबराचें ठरेल ह्याविषयींहि मतभेदच होईल. मुख्यतः हा एकपात्री जलसा आहे व एकच पात्र एकसारखें गाऊन गाऊन दमूं नये म्हणून त्याला विश्रांति देण्यासाठींच इतर पात्रें घातलेलीं आहेत.

रा. रा. खाडीकरांचीं हीं जीं स्थित्यंतरें झालीं त्यांस कारण त्यांचें मन म्हणजे ' गंगाजल पाणी ' आहे हेंच होय. 'अग्नीपाशीं नवनीता'ची जशी स्थिति होते तशीच रा. रा. खाडीलकर व इतर विशिष्ट व्यक्ति ह्यांचा संबंध आला असतां खाडीलकरांची होते. अशा वेळींही कांहीं माणसें आपली खास गुणमालिका ( आपली Personality ) कायम ठेवूं शकतात. पण रा. रा. खाडीलकरांस तीं कायम ठेवतां येत नाहींत. ते त्या दुसऱ्या व्यक्तींत विरघळून जातात व निःशेष होतात. पण रा. रा. खाडीलकर हे ह्याप्रमाणें परगुणलीन होण्याचे अगोदर त्यांचें खाडीलकरी वळण म्हणून एक खचीत होतें. ह्यांतील विविधता, ओज, श्रीमंती, विपुलता व ध्वनिकाव्य ह्या सर्व गुणांचें आकलन करून आपण त्यास अद्भुत रस असें नांव देऊं व रा. रा. खाडीलकर ह्यांनीं मराठी रंगभूमीवर अद्भुतरसाचा अंक सुरू केला असें म्हणूं.

याप्रमाणें रा. रा. किर्लोस्कर हे महाराष्ट्र नाट्यवधूचे ‘ शृंगार ’ आहेत, रा. रा. गणपतराव जोशी हे ‘ वीररस ’ आहेत, रा. रा. गडकरी हे ‘ हास्य ’ व ‘ करुण ’ आहेत, आणि रा. रा. खाडीलकर हे तिचें ‘ अद्‌भुत ’ रसाचे लेणें आहेत. ह्या सर्व नाट्यभक्तांनीं महाराष्ट्र नाट्यसुंदरीस निरनिराळा साज चढविलेला आहे व तिला शक्य तितकी भूषविण्याचा त्यांनीं प्रयत्न केलेला आहे. ह्या प्रयत्नांमुळेंच गेल्या ५० वर्षांत महाराष्ट्र रंगभूमीचें इतकें सौंदर्यसंवर्धन झालेलें आहे कीं, तिचा इतरांना हेवाच वाटायला लागेल. महाराष्ट्रीय रंगदेवतेची खरी सेवा यांनींच केली व महाराष्ट्रीय रंगदेवतेची कीर्ति ह्यांनींच वाढविली. तिची ह्यापुढें जास्त सेवा करण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांनीं तिचे अंगावर जास्त लेणीं चढविलीं पाहिजेत व तिचें लावण्य सर्वांच्या नेत्रांना जास्त दिपवील असे प्रयत्न केले पाहिजेत. महाराष्ट्र–रंगदेवता त्यांनाच प्रसन्न होईल व त्यांनाच यशाच्या कोंदणांत कायमचें स्थान प्राप्त होईल.

रंगभूमीचें शास्त्र सध्यां स्थित्यंतराच्या चमत्कारिक चमत्कारांत आहे. कालिदासांपासून तों अण्णासाहेब किर्लोस्करांपर्यंत रंगभूमीवर जितकीं स्थित्यंतरें झालीं त्यापेक्षांहि ज्यास्त स्थित्यंतरें रंगभूमीवर घडायची वेळ सध्यां आलेली आहे. “ सायन्स ”चा वाढता पसारा अज्ञात सृष्टिशक्तींपैकीं अनेक शक्तींना मनुष्याचे आटोक्यांत आणीत आहे व ह्या शक्तींचा उपयोग हव्यासी नाट्यपुरस्कर्ते रंगभूमीच्या उत्कर्षाकडे करूं लागलेले आहेत. सिनेमाच्या योगानें अद्‌भुत गोष्टी रोजच्या व्यवहारांत येऊन बसलेल्या आहेत व कालिदासासारख्या कल्पना कोणास ज्याचें स्वप्नही पडलेलें नव्हतें असल्या गोष्टी रोजच्यारोज रंगभूमीवर घडत आहेत. जर आजच्या इतकें भौतिक शास्त्राचें परिवर्तन कालिदासाच्या वेळीं झालें असतें तर कालिदासानें काय गंमत केली असती त्याचीं नुसतीं रम्य चित्रें जरीं आपण आपल्या डोळ्यांपुढें उभीं केलीं तरी आपल्या मनाला मौज वाटायला लागते ! सध्यांचे शास्त्रीय शोध जर कालिदासाच्या काळीं असते तर त्याचा रथ इन्द्राच्या रम्य लोकांतून भूमीवर कोणत्या तऱ्हेनें उतरला असता व मधल्या मेघांचा त्याच्या रथाच्या चाकांनीं जो चुराडा उडाला तो कितीतरी विलक्षण तऱ्हेनें उडाला असता ! ज्यावेळी शास्त्रीय शोधांचें आधुनिक काळाइतकें प्राचुर्य नव्हतें त्यावेळीं ज्यानें इतक्या मनोहर कल्पना केल्या, त्याला जर शास्त्रीय शोधांचें साह्य असतें तर काय बहार केली असती व नाट्यसृष्टि कुणीकडच्या कुणीकडे नेली असती !

हा सर्व विचार केला म्हणजे महाराष्ट्र नाट्यदेवीची सेवा करायला किती प्रकारांनीं वाव आहे ह्याची कल्पना करायला सांपडते! अण्णासाहेबांपासून गडकऱ्यांपर्यंत कोणी कोणी महाराष्ट्र नाट्यदेवीवर कसकसे साज सजविले ह्याचें आपण निरीक्षण केलें. त्याच पद्धतीनें आणखीहि साज सजवायला तिचे भक्त पुढें आले पाहिजेत. कै. भाऊराव, कै. केशवराव, व रा. रा. बालगंधर्व ह्यांचे गायनसौष्ठवाचे दृष्टीनें प्रयत्न झालेले आहेत व हे प्रयत्न पुढेंही ज्यास्त कसोशीनें व ज्यास्त कळकळीनें व्हायला पाहिजेत; हे किंबहुना पाश्चात्य संगीत, पाश्चात्य नृत्यकला व पाश्चात्य अभिनय ह्यांचा पौर्वात्य संगीत व पौर्वात्य नृत्यकला ह्याच्याशीं मिलाफ करून रंगभूमीचें आकर्षकत्व सध्यांपेक्षां अनेक पटींनी वाढविलें पाहिजे. एवढेंच काय पण ज्या सायन्सचा वर उल्लेख केला त्या सायमन्सधील दर्दी लोकांची मदत घेऊन रंगभूमीच्या सजावटींत व हालचालींत इतकी विलक्षण क्रान्ति घडवून आणली पाहिजे कीं, स्वर्गलोकीची बिछायत पृथ्वीलोकावर आतांच पसरलेली आहे असें प्रेक्षकांस वाटून जगांत एखादी वस्तु प्रिय असेल तर ती रंगभूमीच होय असें वाटल्याखेरीज राहूं नये.

रसोत्कर्ष, गायन व सजावट ह्या तिन्हीं दृष्टींनें रंगभूमीची शोभा वाढविणें हीच महाराष्ट्र नाट्यदेवीची सेवा होय. त्यांपैकीं कोणी काय केलें हें वर सांगितलेंच आहे. सजावटीसंबन्धानें भयंकर स्थित्यन्तर करून रंगभूमीस कल्पनातीत रुचिर रूप द्यावें अशी महत्वाकांक्षा रा. रा. फाळके ह्यांनीं बाळगली व त्या दिशेनें प्रयत्नही केले. दुर्दैवानें ते प्रयत्न सिद्धीस गेले नाहींत. परन्तु त्यांचे ते प्रयत्न जरी सिद्धीला गेले नसले तथापि त्यांच्या अपूर्त इच्छा रंगभूमीचे आवाराभोंवतीं अतृप्त स्थितींत वावरत आहेत त्यांत संशय नाहीं. मध्यन्तरीं रा. रा. वरेरकर ह्याचें "सत्तेचे गुलाम" नाटक पुढें आलें त्यावेळीं त्यांनीं रा. पेण्ढारकर व काळे ह्यांच्या साह्यानें रंगभूमीची रचना आणि सजावट ह्यांच्यांत बरींच अभिनव स्थित्यंतरें केलीं व प्रेक्षकांनाही तीं प्रिय वाटलीं. ह्याच दिशेनें आणखी पुढेंही स्थित्यंतरें होणें जरूरीचें आहे, किम्वहुना आतां नवीन नाटकें जुन्या स्वरूपांत येणें योग्य नाहीं असें रा. रा. बालगंधर्व ह्यांच्या आशा-निराशा ह्या नाटकानें सिद्ध केलेलें आहे.

रंगभूमीचे हे सर्व प्रिय सेवक पाहिले म्हणजे मनाला उल्हास वाटतो व पुढील हजारपांचशें वर्षांत महाराष्ट्र रंगभूमि कोणत्या विलक्षण मनोहर स्वरूपांत दिसणार आहे ह्याबद्दल जिभेला पाणी सुटतें. महाराष्ट्र रंगभूमीचें तें भावी मनोहर रूप

पहाण्यास आधुनिक आयुष्याचा क्षीण तन्तु पुरणार नाहीं हें उघड आहे. तथापि त्या आज जन्मसंभव नसलेल्या नाट्यसेवकांस आनंदानें वन्दन करावेसें वाटतें, आज रंगभूमीच्या उत्कर्षासाठीं झटणाऱ्या सर्व कवींस व नटांस अभिनन्दनानें गौरवावेसें वाटतें व प्राचीन काळच्या कालिदासादि नाट्याचार्यांस आनन्दानें हृत्कमलावर स्थापन करावेसें वाटतें. कारण नाट्यसुन्दरीची प्रभा त्यांच्या योगानें आहे व त्यांचेच आशीर्वाद महाराष्ट्र रंगभूमीस उपयोगी पडलेले आहेत.

---

# हे तात्या आणि हे तात्या. *

यंदाच्या पुणें येथील साहित्य संमेलनास उद्यांपासून सुरुवात होणार असून त्याची विशेष गोष्ट अशी आहे कीं महाराष्ट्रांतील दोन तात्या त्यांत प्रमुखत्वेंकरून चमकणार आहेत. ह्यांपैकीं श्री. श्रीपाद कृष्ण उर्फ तात्यासाहेब कोल्हटकर हे साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष आहेत व श्री. नरसिंह चिंतामण उर्फ तात्यासाहेब केळकर हे साहित्यसंमेलनाचे स्वागताध्यक्ष आहेत.

× × × ×

तात्या हें नांव महाराष्ट्रास अगदींच अपरिचित नाही. स्वतःच्या मुख्य नांवापेक्षां घरगुती नांवानें प्रसिद्ध असणाऱ्या पुरुषांत नाना फडणीस हे प्रमुखच म्हटले पाहिजेत ! त्यांच्या घरगुती नांवानें ते एवढे प्रसिद्धीला पोंचले कीं नाना हें त्यांचें मूळ नांव नव्हे असें कोणाला सांगितलें तर पुष्कळ वेळां तें खरें देखील वाटत नाहीं. ह्या नाना फडणीसांच्या कारकीर्दीत व त्यांना अत्यंत साह्यभूत असे दुसरे पुरुष म्हणजे हरीपंत तात्या फडके झाले ! महाराष्ट्राला अतिशय आवडते असे हे तात्या होते.

**नानांत नाना फडणीस नाना**
**इतर नाना करिती तनाना**

ह्याप्रमाणें खडबडीत पण व्यावहारिक कवन करून नाना फडणीसांची स्तुति

---

* चाबुकस्वार २१ मे १९२७.

गाणारा ज्यावेळीं एक गुणग्राहक निघाला, त्यावेळीं तात्यांचाही एक गुणग्राहक त्यांची प्रसिद्धी करायला तयार झाला. त्यानें हरिपंत तात्यांना उद्देशून म्हटलें कीं,

**तात्यांत तात्या हरीपन्त तात्या**
**इतर तात्या करिती चपात्या.**

× × × ×

आणि हरिपन्त तात्यांसम्बंधानें हें जें म्हणण्यांत आलें तें आलें तें आजतागाईत श्रीपाद कृष्ण उर्फ तात्यासाहेब कोल्हटकर ह्यांच्यासंबंधानेंही खरें आहे. मराठींत आजपर्यंत अनेक नाटककार होऊन गेले व पुढेंही होतील! पण ह्या सर्व नाटककारांतील श्रीपाद कृष्णांची श्रेष्ठता अजूनही इतकी अबाधित आहे कीं, त्यांचेपुढें इतर सर्व नाटककार 'करिती चपात्या' असें म्हटलें तर तें अतिशयोक्तीचें होणार नाहीं!

× × × ×

कै. गडकरी ह्यांनीं अलिकडे नाट्यसिंहासनावर उडी मारलेली आहे व राजकीय भाषेंत बोलावयाचें म्हणजे सध्यां मराठी नाट्यकला गडकरी–राजवटींत आहे असें म्हटलें तरी चालेल! गडकऱ्यांनीं नाट्यकलेंत पाऊल टाकलें त्यावेळीं किर्लोस्कर–युग सम्पलेलें होतें व श्रीपाद कृष्णांचें युग चालू होतें. पण गडकऱ्यांनीं टिचकीसरशीं तें युग बन्द केलें आणि त्याचे जागीं आपली शिक्के–कट्यार सुरू केली. पण जरी ह्याप्रमाणें गडकऱ्यांची साम्राज्यसत्ता सुरू झाली व 'तात्यांच्या नाटकांचा मी सोमवार करीन' ही गडकऱ्यांच्या तोण्डीं चिकटविलेली उक्ती खरी झाली तरी त्यामुळें श्रीपाद कृष्णांच्या श्रेष्ठतेस बाध आला नाहीं. किंबहुना ह्या पराभवामुळें श्रीपाद-कृष्णांची श्रेष्ठता ज्यास्तच वाढली! कारण गडकरी हे श्रीपादकृष्णांचे शिष्य होते. गडकऱ्यांचें युग म्हणजे एके प्रकारें पेशवाईची स्थापना होती. ह्या सत्तास्थापनेमुळें नाट्यराजकारणाचें केन्द्र जरी बदललें तरी गादी कायम राहिली, मुजरा कायम राहिला.

× × × ×

आणि मुजरा कायम राहिल्यामुळेंच श्रीपादकृष्णाचें नाट्याधिष्ठान अजून कायम राहिलेलें आहे! गडकरी पन्थाचे ते प्रणेते आहेत–नावीन्याचे ते नायक आहेत–विनोदाचे ते विनायक आहेत! त्यांच्याइतका स्वाभाविक परिपोष कुणालाही साधत नाहीं! डायऱ्या आणि टांचणें ह्यांच्या मुंडावळ्यांशिवाय लिहितां लिहितां सहज सुचलेल्या

साहित्यसाजानें नाट्यभाषेला सजविणारा भाषासुवर्णकार जर कोणी असेल तर एकच श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे होत !

× × × ×

एवढेंच कीं श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे आज चलनी नाणें ( Current coin ) नाहींत. आजकालचें चलणी नाणें म्हणजे खाडिलकर, वरेरकर, शुक्र हे होत ! श्रीपाद कृष्ण म्हटलें म्हणजे कांहींतरी जुनी मोहोर आपण वापरीत आहोंत, कांहींतरी जुनी बातमी आपण वाचीत आहोंत असें वाटतें. आबासाहेब म्हाळस, विनायक कोंडदेव, भालचन्द्र कृष्ण वगैरे शब्द उच्चारल्याबरोबर जसा एकदम जुनेपणाचा भास होतो, त्याप्रमाणें श्रीपाद कृष्ण म्हटलें म्हणजे मागें उलटलेलें पृष्ठ ( Back Page ) आहे असें आपल्याला वाटतें.

× × × ×

पण त्याचें कारण हेंच कीं रा. रा. तात्यासाहेब हे सध्यांच्या जगाशीं जितके समरस असायला पाहिजेत तितके नाहींत ! ते एल्. एल्. बी. होऊन वऱ्हाडांत शिरले ते जिथें होते तेथेंच राहिले ! त्यांची सृष्टि म्हणजे तीस वर्षांपूर्वीची सृष्टि ! ह्या ३० वर्षांत जी घडामोड झाली ती त्यांच्या अंगावरूनही गेली नाहीं व त्यांना जाणवलीही नाहीं ! निजकोशांत तल्लीन असलेला भ्रमर किंवा निजानन्दांत निमग्न असलेलें परब्रह्म—ह्यांना ज्याप्रमाणें जगांतील वावटळीचा कांहींएक उपसर्ग पोंचत नाहीं त्याप्रमाणें श्री. तात्यासाहेब हे जगांतल्या वावटळीपासून अलिप्त आहेत !

× × × ×

एवढेंच काय, अजून त्यांच्या मनाभोंवतीं ३० वर्षांपूर्वींचीच सृष्टि आहे–३० वर्षांपूर्वींचेंच जग आहे ! त्यांचें संभाषण ऐकलें तरीहि पुराणयुगांतला हा पुराण-पुरुष आहे असेंच वाटतें ! अजूनही विधवावपनावर बोलतांना ते आपल्या अस्सल कोट्या काढतील व पुनर्विवाहाच्या प्रश्नावरून त्यांचा चेहरा जितका गोरामोरा होईल तितका असहकारी किंवा प्रतिसहकारी ह्या शब्दावरून होणार नाहीं ! त्याब-द्दलची फारशी माहितीही त्यांना असणार नाहीं ! कारण तात्यासाहेबांचा आणि सध्यांच्या जगाचा फारसा संबन्ध नाहीं. ना. पटेल जेव्हां इकडे बादशहाची मुला-खत घेत असतील त्यावेळीं जिन्याच्या पायऱ्या लक्षांत रहायची सोपी युक्ति कोणती ह्याचा विचार तात्यासाहेब करीत असतील आणि ज्यावेळीं कांग्रेसच्या वर्किंग कमि-

टीनें आपल्याला फसविलें म्हणून ऑल इंडियांतील माणसें धुसफुसत असतील त्यावेळीं दोन पिढ्यापूर्वी बाळासाहेब नातूंनीं केलेली दंगल आठवून तात्यासाहेब मनांत चरफडत असतील कीं " हे दुरात्म्या बाळासाहेबा, विविधज्ञानविस्तारांत तर चल, म्हणजे तुला दाखवितों ! "

× + × ×

श्रीपाद कृष्ण उर्फ तात्यासाहेब ह्यांची अशी अवस्था होण्याचें कारण म्हणजे त्यांचें खेडेगांवांतील राहणें ! त्यांना रहायला खेडेगांवेंही अशीं इरसाल मिळालीं कीं तेथें चालू धामधुमीच्या फारशा लाटा उठूंच नयेत ! वऱ्हाडांतील अकोला गांवीं त्यांनीं आपला वकीलीचा धन्दा सुरू केला व ते अखेरपर्यंत अकोला येथेंच असते तर कदाचित् अप–टू–डेट रहाते ! पण त्यांनीं लवकरच आपलें राहणें तेल्हारें गांवीं नेलें, व पुढें खामगांवाचा सम्पर्क होतो न होतो तोंच जळगांव–जामोद येथें रहायला गेले ! अर्थात् जळगांव–जामोद म्हणजे आधुनिक जगांतलें टिम्बक्टूच ! तें कुठें आहे म्हणून विचारलें तर कुणाला सांगतां यायचें नाहीं ! फक्त केव्हांतरी व कुठेंतरी त्याचें नांव ऐकलेलें असायचें !

× × × ×

कुग्रामवासाविषयीं एका प्राचीन संस्कृत कवीनें आपली नापसंती प्रदर्शित केलेली आहे. ही नापसंती किती सार्थ होती व कुग्रामवासाचे किती शोचनीय परिणाम होतात ह्याचें ढळढळीत उदाहरण बघावयाचें असल्यास श्री. श्रीपाद कृष्ण उर्फ तात्यासाहेब होत ! ते जगाच्या मागें राहिले ह्याचें कारण ते चालू जगांत कधीं राहिलेच नाहींत. ध्रुवस्थान ज्याप्रमाणें जगाच्या गाऱ्याभिगाऱ्यापासून अलिप्त राहून आपल्या श्रेष्ठ दर्जावर गुपचूप बसलेलें असतें, त्याप्रमाणें श्री. श्रीपाद कृष्ण हे जन–संमर्दा-पासून अत्यन्त दूर अशा आपल्या श्रेष्ठ स्थानावर बसलेले आहेत. जगांत असूनही आपण जगांत कसें नाहीं ह्याची त्यांना जाणीवही नाहीं.

× × × ×

दुसरे तात्यासाहेब म्हणजे श्री. नरसिंह चिंतामण उर्फ तात्यासाहेब केळकर. ह्यांची गोष्ट ह्याच्या अगदीं उलट आहे, ते आधुनिकांतले आधुनिक आहेत. त्यांच्यांत जुनेंपानें असें कांहींच नाहीं. व्यासंगाच्या अभावामुळें श्री. गंगाधरराव देशपांडे जितके मागें पडले किंवा व्यासंगाच्या एकदेशीयत्वामुळें श्री. शिवरामपंत परांजपे

जितकें मागें पडले तितकेही रा. रा. केळकर मागें पडलेले नाहींत! ते अगदीं आधुनिकांतले आधुनिक आहेत—" मॉडर्नां " तले " मॉडर्न " आहेत!

× × × ×

ह्याचें एक कारण त्यांची चवकस बुद्धी व दुसरें कारण त्यांचा वर्तमानपत्राचा व्यवसाय! चवकस बुद्धि नसली तर वर्तमानपत्राचा व्यवसाय असूनही खाडील-करांसारखीं माणसें जुनींपुराणीं होऊं शकतात आणि वर्तमानपत्रासारखा व्यवसाय किंवा राजकारणाची रोजचीं उठाठेव नसली तर चिन्तामणराव वैद्यांसारख्या चवकस माणसावर देखील जुनेपणाची हिरवी छाया पडायला लागते! पण तात्यासाहेब केळकरांना दोन्ही आहेत! त्यांचेजवळ राजकारणाचा रोजचा प्रपंचही आहे व चवकस बुद्धिही आहे–आणि एखाद्या घासलेल्या तरवारीप्रमाणें त्यांची मेंदूची तरतरी चकचक चकाकणारी आहे.

× × × ×

आणि म्हणूनच साहित्यसंमेलनांतील दोन तात्यासाहेबांचा संयोग म्हणजे प्राचीन युग आणि अर्वाचीन युग ह्यांचा संयोग आहे! कृतयुग जर कलियुगाला भेटायला आलें किंवा अश्वत्थामा जर ब्रिटिश पलटणींत उभा राहिला तर ज्या-प्रकारचा संयोग दिसेल तशा प्रकारचा संयोग ह्या दोन तात्यासाहेबांच्या योगानें साहित्यसंमेलनांत दिसणार आहे! कारण श्रीपाद कृष्ण म्हणजे प्राचीन जग आणि नरसोपन्त केळकर म्हणजे वर्तमानपत्राचा ताजा अंक! मौज पत्राच्या पहिल्या पानावर वेद छापावे किंवा वेदाच्या एखाद्या अध्यायांत बालगंधर्वाचें " लेटेस्ट " पद आढळावें त्यांतीलच हा संयोग होय! यंदाच्या संमेलनाला निदान ह्या एका गोष्टीनें जरी अपूर्वता आली तरी त्यांत आश्चर्य नाहीं!

× × × ×

दोघां तात्यासाहेबांत हा जसा एक मोठा फरक आहे, तसा आणखीही एक फरक आहे. दोघेही तात्यासाहेब रसिक आहेत, प्रेमळ आहेत, रंगदार आहेत, रंगेल आहेत–तथापि एकाचे स्वभावांत भयंकर लाजाळूपणा आहे आणि दुसऱ्याचें स्वभावांत तितकाच ढकलबाजपणा ( Pushingness ) आहे! एकाच्या पुढें पक्वान्नाचें ताट वाढलेलें असलें तरी दुसरे काय म्हणतील ह्या भीतीनें ते जपून

खातील तर दुसरे खुलेपणानें पक्वान्नावर हात मारतील आणि पुन्हां वर असें म्हणतील कीं, 'कायहो, जिलब्याच जिलब्या झाल्यामुळें तोण्डाला कशी मिठी बसलेली आहे ! ह्यावेळीं जर चार खुसखुशीत भजीं असतीं तर काय बहार झाली असती !"

× × × ×

किंबहुना तात्यासाहेब केळकरांच्या लोकप्रियतेचें हेंच बीज आहे ! ते कुठेंहि गेले तरी मनमोकळेपणानें घरच्यासारखे वागतील आणि लहानापासून थोरांपर्यंत आवडणाऱ्या प्रत्येक विषयांत लक्ष्य घालतील. तात्यासाहेब कोल्हटकरांचें तसें नाहीं ! त्यांच्या भोंवतीं नेमकीं ३।४ माणसेंच आहेत तोंपर्यंत ते खुलेपणानें बोलतील पण ज्यास्ती माणसें जमायला लागलीं कीं तात्यासाहेबांच्या तोण्डाला कुलूप बसलेंच. तात्यासाहेबांच्या या संकोचीपणाचें अनेक वेळां सभाभीरुत्वांत रूपांतर झालेलें आहे ! ते जेव्हां सभेंत बोलतात, तेव्हां फारच चांगलीं भाषणें करतात पण ते सभेंत बोलायला येतातच कशाला ? येतच नाहींत ! त्यांना संकोच वाटतो ! ते " अप्सेट " होतात !

× × × ×

साहित्यसभा ही एक शकुंतला आहे अशी जर कल्पना केली तर तात्यासाहेब केळकर व तात्यासाहेब कोल्हटकर हे शकुंतलेच्याबरोबर दुष्यंत राजाच्या राजवाड्यांत गेलेले दोन ऋषिकुमार आहेत असें म्हणायला कांहीं हरकत नाहीं ! त्यांपैकीं एकाला सभा आणि थाट आणि गर्दी म्हणजे अगदीं कण्टाळा—दुसऱ्याला त्याची अतिशय हौस ! त्याला उलट हाच आनन्द कीं शकुंतलेला पोंचविण्याच्या डेप्युटेशनवर आपण आलों हें सर्व लोकांना समजावें आणि दुष्यन्त राजाशीं शेकहॅण्ड करायला आपल्याला मिळालें ह्याच्या तारा चोहोंकडे जाव्या !

× × × ×

ह्या दोघांच्या स्वभावांतला हा जो फरक त्याचा परिणाम दोघांच्याही आयुष्यावर झाला ! तात्यासाहेब केळकर व तात्यासाहेब कोल्हटकर हे डेक्कन कॉलेजपासून एकमेकांचे मित्र—एकमेकांचे अनुबन्धी ! दोघांचें सख्य फार, आपुलकीही मोठी ! तात्यासाहेब केळकर आणि तात्यासाहेब कोल्हटकर ह्या दोघांनींही डेक्कन कॉलेजमधील संस्कृत मृच्छकटिक नाटकांत काम केलेलें ! तात्यासाहेब केळकर ह्यांनीं मदनिकेचें काम केलेलें व तात्यासाहेब कोल्हटकर यांनीं शकाराच्या विटाचें काम

केलेलें ! डेक्कन कॉलेजांतून सुटल्यावर वीरतनय नाटक लिहून तात्यासाहेब कोल्हटकर हे केळकरांच्या अगोदर जगाच्यापुढें आले ! अभ्यासाकडे लक्ष देऊन तात्यासाहेब केळकर हे कोल्हटकरांच्या अगोदर एल्. एल्. बी. झाले. १८९७ सालीं केसरींत येऊन मिळण्याबद्दल केळकरांनीं श्रीपाद कृष्णांना पत्रही लिहिलेलें होतें.

× × × ×

पण श्रीपाद कृष्णांनीं अकोल्याचा मार्ग धरला आणि तेव्हांपासून दोघांच्या आयुष्यक्रमांत फरक पडला ! श्रीपाद कृष्णांचा जगाशीं संबंध सुटत चालल्यामुळें एकएका पावलानें ते जगाच्या मागें पडत चालले आणि रोजच्या जगांत धांवण्याची आवश्यकता पडल्यामुळें एकएका पावलानें नरसोपन्त केळकर जगाच्या पुढें आले ! आज सम्पत्ति, कीर्ति, प्रतिष्ठा, सत्ता ह्या सर्व दृष्टीनीं नरसोपन्त केळकर हे श्लाघ्य व श्रेष्ठ पदावर आहेत आणि श्रीपाद कृष्णांची खाजगी किंवा साम्पत्तिक स्थिति सोडून दिली तरी लढाईत दाणादाण झालेल्या एखाद्या सेनापतीप्रमाणें त्यांची स्थिति आहे ! सी. आर दासप्रमाणें किंवा जोशी–खापर्ड्यांप्रमाणें देखील वकील म्हणून त्यांची कीर्ति नाहीं–राजकारणांत ते कोणीही नाहींत–सामाजिक बाबतींत कोणतीही विशेष कृति त्यांच्या हातून झालेली नाहीं–"मूकनायका" शिवाय त्यांचें एकही नाटक, आज रंगभूमीवर नाहीं–एकाही नाटक कम्पनीवर त्यांचें वजन नाहीं–ते उत्तम गणिती किंवा ज्योतिषी आहेत हेंही लोक विसरून गेलेले आहेत !

× × × ×

तेव्हां दोघां तात्यासाहेबांकडे पाहिलें म्हणजे हें चित्र पहा आणि हें चित्र पहा असें म्हणण्याची पाळी येते ! केळकरांचें आयुष्य यशस्वी दिसतें–श्रीपाद कृष्णांच्या आयुष्यावर Failure ( निष्फळ ) असा एक मोठा 'फ'कार किंवा नकार दिसूं लागतो ! आणि ह्याचें कारण काय, तर श्रीपाद कृष्णांनीं चालू जगावर आपली पकड Hold ठेवली नाहीं ! नरसोपन्तानीं ह्याच्या उलट वर्तन ठेवलें ! ते चालू जगांत राहिले–चालू जगांत पोहले–चालू जगाशीं लढले व चालू जगांत मिसळले ! त्यांच्या ढकलबाज स्वभावामुळें प्रत्येक परिस्थितींतून ते सहीसलामत बाहेर पडले ! त्यांना सातव्या मजल्यावर कोण्डलें तरी ते पहिल्या मजल्यावरून बाहेर पडले व पहिल्या मजल्यावर कोंडलें तरी तळघरांतून निसटले ! चालू जगाशीं संबन्ध आल्यामुळें त्यांची बुद्धि अत्यन्त कुशाग्र राहिली ! बुद्धिमत्तेंत त्यांचा ' नम्बर ' पहिला लागला.

× × × ×

तात्यासाहेब केळकरांच्या बुद्धिमत्तेसंबंधानें चाबूकस्वारमध्येंच अनेकवेळां लिहिण्याचा संबन्ध आलेला असल्यामुळें त्याविषयीं पुनरावृत्ति करण्याची जरूरी नाहीं ! बुद्धीची कुशाग्रता, व्यापकता, सुपूर्तता व चपलता ह्या चारी गुणांनीं त्यांची तुलना कै. महादेव गोविन्द रानडे ह्यांच्याशींच करावी लागते. रानड्यांच्या वेळेपासून इतका बुद्धिमान् पुरुष महाराष्ट्रांत झालाच नाहीं म्हटलें तरी चालेल ! अनेक प्रसंगीं कै. लो. टिळकांपेक्षां केळकरांनीं सरस बुद्धिमत्ता दाखविलेली आहे ! व्यासंगांत तर ते कोणापेक्षांहि खात्रीनें सरस आहेत.

× × × ×

ह्याचे उलट श्री. तात्यासाहेब कोल्हाटकरांच्याकडे पाहिलें म्हणजे सेंट हेलेना बेटांतील तुरुंगवासांत एखाद्या खडकावर शून्य दृष्टीनें बसलेल्या नेपोलियन् बोनापार्टाच्या चित्राची आठवण होते ! त्याचें राज्य गेलेलें आहे, त्याचें वैभव गेलेलें आहे, पंचवीस वर्षांपूर्वी असलेला त्याचा दरारा गेलेला आहे–आणि आतां मूकभाषेंत समुद्राच्या लाटांना आपलें मनोगत सांगत तो एकान्तवासांत बसलेला आहे !

× × × ×

आणि इतकें असूनही श्री. श्रीपाद कृष्ण हे नेपोलियन् आहेत हें लक्ष्यांत ठेवले पाहिजे ! जरी खाडिलकरांच्यापुढें त्यांचा पराभव झालेला असला, जरी गडकऱ्यांनीं त्यांचीं नाटकें सोमवारावर नेलेलीं असलीं, जरी त्यांना " या बसा " म्हणायला बालगंधर्वांना वेळ नसला, किंवा जरी नरसोपन्त केळकर हे ड्यूक ऑफ वेलिंग्टन्-प्रमाणें यशस्वी वीर म्हणून सम्पत्ति, मानमरातब कीर्ति किंवा सत्ता ह्यांनीं अलंकृत असले तरी सेंट हेलेना—मधील हा आधुनिक नेपोलियन् महाराष्ट्राचा नेपोलियनच ठरेल. त्याच्यापासून हजारों तरुणांला स्फूर्ति मिळेल, हजारों रसिक त्याचे गुणांवर डुलतील, हजारों लेखक त्याचें अनुकरण करायला लागतील व हजारों देशबान्धव त्यांचेवर पुष्पवृष्टि करायला लागतील.

× × × ×

आम्हीहि सहस्रावधि सुरुचिर कल्पना प्रसविणाऱ्या त्यांच्या सहस्रशीर्षांवर आज प्रेमभावांची कुसुमवृष्टि करीत आहों ! श्रीपाद कृष्ण हे आमच्या प्रेरणांचे जनक नव्हेत, त्यांच्या परंपरेंत आम्ही कधींहि नव्हतों आणि तरीहि मराठी भाषेंत नावीन्यमय कल्पनांचे किती निसर्गसुंदर कालवे त्यांनीं खोडलेले आहेत हें पाहून

आम्ही सरस्वतीच्या या लाडक्या सुपुत्रास आपली प्रणति अर्पण करीत आहोंत ! त्यांचे अवगुण आम्हांस माहीत आहेत ! त्यांचे अवगुण आम्हाला लक्ष्यांत ठेवायलाच पाहिजेत. पण त्यामुळेंच त्यांचे अनुपम गुण आम्हांस ज्यास्तच अनुपम वाटतात आणि प्रेमभावनांच्या वरचा ताबा नाहींसा होऊन त्या सर्वेच्या सर्व मराठी भाषेच्या ह्या शाहिराच्या गुणांस जाऊन बिलगतात ! आणि म्हणूनच श्री. श्रीपाद कृष्ण उर्फ तात्यासाहेब ह्यांच्यासारखा लायक अध्यक्ष निवडल्याबद्दल साहित्य-परिषदेचे आम्ही अत्यन्त आभारी आहोंत !

---

## ब्राह्मण–अब्राह्मण*

ह्या विषयासंबन्धानें अत्यंत गंभीरपणानें लिहिण्याचें आम्ही ठरविलेलें आहे, कारण ज्यावेळीं एखादा नवीन प्रश्न उद्भवून दोन्ही पक्षांचीं मनें एकमेका-संबंधानें गैरसमज प्रसृत करून घ्यायला तयार होतात त्यावेळीं त्या विषयासंबंधानें जितक्या तन्मयतेनें विचार करावा तितकें चांगलें असें आम्हांस वाटतें. ब्राह्मण–अब्राह्मण हा प्रश्न तूर्त अशा स्वरुपाचा झाला आहे कीं येथें एक गाफील शब्द, निष्काळजीपणानें केलेला वाक्यप्रयोग अथवा पूर्ण तात्पर्य लक्षांत घेतल्यावांचून केलेली एक अर्थरचनाही इतकी अनर्थकारक होण्याचा सम्भव आहे कीं तिच्या निराकरणाकरतां पाठीमागून जरी स्पष्टीकरणाचें रांजणहि ओतले तरी झालेला दुष्परिणाम कधींही नाहींसा करतां यावयाचा नाहीं. अत्यंत श्रद्धालु अंतःकरणानें आणि बंधुप्रेमाच्या अत्यंत निर्भरतेनें संदेशमध्यें लिहिलेल्या एकदोन गोष्टींचा, जाणून बुजून म्हणा अथवा नेणतेपणानें म्हणा, कसा विपर्यास केला गेला आहे त्याची आम्हांस नुक्तीच आम्ही वर्धा येथें गेलों असतांना दुःखद प्रतीती आलेली आहे. तेव्हां अशा प्रसंगाची पुनरावृत्ति होऊं नये आणि आम्ही ज्या अर्थानें एखादी गोष्ट लिहितों त्याच अर्थाचा विनचूक ठसा वाचकांच्या मनावर उमटावा ह्याकरतां आजच्या लेखाला गंभीर पद्धतीचा अवलंब करणें हेंच इष्ट आहे.

आम्हांस प्रथमारंभींच हें सांगून ठेवलें पाहिजे कीं ब्राह्मण–अब्राह्मण ह्या चळवळीचा आम्हांस यत्किंचित्‌सुद्धां विषाद वाटत नसून ही आपल्या देशांत

---

* संदेश, २८ एप्रिल १९२०.

उत्पन्न झाल्याबद्दल आम्हांस अंतःकरणपूर्वक आनंद होत आहे. ब्राह्मण—अब्राह्मण चळवळ उद्भवली म्हणजे त्याचा अर्थच असा कीं हिंदुस्थानांतील जनता आतां खडबडून जागी झाली असून आमचे हक्क आम्हांस पाहिजेत अशी आकांक्षा तिचे मनांत उत्पन्न झाली आहे. जोंपर्यंत ब्राह्मण-अब्राह्मणांचें द्वंद्वयुद्ध देशांत चालू नव्हतें तोंपर्यंत देश मेलेला होता, तोंपर्यंत देशाच्या भावना विकारांच्या चुलाण्यावर उकळूं लागलेल्या नव्हत्या. आतां ब्राह्मण—अब्राह्मण हा प्रश्न उद्भवलेला आहे आणि ही एकच गोष्ट असें दाखविते कीं येथें शिक्षणाची, ज्ञानाची, महत्वाकांक्षेची, स्वाभिमानाची आंच प्रत्येक व्यक्तीला लागलेली आहे. देशांतले इतके अणू आणि परमाणू स्वाभिमानाच्या कढईवर थैथैथै नाचूं लागले असतांना देश खळबळल्याशिवाय राहील असें होईल तरी कसें ?

तेव्हां ह्या लेखाच्या आरंभीं आम्ही अगोदर ब्राह्मण—अब्राह्मण या चळवळीचें अभिनन्दन करून सर्व चळवळींचा अधिष्ठाता जो परमेश्वर त्याचे अत्यन्त उपकार मानतों. आमचा हा हिंदुस्थान देश नम्रपणा, नरमपणा, भ्याडपणा, सोशीकपणा ह्या सर्व खालमान्या दुर्गुणांमुळें इतक्या असहाय दशेला पोंचलेला आहे कीं, राष्ट्राच्या अस्तित्वाला लागणारी क्रोधाची मूस जणूं हिंदुस्थानांतून नाहींशीच झालेली आहे. हा देश मूळ आम्हां भारतीयांचा असतांना तो आमच्या हातांतून नाहींसा झाला ह्याचें कारण क्रोधाचा आमच्या देशांत झालेला अभाव हें होय. आमच्या देशांत जर आम्हांला कांहीं मिळवायचें असेल तर आमचा मेलेला राग आम्हांला परत मिळवायचा आहे. आमच्यांतला राम वनवासाला गेलेला नाहीं, सीता चोरून नेलेली नाहीं, पाण्डव अज्ञातवासांत अडकलेले नाहींत, शिवाजी दिल्लीच्या कैदेंत पडलेला नाहीं, राजाराम जिन्जीवासांत गुंतला नाहीं, कांहींएक नाहीं. होमरूलच्या चळवळींत ध्वनित केल्याप्रमाणें आमचें स्वराज्यही आम्हांला परत आणायचें नाहीं. आम्हांला काय परत आणायचें आहे ? आम्हांला काय परत आणायचें आहे ? आम्हांला दुसरें कांहींएक परत आणायचें नाहीं. आम्हांला आपला राग परत आणायचा आहे.

अरे म्हटलें कीं कारे, कोण म्हटलें कीं आम्ही, कुठला म्हटलें कीं इथला—ह्या हिंदुस्थानांतला, ही प्रवृत्ती आपण विसरलेलों आहों, ही प्रवृत्ती आपल्यांतून नष्ट झालेली आहे आणि हेंच सर्व आपल्या हीन स्थितीचें मूळ आहे ! आजपर्यंत हिंदुस्थानांत राजे रहात होते, जनता रहात नव्हती; आजपर्यंत हिंदुस्थान देश राजे लोकांचा होता, जनतेचा नव्हता ! ती जनता, तो लोकसमुदाय, तो देशांतील नाग-

रिकांचा प्रचंड संघ आतां खडबडून जागा झाला आहे आणि ह्या जागृत झालेल्या हजारों मुखांच्या नरसिंहकंठांतून ब्राह्मण–अब्राह्मण, ब्राह्मण–अब्राह्मण, अशी घनगर्जना सुरू झालेली आहे.

ही गर्जना वाईट कशी असेल ! हा नरसिंह हिरण्यकश्यपूचें पोट फाडील पण त्याच्याजवळ प्रल्हाद उभा असेल ! हा नरसिंह आपलीं प्रखर नखें एखाद्या असुराच्या उदरांत रोंवील, पण तो जगाला जुलमांतून सोडवील. ही गर्जना जर तुम्हांला नको असेल तर असें म्हणा कीं आम्हांला ईश्वराचे अवतार नकोत, असें म्हणा कीं राम-रावणयुद्धाबद्दल आम्हांला दुःख होतें. असें म्हणा कीं श्रीकृष्णानें केलेलें कंसकन्दन आम्हांला शरम आणणारें आहे.

ब्राह्मण–अब्राह्मण म्हणून गर्जना करीत उठणारा आजचा जनतारूपी नरसिंह जर पृथ्वीराज चव्हाणाचे काळीं जागृत असता तर महंमद घोरीची हिंदुस्थानांत पाऊल टाकण्याची प्राज्ञा नव्हती. जर हा नरसिंह एकसारखा गुर्र गुर्र गुर्र करीत सह्याद्रीच्या टोंकावर बसला असता तर रामदेवराय यादवाचें राज्य खिलजीच्या पंज्याखालीं कधीं सांपडलें नसतें एवढेंच काय, तर हा नरसिंह आपलीं नखें पाजळीत आणि जिव्हा ळळळळ् ळळळळ् करीत कृष्णेच्या, भीमेच्या आणि गोदावरीच्या तीरावर एकसारखा जागत बसला असता तर शत्रूच्या गोटांत पळण्याची राववाजीला छाती झाली नसती.

मित्रहो ! आपला दोष हाच कीं ही आपली जनता कधीं खवळली नव्हती. राग हा पदार्थ जनतेला माहीत नव्हता. सर्व जनता म्हणजे मिसमिशीत, पचपचीत अशी भेज्याची भाजी झालेली होती.

अशा स्थितींत आपलें काय हरवलेलें होतें असें आपल्याला वाटतें ? आपलें स्वराज्य काय ? नाहीं. आपलें वैभव काय ? नाहीं. आपलें स्वातंत्र्य काय ? नाही. आपलें एकच हरवलेलें होतें. आपला राग हरवलेला होता. जनतेच्या अंगांतला हा राग कायम असूं द्या कीं मी तुम्हांला सांगतों कीं ज्याप्रमाणें वांद्र्यांतला कसाई गाईच्या मानेला हिसडा देऊन तिला फर्ररदिशीं ओढून आणतों त्याप्रमाणें स्वराज्य, स्वधर्म, सौख्य ह्यांना आपल्याला पांच मिनिटांत ओढून आणतां येईल.

ज्यावेळीं कंसानें हिंदुस्थानावर नानाप्रकारचा जुलूम केला त्यावेळीं त्याच्यावर जनतेनें *कां डोळे वटारले* नाहींत ? ज्यावेळीं दुःशासनासारख्या अधम मनुष्यानें

रजस्वला स्त्रीच्या मंदिरांत शिरून तिचें केशाकर्षण करायला धजला त्यावेळीं जनतेनें त्याच्यावर डोळे कां वटारले नाहींत? ज्यावेळीं प्रत्यक्ष आपल्या सावत्र आईला संभाजीनें भिंतींत चिणलें, त्यावेळीं 'मूर्खा, काय करतोस हें?' असें म्हणून महाराष्ट्रांतील जनतेनें त्याच्या वाड्यांत कां दंगल केली नाहीं? याचें कारण एकच. दोस्तहो, याचें कारण एकच. मित्रानों, याचें एकच कारण कीं, हिंदुस्थानांतील जनतेंतला राग नाहींसा झालेला होता. हिंदुस्थान देश राजांचा देश होता, जनतेचा देश नव्हता. ह्या देशांत वाटेल त्यानें यावें आणि वाटेल तसा धूडगूस घालावा पण विचारणार कोण? कारण जनतेंत राग नव्हता. राग ह्या चिजेला हिंदुस्थानांतील जनता पारखी झालेली होती.

राग? राग कशाला? कशाला राग? हिंदुस्थानांत सुदैवानें त्यावेळीं एखादा राजा असेल तर तो शत्रूंचें कंदन करील. राजा नसेल तर हिंदुस्थान शत्रूंच्या हातांत जाईल. जनता! हिंदुस्थानांतील जनता आणि जनावरें सारखींच! त्यांना राग, क्रोध, चीड, यापैकीं कांहीं एक नाहीं, वाटेल ते या आणि जनतेस वाटेल तसे नाचवा, त्याबद्दल जनतेला क्रोध वगैरे कांहीं एक विकार नाहीं.

आज हिंदुस्थानची जी विपन्न दशा आपण पहातों याचें कारण वाटेल तसें ऐकून घेण्याची हिंदुस्थानांतील लोकांना लागलेली संवय होय. काय? तुम्ही आम्हांला महार म्हणतां? बाहेर बसवतां? आमचा विटाळ समजतां? आमच्या वाडवडिलांना कःपदार्थ लेखतां? कांहीं हरकत नाहीं. मी निमूटपणें तुमचें ऐकेन. गळ्यांत मडकीं अडकवीन पण तुमचें ऐकेन. गांवाच्या बाहेर महारवाड्यांत राहीन पण तुमचें ऐकेन. अशा प्रकारची हीन संवय हिंदुस्थानांतील जनतेला लागली, लावली, शिकवली गेली, त्याचा परिणाम आजचा मेषपात्रपणा होय. ज्या दिवशीं पहिल्या महाराला अस्पृश्य म्हणून गांवाबाहेर हांकलून दिला त्या दिवशीं जर महाराष्ट्रांत दंगल झाली असती तर आजचा सर्व अनर्थ टळला असता. परन्तु तें होणार कसें? दुसरे म्हणतील तें मान खालीं घालून ऐकावें हें आजपर्यंत हिंदुस्थानांतील जनतेंत चालत आलेलें आहे. वर मान काढूं नका असें त्यांना शिकवलेलें आहे. वाटेल तें सोसा पण जिवंत रहा असें त्यांना शिक्षण देण्यांत आलेलें आहे. जान गेली तरी हरकत नाहीं पण अपमानाचा एक शब्द सहन करणार नाहीं असली प्रदीप्त—धगधगित परम्परा शिकविलेली नव्हती हेंच त्याचें कारण आहे. ह्याच्या उलट जर प्रकार

असता तर एकेकाळीं सुवर्णभूमी म्हणून गाजलेलें हें हिंदुस्थान, त्याच्या हातांत नारळाची नरोटी कधींही आली नसती.

आम्हांला रागावणारीं माणसें पाहिजेत. आगकाडीच्या काडीप्रमाणें ज्याचा स्वाभिमान तावडतोब पेट घेतो अशीं माणसें आम्हांला पाहिजेत. हीन शब्द बोलल्यावरोवर त्याच्यावर भडकणारीं माणसें आम्हांला पाहिजेत. खालीं जागा दिल्याबरोबर खुनशीपणानें मिशीला पीळ देणारीं माणसें आम्हाला पाहिजेत. "युद्धे चाप्यपलायनम्" अशीं माणसें आम्हाला पाहिजेत. लढाईच्या गर्दीत मारूं किंवा मरूं अशा त्वेषानें पुढें सरणारीं माणसें आम्हांला पाहिजेत. अपमानाचा शब्द बोलल्यावरोबर रागानें लाल डोळे करणारीं माणसें आम्हांला पाहिजेत. अपमानाचा शब्द कीं मुसकटींत थप्पड, अशीं माणसें आम्हांला पाहिजेत. आम्हांला रागीट जनता पाहिजे. क्रोधाला न विसरलेली जनता आम्हांला पाहिजे. ज्यांच्या हृदयांतील क्रोधाचा धगधगीत निखारा शरीराच्या जड कवचाच्या त्वचेंतून स्पष्टपणें बाहेर दिसत आहे अशी रागीट जनता आम्हांला पाहिजे. अरे, असें बोलूं नको नाहींतर रागाच्या भरांत हा काय करील आणि काय न करील याचा नेम नाहीं, असें ज्यासंबंधानें निर्धोकपणें सांगतां येईल अशी रागीट, तिखट, तजेलदार, हिरवट, अत्यंत मानी, अतिशय भांडकुदळ अशी जनता आम्हांला पाहिजे. बोला, मित्रानों बोला, दोस्तहो उत्तर द्या, तरवारीच्या धारेप्रमाणें अत्यंत तीक्ष्ण, विकट, आणि भयोत्पादक अशी जर जनता हिंदुस्थानांत बाहेरच्या चौकीपासून तों अंदरच्या दिवाणखान्यापर्यंत असती तर हिंदुस्थानचें स्वातंत्र्य, स्वराज्य, राजलक्ष्मी अशा लाजीरवाण्या तऱ्हेनें तिच्यापासून हिरावून घेणें शक्य झालें असतें काय?

परन्तु ह्या गोष्टी गेल्या ह्याचें कारण हिंदुस्थानांतली जनता दुबळी झाली. तिच्यांत राग उरला नाहीं, तेज उरलें नाहीं, स्वाभिमान उरला नाहीं, ती जडाहून जड झाली, पाषाणाहून निर्बुद्ध बनली, मृत्तिकेपेक्षां तिची माती झाली. हिन्दुस्थानला पुन्हां हालवायचा असेल तर हिच्यांत तेज भरा, स्वाभिमान पेटवा, हिंमतीचा भडका उडवा, असें कांहींतरी करा. तर तुमचा हिन्दुस्थान तुम्हांला परत मिळेल, तुम्ही स्वराज्यावर शोभाल, होमरूलच्या सुवर्ण–शृंगारावर तुम्हांला आरूढ व्हायला सांपडेल. जनता जिवन्त नाहीं आणि होमरूल मागतां? तें तुम्हांला कसें मिळेल? तुमचें पहिलें कर्तव्य हें कीं तुम्ही जनतेला जागृत केलें पाहिजे.

आणि म्हणून ब्राह्मण–अब्राह्मण चळवळीचें आम्हांस वैषम्य वाटत नसून तो आम्हांला स्वराज्याचा पाया वाटतो. त्याचें आम्ही प्रेमानें अभिनन्दन करतों. त्याचें आम्ही आनंदानें स्वागत करतों. ब्राह्मण–अब्राह्मण चळवळ म्हणजे काय ? महार म्हणतात आम्ही कमी योग्यतेचे नाहीं. चांभार म्हणतात अस्पृश्य नाहीं. वाणी उदमी म्हणतात आम्ही हलके नाहींत. ते माननीय क्षत्रिय म्हणतात, आम्ही श्रेष्ठ आहोंत, रजपूत म्हणतात आम्ही तुमच्या बरोबरीचे आहोंत. सर्व जण म्हणतात ओढा, ओढा, त्या ब्राह्मणांना ओढा, तेच काय म्हणून श्रेष्ठ ? आम्हीही त्यांच्याच बरोबरीचे आहोंत ! अरे हो विसरलों ! आम्ही त्यांच्यापेक्षांही श्रेष्ठ आहोंत !

बस्स ! जें ऐकायचें तें ऐकलें ! ज्याच्या करितां आजपर्यंत तपश्चर्या केली ती तपश्चर्या आतां फळाला आली ! ज्याचा पाया रचला ती इमारत बांधली गेली ! काय ? काय हा मधुर शब्द ? हिंदुस्थानांतली जनता–आम्ही हलके ? हिंदुस्थानची जनता आतां असें म्हणूं लागली आहे कीं चला, उठा, सिंहासन सोडा, आम्हीही तुमच्याच बरोबरीचें असेच आहों !

स्त्रिया, अस्पृश्य, ब्राह्मणेतर, कांग्रेस, होमरूल या स्वराज्याच्या शिड्या आहेत असें आम्ही पूर्वीच म्हटलेलें आहे. मोठमोठ्या संस्था आतां नवीन तत्वावर भांडूं लागल्या आहेत, आपल्या हक्कांचें संरक्षण करायला लागलेल्या आहेत. माझ्या हक्कांचा हिस्सा आतां टाका असें म्हणत ते आतां पाठीस लागलेले आहेत. हीं भांडणें स्वराज्यस्वर्गाचा दरवाजा उघडून टाकतील, दारिद्र्याला पायांखालीं तुडवतील, अशा निर्धाराचीं तरुण माणसें आतां पुढें येऊं लागलेलीं आहेत. ह्याचा कंटाळा करूं नका. असा निश्चय केलेलीं तरुण माणसें आतां निघायला लागलेलीं आहेत. झालेला अन्याय रात्रंदिवस डोळ्यांपुढें ठेवून त्या अन्यायाचें निराकरण करूं तरच जन्मसाफल्य झालें असें मानून त्याप्रमाणें कृतींत घडवणारें लोक आतां निर्माण झालेले आहेत. ह्या लोकांनीं ब्राह्मणपणाचा द्वेष दाखवला किंवा प्रसंगविशेषीं आपणांला बोंचतील असें लोकही निर्माण झाले तर त्यांच्यावर तुम्ही रागवणार ? त्यांना शाबासक्या द्या, चांगले म्हणा, त्यांचेवर शुभ आशिर्वाद वर्षवा त्यांची दया करा, कारण,हा ब्राह्मण–अब्राह्मण प्रश्न तुमच्या दाराशीं धक्के मारूं लागलेला आहे. हिंदुस्थानांत गेलेला स्वाभिमान आतां जिवंत झाला याची तो प्रत्यक्षपणें साक्ष देत आहे.

ब्राह्मण लोक हे अब्राह्मणांचे वडील बन्धु असतील, देशबान्धव असतील, त्यांचे गुरु असतील, अथवा त्यांचे शत्रू असतील ! ह्यांतील कोणत्याही नात्यानें पाहिलें तरी अधिकाराची उच्च वांच्छा धरणाऱ्या ब्राह्मणाला अब्राह्मणांच्या मागणीचें वैषम्य कसें वाटेल ? धाकटा भाऊ पायावर उभा राहिला म्हणून कोणत्या भावास वाईट वाटलेलें आहे ? मुलगा आपल्या इतका उंच झाला म्हणून कोणता बाप चिडलेला आहे ? मित्र मित्राच्या बदबदीनें खुर्चीवर बसला म्हणून कुणाला दुःख झालेलें आहे ?

शिष्यानें आपला पराभव केला म्हणून कोणत्या गुरुला वाईट वाटलेलें आहे ? आम्हीं असेंही म्हणतों कीं, ब्राह्मण आणि अब्राह्मण हें एकमेकांचे द्वेष्टे आहेत, पण आजपर्यंत असा कोणता चांडाळ शत्रू कोणत्या चांडाळ मुलखांत उत्पन्न झाला कीं शत्रूनें लढायच्या वेळेस हातांत हत्यार मागितलें म्हणून जातिवंत शूराला भीति वाटली ?

जातिवंत ब्राह्मणाला जर ब्राह्मण—अब्राह्मण चळवळीपासून भय वाटलें असेल तर तो ब्राह्मण नव्हे ! तो ब्राह्मण नव्हे कीं जो महाराला अस्पृश्य समजेल ! तो ब्राह्मणच नव्हे कीं जो स्त्रियांनीं मताधिकार मागितला असतां तो त्यांना द्यायला कचरेल ! तो ब्राह्मणच नव्हे कीं दुसऱ्यानें यज्ञोपवीत घातलें असतांना ज्याला चीड येईल ! तो ब्राह्मणच नव्हे कीं दुसरा संध्या करूं लागला असतां ज्याला आपला अधिकार गेला असें वाटेल ! तो ब्राह्मणच नव्हे कीं ज्याला दुसरा वेद पढूं लागला तर आनंदाच्या उकळ्या आल्यावांचून राहतील ! तो ब्राह्मणच नव्हे कीं ज्याला दुसऱ्यानें परमेश्वराची अर्चा वेदमंत्रानें केली असतां आपली मोनॉपली बुडाली अशी कल्पना येईल. तो ब्राह्मणच नव्हे कीं ज्याला आपलें श्रेष्ठत्व राखण्यासाठीं दुसऱ्याला कनिष्ठपणांत ठेवावेसें वाटेल. तो ब्राह्मणच नव्हे कीं ज्याला स्वतःच्या ज्ञानाची थोरवी दुसऱ्याच्या अजाणपणाच्या तळावर गाजवावीशी वाटेल. तो ब्राह्मणच नव्हे कीं जो आपल्या पोटाची खळगी दुसऱ्याच्या मेहेरबानगीनें भरील ! आम्ही तर असेंही म्हणतों कीं तो ब्राह्मणच नव्हे कीं जो याचनेसाठीं हात पसरील !

आनन्द ब्राह्मणो विद्वान् न बिभेति कदाचन ! ब्राह्मणाचें मुख्य लक्षण हें कीं, तो भित्रा नसला पाहिजे ! जगत्त्रयांत त्याला भीतीनें स्पर्श करतां उपयोगी नाहीं, त्याचें हृदय गारठतां उपयोगी नाहीं. तो बेफाम, बेछूट, बेडर, बेदरकार मनुष्य पाहिजे. ह्याचा हात देण्यांकरितां पाहिजे, त्याचा हात घेण्यांकरितां नको ! त्याचें मुख सत्यवादित्वाकरितां पाहिजे, त्याचें तोण्ड माफी मागण्याकरितां नको ! त्याची

दृष्टि सर्व जगभर आनन्दाचीं कमलें उमलविण्याकरितां पाहिजे, आश्रयांसाठीं जागा शोधण्याकरितां नको; त्याचे पाय संकटाच्या मानगुटीवर दाब देण्याकरितां पाहिजेत, लटपटण्याकरितां नकोत. ब्राह्मणानों, अब्राह्मणांच्या चळवळीकडे पाहून तुम्हांला घाम सुटला ? तुमची जीभ कोरडी पडली ? तुमचे पाय कांपूं लागले ? अंग थरथरूं लागलें ? तुमची वृत्ति बुडाली असें तुम्हांला वाटलें ? नाहीं, ही भिण्याची गोष्ट नव्हे ! त्यांत कसले डरतां ? ब्राह्मण म्हणजे तो कीं, ज्याला भीति स्पर्श करीत नाहीं. आनन्द ब्राह्मणो विद्वान् न बिभेति कदाचन ।

ह्या पहा स्वर्गाच्या घंटा वाजायला लागल्या ! पूर्वजांचीं पुण्यें सफलतेला आलीं ! तपस्व्यांचीं तपें सिद्धिस्वरुप झालीं ! ह्या पहा वशिष्ट–वाल्मिकांच्या दीप्ती ! ह्या पहा मनुयाज्ञवल्क्यांच्या मूर्ति ! आपलें हिंदुस्थान जिवन्त व्हावें म्हणून ह्यांनीं प्रयत्न केले आणि आपलें हिंदुस्थान जिवन्त झालें. समाज खडबडून जागा व्हावा म्हणून सामर्थ्यवान् शब्द ह्यांनीं ह्या विश्वकटाहांत सोडून दिले आणि हा आपला समाज खडबडून जागा झाला ! त्या शुकांनीं, त्या पराशरांनीं सदाशांचा बगीचा उभारला आणि त्यांत प्रयत्नांच्या अमृतधारांचें कारंजें लावलें ! पहा, पहा, त्यांच्या सदाशांचा बगीचा आज फुललेला आहे ! तो दरवळलेला सुवास आतां स्वर्गापर्यन्त जाऊन पोंचलेला आहे ! पहा, पहा, ते स्वर्गाच्या तेजोमय गवाक्षांत उभे आहेत व हा बगीचा पहात आहेत ! एक हार नीट वर फेंका म्हणजे नेमका त्या पुण्यात्म्यांच्या कंठांत जाऊन पडेल ! त्यांना सांगा कीं तुमचें सत्कर्म सिद्धीला पोंचलें ! ह्या हिंदुस्थानांत–ह्या पवित्र हिंदुस्थानांत–आतां कोणीही ‘मी हीन’ असें स्वप्नांतसुद्धां म्हणत नाहीं ! ह्या हिंदुस्थानांत जन्म घेतलेले, ह्या पवित्रभूमींत जन्म घेतलेले, ह्या पुण्य जननीच्या कुशींतलीं लेंकरें हीं हीन कशी होतील ? येथील प्रत्येक मनुष्य आपल्या थोरपणाच्या जाणीवेनें नटलेला आहे ! अहो तो महार–त्याला सुद्धां आतां आत्मविश्वास उत्पन्न झाला आहे आणि तोही–तो हिंदभूमीचा खरा बालक–आतां हीनपणांतून उठला आहे. आणि तुम्हांला आश्चर्य वाटेल, पण त्या लाजणाऱ्या बायका–त्या कमलासारख्या नेत्रांच्या आणि पोवळ्यासारख्या ओंठाच्या युवती–सूर्याच्या प्रकाशांत आपल्या हास्याचा प्रकाश सोडून देणाऱ्या–सुमुखी, अहो पूर्वी पतीचें नांव घ्यायचें तरी त्या घामाघूम होत असत. मुलींनों, ऋषीनों, तपस्व्यांनों, पुण्यात्म्यांनों, तुमच्या संस्कृतीचा परिपाक कीं त्यांनाही आतां आत्मश्रद्धा उत्पन्न होऊन त्याही आतां मताधिकार मागायला सज्ज झाल्या आहेत !

# बाळंभटाची पळीपंचपात्री*

**पुनन्तु मां ब्राम्हणपाद्पांसवः॥**

बडोद्यास जो एक नवीन कायदा होण्याचें घाटत आहे व ज्याचें स्थूल स्वरूप आज आम्हीं दुसरीकडे दिलेलें आहे, त्यामुळें सर्व बाळंभट, पिलंभट, सखंभट यांची दाणादाण उडून गेली असेल, ह्यांत संशय नाहीं. श्रीसयाजीरावांच्या सूक्ष्म दृष्टींतून आजपर्यंत धान्याची खिचडी अथवा बाहुलीएवढ्या नवऱ्या मुलीहि न सुटल्यामुळें सगंभट व बगंभट त्यांच्या नजरेंतून सुटतील हें शक्यच नव्हतें. त्यांनीं आपल्या कुळस्वामिनीचे एवढेच उपकार मानावयास पाहिजेत कीं, आजपर्यंत तरी त्यांच्या शिकंदर नशिबानें त्यांना हे दिवस दाखविलें; नाहींतर ह्यापूर्वीच पळीपंचपात्रीचें खडखडावणें थोडेसें बंद होऊन त्यांना वेदाच्या पोथ्या सोडून बसावें लागलें असतें. आजपर्यंत ज्याचा त्याचा ब्राह्मणावर कटाक्ष असे. ज्याप्रमाणें आजचा कंपौंडर उद्यां बिनभांडवलानें डॉक्टर बनतो, अथवा ज्याप्रमाणें आज मास्तरच्या हातचा मार खाणारा सद्या उद्यां सारंगनयना बनून नाट्यसंमेलनांत घुसतो, त्याप्रमाणें भिक्षुकगिरी हा बिनभांडवली धंदा आहे, अशी आजपर्यंत प्रतिपक्षाची समजूत असे. एक पळी, एक पंचपात्री, एक जानवें, विशाल पोट व सैल केलेली कडोसरी, एवढें भांडवल असलें, कीं प्रतिपक्षाच्या समजुतीप्रमाणें तो 'ब्राह्मण' बनत असे. ह्याशिवाय भटजीमहाराजांचें भांडवल, प्रतिपक्षाच्या कल्पनेप्रमाणें जास्त नसे. कदाचित् बारबंदी, आंखूड पंचा, त्याचेपेक्षांहि आंखूड धाबळी, माभळभटी पागोटें, त्याला बिलगलेलें एक धोतर, व वेताच्या काठ्यांची एक मेणकापडी छत्री, ह्याहि गोष्टी प्रतिपक्षाच्या कल्पनेप्रमाणें भटजीपणाला अवश्य असतात. इतक्या बारदानांत एक "गोट" लावलेला निग्रो रंगाचा जोडा असला तरी चालतो. निदान भटजीबुवांच्या कुटुंबाचे हातांत "गोट" पडण्याऐवजीं असल्याच 'गोटांनीं' भटजीबुवांचा जोडा शोभूं लागतो. ह्याशिवाय आणखी एक तपकीरीची डबी असली तरी अर्थविशेषच असतें, पण छीः—शतं जीव—हें सर्व वैभव भटजीबुवांना बहुतकरून आयतेंच मिळत असतें. जेव्हां एखादा गृहस्थ वारल्यावर त्याची शोकार्त, 'विधवा'

* संदेश, ता. २० नवंबर १९१५.

‘ शय्यादान ’ करते अथवा संसार देऊन टाकते त्यावेळीं भटजीबोवा आयतेच ‘ छत्र ’–पति बनतात.

परंतु आतां हें भटजीबुवांचें साम्राज्य संपुष्टांत आलेलें आहे. कारण श्रीसयाजीराव महाराजांसारखे राजाधिराज त्यांचेकडे लक्ष देऊं लागलेले आहेत. आजपर्यंत ब्राह्मण लोक म्हणत असतील कीं, आमचे भस्माचे पट्टे आमचें ह्या कष्टमय संसारांत परित्राण करतील, परंतु आतां श्रीसयाजीरावमहाराज त्यांच्यामागें कायद्याचें दुट्टे लावून दिल्याशिवाय सोडणार नाहींत. ब्राह्मणलोक म्हणत असतील कीं, आम्हीं आपल्या पोटांत यजमानांचा सर्व सैंपाक सामावून नेऊं, परंतु श्रीसयाजीराव महाराज त्यांचे अपराध कधींहि पोटांत घालणार नाहींत. सैल कासोटा करून चाललें कीं आपण मोठे साधेभोळे झालों असें ब्राह्मण लोकांना वाटत असेल, पण त्यांच्या पळीपंचपात्रीच्या नादावरच फसून जाण्याइतके श्रीसयाजीराव महाराज साधेभोळे नाहींत, हें त्यांनीं पक्कें लक्षांत ठेवावें. श्रीसयाजीराव महाराजांसारखे न्यायी व सदाचारप्रिय राज्यकर्ते चातुर्वर्णास कांटेतोल समतेनें वागविणारे आहेत. एखाद्या अत्यंजानें पराक्रम केला तरी ते त्यास पारितोषक देण्यास कचरावयाचे नाहींत, व एखादा ब्राह्मण जरी अपराधी असला, तरी त्यास दंड करावयास ते मागें हटावयाचे नाहींत. ब्राह्मणांनीं ह्या गोष्टीचा पूर्ण विचार करूनच ह्यापुढें चाललें पाहिजे. आपण ब्राह्मण आहोंत ह्या गोष्टीच्या वृथा गर्वाचे दिवस संपले. ब्राह्मणपणाची ‘ टेस्ट ’ हि आतां बदललेली आहे. पूर्वी “ शिखासूत्रवान् ब्राह्मणः ” ही ब्राह्मणाची कसोटी असे. ब्राह्मण म्हणविणारे आपलें ‘ जानवें ’ दाखविलें म्हणजे पूर्वीच्या युगांत तो “ पासपोर्ट ” समजला जात असे, पण आतां भटजीचा धंदा करावयाचा म्हणजे याज्ञिकेचे मंत्र भराभर पाठ म्हणून दाखविले पाहिजेत.

श्रीसयाजीरावांचा कायदा सर्व ब्राह्मणांना अर्थात्च लागूं नाहीं. जे ब्राह्मण भिक्षुकी करीत नसतील त्यांनीं श्रीसयाजीरावांच्या कायद्याची वार्ता ऐकून आपली झोंपमोड करून घेण्याची मुळींच आवश्यकता नाहीं. त्यांनीं शिखासूत्रवान् ब्राह्मणः हें सूत्र लक्षांत ठेवूं नये एवढेंच नव्हे तर शेंडी अथवा जानवें यांपैकीं एखादी वस्तु चुकीने राहूनच गेली असल्यास तावडतोब तिला रजा द्यावयास चुकूं नये. सौर, रुद्र, पवमान, ह्यांपैकीं आधुनिक सुशिक्षित ब्राह्मणांना बहुतकरून कांहीं येत नसेलच. तितकी सावधगिरी त्यांच्या आईबापांनीं बाळगली असलीच पाहिजे. परंतु मुंजीच्या निमित्तानें

जर एखादा "केशव नारायण" त्यांच्या जिव्हेला चिकटलाच असेल तर तोहि चहाच्या आचमनानें त्यांनीं धुवून टाकला तरी चालेल. श्रीमंत सयाजीरावांचा कायदा केवळ उपाध्यांचा धंदा करणाऱ्या ब्राह्मणवर्गावर लावून त्यांनीं खरोखरच उपकार केलेला आहे असें आमचें प्रांजल मत आहे.

श्रीसयाजीराव सरकार ह्यांनीं केलेला उपाध्यांचा कायदा कोणत्याही ब्राह्मणास भीतिप्रद वाटेल असें आम्हांस वाटत नाहीं. ह्या कायद्याची आवश्यकता काय होती हेंहि आपलेकडील ब्राह्मण लोकांच्या फारसें लक्षांत येणार नाहीं. कारण, आपलेकडील ब्राह्मण कितीहि अपढीक असले, तथापि गुजरात, मध्यप्रांत, माळवा इत्यादि प्रांतांतील ब्राह्मण्य जितक्या हीन दशेला पोहोंचलें आहे, तितकें तें आपल्या महाराष्ट्रांत गेलेलें नाहीं. महाराष्ट्रांतील मिरीं कितीहि नासलीं तथापि तीं जोंधळ्याला हार जाणारीं खचित नाहींत. पण गुजरात–माळवा–इकडील ब्राह्मण इतके मूढ व बुरसलेले आहेत कीं त्यांना मोठ्या श्रमानेंच ओळखून काढावें लागतें. इकडे कोणाहि ब्राह्मणास आपल्या नावापुढें 'ब्राह्मण' हीं अक्षरें जोडून आपली जात दाखविण्याचा प्रसंग येत नाहीं, परंतु त्या प्रांतांत ब्राह्मण इतके अमंगल बनलेले असतात कीं त्यांना ह्याच पद्धतीनें 'ब्राह्मणत्व' दर्शित करावें लागतें. "क्यों जी, क्या पढे हैं ?" तर "महिमन पढे हैं" (म्हणजे महिम्नस्तोत्र पाठ केलें आहे) इतकें उत्तर आलें कीं ब्राह्मणपणाची कडेलोट झाली असें तिकडे कितीतरी लोकांना वाटतें. अशा वल्ली भेटल्या म्हणजे सयाजीरावच काय, पण प्रत्यक्ष परमेश्वर आला तरीसुद्धां हात टेंकील, मग संस्कृतांतलीं मुळाक्षरें तरी तुम्हांस येऊं द्या असा कोणी कायदा केल्यास त्यांत आश्चर्य कोणतें ?

धार्मिक अथवा सामाजिक बाबतींत सरकारनें कायदे करावे हें आम्हांस नेहमींच अनावश्यक वाटतें, कारण तुम्ही आपल्या घरीं इतक्या दांड्या टाकीत जा असें दुसऱ्यांनीं सांगण्याची पाळी येण्यापेक्षां घरच्या मालकानेंच किती धुणी वाळत घालावयाचीं आहेत हें ओळखून त्याप्रमाणें दांड्या टांगाव्या हें चांगलें. ज्या पद्धतीपासून इतर धर्माच्या लोकांना कांहीं त्रास होत नाहीं त्या कितीहि मूर्खपणाच्या असल्या तरी ज्या समाजाची सुधारणा त्याच समाजानें करावी हें चांगलें. त्यांत सरकारनें विनाकारण हात घालूं नये. पार्शी लोकांत गिधाडांकडून प्रेतांची व्यवस्था करायची जी पद्धत आहे, ती आमच्या हिंदु डोळ्यांना कितीहि नवीन वाटली तरी

त्याबद्दल सरकार कायदे करूं लागल्यास आम्हीं त्यांना पार्शी लोकांच्या धर्मांत हात न घालण्याबद्दलच विनंति करणार. परंतु श्रीसयाजीरावांनीं केलेल्या कायद्याचें तसें नाहीं. सयाजीराव हे जरी महाराज असले तरी ते आमच्यांतीलच आहेत. ते हिंदु आहेत, ते स्वजनवत्सल आहेत, आमच्या सामाजिक नडी काय आहेत, धार्मिक गरजा काय आहेत, आनुवंशिक समजुती काय आहेत, सुधारणेचीं स्थळें कोणतीं आहेत, हें श्रीसयाजीरावांना उत्तम कळतें. ह्या बाबतींतील त्यांचे विचार म्हणजे आम्हांस सर नारायण चंदावरकर अथवा टिळक बोलल्यासारखे वाटतात. तेव्हां सरकारनें धार्मिक व्यवहारांत कायदे करावेत ह्यास आम्हीं जरी अगदीं नाखूष असलें तरी सर सयाजीरावांनीं केलेला हा कायदा आम्हांस प्रांतिक सभेंतील अथवा सामाजिक परिषदेंतील एखाद्या ठरावाइतकाच प्रिय वाटतो. लाडवांचीं शिपतरें, बासुंदीचे गंज, जिलेबीच्या पराती उडविणें म्हणजेच ब्राह्मणांचा पराक्रम असें कोणी ब्राह्मण समजत असतील अथवा कोणी ब्राह्मणांचीं तशीं वर्णनें करीत असतील; पण आतां लाडवांच्या पाचुंद्यांवरून ब्राह्मणत्त्वाचें माप मोजावयास निदान सयाजीराव महाराज तरी तयार नाहींत. त्यांना शास्त्रसंपन्न ब्राह्मण पाहिजेत. त्यांना उत्तम नैतिक वर्तनाचे ब्राह्मण पाहिजेत. मराठ्यांच्या स्त्रिया विवाहपाशांत गोंवणारे अथवा विवाह झाल्यानंतर कांहीं महिन्यांनीं रजिस्ट्रेशनचा विधी करणारे निवृत्तमांस अथवा प्रवृत्त-मांस ब्राह्मण श्रीसयाजीरावांच्या कायद्याच्या दूध–गाळण्यांतून पास होतात कीं नाहीं हें त्या कायद्यालाच माहीत होईल. ज्या ब्राह्मण उपाध्यायाकरितां वरील कायदा करण्यांत येणार आहे, त्यांची प्रगति येथपर्यंत झालेली नसेल, ते बिचारे थोंडभट्टी करून नुसती पळीपंचपात्रीच खडखडवीत बसतील. अशा सर्व भूदेवांना आम्ही सांगतों, कीं बाळंभट, डोळे उघडा व आमंत्रणाची वाट पहाण्याचे अगोदर ब्रह्मकर्म पढा.

# द्रौपदी वस्त्र-हरण *

तिची दीन आरोळी, तिचा दीन आक्रोश, तिचा हृदयद्रावक हंबरडा, तिचा काळजाचें पाणी करणारा विलाप—असा कोण मनुष्य असेल कीं जो ह्या योगानें गहिंवरणार नाहीं? असा कोण आहे कीं ज्याला दया उत्पन्न होणार नाहीं? असा कोण आहे कीं ज्याचें अंतःकरण त्याला धक्के देणार नाहीं? असा कोण आहे कीं ज्याचें मन, ज्याचें चित्त, ज्याचा अन्तरात्मा, ज्याचा सर्व अस्तित्व–प्रेमा त्याला सप्पदिशीं पश्चात्तापाची छडी लगावून त्याला असें सांगणार नाहीं कीं, ऊठ, मानवा ऊठ, नरवीरा, ऊठ, अरे मानहानीचा एवढा प्रसंग आला असतांना गुडघ्यांत मान घालून काय बसलास?

× × × ×

आणि हा मानहानीचा प्रसंग म्हणजे काय साधासुधा प्रसंग! वीराला वीरत्वाची लाज वाटविणारा असा हा प्रसंग, पुरुषाला पौरुषाची शरम वाटविणारा हा प्रसंग! मर्द माणसाला आपल्या मर्दपणावर डाग आणणारा हा प्रसंग! पीळदार, बाणेदार, माणसाचा सर्व पीळ पाण्यासारखा पातळ आहे असें सांगणारा हा प्रसंग! आणि हा प्रसंग आला असतांना तुम्ही स्वस्थ बसलां? तुमच्या नाकपुडींतून श्वासोच्छास चालत नाहीं? तुमच्या नाडीला ठोके पडत नाहींत? तुमचें रक्त गरम नाहीं? तुम्हांला मनोविकार कांहीं एक नाहींत? तुम्हांला राग नाहीं? लाजलज्जा, शरम तुमची सर्व आटली? तुम्हीं मेलां? थण्ड झालां? गार पडलां? पण अहो–तुम्ही मेलां असला तरी मेलेल्यांनीं, प्रेत बनलां असलां तरी प्रेत झालेल्यांनीं, शव होवून अचेतन पडलां असलां तरी अचेतन पडलेल्यांनीं,—हा प्रसंग असा आहे कीं हा प्रसंग पाहून मेलेलीं माणसें धडपडून उठतील, प्रेतें जागीं होतील, मसणवट्या गुरगुरायला लागतील, सर्व सोनापुरें आणि ओंकारेश्वर ओंकारप्रणवाच्या अलौकिक तेजानें पुन्हां स्फुरित होऊन धांवायला लागतील, पळायला लागतील, दंगा करायला लागतील, एवढीं गडबड माजवतील कीं सप्त लोकांना वाटेल कीं आतां

* संदेश, ता. १३ डिसेंबर १९२०

मृत्यु संपला; आतां जगणें, जागणें, जागें होणें, जागृति करणें हा मृत्युलोकांतला एकच धर्म !

× × × ×

अरे मेला कोण ? ज्यानें कबूल केलें कीं मी मेलें, तो मेला, जो चीत होऊन पडला तो मेला, ज्यानें शरणचिठी लिहून दिली तो मेला ! बाकीचा माणूस, अरे, तो वाटेल तितका मरो, वाटेल तितका जमीनदोस्त होवो, वाटेल तितका धरणीला खिळो, तो खास-खचित-केव्हांही मेलेला नाहीं ! तो मरतां मरतां अशी लाथ झाडील कीं ज्यानें जिवन्त माणसें कोलमंडतील ! तो मेल्यानंतर एवढा मोठा पिशाच्च होवून बसेल कीं, तो जिवंत होता तो बरा होता असें प्रतिपक्षीयांना वाटेल ! तो धरित्रीच्या पोटांत गेला असला तर आंत गडबड करायला लागून जमीनीला उंचवटे आणील ! तो भस्मसात् झाला असला तर वायूच्या कणाबरोबर प्रत्येकाच्या डोळ्यांत शिरून त्याला हाय, त्याला हाय, त्याला हाय, करायला लावील. तो काष्ठांबरोबर दग्ध झालेला असला तर दग्ध काष्ठांत जिवंत स्फुल्लिंग बनून संकटांना जाळून खाक करील आणि तो जर का नुसता मेदिनीवर निश्चेष्ट पडलेला असला, तर मग काय विचारतां ? तो आपलें नाक वर करून आपल्या प्रतिपक्षाला सांगेल कीं बच्चाजी, काय समज़ला आहेस ? माझ्यावर जय मिळवलास ह्या फुशारकींत आहेस कीं काय ? अरे जा ! कोण तुझ्या या जयाची फिकीर करतो ? ह्या जगांत ज्यानें जय मिळविला तोच अपजयी झाला, ज्यानें लोकांच्या उरावर पाय दिला तोच जगाचे पायातळीं गेला, जो दिमाखला, जो हरखला, जो फुशारला, तो तोच पडला, बुडला, साफ बुडला ! खरा जिवंत मी, कधींहीं हार न जाणारा खरा जिवंत मी. कधींही निराश न होणारा खरा जिवंत मी ! पहा, पहा, माझ्याकडे पहा. तूं उभा आहेस, मी पडलेलों आहें, तूं ताठ आहेस, मी निपचीत आहे, तूं खडा आहेस, मी पसरलेलों आहें-तथापि पहा नीट पहा—निराशेला कधींही वश न होणारा—निराशेच्या कैचींत कधींही न सांपडणारा– निराशेच्या मृत्यूला मूठमाती देणारा—नाक माझें वर, होय, माझें नाक वर, पहा पहा, माझें नाक वर आहे ! आणि माझेंच नाक वर, वर रहाणार !

× × ×

आणि ही थट्टा आहे, लाघव आहे, विनोद आहे, कवीची कल्पना आहे असें समजूं नका! कवी कसली कल्पना करतात हो? कवीच्या धांवा का सृष्टीच्या करामतीपलिकडे चालतात काय? सृष्टिचमत्काराच्या काठीवर नर्तन करणारीं माकडें ते कवी! सृष्टि काठी हलवीते तेव्हां कवी नाचतात. असें म्हणूं नका कीं हें कल्पनांचें जाळें आहे, शद्बांचें अवडंबर आहे, हें नुसतें उपमांचें आणि उत्प्रेक्षांचें चक्र आहे! नाहीं, नाहीं, हा सृष्टीचा नियम आहे! सृष्टीचा नियमच असा आहे कीं, ज्यानें स्वतःला मेला असें म्हटलें तो मेला! तो मेला असतांना तर मेलाच, पण तो जिवंत असतांना सुद्धां मेलाच! कसलीं जिवंत बागुर्डीं तीं! कसलीं मेलेलीं मढीं तीं! अहो त्यांना घेऊन काय करतां! तुम्ही मर्द असलां तर जिवंतपणाच्या या जिवंत झऱ्यांत हात घाला आणि जिवंतपणाचें हें जीवन प्या कीं, जो स्वतःला मेलेला समजतो, तोच खरा मरत असतो; तसें समजत नाहीं तो कधींहीं, कधींही, कधींही मरत नाहीं.

× × × ×

तुम्हांला असें वाटतें काय कीं तो शिवाजी, तो तानाजी, तो महादजी, मेला? तुम्हांला असें वाटतें काय कीं, तो बाजी, तो धनाजी, तो प्रल्हाद निराजी मेला? तुम्हांला असें वाटतें काय कीं तो नाना, तो बापू, तो चिमा, मेला? त्यांचा अग्निसंस्कार झाला, त्यांचे दिवस धरले गेले, त्यांचेकरितां रडारड झाली, पुष्कळ इतिहासकारांनींहीं त्यांचेविषयीं लिहिलें कीं शिवाजी १६२७ त जन्मला आणि १६८० मध्यें मेला. लाथ मारा. त्या इतिहासकारांना एक सपाटून लाथ मारा. त्यांना बजावा कीं, गाढवाच्या धसांनों, तुम्हांला खोटें खोटें लिहायचें असेल तर दुसरीकडे कुठें झक् मारा, पण झक् मारायला शिवाजी मेला असली खोटी गोष्ट पुन्हां लिहूं नका.

× × × ×

शिवाजी मेला हें कुणाला खरें वाटेल? कोण विश्वास ठेवील त्याच्यावर? थूः थूः तुमच्या तोंडावर. तुम्हीं इतिहास लिहायला बसलां कशाला? कोणी सांगितलें होतें तुम्हाला कीं इतिहास लिहा? मी शिकवितों, तुम्हांला इतिहास लिहायला मी शिकवितों! मी तुम्हांला इतिहासाचे धडे देतों! चला या! घ्या तुमचे कागद! आणा तुमची पेनें! आणि लिहा असें:—

## शिवाजी १६२७ त जन्मला
## आणि
## १६८० ह्या वर्षी
## तो
## पुन्हा जोरानें जन्माला आला.

× × × ×

आणि ह्याचें कारण असें कीं १६८० पर्यंत शिवाजी दिल्लीस असला तर, प्रतापगडावर नसे व सिंहगडावर असला तर कर्नाटकांत नसे! पण १६८० पासून शिवाजी इतक्या जोरानें जिवंत झालेला आहे, इतक्या सपाट्यानें जिवंत झालेला आहे, इतक्या त्वेषानें, इतक्या आवेशानें जिवन्त झालेला आहे कीं, महाराष्ट्राचा एक दिवस, एक क्षण, एक पळ, असा जात नाहीं कीं ज्या दिवशीं महाराष्ट्रांत शिवाजी नाहीं. आणि शिवाजीचें नांव भीतिप्रद केव्हां होतें? १६८० पर्यंत? छेः छेः मुळींच नाहीं. १६८० पासूनच त्याचें नांव अतिशय भयप्रद झालेलें आहे. तो, तो पहा, छाती धडधडत असलेला, काळजीनें फिका पडलेला, धास्तीनें कावराबावरा झालेला, दीनवाणा, बापुडवाणा, निराश, चिरोल! त्याच्या छातीवर हात ठेवा आणि त्याला मनांतलें हितगुज विचारा बरें? त्याला सांगा जस्टिस दार्लिंगची तुला शपथ आहे, खरें बोल कीं तूं कुणाला भीतोस? तो सांगेल, त्याला खरें बोलणें भागच पडेल कीं मी शिवाजीला भीतों! मी दहा बारा वर्षांपूर्वी एवढ्यांकरितां इथें आलों. त्या टिळकानें शिवाजी कितपत जिवंत केलेला होता आणि आतां तो माझा दुष्मान टिळक मेल्यावर मी पुन्हां इथें हळुच कानोसा घ्यायला आलेलों आहें कीं अजूनही इथें शिवाजी आहे का, कीं ज्या दिवशीं टिळकाचीं हाडें चौपाटीवर गेलीं त्यावेळीं शिवाजीचीही हाडें चौपाटीवरच गेलीं.

× × ×

अभागी मनुष्या, अरे नाहीं रे, असें कधींही व्हायचें नाहीं कीं १६८० नंतर ह्या महाराष्ट्रांत शिवाजी नाहींसा झाला. तूं वाटेल तितक्या वेळां ये, तूं १९०८-मध्यें ये, १९१८ मध्यें ये, तूं १९२० ची कॉंग्रेस अटेंड कर, १९२५ ची पार्लमेंट अटेंड कर, तूं उघड ये, गुप्तपणानें ये, तूं व्हाइसरायाचे बंगल्यांत उतर का ताजमहाल नामाच्या खानावळींत बिऱ्हाड ठेव, तुला नेहमीं असेंच आढळून येईल,

तुझी भीति नेहमीं खरी ठरेल, कीं शिवाजी महाराष्ट्रांत आहे एवढेंच नव्हे, एवढेंच नव्हे तर ह्या गेल्या खेपेपेक्षां तुला जो विशेष प्रकार इथें आढळेल तो असा कीं तुझ्या गेल्या खेपेचे वेळेस फक्त शिवाजीच जिवंत होता, पण आतां, चिरोला, बिचाऱ्या चिरोला, आतां तर तुला आढळून येईल कीं, पूर्वी या महाराष्ट्रांत जर एकटा शिवाजी जिवंत होता तर आतां ह्या महाराष्ट्रांत दोघे जिवंत आहेत, शिवाजी एक व दुसरा टिळक.

× × ×

आणि हे सदोदित जिवंत रहाणार, १६८० साल जरी होऊन गेलेलें असलें आणि १९२० साल जरी उजाडून गेलेलें असलें तरी शिवाजी आणि टिळक, टिळक आणि शिवाजी ह्या महाराष्ट्रांत सारखे तळपत राहणार. अरे डार्लींगची जजमेंटें कितीही आण, इतिहासकारांच्या कलमांचे कितीही फटकारे लगाव, त्यांना बांध, त्यांना चेंद, त्यांना दडव, त्यांना चौपाटीवर जाळ, त्यांना रायगडावर पूर, मान उंच करून, मांडी थोपटून, हात उभारून ते सर्व जगाला एकसारखे जाहीर करीत बसतील कीं आह्मी टिळक आणि शिवाजी असें दोघें जिवंत आहोंत.

× × ×

आणि ते जिवंत असतांना तुम्ही कां मरतां? तुम्हांला काय मरायचा अधिकार? तुम्ही मेलां असें तुम्हांला कोणी सांगितलें? हा महाराष्ट्र जिवंत असतांना तुम्ही कां मरतां? अरे तुम्ही जिवंत असतां या महाराष्ट्राला कां मरूं देतां? उठा, चला, जागे व्हा, जिवंत व्हा, जिवंत शक्तीप्रमाणें बना, जिवंत सामर्थ्यें व्हा! कारण ही पांचाली, ही द्रौपदी, ही याज्ञसेनी, ही कॉंग्रेस, हिच्या एक वेणीला धरून हिला लीग ऑफ नेशन्सच्या राजसभेंत आणलेली आहे आणि तूं दासी, दासी, असा शब्दवर्षाव हिच्यावर चाललेला आहे.

× × ×

सांगा कीं ही दासी नाहीं. स्वतंत्र आहे. सांगा कीं इतर कुलवधूंना जशी अब्रू आहे तशीच हिलाही अब्रू आहे. बोला, बोला, शूर बंधूनों, बोला कीं इतर मानवांना ज्याप्रमाणें स्वयंनिर्णयाचा अधिकार आहे त्याचप्रमाणें हिलाही आहे! ही विकत घेतलेली नाहीं, ही जिंकलेली नाहीं, ही पणाला लावलेली नाहीं. शिवाजीची आणि शहाजीची, बाजीची आणि चिमाजीची, महादजीची आणि जनकोजीची, मी

असें ही अभिमानानें म्हणायला तयार आहें कीं रानड्यांची आणि दादाभाईची, विष्णुशास्त्र्यांची आणि टिळकांची ही मातुःश्री, ही जननी, ही सर्वमान्य माता, ही स्वराज्याला आणि स्वराज्यालाच लायक आहे.

× × ×

पण तिचें वस्त्रहरण चाललेलें आहे. तिच्या अब्रूचे धिंडवडे चाललेले आहेत. तिची इज्जत घेण्यांत येत आहे. काय ? अजून तुमच्या चित्ताची काळजीनें खळ-वळ नाहीं झाली ? अजून चिंतेनें तुमच्या मनाला नाहीं धक्का दिला ? अजून तुम्हीं चिंतेनें कावरेबावरे नाहीं झालां ? हिला एका वर्षाच्या आंत स्वराज्याचा शालू नेसवीन अशी प्रतिज्ञा गांधीनें केली, त्याकरितां त्यानें विडा उचलला, त्या-करितां त्यानें इमान केलें, त्याकरितां त्यानें बेलभण्डारा हातांत घेतला, पण नाग-पूरच्या आवारांत, काँग्रेसच्या आंतर्वेदींत, हाय ! काँग्रेसच्या त्या अंतर्गृहांत, गांधीला हटवूं, त्याला पराजीत करूं, त्याचें मनोरथ ढांसळूं अशा प्रकारचा कट झालेला आहे.

× × × ×

म्हणून म्हणतों कीं जिवंत व्हा आणि हा कट ढांसळा ! गांधी म्हणतो कीं मला फक्त तुमचें इमान द्या, एक वर्षाच्या आंत–अहो एक वर्ष कशाला, नऊ महिन्यांच्या आंत मी तुम्हाला स्वराज्य मिळवून देतों पण तुमचें इमान मला द्या.

× × × ×

मग कां ? तेवढें कां करीत नाहीं ? कौन्सिलना कशाला लालचावतां ? सरकारी शाळा-करितां कशाला लालचावतां ! कशाला त्या वकीलीकरितां तडफडतां ? काय दुसरीं कामें करून पोटें जाळतां येत नाहींत ? तुम्ही इतके निर्बळ झालां, दुबेळ झालां, इतके पंगू, इतके निःसत्व बनलां कीं वकीली नाहीं केली तर तडफडून मराल ? अहो रे नामर्दांनो, अरे मेल्यानंतर एकेक डोळे वटारून सर्व महाराष्ट्रभर आपला जिवंतपणा गाज-विणारे ते शिवाजी, ते टिळक, ह्याच भूमींत तर उत्पन्न झाले आणि ह्याच भूमीच्या उदरांत तुम्हीहि जन्माला आलेले असून वकिलीकरतां पोटांत कांटे भरतां ? शरम ! शरम ! चला फिरा माघारे, मूर्खांसारखे करूं नका, बेअकल्यासारखे करूं नका, चला सोडा वकिली, सोडा व्यसनें, सोडा चैनी, सोडा सरकारी शाळा, सोडा कौन्सिल.

× × × ×

चला, राष्ट्रांतील उत्साही मुलांकडे पहा ! शाळा सोडणाऱ्या आणि कॉलेजांना रामराम ठोकणाऱ्या त्या विद्यार्थ्यांकडे पहा, पहा त्या नागपुरांतल्या हरकऱ्यांकडे पहा, त्या मंडलेश्वराकडे पहा, आपल्या मातेची अब्रू ह्यांनीं राखली. हिंदमातेवर सन्मानाचा शालू ह्यांनीं घातला. ह्यांनीं स्वराज्याचा डंका वाजविला ! ह्यांनीं एकजात देशभक्त जागा केला ! पुण्यांतील आणि धुळ्यांतील, गदगमधील आणि सुरतमधील, नाशिकच्या आणि नगरच्या, कोइमतूर इथल्या आणि अमळनेरांतल्या देशभक्तांनों, ही हिंदभूमी स्वराज्याला लायक आहे, हिला स्वयंनिर्णय आहे, हिला स्वायत्त पदवी आहे, ही विकलेली नाहीं, ही जिंकलेली नाहीं. हें जाहीर करायला आणि ह्या याज्ञसेनीच्या वस्त्रहरणाचा लज्जास्पद प्रसंग टाळायला नागपूरांत या ! परमेश्वराच्या अनुज्ञेनें, शिवरायाच्या आशिर्वादानें, गीतारहस्यकाराच्या स्फूर्तीनें आणि पवित्रतेच्या अनुपमेय पुण्यानें हा गांधी स्वावलंबनाचें हातमाग लावून तिची अब्रू सांभाळायला बसलेला आहे. असा कोण जिवंत मनुष्य आहे कीं जो गांधीच्या ह्या पवित्र कार्यांत त्याला साह्य करणार नाहीं ?

---

## वन्दे मातरम्*

एकीकडे भरपूर पर्जन्यवृष्टीनें प्रमुदित झालेली वसुंधरा नूतन धान्यांच्या कणसांनीं आपली कृतज्ञ वृत्ति दाखवीत आहे. एकीकडे गुडघा गुडघा चिखलांत काम करून थकलेला शेतकरी माळ्यावर बसून हर्षभरित नेत्रांनीं शेतांत उगवलेल्या पिकांकडे पहात आहे. एकीकडे वर्षभर नांगरकुळवांना जोडलेला शेतकी–प्राणीवर्ग दाट कुरणांतून रानोमाळ भटकत चरत आहे, आणि एकीकडे दहिवराचे टप्पोरे कण उपवनलक्ष्मीचे कंठांत हिऱ्यांची माळ घालून तिला खुलविण्याच्या प्रयत्नांत आहेत. अशा ह्या प्रशांत रमणीय काळीं विश्वाच्या विश्वव्यापी गायनांतून हा कोणता सूर ऐकूं येतो आहे बरें ! अहाहा ! हाच बरें तो मंजुळ ध्वनि ! अपूर्व सौंदर्यानें नटलेल्या ह्या विश्वाच्या दिव्य सारंगींतून दुसरे कोणते ‘ बोल ’ ऐकूं येणार ? कर्णानों ऐका, ह्या अपूर्व गायनांत तल्लीन व्हा. प्रेमरोमांचानों, थरारून जा. ‘ वन्दे मातरम् ’ ह्या पवित्र मंत्राशिवाय तुम्हाला पुलकित व्हावयास दुसरा

* संदेश ता. ८ डिसेंबर १९२५.

विषय सांपडणार नाहीं. या वेळीं तुम्हांस याच पवित्र शब्दांखेरीज, कोठेंहि दुसरा शब्द ऐकूं येणार नाहीं. नंदनवनासारख्या उपवनांत जा, तसें सर्व वृक्षराजींतून, सर्व तरुलतांतून व सर्व पुष्पांमधून तुम्हाला हाच पवित्र ध्वनि निघालेला ऐकूं येईल. खरखर करणाऱ्या वाळवंटांत जा, त्या ठिकाणींहि हाच मधुर आवाज तुम्हांस ऐकूं येईल; अथवा भयाण गिरिकंदरांत जा, तिथेंहि "वन्दे मातरम्" या पवित्र शब्दांचा प्रतिध्वनि उमटलेला तुम्हांस ऐकूं येईल. पृथ्वीवरील सर्व चराचर वस्तूंमध्यें मानव हाच श्रेष्ठ गणलेला आहे. मानवाची बुद्धिमत्ता इतर चराचर वस्तूंपेक्षां फारच उच्च आहे व विशेष हें कीं, मानवास बोलावयास तोंड आहे. मानवाप्रमाणें पशुपक्षांदिकांना तोंडें आहेतच, परंतु त्यांचा खाण्यापलिकडे त्यांना कांहींच उपयोग होत नाहीं. परमेश्वरानें दिलेल्या तोंडानें खावें, व "मानवांच्या कह्यांत राहून" आपला चरितार्थ चालवावा हेंच काम पशूंच्या वाट्यांस आलेलें आहे. मानवांची तशी गोष्ट नाहीं. क्षुधा शमविणें हाच मानवाच्या तोंडाचा खरा उपयोग नाहीं. त्यांच्या मुखांतून पवित्र शब्दांचा उच्चार सतत निघाला पाहिजे. पशुपक्षी देखील या पवित्र नांवाचा उच्चार करतात, या मंगल नांवाची थोरवी त्यांना समजली नाहीं असें मुळींच नाहीं. पण काय करतील बिचारे! परमेश्वरानें त्यांच्यामुखीं नादच घातलेला नाहीं. या शब्दांविषयीं झालेलें ज्ञान त्यांना मनुष्याच्या वर्तीनेंच प्रगट करावें लागतें, अशी त्यांची परावलंबी स्थिती झालेली आहे. मानवाचें तसें नाहीं. मानवास या कामीं परावलंबी राहण्यास परमेश्वरानें मुळींच वाव दिलेला नाहीं. 'वन्देमातरम्' या शब्दाची थोरवी किती आहे, याबद्दलचें पूर्ण ज्ञान होण्यास भरपूर अशी बुद्धी परमेश्वरानें "मानवास" दिलेली आहे. असें असून मानव जर त्या शब्दांची थोरवी लक्षांत घेऊन त्या मधुर शब्दांचा उच्चार आपल्या वाणीनें न करील तर त्याची व पशूची वाणी एकाच प्रकारची होऊन तो परमेश्वराच्या दरबारांत मोठा अपराधी ठरेल, या प्राण्यास मानवाच्या जन्माला मी फुकट घातलें याबद्दल परमेश्वरास मोठा पश्चात्ताप होईल. मानवाच्या वाणींत इतकी जादू आहे कीं, तीमधून जो कांहीं शब्द निघेल त्याच शब्दाचा, त्याच नादाचा प्रतिध्वनि इतर मुक्या प्राण्यांच्या ठायीं निघत असतो. मानव जर परमेश्वराशीं कृतज्ञ होऊन "वन्दे मातरम्" यासारख्या पवित्र नामाचा उच्चार करील, तर त्याचा गोड ध्वनि सर्व जड व मूक वस्तूंमधून निघून सर्व जग मंजुळ शब्दानें निनादित होऊन जाईल व परमेश्वरानें

दिलेल्या वाणीचा सदुपयोग होऊन त्याची वाणी दिवसेंदिवस जास्त शुद्ध व मंजुळ होत जाईल. याच्या उलट कृति ‘ मानव ’ जर आपल्या वाणीनें करूं लागेल तर कालांतरानें त्याची वाणी बंद होऊन त्यांतून कोणताच नाद निघणार नाहीं ! पशूंची व त्याची वाणी एकच होईल.

परंतु, सुदैवानें मानव अशा तऱ्हेनें परमेश्वराशीं कृतघ्न झालेले नाहींत. प्रत्येक मानव, मग तो कोणत्याहि स्थितींत असो, सुखाच्या शिखरावर चढलेला असो अगर दुःखाच्या गर्तेंत बुडालेला असो, सांप्रत त्याच्या तोंडून “ वन्देमातरम् ” या शब्दांचाच जप चाललेला आहे. फार काय, सांप्रत चाललेल्या महायुद्धाच्या रणभूमीवर जाऊन जर पहाल तर त्या ठिकाणीं युद्धमान राष्ट्रांतील प्रत्येक शिपाई याच शब्दांचा जयघोष करीत असलेला दिसेल. बंदुकींच्या आवाजांतून, तोफांच्या धडाक्यांतून व शस्त्रास्त्रांच्या खणखणाटांतून “ वंदेमातरम् ” याच शब्दांचा प्रचंड ध्वनि निघालेला ऐकूं येईल. रणांगणावर मृत झालेल्या लढवय्यांचे आत्मेही हाच नाद करीत असतील. तरवारीचा घाव घालण्याचे पूर्वीं, बंदुकीची गोळी सोडविण्यापूर्वीं व तोफांचा धडाका उडविण्यापूर्वीं सर्व शिपायांचीं मनें याच शब्दानें भरलेलीं असतात व याच शब्दानें त्यांना लढण्यास विशेष हिंमत येते. या शब्दाची थोरवीच तशी आहे. एकादा शिपाई जर या शब्दाचा उच्चार न करतां लढूं लागेल तर त्याचीं शस्त्रें त्यास तसें मुळींच करूं देणार नाहींत.

पहा ! भयंकर रणांगणावरहि या शब्दाचा जर इतका प्रभाव, तसल्या ठिकाणींहि जर या शब्दाचा ध्वनि निघत असतो तर शांततेच्या ठिकाणीं तो निघाल्याशिवाय कसा राहील ? मनुष्यप्राणी म्हणजे कांहीं देव नाहीं. देवापेक्षां मनुष्यास बुद्धि कमीच असावयाची, व त्या कमीपणास अनुसरून ‘ मनुष्य ’जात जर आपापसांत भांडूं लागेल तर त्यांत मोठेंसें नवल नाहीं. हरकत नाहीं, याप्रमाणें भांडून ‘मनुष्य’-जातीनें आपापसांत दोन फळ्या केलेल्या असल्या तरी हरकत नाहीं, परमेश्वर याबद्दल कांहींच करणार नाहीं. अमुक एक आपणास राष्ट्रीय समजत असेल तर दुसरा आपणास ‘ नेमस्त ’ समजत असेल. ‘ राष्ट्रीय ’ व ‘ नेमस्त ’ हीं नांवें जरी भिन्न आहेत तरी तीं नांवें धारण करणाऱ्या व्यक्ति ‘मनुष्यच’ आहेत. दोघांच्याहि तोंडांतून ‘ वन्देमातरम् ’ हाच ध्वनि बाहेर पडेल, व दोघेही याच ध्वनीची सार्थकता करण्याचा प्रयत्न करतील. दोघांचा प्रयत्न एकच, दोघांची जात एकच व दोघांच्या

वाणींतून निघणारा मंगल नादहि एकच. मग भिन्न काय? दोघांमध्यें दुजाभाव कसा राहिला? अमुक एक मनुष्य अमक्या पक्षाचा व तमुक तमक्या पक्षाचा असा भेद कां व्हावा? यास कारण फक्त मनुष्याची कमी बुद्धि हेंच होय. या बुध्द्यनुसार सांप्रत महाराष्ट्रांतील दोन्हीं पक्ष, जरी ते एकमेकांस भिन्न समजत असतील, अगदीं एकाचा दुसऱ्यास विटाळ नको असें जरीं त्यांस वाटत असेल तरी त्यांच्या ध्येयांतील, त्यांच्या अंतस्थ हेतूंतील साम्य, परमेश्वरास पटलेलें आहे. आतां होणारी कॉंग्रेसच पहा ना! केवढा मोठा मंडप थाटून त्याच्या सुखमय छायेखालीं सर्व देशांतील लोक जमून काय करणार आहेत बरें? 'वन्देमातरम्' याच शब्दाची सार्थकता ते सर्व लोक त्या ठिकाणीं करणार आहेत. याच शब्दाची सार्थकता जर ते करीत नसतील तर त्या त्यांच्या जमावाला 'कॉंग्रेस' म्हणजे राष्ट्रीय सभा असें कोण म्हणेल? संबंध राष्ट्रांतील प्रतिनिधींचें एकत्र मधुसंमीलन त्या ठिकाणीं झालेलें असतें आणि या सर्व प्रतिनिधींचा मिळून जो एकवटलेला नाद निघेल तो 'वंदेमातरम्' हाच असेल. आपल्या जन्मदात्या प्रिय मातेस वंदन करण्यासाठीं संबंध देशांतील प्रतिनिधी जमून, हा एक 'सहस्राक्ष सहस्रपाद' असा विराटस्वरूपी पुरुष बनलेला असतो. 'वन्दे मातरम्' याच जयघोषानें हा पुरुष आपल्या मातेस वन्दन करीत असतो. हा पवित्र महिना, या विराट पुरुषाचा अवतार होऊन, आपल्या 'राष्ट्रमातेचा' उत्सव, आपल्या देशाचें हृदय असें जें महाराष्ट्र त्या महाराष्ट्राच्या एका केंद्रस्थानीं होणार आहे. अहाहा! काय तो पवित्र दिवस, कीं ज्या दिवशीं सर्व राष्ट्रांतील जन आपल्या जन्मदात्या मातेच्या चिंतनांत घालवतात! पण महाराष्ट्रा! एकच गोष्ट तुझें बदनाम करण्यास कारणीभूत होते, ती ही कीं, तुझ्यातील दुही! ही दुही तुला खपते का? 'महाराष्ट्र' हें नांव यथार्थ करण्याची तुला महत्वाकांक्षा नाहीं कां? होय, आहे. मग असें कां? सर्व तुझींच मुलें; सर्वांचा तूं फारच प्यार; दिवसें-दिवस तुझी कीर्ति वाढत जावी अशीच सर्वांची इच्छा. मग या सर्व इच्छा एक असून त्यांचीं मनेंच अशीं द्विधा कां? पण तूं तरी काय करशील? तुझीं मुलें झालीं तरी तीं मनुष्यप्राणीच आहेत. त्याप्रमाणें त्यांच्यामध्यें थोडासा कमीपणा असावयाचाच. पण त्याची तुला फारशी फिकीर नको. ते त्यांच्या अज्ञानानें कसेहि वागोत. तुला त्यांचेकडे वात्सल्यप्रेमानेंच पाहिलें पाहिजे. कारण तुझीं सर्व मुलें, मग तीं 'नेमस्त' असोत अगर 'राष्ट्रीय' या नांवाची असोत, तीं सर्व तुझ्या बऱ्याकरितांच प्रयत्न करीत आहेत. तुझें अकल्याण त्यांतील कोणताच पक्ष चिंतीत

नाहीं. तूंच त्यांना पाहिजे तर विचार. तुझें अकल्याण चिंतणारा एकहि सुपुत्र तुला त्यांत सांपडणार नाहीं! दोन्हीं पक्षांतील तुझीं लाडकीं मुलें निरनिराळ्या ठिकाणीं कां होईना, पण 'वन्देमातरम्' याच शब्दानें तुझें चिंतन करतील.

# कमालपाशाची तरवार!*

नारायण, नारायण, काय ती परवांची लगबग! अरे पळतां कुठें? थांबा, जरा थांबा! बेव्यांनों, ही पळपुटेपणाची विद्या तुम्हीं दुसऱ्या बाजीरावापासून शिकला कीं काय? ही ढुंगणाला पाय लावून पळण्याची कला तुम्ही मालेगांवच्या भास्कर फौजदाराकडून उचललीत कीं काय? आणीबाणीच्या वेळीं चिमणी येवढें तोंड करून मागल्या पायीं धूम ठोकण्याची ही बगंभ्भट्टी चोरटी पद्धति नेस्तनाबूद, नेभळटापासून पैदा केलीत कीं काय? अहारे बेहिमती! थूः तुमच्या तोंडावर! म्हणे आम्हीं थेन्स मधून तुर्कांना हांकलून लावणार! चला, सोडा त्या गप्पा! थ्रेस हा तुर्कांचा आहे. थ्रेस हा विजयी तुर्कांचा आहे. थ्रेस हा कांहीं तुमच्या काकांना आंदण दिलेला नाहीं. तलवारीचा योग्य उपयोग जाणणारा, गाजी कमाल बादशहा त्याचा हा देश आहे.

ग्रीक लोकांना भलती घमेंड! म्हणे आम्हीं तुर्कांना हांकलून लाऊं! पण याद राखा, तुर्क तुमच्या देवालाहि हालायचें नाहींत. तुमचे पितामह स्वर्गांतून उतरले तरी हालायचे नाहीत. तुर्कांस एक गोष्ट समजते. तरवारीचा योग्य उपयोग तुर्कांला समजतो. ज्याची तरवार खंबीर तो खरा खंबीर, हे तुर्कांला समजतें. काय? तुर्कांना तुम्हीं हांकलून लावणार? सोडा, त्या गांवगप्पा सोडा! असल्या गप्पा ग्रीसमधल्या बायकांनीं आपल्या पाळण्यांतल्या पोरांना सांगाव्या! तुर्क लोकांना असल्या गप्पा सांगूं नयेत. जोंपर्यंत कमाल बादशहासारखे शौर्याची कमाल करणारे गाजी तुर्कलोकांत आहेत तोंपर्यंत तरी असल्या बाता तुर्कलोकांपाशीं करूं नका. तुर्कलोक हटायचे नाहींत, तुमचे पितामह आले तरी तुर्कलोक हटावयाचें नाहींत. तुर्क लोकांना तरवारीचा हक्क आहे. तुर्क लोकांना पराक्रमीपणाचा हक्क आहे. युरोपांत रहायचा तुर्कलोकांना, गाजीपणाचा जन्मसिद्ध हक्क आहे.

* संदेश, दिवाळी अंक १९२२.

एशियाखंडांत जर युरोपियन लोकांनीं रहायचें, तर युरोपखंडांत तुर्क लोकांना रहायला काय हरकत आहे ? युरोपियन लोक स्वर्गांतले व तुर्कलोक कुठले पाताळपुरांतले ? युरोपियन लोकांना एशियाखंडांत रहायचा जितका हक्क आहे, तितकाच युरोपखंडांत रहायचा तुर्कांना हक्क आहे. युरोपियन लोक कांहीं आभाळांतून पडलेले नाहींत किंवा आकाशगंगेंतून उगवलेले नाहींत. तेहि मनुष्य आहेत, व तुर्कलोकहि मनुष्यच आहेत. त्यांचा आणि तुर्कांचा हक्क सारखाच आहे. तुर्कलोक युरोपखंडांत कांहीं चोरवाटेनें शिरलेले नाहींत ! राजरोस व उघडपणानें युरोपखंडांत गेलेले तुर्कलोक राजरोसपणानें युरोप खंडांतच राहणार ! निदान तुर्कांची फतेमंद तलवार जोंपर्यंत त्याचजेवळ आहे तोंपर्यंत तुर्कलोक खात्रीनें युरोपखंडांत राहणार !

पण तुर्कलोकच काय ! जो हक्क तुर्कांना आहे तोच एशियाखंडांतील प्रत्येक मनुष्यास आहे, जपानी मनुष्यास आहे, युरोपखंडांत राहण्याचा हक्क हिंदुस्थानांतील हिंदी मनुष्यासहि आहे. फक्त तो गाजवायला अंगांत गाजीपणा पाहिजे. गाजी कमाल बादशाहा ह्यानें तो हक्क गाजविला, कारण तो गाजी होता. तुम्हीहि गाजी व्हा, म्हणजे तुम्हालाहि हा जन्मसिद्ध हक्क मिळेल. इंग्लंडमधील लॉर्ड रीडिंग हे जर हिंदुस्थानांत व्हाइसरॉय म्हणून येऊं शकतात, तर हिंदुस्थानांतले चव्हाण किंवा मोरे लंडनमधल्या प्रधानमंडळांत कां शिरूं नयेत ? ते जात नाहींत, हा कांहीं परमेश्वराचा अपराध नाहीं. कारण त्यानें लॉर्ड रीडिंगला जितके हातपाय दिलेले आहेत तितकेच इथल्या लोकांनाहि दिलेले आहेत. ह्यांत परमेश्वराची कसूर मुळींच नाहीं, ही आपली कसूर आहे. ह्यांत आपली कसूर अशी आहे कीं कमाल पादशहांत गाजीपणा आहे आणि आपल्या अंगांत गाजीपणा नाहीं.

येशू ख्रिस्ताची गोष्ट घ्या ! एशियाखंडातला सामान्य मनुष्य ! गुरांच्या गव्हाणींत जन्मलेला व सुताराच्या सोप्यांत वाढलेला ! पण त्या एका एशियाटिक माणसाचा शिक्का आज युरोपांतल्या प्रत्येक मनुष्याच्या कपाळावर आहे. एवढा ग्लॅडस्टन झाला, तो ख्रिस्ती ! एवढा लॉईड जॉर्ज, तोहि ख्रिस्ताचा अंकित ! गुलमुशवाला केझर तोहि ख्रिस्त–किंकर, व बिनमिशीवाला कर्झन तोहि ख्रिस्तापुढें नम्र. एशियाखंडांतल्या एका सुताराचा मुलगा जर सगळें युरोपखंड आपल्यापुढें पालथें घालतो, तर आपल्याला युरोपखंडांत रहायचा अधिकार नाहीं असें एशियां-

तल्या लोकांना वाटतें तरी कसें ? छेः, ही समजूत अगदीं चुकीची आहे. युरोपांतल्या लोकांना एशियांत यायचा जितका अधिकार आहे, तितकाच एशियांतील लोकांना युरोपांत जायचा आहे. ग्रीक लोकांनीं जंग जंग पछाडले तरी बहाद्दर तुर्क युरोपखंडांतून हालले नाहींत. एशियांतल्या प्रत्येक मनुष्यासही तितकाच अधिकार आहे. फक्त तो त्यानें जाणला पाहिजे. युरोपियन मनुष्यास इराण, काबूल, हिंदुस्थान, चीन इथें येण्याचा जर अधिकार आहे, तर चिनी, इराणी, काबुली व हिंदी मनुष्यांसहि युरोप खंडांत जायचा अधिकार आहे. मात्र त्यांनीं मर्दपणा धरला पाहिजे, मर्दपणा गाजविला पाहिजे.

गाजी कमाल बादशहानें एशियाटिक लोकांचा हा हक्क प्रस्थापित केलेला आहे. गाझी कमाल बादशहानें युरोपांतल्या लोकांचे डोळे त्या सत्याकडे उघडले आहेत. गाजी कमाल बादशहानें युरोपांतल्या लोकांचे डोळे पांढरे केलेले आहेत.

अलीकडे युरोपांतल्या लोकांना असें वाटूं लागलेलें होतें कीं, सर्व जगांतली भूमि आमची आहे. पण गाजी कमाल बादशहानें ही त्यांची समजूत खोटी पाडलेली आहे. ईश्वरानें कोणतीहि भूमि कोणालाहि कायमची दिलेली नाहीं. मर्दाला वाटेल तेथें रहाण्याचा अधिकार आहे, नामर्दाला स्वतःच्या देशांतहि सुखानें रहायचा अधिकार नाहीं. नामर्दानें ऊठ म्हटलें उठलें पाहिजे. बस म्हटलें बसलें पाहिजे. त्याच्या देशांत आणि त्याच्या पैशानें चाललेल्या आगगाडींत जरी त्याची मेंढरूपट्टी झाली आणि त्याच्या डोळ्यांदेखत "हा डबा युरोपियन लोकांकरितां राखून ठेवलेला आहे" अशी जरी पाटी लावली गेली, तरी ती त्यानें निमूटपणें पाहिली पाहिजे. युरोपांतून येणारा हा मनुष्य माझ्या देशांतला व माझ्या पैशाच्या आगगाडींत पाय ताणून कां बसतो त्याचीसुद्धां चौकशी त्यानें करतां कामा नये, कारण तो नामर्द आहे. पण मर्दाचें तसें नाहीं. सर्व दुनिया त्याची आहे. त्याला वाटेल तिथें तो बसेल, व त्याला वाटेल तेव्हां तो बसेल. ग्रीक माणूस कमाल बादशहाच्या पाठीस लागून जेव्हां त्याला म्हणाला कीं 'तूं युरोपखंडांतून ऊठ,' तेव्हां तो म्हणाला मी मर्द आहें, तुमचे पितर स्वर्गांतून आले तरी मी युरोपांतून हालणार नाहीं. एशिया खंड जितका युरोपियन लोकांचा आहे, तितकाच युरोपखंड एशियाटिक लोकांचा आहे. युरोपियन लोक एशियाखंडांत निर्धास्तपणें बसतात तसा मीहि युरोपखंडांत निर्धास्तपणें बसणार !

गाझी कमाल बादशहानें हें तत्त्व प्रस्थापित केल्यापासून ग्रीसचा बादशहा रगडला गेला आहे, कर्झनचें तोंड गोरेंमोरें झालेलें आहे, व लॉइड जॉर्जची कढी पातळ

झालेली आहे. कमाल बादशहाच्या विजयानें श्रांत व पतित राष्ट्रांत सुद्धां आशा उत्पन्न केलेली आहे. कमाल बादशहाच्या विजयानें हिंदुस्थानांत निपचित पडलेल्या लोकांत पुन्हां उमेद आणलेली आहे. कमाल बादशहाच्या विजयानें आफ्रिकेंतल्या जंगली लोकांना, अमेरिकेतल्या निग्रोंना व जगाच्या इतर भागांतील रानटी व निसर्ग-मूल स्थितींत खितपत पडलेल्या दुःखी जीवांना असा आशेचा संदेश शिकविलेला आहे कीं, धीर धरा, घाबरूं नका, दुनिया युरोपियन लोकांना कोणी बहाल केलेली नाहीं. दुनिया कर्तबगार लोकांची आहे आणि जर तुम्ही कर्तबगार व्हाल तर ही दुनिया तुमचीहि आहे.

---

# पुणेरी जोडे ! *

इतिहासांतील प्रसिद्ध असा पहिला पुणेरी जोडा म्हणजे राजे शहाजी आणि दादोजी कोंडदेव ह्यांचा होय. एके बाजूला स्वाभिमान, एके बाजूला मुत्सद्दीपणा, एके बाजूला कर्तृत्व, एके बाजूला सुव्यवस्थितपणाची आवड, एके बाजूला धाडस, एके बाजूला दूर-दृष्टि अशा ह्या दोन पुरुषांचा महाराष्ट्रांत इतका सुंदर जोडा जमलेला होता कीं, ह्या जोड्याचे हातून महाराष्ट्राच्या भाग्योदयाचीं बीजें पेरलीं गेलीं. महाराष्ट्राचा अर्वाचीन इतिहास श्रीशिवाजीमहाराज ह्यांचे हातून सुरू झाला अशी जर कल्पना केली, तर ह्या इतिहासाची पूर्वतयारी शहाजी राजे आणि दादोजी कोंडदेव ह्यांचे हातून झाली असें म्हणावयास हरकत नाहीं. कित्येक इतिहासकार तर स्वराज्यस्थापनेचें सर्व श्रेय श्रीशिवाजीमहाराजांपेक्षां, शाहाजीराजे व त्यांचे विश्वासू कारभारी दादोजी कोंडदेव ह्याच जोडीकडे देतात. ही कल्पना कदाचित् खरी असेल, कदाचित् अति-शयोक्तिची असेल, पण एवढें खरें कीं, शहाजी आणि दादोजी कोंडदेव ह्या दोघांनीं महाराष्ट्रांत जें स्वराज्याचें बीज पेरलें त्यालाच श्रीशिवाजीमहाराजांचे कारकीर्दींत सुंदर फळें आलीं. पुणें शहरांतील ह्या दोन थोर पुरुषांच्या जोड्याला दुसरें महत्व असें आहे कीं ह्या जोड्यावरून ब्राह्मण–अब्राह्मण हा प्रश्न किंवा हीं भांडणें किती अप्रयोजकपणाचीं आहेत हें पूर्णपणें सिद्ध होतें. शहाजीराजे मराठे होते, दादोजी कोंडदेव ब्राह्मण होता. परंतु शहाजीचा दादोजींवर पूर्ण विश्वास होता व दादो-

* संदेश ता. १९ जुलै १९२७

जीची शहाजीविषयीं अत्यंत स्वामिभक्ति होती. हे दोघे पुरुष ब्राह्मण-अब्राह्मण, एका विचारानें चालले. त्यांच्यांत कधींहि भेदभाव उत्पन्न झाला नाहीं, म्हणून महाराष्ट्राच्या भावी इतिहासाचा नकाशा आंखला गेला ! जोडा असावा तर असा असावा. जोडा असावा, तर त्याच्या हातून अद्वितीय राष्ट्रोत्कर्ष व्हावा ! शहाजी व दादोजी कोंडदेव हा त्या दृष्टीनें अपूर्व जोडा आहे, आणि सर्व पुणेरी जोड्यांत ह्यालाच पहिला नंबर दिला पाहिजे.

ह्यापुढील पुणेरी जोडा म्हणजे, श्रीशिवाजी महाराज आणि तानाजी मालुसरे ह्यांचा अद्वितीय जोडा होय. आजपर्यंत मित्र मित्रांना मिळाले असतील, स्नेह्यांनीं स्नेह्यांशीं कार्य केलें असेल, आजपर्यंत एकाच कार्यास वाहिलेल्या व एकाच ध्येयांत गुंग असलेल्या दोन व्यक्तींनीं एकेमेकांना साह्य केलेलें असेल, पण ह्या सर्वांत श्रीशिवाजी महाराज आणि तानाजी मालुसरे ह्यांचा जोडा जसा शोभला, तसा कोणाचाहि जोडा शोभला नसेल. शिवाजीला तानाजीची जोड मिळाल्यापासून पराक्रमाला जें स्वरूप आलें, देशभक्तीला जो पूर आला, उत्साहाला जो भर चढला, आशांना जें स्फुरण आलें, आणि यशाला जी चढती कमान चढली तिच्यामुळें महाराष्ट्राच्या मांगल्याचा दीप प्रज्वलित होऊन त्यांत गुलामगिरीचा लज्जास्पद कलंक पार दिसेनासा झाला. मालुसरे पडला तेव्हां आपल्या गोटांतला सिंहच हरपला अशी खुद्द शिवाजी महाराजांनीं साक्ष दिली, एवढेंच केवळ नव्हे तर तानाजीच्या मुलाचें सांत्वन करतांना शिवाजी मेला, तानाजी जीवन्त आहे असे उद्गार श्रीशिवाजी महाराजांनीं काढले. शिवाजीला तानाजीची जोड मिळाल्यामुळें शिवाजी महाराजांना किती अमोलिक मदत झाली असेल ह्याचा हा धडधडीत पुरावा आहे. शिवाजी महाराज आणि तानाजी मालुसरा ह्यांचा हा अद्वितीय जोडा जमला म्हणून ह्या महाराष्ट्रभूमीचें गुलामगिरीचें जोखड नाहींसें झालें, हिला वैभवाचा टिळा लागला, हिच्यावर स्वराज्याचीं छत्रचामरें उडालीं, हिची कीर्तीच्या सिंहासनावर प्रस्थापना झाली. असला योग, असला मुहूर्त, असला भाग्याचा जोडा इतिहासांत दुसरा कोणता असणार ? महाराष्ट्राच्या सगळ्या सुखद प्रसंगांत श्रीशिवाजी महाराज आणि तानाजी मालुसरे ह्यांच्या ऐक्याचा प्रसंग आम्हीं अत्यंत महत्त्वाचा समजतों, आणि म्हणून सगळ्या पुणेरी जोड्यांत आम्हीं शिवाजी-तानाजीच्या जोड्यास अग्रस्थान देतों. हें अग्रस्थान अयोग्य आहे असें कोण म्हणेल आणि ह्या पुढील जोड्याचा निर्देश करायचेपूर्वी शिवाजी-तानाजीच्या

जोड्याला पुनःपुन्हां, पुनःपुन्हां कोणता महाराष्ट्रीय वंदन करणार नाहीं? ह्यापुढील जोडा अर्थातच धनाजीराव जाधव आणि संताजीराव घोरपडे ह्यांचा होय. ह्या जोड्याचें महाराष्ट्राच्या इतिहासांत अत्यंत महत्त्व आहे, किंबहुना धनाजी संताजीचा हा जोडा जर निर्माण झाला नसता तर शिवाजी–तानाजींनीं कमावलेल्या सर्व भाग्यावर पाणी पडलें असतें ह्यांत संशय नाहीं. ह्या जोड्याची आणखी दुसरी विशेष गोष्ट ह्मणजे ह्या दोघांना कार्य करतांना भोगाव्या लागलेल्या कमालीच्या अडचणी ह्या होत. शहाजी–दादाजीची परिस्थिति निराळी, शिवाजी–तानाजीची परिस्थितिहि एकाप्रकारें सोपीच म्हणतां येईल, पण ज्या परिस्थितींत धनाजी-संताजीनीं कार्य केलें तितकी बिकट परिस्थिति महाराष्ट्राच्या इतिहासांत तर नाहींच, पण जगाच्या इतिहासांतहि फारच थोडकी असेल असें खात्रीनें म्हणतां येईल. शिवाय महाराजांच्या नंतर संभाजीनें काय ठेवलें होतें? काय सैन्य कायम ठेवलें होतें, कीं शिस्त कायम ठेवली होती, कीं प्रजेचीं मनें संतुष्ट ठेवलीं होतीं? पण सहाय्य नाहीं, खजीना नाहीं, सैन्य नाहीं, अनुयायी नाहींत, एवढेंच काय पण ज्या घोड्यावर बसायचें त्या घोड्याचें जीनहि धड नाहीं, अशा निरुत्साहकारक व सर्वतोपरी प्रतिकूल परिस्थितींत ज्या बहाद्दरांनीं स्वराज्याचा अभिमान धरला आणि अवरंजेबासारख्या मी मी म्हणणाऱ्या लढवय्याला हात टेंकायला लावून दख्खनचे घोडे गंगा नदीच्या पात्रांत नेऊन नाहविले त्या शूरांची, त्या वीरांची, त्या हिंमतबहाद्दरांची स्तुति किती गावी? शत्रूचे घोडे पाणी पिईनातसे झाले म्हणजे अरे, तुला ह्यांत धनाजी दिसत आहे कीं काय? असें ज्या पराक्रमी पुरुषांनीं स्वतःविषयीं म्हणविलें, त्यांच्या नांवानें जर महाराष्ट्रांतील तरुणांना स्फूर्ति न चढेल तर कृष्णागोदेच्या पाण्यांत कांहीं पाणीच नाहीं असें म्हणावें लागेल.

पण त्या जोड्यावर एक आक्षेप असा आहे कीं शहाजी–दादाजी, अथवा शिवाजी–तानाजी ह्याप्रमाणें हा जोडा अस्सल पुणेरी नव्हे. ह्या आक्षेपांत अर्थातच कांहींएक अर्थ नाहीं, कारण अवरंगजेबाशीं ह्या दोघांनीं खेळलेल्या धांवत्या लढाईत जिंजीपासून पुण्यापर्यंत असें एकहि महत्वाचें ठिकाण उरलें नव्हतें कीं जें किंचित्कालपर्यंत तरी त्यांच्या पराक्रमाचें विषय झालें नव्हतें. तथापि आकुंचितपणाच्या भरीं भरून जर असें म्हणावयाचेंच असेल तर पुण्याचा, खास पुण्याचा असा बाजीराव आणि चिमाजीअप्पा यांचा जोडा पहा. ह्यांतल्या बाजीरावानें मराठी समशेर दिल्लीपर्यंत चमकावली, छत्रसाल राजाला संकटमुक्त केलें, निजाम–उल्मु-

ल्काचा नकशा उतरला, आणि नादिरशहाच्या पोटांत धडकी उत्पन्न केली. चिमाजी अप्पांचा पराक्रम तर ह्यापेक्षांहि थोर ! बाजीरावाचे पराक्रम एशियाटिक लोकांविरुद्ध तरी होते, पण चिमाजीनें, त्या वीरविख्यात चिमाजीअप्पानें, पोर्तुगीजांसारख्या एका युरोपियन राष्ट्राचा धुव्वा उडवून, ख्रिस्ती चर्चमध्यें घणघण घणघण करणाऱ्या घंटेचे मुखांतून, मराठी भालाइतांच्या कीर्तीचें गाणें बाहेर काढलें ! धन्य ! धन्य तें पुणें ! धन्य तो बाजी ! धन्य तो शाहू नृपति आणि धन्य धन्य तें महाराष्ट्र कीं, ज्याला असले अवर्णनीय चमत्कार प्रत्यक्ष डोळ्यांनीं पहायला सांपडले !

बाजी-चिमाजीनंतरचा प्रख्यात जोडा म्हणजे अर्थात् नाना फडणीस आणि हरिपंत तात्यांचा होय ! पानिपतच्यानंतर पहिल्या माधवरावाच्या मृत्यूनंतर, नारायणरावाच्या खुनानंतर, आणि मराठे-इंग्रज ह्यांच्यांतील युद्धानंतर जें मराठी राज्य डळमळायला लागलेलें होतें, तें खूब शर्तीनें ज्यानें राखलें, त्या नाना फडणीसाला धिम्या पण यशस्वी हरिपंत तात्यासारख्या रणधुरंधराची जोड जर मिळाली नसती, तर कितीसें यश कमावतां आलें असतें, हाहि एक प्रश्नच आहे. पण हा प्रश्न उपस्थित झाला नाहीं ह्याचें कारणच नाना फडणीसांना हरिपंत तात्यांच्या तलवारीचा प्रबळ आधार मिळाला हें होय. आणि हरिपंत फडके कोण तर महाराष्ट्रराज्याचें नाक, स्वराज्याचें भूषण, पराक्रमाचा अभिमान, वीरांचा रणोत्साह आणि देशभक्तांचें मूर्तिमंत राष्ट्रप्रेमच असा जो सर्व विजयी जरीपटका तो ज्याच्या स्वाधीन केलेला होता असा इमानी शिपाई गडी ! हा शिपाई गडी जोंपर्यंत हयात होता तोंपर्यंत मराठ्यांचा जरीपटका कधीं मळला नाहीं, कधीं हटला नाहीं, कधीं लपला नाहीं ! हरिपंत गेले आणि जरीपटक्याचे लगेच धिंडवडे निघाले. पण असो, ती दुःखदायक कहाणी तूर्त बाजूला असो. इथें सांगायचें तात्पर्य म्हणजे एवढेंच कीं, जरी स्वराज्यांतला हा शेवटचा जोडा असला तरी तो कमी महत्त्वाचा नाहीं. ह्या जोड्यानें कांहीं काळ महाराष्ट्र हालवून सोडला, दणाणून सोडला, स्तंभित आणि विस्मयचकित केला. ह्या जोड्यापुढें आम्हीं असे आश्चर्यचकित झालों ह्यांत कांहींएक नवल नाहीं. तेव्हांपासून आतांपर्यंत नाना-हरिपंतांचा हा जोडा शत्रु-मित्रांना असाच आश्चर्यचकित करीत आलेला आहे. आपण तरी ह्या नियमाला अपवाद कसे ठरूं ?

ह्यापुढील पुणेरी जोडा म्हणजे,—अरे पण इथपासून इंग्रजी सत्तेला सुरवात झाली. आतां पुणेरी जोडा शोधायचा म्हणजे रणमैदान, जरीपटका, भवानी तलवार,

हें सारें विसरलें पाहिजे, आणि इंग्रजी शिकलेल्यांत हे जोडे शोधायला लागलें पाहिजे. पण हें केव्हांतरी! आजच रण आणि अरण, संग्राम आणि असंग्राम, समशेर आणि असमशेर ह्या सर्वांची खिचडी नको. आपण शहाजी राजांच्या तरवारबहाद्दरीपासून ह्या जोड्यांना सुरवात केली—राहूं द्यात, हे जोडे, ह्या जोड्या, हे गडी, इथेंच राहूं द्या! तरवारबहादुरी आणि लेखणीबहादुरी ह्यांचा आजतरी घोटाळा व्हायला नको.

पण त्यांतलें जें महत्त्वाचें तात्पर्य तें मात्र आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. पुणें म्हणजे मराठी मुलखांतलें एक शहर आहे अशी ज्यांची कल्पना असेल त्यांना खरोखरी इतिहासहि कळला नाहीं व भूगोलहि कळला नाहीं. पुणें म्हणजे मराठी मुलखांतलें एक शहर नव्हे, पुणें म्हणजे महाराष्ट्रांतील थोर पुरुषांचें पुण्य आहे, त्यांचें यश आहे, त्यांचें विजयशालित्व आहे, हें महाराष्ट्राचें पुण्य जितकें जास्त वर्धमान होईल, जितकें जास्त सांचेल, जितकें जास्त शिलकेंत पडेल, तितका महाराष्ट्राचा गौरव आहे. हें पुण्य ज्या प्रमाणांत खलास होईल तितका महाराष्ट्र रसातळाला जाईल. पण ह्या पुण्याईची जर जोड करावयाची असेल, तर सत्कार्यासाठीं सर्वत्र एकजीव झाले पाहिजेत. ज्याप्रमाणें शहाजीला दादोजीनें मदत केली, ज्याप्रमाणें तानाजीनें शिवाजीकरितां आपले प्राण गहाण ठेवले, ज्याप्रमाणें धनाजी संताजीमय झाला, आणि संताजी धनाजीमय झाला, असलीं ऐक्यें, असल्या जोड्या, असले जोडे, जर महाराष्ट्रांत निर्माण होतील तर महाराष्ट्राच्या पुण्याईला काय कमती आहे? पण हींच जर अंतःकरणें फाटतील, हृदयें फुटतील, मनें विचकतील, प्रेमें विसकटतील, तर मग पुण्यांत अर्थ कोणता? महाराष्ट्राचें ऐक्य हीच खरी महाराष्ट्राची जोडी, व हेच खरे महाराष्ट्राच्या शत्रूंना खरोखरीच पुणेरी जोडे! हे पुणेरी जोडे सध्यांच्या तरुणांतून निर्माण झाले पाहिजेत, सध्यांच्या पीळदार मर्दांतून निघाले पाहिजेत, देशाकरतां ज्यांचें रक्त सळसळतें त्यांच्यांतून हे पुणेरी जोडे निर्माण झाले पाहिजेत! काय? तरुणांच्या अंतःकरणाची अशी जोडणी खरोखरच महाराष्ट्रांत चालली आहे काय?

---

# खुडबुड्या जोशी *

सजयति सिन्दुरवदनो
देवो यत्पादपंकजस्मरणं
वासरमणिरिव तमसां
राशिन्नाशयति विघ्नानाम्

चला, लवकर या, मी ज्योतिषी आहें, मी एक चांगला विश्वसनीय खुडबुड्या ज्योतिषी आहें. या, माझ्या पायां पडा, माझ्या पायावर गंधपुष्पें वहा. मी मोठ्या आनंदानें तुमच्यापुढें पाय करीत आहें. मला विनंति करायचीसुद्धां मी तुम्हांला खटपट पडूं द्यायचा नाहीं ! मला मनुष्यांची इच्छा ओळखतां येते आणि ती लक्षांत घेऊन मी अगोदरच सर्वांचेपुढें पाय करतों. चला. माझ्या पायांवर डोकें ठेवा ! ठीक आहे ! दीर्घायुरस्तु ! सुमंगल्यं चास्तु ! आतां माझ्यापुढें एक नारळ असूं द्या ! नाहींतर एखादा स्वस्त बिनपाण्याचाच नारळ माझ्यापुढें ठेवाल ! मी इतर ज्योतिषांसारखा नाहीं. माझ्या अंगांत पाणी आहे. माझ्यापुढें जर बिनपाण्याचा नारळ ठेवाल तर मी अशी एक श्रीमुखांत भडकावीन कीं तुमच्या डोळ्यांत चद्रदिशीं पाणी येईल. ह्या नारळाच्या बरोबर थोड्याशा खारका, बदाम व बेदाणा ठेवाल तर फार चांगलें होईल. अहो, मी बेदाणा आहें. मी तुम्हांला असें कांहीं भविष्य सांगेन कीं तुम्ही गारेगार होऊन जाल. गारेगार म्हणजे काय? गारेगार म्हणजे गार नव्हे ! छेः त्याची भीति नको, गारेगार म्हणजे गारेगार ! हो हो ! तुमचें देव भलें करो ! बरी आठवण झाली. खारीक आणि बदाम ह्यांच्याबरोबर एक सुन्दरसा चहाचा पेलाही आणा बरें कां? पूर्वीच्या काळीं ज्योतिष्याच्या पुढें हें ठेवीत नव्हतें हें मला माहीत आहे, पण आपलें तुम्हांला म्हणून सांगतों, दुसऱ्यांना सांगायची मला काय जरूर होती? मला किनई चहा नसला म्हणजे कसेसेंच होतें. तेव्हां आपलें तुम्हांला सांगतों कीं नारळाच्या आंत थंड पाणी असतेंच ! त्यांतच चहाच्या गरम पाण्याची जर सोय कराल तर थंड आणि गरम ह्यांचा नेमस्त आणि जहाल ह्यांच्याप्रमाणें समेट होईल व माझें

* संदेश, ता. २ एप्रिल १९२०.

भविष्य म्हणजे तुम्हांला लखनौ कॉंग्रेसप्रमाणेंच भासेल! आतां आपली शेवटची लहानशी गोष्ट सांगायची! तुम्हांला नाहीं सांगितली तरी ती तुम्ही करणारच हें मला माहीत आहे, तुम्हांला नाहीं सांगितलें तरी तुम्ही माझ्यापुढें दक्षिणा ठेवालच, तथापि 'लेस्ट यु फरगेट' म्हणूनच तुम्हांला सांगावयाचें झालें! आतां अर्थातच तुम्हांला सांगावयाचें म्हणजे तुम्हांला शोभेल असेंच मला सांगितलें पाहिजे.

तुम्ही थोडेच कंगाल आहांत? माझी खात्री आहे कीं लहानसहान रक्कम तुम्हांला सांगितली कीं तुमचा माझ्यावर राग होणार! रागच काय? तुम्हांला असें वाटेल कीं मी तुमचा अपमान केला, एवढ्याशा गोष्टीवरून तुमचें माझें वाकडें यायचासुद्धां संभव आहे म्हणून तुम्हांला सांगतों कीं तुम्हांला शोभेल अशीच दक्षिणा मी मागेन; माझ्यापुढें फक्त एक शम्भर रुपयांची नोट ठेवा म्हणजे झालें! काय? तुम्ही रागानें लाल झालां? हलक्या मनुष्यासारखी शम्भरच रुपयांची नोट काय मागितली असें तुम्हांला वाटायला लागलें? वरें वोवा! पांचशें रुपयांची नोट ठेवा! मी तुम्हांला खात्रीनें सांगतों कीं ही पांचशें रुपयांची नोट मी परत करणार नाहीं! कां? आतां झालां खूष? आतां चला ऐका! कान पुढें करा. काय म्हणतां? तुमचे कान लांब नाहींत? तुम्ही जागच्या जागींच बसून ऐकणार? बरें तसेंही करा! माझें म्हणणें एवढेंच आहे कीं नीट लक्षपूर्वक ऐका. हं, या वर्षाचा राजा सूर्य आहे. अरे हो, पण चहाचा कप निवाला नाहीं का? बरें आहे, तुमच्या इच्छेप्रमाणें जरा चहा घेतों आणि नंतर तुम्हांला भविष्य सांगतों.

[ तसें केल्यानंतर ]

ह्या वर्षाचें नांव 'सुधारणा' असें आहे. फरक एवढाच कीं, सुधारणा हा शब्द केवळ मांटेग्यु-सुधारणा या आकुंचित अर्थानें न वापरतां प्रत्येक विषयाची सुधारणा ह्या अर्थानें वापरला जाईल. ह्या वर्षी मांटेग्यू सुधारणा तर राजकीय बाबतींत होईलच, पण सामाजिक बाबतींतहीं यंदा कांहीं मोठ्या सुधारणा व्हावयाच्या आहेत. ह्या वर्षी अस्पृश्यांची अस्पृश्यता पुष्कळ कमी व्हावयाचा सम्भव आहे. पण ती यन्दा अजीबात बन्द व्हायचा कांहीं योग दिसत नाहीं.

अस्पृश्यतेप्रमाणेंच मजुर-भांडवल, ब्राह्मण-अब्राह्मण ह्या विषयाला यन्दा पुष्कळ जोर येईल आणि ब्राह्मणांकडून सामाजिक व्यवहारांत बऱ्याचशा सवलती मिळण्याचा सम्भव आहे. यंदा स्त्रियांचें पाऊल समाजांत बरेंच पुढें पडेल व ष्कळ

ठिकाणीं स्त्रियांचा पडदा दूर होण्याचा योग आहे. यंदा पटेलबिल पास व्हायचा योग नाहीं व अरुण्डेलचें लग्न यंदा होईल असें दिसत नाहीं. तथापि या बाबतींत आटोकाट प्रयत्न होण्याचा सम्भव आहे. यन्दा पुण्यांत मात्र एका चमत्कारिक लग्नाचा योग पंचांगांत दिसत आहे. यंदा लग्नाची लगीनघाई उडेल व बहुतेक मुलींना तरुण पति मिळतील. कांहीं वृद्ध–बाला विवाहही घडणार नाहींत असें मात्र नाहीं.

औद्योगिक सुधारणांत सरकारचें लक्ष हिंदुस्थानच्या उद्योगधंद्याकडे विशेष लागेल व कांहीं युरोपियनही यन्दा हिंदुस्थानांत उद्योग सुरू करतील. सोनें महाग होईल असें वाटत नाहीं व एक्सचेंजचा भावही फारसा बदलणार नाहीं. बऱ्याचशा वस्तू महागच रहातील व लोकांना सुखाचा योग विशेष राहणार नाहीं.

शिक्षणांत पुष्कळ सुधारणा होतील. कांहीं नवीन कॉलेजें निघायचीं आहेत व कांहीं नवीन युनिव्हर्सिट्याही निघाल्याशिवाय राहणार नाहींत.

मुलांमुलींच्या शिक्षणांत मुलांच्या शिक्षणाइतकाच मुलींच्या शिक्षणाचा योग आहे, आणि पुष्कळ ठिकाणीं दोन्ही स्वस्त आणि सक्तीचीं केलीं जातील. यन्दा देशी भाषांना जास्त उत्तेजन मिळेल आणि पुष्कळ ठिकाणीं इंग्रजीचे ऐवजीं देशी भाषेंतच भाषणें होतील. कर्नाटक प्रान्त यंदा मराठीला प्रतिकूल दिसतो. तथापि प्रयत्न केला व कांहीं ग्रहांची शांति केली तर ही प्रतिकूलता तितकी तीव्र होणार नाहीं.

व्यापाराचे बाबतींत हिंदुस्थानचें पाऊल पुढें पडेल. विशेषतः व्यापाराची अभिवृद्धी गिरगांवांत ज्यास्ती होईल व त्याचीच छटा ठाकुरद्वार व काळबादेवी येथेंही अनुभवाला येईल. सायन्समध्यें विमानाची सुधारणा यापूर्वीच झालेली आहे. पण हीं विमानें हिंदुस्थानांत पुष्कळ आणलीं जातील व कांहीं खाजगी विमानेंही येण्याचा सम्भव आहे. विमानांनीं प्रवास सुरू व्हायला लागतील व व्यापाराकरितांहि विमानांचा उपयोग करण्याचा प्रयत्न होईल. सायन्समध्यें दुसरी सुधारणा म्हणजे पंचांगाची सुधारणा होय. सांगली इथें ठरलेली सुधारणा कायम टिकणार नाहीं. त्यांत आणखी सुधारणा होईल व पंचांग दृक्प्रत्ययाला उतरविण्याचा प्रयत्न केला जाईल.

ह्या वर्षी प्रधान ‘ कलह ’ आहे, तेव्हां चोहोंकडे कलह माजलेला दिसेल. ब्राह्मण–अब्राह्मण हा कलह होणारच आहे, ह्याशिवाय मजूर–भांडवल हा कलह

यंदा विकोपाला जाईल आणि युरोपांतील राष्ट्राराष्ट्रांतही अत्यंत कलह माजेल. कलहाच्या योगानें जर्मनी, रशिया, आयर्लंड, जपान ह्या देशांना विशेष त्रास होईल व अमेरिका खंडांतसुद्धां कलह माजेल. आस्क्विथ आणि लॉईड जॉर्ज ह्यांचीं मनें जास्त कलुषित होतील व लॉइड जॉर्ज ह्यांचा पाडाव करण्याचा कसून प्रयत्न होईल. पण लिबरल पक्ष अधिकारारूढ होणार नाहीं. व लेबर पार्टीलाही यन्दाच जय मिळेल असें वाटत नाहीं बोल्शेव्हिकांची सत्ता वाढविण्याचा पुष्कळ प्रयत्न होईल पण त्याला यश मिळणार नाहीं. हिंदुस्थानांत बोल्शेव्हिकांनीं कारस्थानें चालविल्याच्या पुष्कळ खोट्या कंड्या पसरतील, पण त्यांच्यावर विश्वास ठेवूं नये. कॉंग्रेससंबन्धानें अतिशय तण्टे माजतील आणि ह्या तण्ट्यांत गांधी आणि टिळक ह्यांचा फार मतभेद होईल. पण शेवटीं यंदाची कॉंग्रेस नागपुरलाच भरेल. अध्यक्षपदाकरितां लो. टिळक आणि लाला लजपतराय यांचीं नांवें विशेष रीतीनें पुढें येतील व त्यांत ज्याला जास्त मतें मिळतील तोच अध्यक्ष निवडला जाईल. यन्दाच्या वर्षी पर्जन्याधिपति 'द्रव्य' आहे त्यामुळें कमी वृष्टीचें भय नसून यन्दाच्या कॉंग्रेसला इतकी गर्दी होईल कीं नागपुरचाच नंबर सर्व कॉंग्रेसमध्यें पहिला लागेल !

आतां थोडें किरकोळ भविष्य सांगतों. यन्दा रविवार हा प्रत्येक सुटीच्या दिवशीं येणार असून त्याचेपुढें लगेच सोमवार यायला लागेल. ज्यांचीं आयुष्यें यंदा सुरू व्हायचीं आहेत तीं मुलें जन्माला येतील व ज्यांचीं आयुष्यें सरलेलीं असतील त्यांना दगा होण्याचा सम्भव आहे. जे शिकतील त्यांना विद्या येईल व पैसे मिळाल्याबरोबर मनुष्य श्रीमंत व्हायला लागेल. ज्या मुलींना यन्दा वर मिळणार नाहींत त्या कुमारिका रहातील व जे प्रवासाला निघतील ते घरांत सांपडणार नाहींत. गतवर्षापेक्षां यन्दा प्रत्येकाचें वय एका वर्षानें जास्त असेल व यन्दा फाल्गुन महिना सम्पल्याबरोबर ताबडतोब चैत्र लागेल. सर नारायणराव चंदावरकरांच्या मिशा यन्दा जास्त पांढऱ्या दिसायला लागतील व गोपाळराव देवधरांच्या पगडीच्या झिळमिळ्या जास्त नाचतांना दिसून येतील. यन्दा पाऊस पडणारीं शेतें पिकतील व जेथें पाऊस पडणार नाहीं तेथें अवर्षणाची भीति उत्पन्न होईल. यन्दाच्या दिवाळीला पुष्कळ कडबोळीं केलीं जातील आणि संक्रान्त खिचडीवर बसून येईल. प्रेसअॅक्ट बन्द झाल्यास यन्दा वर्तमानपत्रें स्वतंत्र होतील व हॉर्निमनना परवानगी मिळाल्यास ते हिंदुस्थानांत येतील. जे गुन्हे करतील ते यन्दा तुरुंगांत जातील व ज्यांस माफी मिळेल ते तुरुंगांतून सुटण्याचा संभव आहे.

सरकारनें सोडल्यास सावरकरबन्धु सुटून येतील व परवानगी मिळाल्यास अरविन्द घोष पॉण्डीचरीहून येतील. असें हें जो भक्तीनें पठन करील त्यास आठ पुत्र होतील असा ह्या खुडबुडे जोशाचा आशीर्वाद आहे.

शुभं भवतु ।

# बंगालचा गुलाब *

ह्या पुराणप्रसिद्ध इन्द्रद्वीपाचें प्रगतिरुपी उपवन ह्या शतकांत जर कोणत्याहि एका सुंदर कुसुमाच्या आमोदभावानें दरवळून गेलें असेल तर त्यास कारण बंगालचा गुलाबच होय ही गोष्ट आतां निर्विवाद सिद्ध झालेली आहे. हा बंगालचा गुलाब दिवसेंदिवस जास्त जास्त विकसित होत आहे व हें त्याचें विकसन सरोवरांत जन्म घेणाऱ्या शतपत्र कमलाचाच काय, परंतु नभःकासारांत सगर्व डुलणाऱ्या शीतरश्मी चंद्राला व सर्वप्रसृत तारामंडळास हतप्रभ करणाऱ्या सहस्ररश्मी सूर्यालासुद्धां लज्जित करीत आहे. त्या गुलाबपुष्पाचे पराग, सुंदर पुष्पांशीं न बोलावतांही लगट करणाऱ्या वायूबरोबर नवखण्ड पृथ्वीवरील प्रत्येक खंडांत गेलेले आहेत, व प्रत्येक खंडांतील सर्व रुचिर पुष्पें, बंगालचा गुलाब आल्याबरोबर कोणी उदारतेनें, कोणी आनंदानें, कोणी दिदृक्षेनें, कोणी लालसेनें, कोणी मत्सरानें तर कोणी दुष्टबुद्धीनें त्याचेकडे आपली दृष्टी लावीत आहेत. हें भारतवर्ष आज हजारों वर्षें सर्व राष्ट्रांत प्रख्यात म्हणून जें गाजलेलें आहे त्यास कारण कालपरत्वें कधीं काश्मिरांतील कुसुम्भ–केसर, कधीं राजपुतान्यांतील केतकपत्र, कधीं पम्पासरोवराकडील चंदनद्रुम, तर कधीं महाराष्ट्रांतील सुवर्णचंपक झालेला आहे. आजपर्यंत बंगालमधील गुलाब प्रेक्षकभृंगांना आमोदतल्लीन करून आनंदानें त्यांचें नेत्रमीलन करविण्यास कधींहि पुढें आलेला नव्हता. परंतु आतां अशी भीति पडलेली आहे कीं, हा बंगालचा गुलाबच सर्वांना मागें सारून पुढें जाणार कीं काय ? बंगालचा गुलाब खरोखरच तसें करणार असेल तर त्याची शाबास आहे म्हणावयाची. दुर्दैवाग्नीनें दग्ध झालेलें भारतीय उपवन महाराष्ट्राच्या चंपकानें काय किंवा बंगालच्या गुलाबनें

* संदेश ता. १३ मार्च १९१५.

काय, कोणाच्याहि योगानें परिमलपूर्ण झालें तरी ती आनंदाचीच गोष्ट होणार आहे, आणि तीं दोन्हीं जर एकाच काळीं पूर्ण विकास पावतील तर–तर मग काय, बोलावयासच नको. ह्या आनंदाच्या पुढें स्वर्गांतील अप्सरांना वल्लभांच्या कण्ठश्लेषांत नन्दनवनामध्यें पडलेलीं स्वप्नेंसुद्धां जास्त गोड नसतील !

राष्ट्रें ज्यावेळीं दुर्दैवानें ग्रासलेलीं असतात, त्यावेळीं त्यांचे तीन वर्ग करतां येतात. कांहीं राष्ट्रें अशीं असतात कीं त्यांना आपण कधीं डोकें वर काढूं असें वाटतच नाहीं. कांहीं राष्ट्रांना आपण आहोंत तीं पूर्णावस्थेंतच आहोंत, ह्यापेक्षां पूर्णावस्था येणें शक्य नाहीं, असें वाटत असतें व कांहीं राष्ट्रें अशीं असतात कीं आपल्या अपूर्णावस्थेची जाणीव असूनही आपण कधीं–ना–कधीं पूर्णावस्थेस पोचूंच अशी खात्री वाटत असते. दुर्दैवग्रस्त राष्ट्रांचे जे हे तीन वर्ग केलेले आहेत त्यांपैकीं पहिल्या वर्गांत जीं राष्ट्रें "सांपडलेलीं" असतात त्यांना उन्नतीची कधींहि आशा करावयास नको. तीं नेहमीं हीन स्थितींतच असावयाचीं. निकृष्ट अवस्थेनें स्वतःस मगरमिठी मारल्याबरोबर निकृष्ट अवस्था हीच आपली सहजस्थिती असें हीं राष्ट्रें मानूं लागतात, आणि त्यामुळें निकृष्ट अवस्थेला सोडण्याची इच्छा त्यांना पुन्हां कधींच उत्पन्न होत नाहीं. राष्ट्राच्या जीवित–इतिहासांत उत्कर्षांचे उत्सवदिन अनुभवल्यानंतर अपकर्षांचे निर्जळी उपवासहि घडण्याची कधीं पाळी येत नाहीं असें नाहींच. अपकर्षाच्या निरशनांतून पृथ्वीवरील कोणतेंहि एखादें राष्ट्र सुटलें असेल असा दाखला क्वचितच असेल. परंतु अवनतीचीं उपोषणें घडल्याबरोबर प्रत्येक राष्ट्राचें हेंच कर्तव्य असतें कीं, उन्नतीचें पुन्हां पारणें घडावें म्हणून निराशेच्या काळोख्या रात्रींतून अभ्युदय–भास्कराच्या उत्तेजक किरणांकडे पुन्हां टक लावून बसावयाचें, परंतु कांहीं कांहीं राष्ट्रें अशीं असतात कीं संकटाची रात्र एकदां आली, अवनतीची अमावास्या एकदां प्राप्त झाली, विपत्तींच्या कृष्ण-मेघांची मालिका एकदां जमली म्हणजे ह्या काळोखांत तींहि आपले डोळे, पुन्हां न उघडण्याकरितां–पुन्हां कधींहि न उघडण्याकरितां–झांकून घेतात, आणि मग, अशा राष्ट्रांपुढें अंधार! अंधार!! अंधार!!! अंधाराशिवाय अशा राष्ट्रांना दुसरें काय लाभणार?

वर वर्णन केलेल्या राष्ट्रांशिवाय विपन्न राष्ट्रांचे दुसरे जे दोन प्रकार सांगितले आहेत त्यांस स्वप्नमय राष्ट्रें असें म्हणावयाला कांहींच हरकत नाहीं. पहिल्या

वर्गांतील राष्ट्रें हीं 'पतित' राष्ट्रें होत. दुर्दैवानें लाथ मारल्याबरोबर हीं जीं कोलमंडून पडतात तीं धरणीला चिकटूनच बसतात. धरणीनें त्यांना सोडावयाचें मनांत आणलें तरी तीं कधींहि धरणीला सोडीत नाहींत. ह्या राष्ट्रांचें नांव राष्ट्रपटांतून एकदां निघालें म्हणजे निघालें; पुन्हां तें कधींहि त्या रजिष्टरांत चढावयाचें नाहीं. दुसऱ्या व तिसऱ्या प्रकाराच्या राष्ट्रांची गोष्ट जरा निराळी आहे. त्यांजवर जरी विपत्ती कोसळली असली तरी त्यांचीं संपत्तीचीं स्वप्नें कधींहि नाहिशीं होत नाहींत. हीं राष्ट्रें जरी 'पडलेलीं' असलीं तरी स्वप्नांत धांवत असतात. त्यांचा रथ जरी भग्न झालेला असला तरी त्यांचा मनोरथ वायुवेगानें पळतच असतो. विघ्न–निद्रांनीं ह्यांच्या डोळ्यांवर जरी कितीहि झांपड टाकण्याचा प्रयत्न केला तरी त्यांचे डोळे सुखस्वप्नांच्या योगानें तारवटूनच जातात. दुसऱ्या व तिसऱ्या वर्गांतील राष्ट्रांचीं हीं स्वप्नें खरोखर अजब आहेत. त्यांच्या स्वप्नांना पाहून संकटराक्षसांना सुद्धां हंसूं कोसळून क्षणमात्र हतवीर्य झाल्यासारखें वाटत असेल!

परंतु दुसऱ्या व तिसऱ्या वर्गांतील राष्ट्रांमध्यें स्वप्नमग्नतेचें जरी मोठें साम्य आहे तथापि त्यांच्या स्वप्नां–स्वप्नांमध्यें पुष्कळ अंतर आहे. दुसऱ्या वर्गांतील राष्ट्रांचीं स्वप्नें त्यांना संकटांचें भानच ठेवीत नाहींत व तिसऱ्या वर्गांतील राष्ट्रांचीं स्वप्नें त्यांना संकटांची पूर्ण जाणीव ठेवीत असून भावी सुस्थितीचें भररंगी चित्र त्यांना कल्पनेच्या आरशांतून दाखवीत असतात. दुसऱ्या वर्गांतील राष्ट्रांची कल्पना आपण संकटांत पडलोंच नाहीं अशी असते व तिसऱ्या वर्गांतील राष्ट्रांची कल्पना आपण संकटांतून खास उठूं अशी असते. विस्कटलेली घडी खरोखरी विस्कटलेलीच नाहीं असें एकजण मानीत असतात व विस्कटलेली घडी पुन्हां खचित बसेल अशी दुसऱ्यांची खात्री असते. पहिलीं राष्ट्रें संकटांचा 'भाव' असतांहि त्यांचा 'अभाव' मानीत असतात व दुसरीं संकटांचा भाव गृहीत धरून पुढें अभावाची खात्री बाळगतात. दुःखमय वर्तमानकालालाच पहिलीं राष्ट्रें सुखद मानून चालतात. दुसरीं राष्ट्रें दुःखद वर्तमानकाळाचे कांटे बोंचत असूनही सुखस्पर्शाच्या मिटक्या मारीत असतात. पहिल्या राष्ट्रांच्या समोर भावी काळ असतो. पहिल्या राष्ट्रांचे स्वप्नतरंग वर्तमानकाळाचा सुंदर पोषाख चढवितात, दुसऱ्या राष्ट्रांचें स्वप्नतरंग भविष्यकालाला सुंदर झवलीं घालतात. ज्याप्रमाणें एखादा मद्यपी रस्त्याच्या धुळींत लोळत असूनहि गंगापुलीनांत निमज्जन झाल्याची कल्पना करीत असतो, त्याप्रमाणें पहिल्याची स्थिती असते आणि ज्याप्रमाणें एखादा तालीमबाज आखाड्याच्या

मातींत अंग मळवीत असतां कुस्तीच्या पागोट्याकडे ध्यान ठेवीत असतो त्याप्रमाणें दुसऱ्यांच्या मनाची अवस्था असते. दोन्हीं राष्ट्रें स्वप्नांतच, पण एकाचें स्वप्न एक प्रकारचें व दुसऱ्याचें अगदीं भिन्न प्रकारचें असतें.

स्वतःच्या उणीवा काय आहेत त्या बरोबर रीतीनें माहीत असाव्या आणि अभ्युदयाचीं स्वप्नें पडत असावीं, ह्यासारखा उन्नतीस चढण्याचा दुसरा खात्रीचा मार्ग नाहीं. बंगालचें अगदीं थेट असेंच झालेलें आहे. आणि म्हणून उन्नतीच्या मार्गावर बंगाल एकसारखीं भरभर पावलें टाकीत चाललेला आहे. बंगालसारखें स्वप्नमग्न [Dreamy] राष्ट्र आपल्या हिंदुस्थानांत दुसरें नाहींच म्हटलें तरी चालेल. बंगालसारखें नम्र राष्ट्रहि दुसरें कोणतेंच नव्हतें. ह्या नम्रपणाचें सर्व वर्णन हरिभाऊ आपट्यांच्या सर्व प्रसिद्ध ग्रंथांतून सांठविलेलेंच आहे. बंगाली लोकांचे अंगांत नम्रपणा इतका होता कीं, दुसऱ्या लोकांचा त्यांचेसंबंधीं कधीं कधीं गैरसमज होत असे. परंतु इतका नम्रपणा अंगीं असूनहि स्वप्नांची चंद्रज्योत बंगाली अंतः-करणांत पेटलेलीच असे. बंगाली कारकून आपल्या टेबलाजवळ वाह्यात्कारीं अति-शय मेहनतपूर्वक खर्डे घांशीत बसलेला असे, पण असे खर्डे लिहितां लिहितां आपण स्टेट सेक्रेटरीच्या कौन्सिलवर होऊन व्हाइसरॉयकडे "डिस्पॅचेस" पाठवीत आहों अशीं त्यांस स्वप्नें पडत असत. बंगाली विद्यार्थी रात्रीं अपरात्रीं केमिस्ट्रीचें फॉर्म्युले घोकीत बसत असे, परंतु हे फॉर्म्युले घोकतां घोकतां आपण रसायनशास्त्रांतले मोठमोठे नवीन शोध लावणार अशी खात्री त्यास वाटत असे. बंगाली वैद्य मात्रांवर पुटें चढवितां चढवितां महिनोगणती कष्ट करीत असे, परंतु आपण सर्व आधुनिक वैद्यकीला आपल्या रसगुटिकांनीं लाजविणार असें मांडे तो आपल्या मनांत खात असे. बंगाली "रावसाहेब" आपल्याला म्युनिसिपालिटींत चांगलें भाषण करतां यावें म्हणून मेकॉलेच्या ग्रंथावर सपाटून मेहनत करीत असे, परंतु आपण आतां ग्लॅडस्टन होऊन तासच्यातास आपल्या श्रोतेमंडळीला रिझविणार अशी गोड कल्पना तो आपल्या मनांत करीत असे. बंगाल्यांचा हा स्वप्नशील स्वभाव, त्यांचें हें कल्पनासहजत्व, त्यांचा हा उग्र चित्तभ्रम सद्यःस्थितीसंबंधाचा नव्हता, भावी स्थितीसंबंधीचा होता. त्यामुळें सद्यःस्थितींत त्यांच्या हातून मेहेनतींत मुळींच कसूर झाली नाहीं, आणि ह्याचें गोड फळ त्यांनां असें मिळालें कीं ह्या मेहनती-मुळें त्यांच्या स्वप्नांप्रमाणेंच त्यांना भावी "काळ" आला.

स्वप्नशालित्व हें मनुष्याच्या उन्नतीस अत्यावश्यक असें पोषक द्रव्य आहे. परंतु हें स्वप्नशालित्व वर सांगितल्याप्रमाणें भावी स्थितीसंबंधानें पाहिजे, वर्तमान स्थिती-संबंधानें नको. भावी स्थितीसंबंधानें मनुष्याला उत्तम स्वप्नें पडत असलीं म्हणजे वर्तमान स्थितींत त्याच्या हातून सक्त मेहनत होते, परंतु वर्तमान स्थितींतच स्वप्नें पडूं लागलीं म्हणजे मनुष्य उद्योगापासून परावृत्त होतो. आमटी भुरकत असतां-नाच आपण श्रीखंडावर ताव मारीत आहोंत अशी ज्याची समजूत झालेली असते, त्या करंट्याच्या कपाळीं जन्मभर आमटीच लागली, असें खुशाल समजावें ! परंतु आमटी भुरकली म्हणून काय झालें, कधीं ना कधीं तरी पंचपक्वान्नाचे आपण अधिकारी होणारच अशीं ज्याला स्वप्नें पडतात तो आपली आमटी सुटण्याकरितां इतके श्रम करावयास लागतो कीं पंचपक्वान्नाचें ताट त्याच्या हस्तगत झाल्याशिवाय रहात नाहीं. " मी आपला आमटीचाच अधिकारी, मला गरिबाला पंचामृत कशाला ? " असें म्हणणारा हीन महत्वाकांक्षी जो वर्ग तो राष्ट्रांच्या दीन मालिकेंत लागतो, आमटी भुरकत असतांना स्वर्गांतल्या अमृताच्याच तंद्रींत असणारा जो वर्ग तो राष्ट्रांच्या आत्मवंचक मालिकेंत लागतो, व आमटी भुरकत असतांना ही आमटी काय दोन दिवसांची मेहेनत करीन तर मी ऐरावतांच्यासुद्धां गंडस्थलांवर जाऊन बसेन " अशा स्वप्नांतच राहाणारा जो वर्ग तो खरोखरच उन्नतीच्या मार्गाला लागतो. बंगाली लोक हे अत्यंत स्वप्नमग्न आहेत. ते नेहमीं स्वप्नांच्याच धुंदींत असतात. ह्या स्वप्नांनींच त्यांच्या हातून अचाट मेहेनत करविलेली आहे. ह्या स्वप्नांनींच त्यांना उन्नतींच्या दुर्गांतील चोरवाटा दाखवून दिलेल्या आहेत.

ह्या लेखाच्या प्रारंभीं आम्हीं बंगालला गुलाबाची उपमा दिलेली आहे. कारण खरोखरच हा गुलाब कांटेरी रोपावर उगविलेला असून अजूनही निरखून पाहिलें तर त्याच्या अंगाला कांटेच आढळतील. बंगालच्या गुलाबाचा आज सुवास पसर-लेला आपणांस दिसतो. त्याच्या पाकळ्या उमललेल्या दिसतात, त्याचा रंग खुललेला दिसतो, परंतु त्याच्या आजच्या सुंदरपणाला भुलून जाऊन हा गुलाब कांट्या-कुट्यांतून वर आलेला आहे हें आपण कधींहि विसरतां कामा नये. एके काळीं हें गुलाबपुष्प मुळींच अस्तित्वांत नव्हतें, तर कांट्यांनीं चोहोंबाजूंनीं चिमटे घेतलेली अशी एक गरीब लताच तिथें उभी असे. ह्या लतेकडे पाहून सर्व हंसत, सर्व जग तिचा उपहास करी. तिचें रूप पाहून ही गुलाबाच्या फुलांनीं अलंकृत होईल असें कुणालाच वाटलें नाहीं. परंतु त्या लतेनें निमूटपणें सर्व निंदापवाद सोसले. संकटाच्या

वाऱ्यांनीं तिला गदगदा हलवून तिचा अर्धा जन्म केला, परंतु ती स्वस्थानापासून ढळली नाहीं. निंदेच्या गारा तिच्या अंगावर पडल्या, परंतु तिनें त्याचें दुःख मानलें नाहीं. तिच्या पायथ्याशीं निराशेचीं डबकीं सांचलीं, तरी तिनें त्याकडे लक्ष दिलें नाहीं. तिचें पोषण करणारे दारिद्र्यकीटक तिच्या अंगावर चढले, परंतु त्यांतूनहि ती वृद्धीच पावली. तिला भीति दाखविणारे सायासरूपी सर्प तिच्याजवळ येऊन फुसकारून गेले, परंतु त्या सायासांनीं ती डगमगली नाहीं. तिला अशी खात्री होती कीं आज जरी आपली अशी स्थिती आहे, तथापि गुलाबाचें सुंदर फूल केव्हांतरी आपल्या मस्तकावर येऊन विराजमान होणार. गुलाबाच्या फुलाचा तिला ध्यास लागलेला होता. गुलाबाच्या फुलाचीं तिला गुलाबी स्वप्नें पडत होती, आणि हीं स्वप्नें शेवटीं खरी झालीं. काल जी एक गरीब, बारिक, अशक्त कांटेरी लता दिसत होती, तिच्याच शीर्षावर आज एक सुंदर गुलाबाचें फूल चमकूं लागलें.

वक्तृत्वांत हजारों श्रोत्यांना गारींगार करणारे सुरेन्द्रनाथ बानर्जी पाहून बंगाल-विषयीं आपल्याला आश्चर्य वाटतें. कायदेशास्त्रांत नॉर्टनवर कडी करणारे सत्यप्रसन्न सिंह पाहून आपणांस बंगालविषयीं आदर वाटतो. औदार्यांत पलित राजविहारी सारखे महापुरुष पाहून आपण बंगालची तारीफ करतों. पत्रकर्त्यांत मोतिलालसारखे चूडामणि पाहून त्यांचें अग्रेसरत्व आपण कबूल करतों. शास्त्रीय शोधांत जे. सी. बोस, इतिहासांत यदुनाथ सरकार, प्रवर्तकत्वांत केशव चंद्रसेन, ब्रह्मविद्येंत रामकृष्ण परमहंस आणि वेदांतांत विवेकानंद, ह्या सर्व पुरुषांना पाहून आपण बंगालला धन्यवाद देतों, परंतु ह्या सर्व व्यक्ती, हीं सर्व गुलाबाचीं फुलें बंगालच्या लतेला उगीचच्या उगीच आलेलीं नाहींत. हा प्रसूतभर धारण करण्याच्या पूर्वी कित्येक शतकें हा बंगालचा गुलाब थंडीवाऱ्यांत, उन्हापावसांत, काव्याकुव्यांत, हालअपेष्टांत, निन्दावमानांत उभा होता. परंतु ह्या दुरावस्थेंत त्यास गुलाबपुष्पांचीं स्वप्नें मात्र पडत होतीं, आणि तींच स्वप्नें म्हणजे बंगालची आजची उन्नति होय,

राष्ट्रीय विचारांना मोहोर येऊन जागृतीचीं गुलाबफुलें उमलावयास लागलीं म्हणजे त्यांत विविधता किती येत असते हें बंगालच्या प्रगतीच्या अफाट विस्तारावरून कोणासही सहज कळून येईल. आज विचाराचा, कृतीचा अथवा उद्योगाचा असा एकही प्रशंसनीय प्रांत नाहीं कीं ज्यांत बंगाली लोकांनीं मन घातलेलें नाहीं, अथवा ज्यांत ‘ प्रथमत्व ’ प्राप्त करून घेतलेलें नाहीं. परंतु उच्च विचारांच्या एखाद्या देशांत

तेव्हांच जागृति झाली म्हणावयाची कीं ज्यावेळीं पुरुषवर्गाच्या हृदयांत प्रदीप्त झालेल्या विचारदीपांची प्रभा स्त्रीवर्गाच्या हृदयांतहि प्रकाशमान होते. विसंवादाची जड शृंखला पायांत पडल्यामुळें स्त्रीवर्गाच्या हृदयप्रांताशींच लुल्या होऊन पडलेल्या विचारदेवतेला बंधमुक्त करून ज्यावेळीं बुद्धिदूतिका विजयोत्सवानें स्त्रीवर्गाच्या स्फूर्तिसिंहासनावर तिला अधिष्ठित करते, त्याचवेळीं उन्नतीच्या वैभवाला खरी भरती येते. पुरुष पुढें आणि स्त्रिया मागें, पुरुष विचारांत आणि स्त्रिया अविचारांत, पुरुष ज्ञानांत आणि स्त्रिया अज्ञानांत, अशी जोपर्यंत स्थिती असते तोंपर्यंत उन्नतीचें अर्धें मुखमंडलच दृश्यमान होतें. 'राष्ट्र' म्हटल्याबरोबर स्त्री व पुरुष या दोघांचीं हृदयेंहि ज्यावेळीं प्रेमस्फुरित होतात, 'सेवा' हा शब्द उच्चारल्याबरोबर पुरुष आणि स्त्रिया या दोघांचे अंतःकरणांतही ज्या वेळीं अनिवार हौस उत्पन्न होते, कर्तव्याच्या रिकिबींत पुरुषांनीं पाय ठेवल्याबरोबर ज्यावेळीं स्त्रिया आपल्या उत्तेजनाचा रेशमी लगाम उत्साहवारूला लटकावतात, त्याच वेळीं राष्ट्राची सर्व प्रगति झाली, त्याच वेळीं प्रगतीचें आम्रफल पूर्ण परिणत झालें, त्याच वेळीं उन्नतीची गुलाबकलिका उत्फुल्ल झाली, असें म्हटलें पाहिजे. अभिवृद्धीची ही कसोटी लावली तरी त्यांत बंगाल हार जाणार नाहीं. बंगालमध्यें विचारांची वाढ एकांगी झालेली नाहीं. सर्व बंगाल विचारपुष्पांनीं फुलून गेलेला आहे. बंगाल्यांतील स्त्रिया व पुरुष ह्या दोघांच्या मध्यें राष्ट्रकल्याणाकरितां शर्यत लागलेली आहे. राष्ट्रविचार स्त्रिया बोलूं लागल्या, स्त्रियांच्या बुद्धिकलिका विचारानें फुलूं लागल्या म्हणजे—म्हणजे राष्ट्रोपवनांना खरी शोभा आली. बंगालचें उपवन अशा रीतीनें खुलूं लागलेलें आहे, बंगालची बाग अशा तऱ्हेनें भरारली आहे, बंगालच्या गुलाबाचे ताटवे अशा रीतीनें पसरूं लागलेले आहेत. उदाहरणार्थ, सरोजिनी नायडू ह्या प्रसिद्ध बंगाली कवियित्रीच्या पुढील चारच ओळी वाचा व त्या वाचून जर तुमचें अंतःकरण हेलावलें नाहीं तर बंगालला नांव ठेवा—

"हे भारतमाते ऊठ, ऊठ, तूं दीर्घ काल जगलीस म्हणून तुला कोणी वृद्ध म्हणतो काय? छेः छेः, भारतमाते, तुला वार्धक्य कोठलें? तुझ्यावर तम पसरलें काय? सार, तें बाजूला सार. तूं निद्रित काय म्हणून होतेस? तुझी झोंप पुरी झाली नाहीं काय? माते, आम्हीं तुझीं लेंकरें अशीं केंविलवाणेपणानें रुदन करीत असतांना तुला झोंप लागावी कशी?

तुझें वैभव नाहींसें झालें असें तूं समजूं नकोस. एके काळीं तूं सर्व जगांत प्रमुख होतीस, तूं जागृत मात्र हो म्हणजे तें वैभव तुला परत खास मिळेल. तो तुझा बडेजाव, ती तुझी देदिप्यमान संपत्ति, तें मागें तूं मिळविलेलें विश्वयश–मोतें, तुझ्या जागृत होण्याचा मात्र अवधी, कीं तें सर्व पुन्हां तुझेंच आहे. ”

ज्या देशांत स्त्रिया अशी दिव्य वाणी उच्चारतात, तेथील विचारपुष्पांची महती काय विचारावी?

---

# बायकोचे दागिने *

काय्यकहो, बायकोचे दागिने ही तुम्हांस क्षुल्लक बाब वाटत असेल. दागिना तो काय आणि त्याला कसलें महत्व असें पुष्कळांस प्रामाणिकपणानें वाटत असेल. बायकोचे दागिने हे शब्द उच्चारल्याबरोबर आपल्या पत्नीच्या ठिकाणींच संपूर्ण विश्वांतील सौंदर्य सांठविलें आहे अशी भावना करून तिजशीं गुजगोष्टी करण्यांत चूर झालेल्या व उच्च मनोविकार व उदात्त कल्पना यांस पारख्या झालेल्या नवऱ्याचें चित्र तुमच्या डोळ्यापुढें उभें रहात असेल. हे शब्द कानीं पडतांच नवऱ्याच्या गुणांपेक्षां तो अंगावर चढवीत असलेल्या दागिन्यांतच आपलें जीवितसर्वस्व सांठविलेलें आहे अशा अलंकारप्रिय खुळचट बायकोची कल्पना तुमच्या मनश्चक्षूपुढें उभी रहात असेल. नवऱ्यास वेड लावणारी बायको आणि बायकोचें मन रिझविण्यांत कृतार्थता मानणारा नवरा, असें दांपत्य ‘बायकोचे दागिने’ हा शब्द उच्चारल्याबरोबर प्रत्येकाच्या नेत्रापुढें दिसत असेल. दागिने! कोण पण ही मोहक वस्तु! या दागिन्यांनीं किती मी मी म्हणणाऱ्या पराक्रमी माणसांचा पराक्रम हरण केलेला आहे, किती माणसांच्या बुद्धीस भ्रम पाडला आहे, किती हत्या केल्या आहेत, किती स्त्रियांस अनीतिपंकांत रुतविलें आहे, किती साहसी माणसांकडून अघोर कृत्यें करविलीं आहेत! खरोखर दागिना हा पदार्थ जर या जगतांत नसता तर आज जितकीं दुष्कर्में घडत आहेत त्याच्या एक शतांशसुद्धां पापकर्में खास घडलीं नसतीं! असा हा मनाला मोहवून सोडणारा दागिना, त्याचें नांव

* संदेश ता. २० मे १९१७

तें कशाला काढावें आणि त्याच्याशीं संलग्न असणाऱ्या दुष्कृत्यांच्या स्मरणानें आपली मति उगीचच्या उगीच मलीन काय म्हणून करावी, असें वाचकहो, आपण म्हणत असाल. "बायकोचे दागिने" येथून आरम्भ करून आम्हांला कोणत्या शोकपर्यवसायी वार्तेचें विष पाजविण्याचा आपला मानस आहे असें आपण मोठ्या काकुळतेनें आम्हांस विचारीत असाल. दागिन्याच्या सोसापायीं एखाद्या स्त्रीनें आपल्या पतीच्या कलिजास जंबिया लाविला कीं काय, बायकोचे दागिने चोरीस गेले म्हणून तिचा नवरा शोक करीत वेडा झाला कीं काय, बायकोनें दागिन्यांचा हट्ट धरला पण तो पुरवितां न आल्याबद्दल दोघांनीं आपसांत भांडण करून एकमेकांचे प्राण घेतले कीं काय, असल्या प्रकारच्या शंकाकुशंकांनीं वाचकांचीं मनें गजबजून गेलीं असतील. वाचकहो, जरा धीर धरा. आपल्या अंतःकरणाचें पाणी होऊं देऊं नका. पुढील गोष्टीमध्यें सुरम्यता आणि अद्भुत रम्यता यांचें इतकें बेमालूम पर्यवसान झालेलें तुम्हांला आढळेल कीं, दागिने हा शब्द मनोदुर्बलता, मोहकता, खेद, मोह, चिन्ता इत्यादि दोषयुक्त मनोविकारांशीं संलग्न झाला असल्याबद्दल आपली जर आजपर्यंत कल्पना झाली असेल तर ती नाहींशीं होऊन इतःपर दागिने हे शब्द उच्चारतांच तुमच्या मनांत अत्यन्त उच्च, अत्यन्त सात्विक, अत्यन्त थोर असेच मनोविकार उद्दीपित होतील. ही वार्ता श्रवण केल्यावर आपण दागिना हा एक कःपदार्थ आहे, तो मनोमालिन्य उत्पन्न करणारा आहे, तो मोहजालांत नेऊन सोडणारा आहे, तो अधःपातास कारणीभूत होणारा आहे अशा प्रकारची भाषा वापरणार नाहीं; आणि असलीं उदार कृत्यें घडवून आणण्याचेंही ज्यांच्यामध्यें सामर्थ्य आहे असल्या दागिन्यांबद्दल अत्यन्त कृपण मनुष्यापेक्षांही तुमच्या ठिकाणीं जास्त दृढ वासना उत्पन्न होईल.

दागिन्यानों ! बायकांच्या दागिन्यानों ! तुम्हीं आजवर जर पापकर्मे करण्याऐवजीं सत्कृत्यें करीत राहिलां असतां तर तुमचा दुर्लौकिक कां झाला असता ? तुम्हीं ज्याच्या शरीरावर आपलें वास्तव्य करितां त्याच्या अंगीं सद्गुणाचें स्फुरण करण्याचें सामर्थ्य तुमच्या ठिकाणीं असल्याचें तुम्हीं प्रथमपासूनच जाहीर केलें असतें तर समाधीसुख अनुभवणारे योगी तुमच्या प्राप्तीची हौस कां न धरते ? आपल्या अंगचे सद्गुण लपवून ठेऊन तुम्हीं विनाकारण अपयश संपादिलें आहे तें कशाकरितां ? बायकांच्या दागिन्यानों, एखादे वेळीं सत्कृत्य करून लोकांचे डोळे दिपवून सोडावे आणि त्या कीर्तीच्या भांडवलावर

पुष्कळ अपकृत्यें करीत रहावीं असा तर आपला मानस नाहीं ना ? पण तें कांहीं असो. तुमच्या ठिकाणीं परमावधीचे सद्गुण वास करितात असें ज्याअर्थीं तुम्हीं निदर्शनास आणिलें आहे त्याअर्थीं आम्ही तुमचे सगळे दुर्गुण विसरून जातों. दुष्कर्मांच्या जननीच्या पोटीं असला एखादाही सत्कृत्यपुत्र जन्मास आला तरी तिचें जीवित धन्य समजलें पाहिजे. म्हणून बायकांच्या दागिन्यानों, आम्हीं आजपर्यंत अज्ञानतः तुमच्या विषयीं जो दृढग्रह करून बसलों होतों त्याबद्दल तुमची क्षमा मागून असले विचार जागृत करण्यास कारणीभूत झालेल्या वृत्ताकडे वळतों.

वाचकहो, नाशिकचे रा. धुण्डिराजपंत फाळके यांच्या 'हिंदुस्थान सिनेमा'चें नांव माहित नाहीं असा महाराष्ट्र वाचक विरळा ! आम्हीं आजपर्यंत त्यांच्या यशस्वी कारखान्याविषयीं इतकी माहिती वाचकांस सादर केलेली आहे कीं ती वाचून कित्येक महाराष्ट्रियांच्या ठिकाणीं "ओल्या सहानुभूतीस" पाझर फुटलेला आहे. ठिकठिकाणचे लोक त्यांजविषयीं व त्यांच्या कारखान्याविषयीं अनन्त प्रकारची चौकशी करीत आहेत. सुदैवेंकरून रा. फाळके यांच्या कारखान्याविषयीं माहिती सादर करण्यास आणि मुंबई प्रान्तिक परिषदेचें अधिवेशन नाशिक येथें घडून येण्यास एकच योग घडून आला; व परिषदेस जमलेले हजारों लोक फाळक्यांच्या बंगल्याकडे खेपा घालूं लागले. एके दिवशीं संध्याकाळीं रा. फाळके यानीं लोकमान्य आणि श्रीमन्त दादासाहेब खापर्डे यांस आपल्या घरीं पानसुपारीस बोलावून नेलें. त्यांच्या बरोबर दोन–तीनशें प्रतिनिधीही तेथें गेले होते. सर्व मंडळी जमल्यावर रा. फाळके यांनीं आपल्या कारखान्यासंबंधानें दोन शब्द जमलेल्या लोकांस सांगितले. ते सांगत असतांना त्यांचा कंठ इतका सद्गदित झाला कीं त्यांच्या तोंडांतून शब्द निघेना आणि नेत्र पाण्यानें डबडबून गेले. सुमारें दोन मिनिटें निःस्तब्ध होऊन त्यांनीं आपलें भाषण संपविलें व लोकमान्यद्वयांस उद्देशून एकच अर्थपूर्ण वाक्य उच्चारिलें कीं "महाराज, हें अन्तःकरण नुसतें जळत आहे." या एका वाक्याचा इतका विलक्षण परिणाम झाला कीं कित्येकांनीं तेथल्या तेथें रा. फाळके यांस पंधरा, पंचवीस, शंभर, इत्यादि रुपये दिले आणि जागच्या जागीं पैसे नसल्यामुळें बाकीच्यांनीं आपल्या कॅम्पमध्यें कोणास तरी पाठविण्याविषयीं रा. फाळके यांस विनंति केली. उमरावतीच्या एका अगदीं सामान्य स्थितींतल्या गृहस्थानीं तर तेथल्या तेथें अशी प्रतिज्ञा केली कीं, रा. फाळके यांस मी दरमहा एक रुपया देण्यास सिद्ध आहें ! वाचकहो, फाळके यांस लागणारे तीस हजार रुपये

कोणीकडे आणि गुलाबरावांचा दरमहा एक रुपया कोणीकडे ! पण ज्या उज्वल देशभक्तीनें प्रेरित होऊन हें आश्वासन देण्यांत आलें, त्या भक्तीचा जिव्हाळा आपण पहाल, त्या निष्ठेचा निस्सीमपणा जर आपण लक्षांत घ्याल, त्या उत्तुंग मातृप्रेमाच्या गगनभेदी शिखरावर जर आपण दृष्टिपात कराल तर सामान्य मनुष्यास घेरी आल्याशिवाय राहणार नाहीं, अशी आपली खात्री पटल्याशिवाय रहावयाची नाहीं. असो. लोकमान्यादि मंडळी तेथील पानसुपारी घेऊन व फाळक्यांचा कारखाना पाहून परत आपल्या बिऱ्हाडीं गेली. फाळक्यांच्या घरीं झालेला प्रकार सर्व प्रतिनिधींच्या कर्णरंध्रावर गेला व असल्या प्रसंगीं आपण हजर नव्हतों म्हणून कित्येकांस पराकाष्ठेचा विषाद वाटला. फाळक्यांच्या आत्मयज्ञाच्या पूर्णाहुतींत आपली एखादी तरी आहुती पडली पाहिजे अशी सद्वासना पुष्कळांच्या ठिकाणीं उत्पन्न झाली व पुष्कळांनीं तिला स्मरून रा. फाळके यांस यथाशक्ति सहाय्यही केलें. हें पुण्यकर्म करण्याच्या अहमहमिकेंत भाग घेण्याची इच्छा अत्यन्त गरिबींत असलेल्या एका दम्पत्याच्या अंगीं उत्पन्न झाली. पण 'हतबल तो अश्व वेगें धांवाया लागतां। नुचलती बा चरण त्याचें ॥' अशी त्यांची स्थिति झाली ! काय करावें, कसें करावें, या मंत्राचा निदिध्यास त्यास लागला. शेवटीं निदान रा. फाळके यांचें दर्शन तरी घ्यावें या बुद्धीनें हें दाम्पत्य संध्याकाळचा काळोख पडण्याच्या सुमारास त्यांच्या कारखान्यांत गेलें. नमस्कारचमत्कार झाल्याबरोबर या दम्पत्यांतील पत्नीनें आपल्या हातांतील सोन्याचे गोट काढून ते रा. फाळके यांच्यापुढें टाकले व ही आमची अल्प सेवा आहे तिचा स्वीकार करावा अशी अत्याग्रहाची विनवणी करूं लागली. फाळक्यांचें अन्तःकरण गहिंवरून आलें ! आपल्या सहानुभूतीबद्दल मी आपला अत्यन्त ऋणी आहें पण हा असला भार माझ्या शिरावर घालूं नका असें फाळके सांगताहेत, उलटपक्षीं हें पुण्यशाली दम्पत्य यांच्या विनन्तीचा अनादर करून आपला आग्रह धरून बसत आहे, अशा प्रकारचा सत्ययुगांतील कलह त्यांच्यामध्यें बराच वेळ चालला. आपण हे गोठ स्वीकारीत नसाल तर मी आतांच्या आतां बाजारांत जाऊन ते विकून टाकीन आणि मिळालेलें द्रव्य आपल्या पायांवर आणून ओतीन असा बाईनीं आग्रह धरिला, व हातांतून काढलेल्या गोठांस त्या स्पर्श करीनात. मी आपल्या अंगावर आजपर्यंत हे गोठ धारण केले, आतां त्यांचें सार्थक होण्याचा समय आलेला आहे, या माझ्या संकल्पाच्या आड आपण येऊं नये, असा बाईचा

हट्ट पडला. शेवटीं फाळक्यांस त्यांच्यापुढें हार खावी लागली, आणि त्यांना ते गोठ सप्रेम, सार्द्र व कृतज्ञतायुक्त अन्तःकरणानें स्वीकारणें भाग पडलें !

वाचकहो, या गोटांनीं फाळके यांच्या भांडवलाची संख्येच्या दृष्टीनें पूर्ति झाली नसेल, पण एवढें नितान्त शुद्ध अन्तःकरण आपल्या सहाय्यास आलें यावरून प्रत्यक्ष परमेश्वरच या स्वरूपानें आपणांस पाठींबा देत आहे असें जर फाळक्यांस वाटलें तर त्यांत कांहीं आश्चर्य आहे काय? वरील गृहस्थ आपल्या पत्नीस घेऊन जेव्हां हौदाच्या बंगल्याकडे एकेक पाऊल टाकीत चालले तेव्हां आपणांस आत्मयज्ञ करण्याची संधी मिळाल्याबद्दल त्यांस केवढा आनन्द वाटत असेल ! पतींशीं एकहृदय झालेल्या ह्या निष्ठावन्त पत्नीचा अन्तःकरणसमुद्र ह्या पर्वणीच्या वेळीं केवढा उचंबळून आला असेल! याची वाचकहो, क्षणमात्र कल्पना करून पहा आणि अनुकूलतेच्या अभावाचें रडगाणें गाऊन सदैव सत्कार्यापासून दूर रहाणाऱ्या सामान्य जनसमूहाकडे अवलोकन करा म्हणजे तुम्हाला ह्या "बायकोच्या दागिन्यांचें" महत्व कळून येईल. वरील वृत्तांत कल्पित असता तरी तो अद्भूत वाटला असताच, पण तो कल्पित नसून गेल्या आठवड्यांत नाशिक येथें प्रत्यक्ष घडून आलेला आहे, व त्याच्या सत्यतेबद्दल नाशिकचे हजारों जण साक्ष देतील. वरील गृहस्थ जेव्हां एकेक पै पैसा जमवून त्याचे दागिने आपल्या पत्नीच्या अंगावर घालीत होते तेव्हां सोन्याच्या प्रत्येक कणांत त्यांनीं आपली कर्तव्यनिष्ठा ओतिली होती. आपण सुवर्णाचे भोक्ते नसून देवाचे, मातृदेवतेचे सेवक आहोंत अशी त्यांनीं व त्यांच्या कुटुंबांनीं कित्येक दिवसांपासून दृढ भावना करून घेतली आहे आणि याच भावनेला अनुसरून त्यांचा जीवनक्रम सुरू आहे. शंभर गोष्टींत लक्ष घालून एक धड ना भाराभर चिंध्या करण्यापेक्षां हातीं घेतलेल्या कार्यास हृदयसर्वस्व वाहून त्या प्रीत्यर्थ परिश्रम करण्याचा त्यांचा सतत क्रम सुरू आहे. वाचकहो, ह्या जोडप्याचें नांव-गांव जाणण्याची उत्सुकता आपणांस झाली असेल, पण ती पूर्ण केल्यापासून तुमचा विशेष फायदा तो कोणता? चांगल्या कृत्यास सहाय्य करण्याच्या इच्छेनें प्रेरित होऊन आपल्याजवळ असेल नसेल तें अर्पण करण्याइतक्या थोर अंतःकरणाचीं माणसें आज मितीस ह्या आर्यावर्तामध्यें आहेत हें ह्या उदाहरणांवरून लक्षांत ठेवा. आज हिंदुस्थानांतील ज्या दारिद्र्याबद्दल आम्हांस खेद वाटतो तें सांपत्तिक दारिद्र्य नसून अंतःकरणशुद्धतेचें दारिद्र्य होय. तुम्हीं विपन्नावस्थेंत असा किंवा विद्वत्तेच्या दृष्टीनें निर्बल असा, पण अन्तःकरण हें प्रत्येकाच्या जवळ असतें. तें कोणत्याही

परिस्थितींत मलीन होऊं देऊं नका; उलटपक्षीं अग्नीनें जशी सुवर्णाची शुद्धि होते, तद्वत् विपरीत परिस्थितीमध्यें असतांनासुद्धां आपल्या कर्तृत्वसंपन्न पूर्वजांचें स्मरण करून त्यांचें विक्रमशालित्व आपल्या अंगीं असल्याचें जगाच्या निदर्शनास आणा, असें वरील जोडपें आपल्या उदाहरणानें आपणांस उपदेश करीत आहे. या दंपत्याचें वक्तृत्व मूक आहे; ते दोघेही व्यासपीठावर उभे राहून बोलत नाहींत. ते आपल्या चरणांची सेवा करून आपल्या अंतःकरणावर अधिरूढ होत आहेत. आपल्या सर्वस्वावर आनंदानें तुळशीपत्र ठेवणाऱ्या ह्या जोडप्याचें दर्शन घेण्याची आपणांस अनिवार इच्छा उत्पन्न झाली असेल पण त्यांच्या नुसत्या दर्शनांत कृतार्थता मानूं नका. त्यांच्या अंतःकरणाशीं आपल्या अंतःकरणाचें तादात्म्य करावयाचें असेल व प्रत्येक सत्कृत्यास शक्य तितकें सहाय्य करण्याचा तुमचा निर्धार असेल, हातांनीं टाळ्या वाजविणें व डोळ्यानीं अश्रू गाळणें यापलीकडे जाऊन प्रत्यक्ष कांहींतरी सत्कृत्य आपल्या हातून व्हावें असा जर आपला संकल्प झाला असेल, तर प्रथम फाळके यांस आपल्या शक्तीनुरूप सहाय्य करण्याची शपथ घ्या आणि मग साधल्यास पुणें येथील नाटकगृहांत प्रत्येक नाटक प्रयोगाच्या वेळीं पैसाफंडाची पेटी फिरविण्याचा संकल्प करून ज्यांनीं आपले डोळे अधू करून घेतले आहेत ते रा. रानडे आणि असल्या आपल्या कर्तव्यानिष्ठ पतीचा कित्ता वळविण्यांत ज्या आपल्या जीविताचें सार्थक्य मानीत आहेत त्या सौ. सत्यभामाबाई यांच्याकडे जा म्हणजे आम्ही वर जें अंगावर रोमांच उभें करणारें सर्वस्वदानाचें वृत्त दिलें आहे त्याच्या सत्यतेबद्दल तुमची खात्री होईल.

---

# सत्तेशिवाय जीवितहि शून्य आहे ! *

एकदां बादशहानें बिरबलाला विचारलें कीं, सत्ताविसांतून नऊ गेले तर बाकी किती राहिले? बिरबलालाच ह्या प्रश्न विचारण्याचें कारण इतकेंच कीं हा प्रश्न यापूर्वीं बादशहानें दरबारांत विचारलेला होता, व त्यावेळीं सर्व दरबारी लोकांनीं सत्ताविसांतून नऊ गेले तर बाकी १८ रहातात असें उत्तर दिलेलें होतें. आणि असें खरेंच आहे. २७ तून ९ गेले तर बाकी १८ च राहणार हें कोणीहि सांगेल.

---

* टिळक ता. ५ मार्च १९२२.

शाळेंतलें कोणतेंहि अंकगणित घ्या, पोरांना बडविणाऱ्या कोणत्याहि शाळामास्तराला पकडा, कॉलेजांतली खुर्ची अडविणाऱ्या कोणत्याहि प्रोफेसरला विचारा, अर्थशास्त्रावर अर्थशून्य बाडें खरडणाऱ्या कोणत्याहि स्वार्थसाधू आंकडेमोड्या " तज्ज्ञ " ला प्रश्न करा, किंवा गणिताविद्येबद्दल जगद्विख्यात सीनियर रँगलरपणाची पदवी कमावून येणाऱ्या आमच्या रघुनाथराव परांजप्यांपुढें हा सवाल टाका—प्रत्येक त्याचें हेंच उत्तर देईल कीं, २७ तून ९ गेले म्हणजे बाकी १८ राहतात !

आणि हें खरेंच आहे. गणिती लोक ह्यापेक्षां निराळें काय म्हणणार? गणिती लोकांची अक्कल ती किती? ' धनगरांनीं २७ मेंढ्या पावणे चारशें रुपयांना विकत घेतल्या, त्यांतल्या सात मेंढ्या पटकीनें मेल्या, तीन मेंढ्या ड्यूक ऑफ कॅनॉटचे आगमनाप्रीत्यर्थ कापल्या, पांच मेंढ्या लांडग्यानें नेल्या व बाकीच्या मेंढ्या देऊन चार इराणी गद्धे मोबदल्यांत घेतले, तर प्रत्येक धनगरानें किती रुपयांकरितां शंख करीत बसावें इथपर्यंतच ह्या शंखांची अक्कल ! ह्यापेक्षां त्यांना राष्ट्राच्या भवितव्यतेचा अंदाज असता, ह्यांना देशाच्या स्वातंत्र्याची चाड रहाती किंवा ह्यांना परिस्थितीची जाचणूक लागती, तर हे शंख सत्तावीस मेंढ्यांत आणि चार इराणी गद्धयांत कशाला घुटमळत बसते? ह्यांना कसली अक्कल? ह्यांनीं जे आहात्ते दोहोंत दोन मिळविले म्हणजे चार होतात असें पोपटासारखें सांगावें, किंवा पृथ्वीचा आकार जें आहात्ते नारिंगासारखा असतो असें सुंदरी आंब्यासारखें तोंड करून वर्गांत विव्हळत सुटावें, राजकारणाची त्यांना काय अक्कल?

राजकारणाची अक्कल फार निराळी असते. राजकारणाचे आंकडे निराळे, राजकारणाचे हिशोब निराळे, राजकारणाच्या बेरजा आणि वजाबाक्या निराळ्या. एकावर शून्य ठेवलें म्हणजे दहा होतात असें हे बेवकूब गणिती सांगतील, पण एकावर शून्य ठेवल्यानें त्यांचा देव आला तरी राजकारणांत दहा व्हायचे नाहींत. उलट त्या शून्याचें त्या एकाला इतकें ओझें होईल कीं एकाचीच किंमत शून्य व्हायची पाळी येईल. रँगलर परांजप्यांचेंच उदाहरण घ्या. रँगलर परांजपे म्हणजे एवढें मोठें शून्य आहे, एवढें मोठें प्रचंड शून्य आहे, एवढें जंगी वर्तुळ आहे, एवढें अगडबंब " वाटोळें " आहे, एवढें मिशाळ " नारिंग " आहे, एवढा " आंकडेदार झीरो " आहे, कीं त्याला कुणाच्याहि पाठुंगळीवर बसवा, त्याला त्यामुळें कांहीं दसपट अवसान चढणार नाहीं, उलट हें पगडीदार पूज्य आपण कुणीकडून जवळ बाळगलें

असें त्यास होऊन जाईल. पूर्वी कै. गोखले हयात असतां त्यांच्या पाठीवर हें पगडबंद शून्य बसलेलें होतें, पण त्यामुळें काय गोखल्यांना दसपट सामर्थ्य आलें? छेः दसपट सामर्थ्य कुठून येणार? उलट त्यांच्या राजकारणाचे बारा वाजायची वेळ आली. गोखल्यांनंतर हें शून्य तिथून सरकून मग नॉन-ब्राह्मण पक्षाचे उरावर बसलें. नॉन-ब्राह्मण पक्ष त्यावेळीं नवीन व बिनअनुभवी होता. "एकावर शून्य दा-हा-!" असें जें त्यांनीं शाळेंत घोकलें असेल तेवढेंच! कदाचित् तें त्यांनीं रँगलर परांजपे यांचेजवळच घोकलें असेल—कदाचित् तें त्यांनीं गोखल्यांचे ॲरिथमेटिकमध्येंच घोकलें असेल. नॉन्—ब्राह्मणपक्षाचे उरावर ज्यावेळीं हें चतुःशृंगी शून्य जाऊन बसलें, त्यावेळीं त्यांना पहिल्यांदां मोठा आनंद झाला. त्यांना वाटलें कीं "एकावर शून्य दा-हा-"च्या सूत्राप्रमाणें आतां आपल्यापैकीं प्रत्येक मनुष्याचे अंगांत दहा वीरांचें सामर्थ्य येणार! पण कुठलें सामर्थ्य न् कुठलें काय? हें शून्य छातीवर बसलें मात्र आणि कोल्हापूरचे महाराज एवढे खंबीर गडी, पण त्यांचाहि जीव कावराबावरा झाला, भास्करराव जाधव भीतीनें पिवळे दिसायला लागले, श्रीपतराव शिंदे बुचकळ्यांत पडले, कोठाऱ्यांचे पाय लटपटले, आणि सर्वांनीं मिळून विचार केला कीं, ही ब्याद उरावरून काढा व ह्याला दिवाणा-नाहीं नाहीं दिवाण-करा. रँगलर परांजपे त्यावेळीं दिवाणा-नाहीं नाहीं दिवाण झाले, आणि हें फर्ग्युसनी पूज्य त्यानंतर सर जॉर्ज लॉईड यांचे बोकांडीं बसलें! "एकावर पूज्य दहा" ह्या गणिती ठोकळ्याचें तेथेंहि कांहीं प्रत्यंतर येत आहे असें दिसत नाहीं, कारण हे दिवाणे-नाहीं नाहीं दिवाण-नेमले जाण्यापूर्वी मुंबई सरकारचा राज्यकारभार जसा चालत होता तसाच आजहि चालत आहे. मुंबई इलाख्यांतील प्रजा त्यामुळें दसपट सुखी झालेली आहे, असें मुळींच दिसत नाहीं; उलट एवढें मात्र झालें कीं, शाळांची फी सर्वत्र वाढलेली आहे, व सक्तीचें आणि मोफत शिक्षण-पण तें जाऊं द्या-हें शून्य उरावर बसल्यापासून काय काय हाल झाले तें सर जॉर्ज लॉईड हे "रिटायर" झाल्यानंतर आपोआपच सांगतील व त्या वेळीं तीं त्यांची-ऑटोबायॉग्रफी राजकारणांत सामान्य गणितें कांहींएक उपयोगाचीं नाहींत हें स्पष्ट कळविल.

२७ तून ९ गेले तर बाकी किती राहतात, हें एक राजकारणांतील गणित आहे. पण बादशहाच्या दरबारीं लोकांना-त्याच्या दरबारांतील नालायक दिवाणांना-त्याचें मुळींच उत्तर देतां आलें नाहीं. सामान्य गणितावर विश्वास ठेवून ते

म्हणाले कीं, २७ तून ९ गेले तर बाकी १८ राहतील! पण बिरबल हुषार होता. तो उत्तम राजकारणी होता, तो उत्कृष्ट मुत्सद्दी होता. तो म्हणाला कीं, वर्षातल्या एकंदर सत्तावीस नक्षत्रांपैकीं पावसाळ्याचीं नऊ नक्षत्रें जर कोरीं गेलीं तर बाकी काय? बाकी शून्यच. सत्ताविसांत ९ नक्षत्रें वजा करा–बाकी शून्यच राहणार!

सध्यां हिंदुस्थान सरकारच्या बजेटवर जो वादविवाद चालला आहे, तोहि अशाच मासल्याचा आहे. ह्या बजेटचें स्थूल स्वरूप आम्हीं दुसरीकडे दिलेलेंच आहे. त्यावरूनच असें दिसून येईल कीं, हिंदुस्थानच्या जमाखर्चांत यंदा तीसपस्तीस कोटींची तूट आलेली आहे; ह्या तुटीमुळें कोणी हिंदुस्थान सरकारवर बोटें मोडीत आहेत, कोणी नवीन सुधारणांना शिव्या देत आहेत, कोणी हिंदी मेंबरांवर आग-पाखडीत आहेत व कोणी परिस्थितीला दोष देत आहेत, पण आमचे मतानें त्यांतील मुख्य गणिताकडे कुणाचेंहि लक्ष नाहीं. एक अब्ज तीस कोटी उत्पन्नांतून वीस कोटी कमी उत्पन्न झालें व खर्चाच्या बाजूला १४ कोटींचा खर्च जास्त वाढला हें यांतलें खरें गणित नव्हे. हें अंकगणिती गणीत झालें. हें सामान्य गणित झालें. हें शाळामास्तरी किंवा सिनीयर रँगलरी गणित झालें, खरें गणित हें नव्हे. राजकारणी गणित हें नव्हे हें कीं, ज्या दिवशीं हिंदुस्थानचें स्वातंत्र्य गेलें त्याच दिवशीं हिंदु-स्थानचा जमाखर्च तोट्यांत निघाला, त्याच दिवशीं जमेपेक्षां तोट्याची वाढ जास्त झाली, त्याच दिवशीं जमाखर्चाच्या वह्या बिघडून हिंदुस्थानची नाचक्की ठरली.

आज हिंदुस्थानांत ३४ कोटींची तूट आली म्हणून वेडे लोक ऊर पिटीत आहेत. पण अरे वेड्यांनों, ३४ कोटींची तूट आली म्हणून ऊर पिटूं नका. त्यांत ऊर पिटण्याजोगें काय आहे? स्वातंत्र्य मिळत असेल तर ३४ कोटींऐवजीं ४३ कोटींची तूट सोसायला आम्हीं तयार आहोंत. स्वातंत्र्य मिळत असेल तर असेच ३४ का पण ३४० कोट रुपयांची तूट सोसायला आम्हीं तयार आहोंत. अरे, ३४ कोटी रुपयांची तूट आली म्हणून काय रडतां? स्वातंत्र्य गेलें म्हणून रडा!

हिंदुस्थानचा जो तोटा झालेला आहे तो पैशांचा तोटा झालेला नाहीं, स्वातंत्र्याचा तोटा झालेला आहे. पारतंत्र्याचे स्थितींत सर मालकम हेले ह्यांनीं ३४ कोटी तोट्याचे-ऐवजीं ३४ कोटी नफा झालेला दाखविला तर तुम्हीं हंसाल काय? दांत काढाल? मग तुमच्यासारखे निर्लज्ज तुम्हींच! कारण देश परतंत्र असतांना कोणालाहि हंसायचा अधिकार नाहीं. देश परतंत्र असतांना कोणालाहि खुषींत असण्याचा अधिकार नाहीं. देश परतंत्र असतांना कुणालाहि आनंद व्यक्त करायचा अधिकार नाहीं.

सर मालकर हेले ह्यांनीं ह्या वर्षी "बजेट" सादर केलें. हेले फडणीस होण्यापूर्वी सर उइल्यम् मायर्स हे हिंदुस्थान सरकारचे फडणीस होते. ते फडणीस होण्यापूर्वी सध्यां इस्पितळांत डोळ्यांच्या विकारानें आजारी असलेले सर उइल्यम् मेस्टन् हे हिंदुस्थान सरकारचे फडणीस होते. पण ह्या फडणीसांचा आपणांस काय उपयोग? ते हांसले म्हणून आपल्याला हंसायचें नाहीं. ते रडले म्हणूनहि आपल्याला रडायचें नाहीं. ते कां न हंसतील? ज्या दिल्लीचे सिंहासनावर आज युधिष्ठिराचे वंशज कोणीतरी विराजमान व्हावयाचे, ज्या दिल्लीचे सिंहासनावर पृथ्वीराज ह्याच्या कुलांतील कोणी विख्यात पुरुष असावयाचा, ज्या दिल्लीचे सिंहासनावर अकबराच्या पुत्रांपैकीं कोणाचें तरी आसन अधिष्ठित असायचें, ज्या दिल्लीचे सिंहासनावर सदाशिवराव भाऊंच्या वीरांपैकीं कोणी तरी वीर दृश्यमान व्हायचा, ज्या दिल्लीचे सिंहासनावर महादजी शिंद्यांच्या वीर बच्चांपैकीं एखादा वीराचा बच्चा विद्यमान व्हायचा, त्या सिंहासनावर-होय-होय-होय-त्या युधिष्ठिराच्या, त्या पृथ्वीराजाच्या, त्या अकबराच्या, त्या अवरंगजेबाच्या, ( अश्रूंनों, थांबा, थांबा, गडबड करूं नका, पुढील सर्व हतभागीं सत्य आम्हांस लिहूं द्या. ) त्या सदाशिवराव भाऊच्या, त्या आमच्या विश्वविजयी महादजी शिंद्याच्या राजसत्तेवर आरूढ होऊन—दिल्ली शहरांत हकीम अजमलखां, स्वामी श्रद्धानंद वगैरे हिंदुस्थानचे लाल हयात असतांहि त्यांचें हातीं राज्यकारभार न पडतां जर पांच हजार मैलांवर घर असलेल्या सर मालकम् हेले यांना विजयी मुद्रेनें जमाखर्चाचा खर्डा वाचायला मिळाला तर ते कां हंसणार नाहींत?

उद्यां एखादा लेले अथवा बापट जर अमेरिकेचा फिनॅन्स मेंबर होईल, एखादा सावंत किंवा राणे ह्यांस जर स्पेनचा फिनॅन्स मेंबर व्हायला सांपडेल, उद्यां एखादा सुब्रह्मण्य ऐयर जर ग्रीसचा फिनॅन्स मेंबर होऊं शकेल अथवा एखादा छोटानी जर पॅरागेचा फडणीस बनेल तर आपणांसहि आनंद कां नाहीं होणार? सर मालकम् हेले ह्यांना जर रडूं येत असेल तर तें एवढ्याकरितां कीं येथें जेवढी रक्कम आपल्या सत्तेखालीं येईल असें त्यांना वाटलें होतें तेवढी आली नाहीं. पण एवढ्यामुळें ते रडलेले नाहींत. काड्याच्या पेटीवर कर बसवून, एका पैशाचें कार्ड दोन पैशाला करून, गरीबांचें मीठ महाग करून त्यांना जेवढी रक्कम राज्यकारभाराकरितां अवश्य वाटते तेवढी ते जमा करणारच आहेत!

पण हा त्यांचा प्रश्न आहे. तो आपला नव्हे. बादशहाच्या गोष्टींतील २७ तून ९ गेले म्हणजे जसें शून्य राहिलें; त्याप्रमाणें हिंदुस्थान सरकारच्या १३० कोटि रुपयांतून जर स्वातंत्र्य तेवढें गेलें तर आपल्याला बाकी शून्यच राहिलें! स्वातंत्र्य नसलें आणि नफा झाला तरी तो शून्यच! स्वातंत्र्य नसलें आणि १४० कोट उत्पन्न झालें तरी तें शून्य! स्वातंत्र्य नसलें आणि इंद्राचें नंदनवन मिळालें तरी तें शून्य! स्वातंत्र्य नसलें आणि ऐरावत बसायला मिळाला तरी तो शून्य! स्वातंत्र्य नसलें आणि कुबेराची संपत्ति मिळाली तरी ती शून्य! स्वातंत्र्याशिवाय सौख्य शून्य, स्वातंत्र्याशिवाय आनंद शून्य! स्वातंत्र्याशिवाय संसार शून्य; स्वातंत्र्याशिवाय जीवितहि शून्य! स्वातंत्र्य हें आमचें अस्तित्व आहे, स्वातंत्र्य हें आमचें धन आहे, स्वातंत्र्य हें आमचें बजेट आहे. ह्या बजेटांत स्वातंत्र्य घाला, आणि कोट्यवधी रुपयांचा तोटा दाखवा—अहाहा—तें आम्हीं आमचें परमभाग्य समजूं—आमच्या बजेटांत स्वातंत्र्य नसूं द्या—मग आम्हांला हेले शून्य, कौन्सिलें शून्य, सर्व शून्य! ज्या बजेटांत स्वातंत्र्य नाहीं तें आम्हांला शून्य नको.

---

# नागपूरची घनघोर लढाई *

आम्हांस आज प्रथमच संदेशच्या प्रिय वाचकांच्या चरणांस वंदन करून त्यांची शतशः क्षमा मागितली पाहिजे. कारण नागपुरच्या कॉंग्रेसला सुरुवात झाल्यापासून ती संपेपर्यंत संदेशचे अंक प्रचंड मारुताच्या प्रचण्ड वेगानें महाराष्ट्राच्या वाचकगणांत एकसारखे खेळत असायचे, त्याऐवजीं संदेशच्या अंकांना ह्या काळांत अंतरायच घडला. वाचकांची अंतःकरणपूर्वक सेवा बजावायचा जो काळ त्याच काळांत वाचकांच्या सदय चरणांपासून दूर होण्याचा प्रसंग यावा हें वाचकांना कदाचित् आत्यंतिक क्रोधाचें सबळ कारण वाटेल, व त्या कारणामुळें संदेशवर अंगचोरपणा, दुर्लक्ष अथवा वाचकांविषयीं बेफिकीरपणा ह्यांपैकीं एक किंवा अनेक आरोप करण्याकडे त्यांच्या मनाची प्रवृत्ति होईल. परंतु वर सांगितल्याप्रमाणें आमच्या प्रिय वाचकांच्या चरणांना वंदन करून आणि त्यांची शतशः क्षमा मागून

* संदेश, ता. ६ जानेवारी १९२१

आम्हीं त्यांना असें निवेदन करण्याची परवानगी घेतों कीं आम्ही आपल्या सेवेला जे अन्तरलों हे अंगचोरपणाच्या किंवा विश्रांतिसुखाच्या इच्छेनें नव्हे, तर वाचकांची खरीखुरी व महत्वाची सेवा बजावण्यास सांपडावी ह्या इच्छेनेंच होय.

× × × ×

आतांपर्यंत जी गोष्ट महाराष्ट्रांत बहुतेकांना माहीत झालेली आहे तीच पुन्हां सांगायची म्हणजे हीच कीं, यंदा नागपुरच्या कॉंग्रेसला संदेशचे नेहमींचे व स्पेशल प्रतिनिधी गेले होते. एवढेंच नव्हे तर, यंदा संदेशचा सर्व कार्यकारी संघ, संपादक, उपसंपादक, प्रतिनिधी, रिपोर्टर, मॅनेजर, कंपॉझिटर, प्रेसमन, नोकर, चाकर, बाईंडर यांसहवर्तमान नागपूर कॉंग्रेसला गेलेला होता. एवढेंच काय, पण वर्तमान- पत्राचा प्रसार करणारे छोकरे हे सुद्धां संदेशनें आपल्याबरोबर नागपुरला नेलेले होते. आणि हा सर्व कार्यकारी वर्ग एकटा गेलेला नव्हता, तर संदेशचा सर्व टाईप, केसी, कागद, शाई, आणि शिरस हे सुद्धां संदेशनें आपल्याबरोबर नेलेले होते.

× × × ×

मुंबईतून निघतांना मुद्दाम रेल्वेचा डबा रिझर्व्ह करून संदेशचा कार्यकारी वर्ग नागपूरला निघाला व त्याचप्रमाणें रिझर्व्ह डबा करून नागपुरहून परत आला. तेथें गेल्याबरोबर कामाला सुरवात झाली. येथें आल्यावरही एक दिवसापेक्षां कामकरी लोकांना ज्यास्त सुट्टी देण्यांत आली नाहीं. इतर वेळेला आठवड्यांतून एक तरी विश्रांतीचा दिवस कामकरी लोकांना देण्यांत येतो, कॉंग्रेसच्या ह्या दिवसांत तितकीही विश्रांति त्यांना मिळाली नाहीं.

× × × ×

हें सर्व इतकें सांगण्याचें कारण एवढेंच कीं, वाचकांच्या सेवेंत संदेश कधींही अंगचोरपणा करणार नाहीं. ह्या जगांत संदेशला सर्वांत जर कोणती गोष्ट ज्यास्त प्रिय असेल तर ती संदेशच्या वाचकांची सेवा हीच होय ! ह्या गोष्टीपुढें संदेशला विश्रांति प्रिय नाहीं. संदेशची वाचकांच्या संबंधानें एवढीच भावना आहे कीं, संदेशच्या हातून वाचकांची आजन्म सेवा घडो व त्या सेवेपासून वाचकांचें व देशाचें महत्वाचें कार्य होवो !

× × × ×

यंदाची कॉंग्रेस अतिशयच महत्वाची होती. हिंदुस्थानच्या आधुनिक इतिहासांत नागपुरच्या कॉंग्रेसनें हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासाचा ओघच बदलून टाकला

आहे असें म्हणायला हरकत नाहीं ! अशा वेळीं संदेशनें वाचकांची कोणती सेवा बजावायची ? मुंबईत स्वस्थ बसून रिपोर्टावर अवलंबून रहायचें ? मतमतांतराच्या ज्या घनघोर संग्रामांत राष्ट्राचें भवितव्य ठरून जायचें त्या संग्रामाचा केवळ आड-गिऱ्हाईकी रिपोर्ट प्रसिद्ध करायचा ? संदेशनें एवढेंच केलें तर मग संदेशनें वाचकांची कोणती विशेष कामगिरी बजावली ? मग संदेशवर असलेल्या वाचकांच्या निरतिशय प्रेमांतून व संदेशवर वाचकांनीं ठेवलेल्या निर्मर्याद विश्वासांतून संदेश कसा उतराई झाला ? छेः, राष्ट्राच्या इतिहासांतील या संस्मरणीय प्रसंगाचे वेळेस संदेशला एवढेंच करून कसें चालेल ? संदेशाच्या वाचकांची तनमनधनेंकरून सेवा बजावणें हें तर संदेशाचें पहिलें काम ! तें काम इमानेंइतबारें बजावण्याला संदेशला आपल्या वाचकांची विशेष चाकरी करावयास नको काय ?

× × × ×

संदेशाच्या संपादकापासून तो संदेशाच्या टैपापर्यंत सर्वांची रवानगी नागपूर येथें करण्यांत आली त्याचें कारण हेंच होय. संदेशाच्या वाचकांचा प्रेमळ आशिर्वाद म्हणूनच संदेशाची ही इच्छा तडीला गेली, आणि आज ‘ कामगिरी करून आलों ’ हें संतोषकारक वाक्य उच्चारण्याची संधि संदेशला लाभलेली आहे. हें वाक्य आज उच्चारायला सांपडेपर्यंत मध्यें अनेक अडथळे, संकटें, विघ्नें येण्याजोगीं होतीं; मुंबईहून निघतांना हा पल्ला फारच विकट दिसत होता. हें कार्य कसें काय तडीला जाईल याविषयीं मन फारच साशंक होतें. सर्व कार्यकारी संघासह ज्यावेळीं बोरी-बंदर स्टेशन प्रथमतः सोडलें, त्यावेळची मनाची कालवाकालव मनालाच माहीत ! आज येथील गाडींत बसत आहोंत खरें पण याच अब्रूदार स्थितींत परत उतरायला सांपडेल ना ? असें एकसारखें मन विचारीत होतें परंतु ईश्वराच्या कृपेनें कोणताही वाईट प्रसंग मार्गांत न येतां आज आम्ही वाचकांचे सेवेस पुन्हां सादर होत आहोंत ही केवळ वाचकांच्या पुण्याईचीच फलप्राप्ति होय ! ह्या वाचकांच्या पुण्याईची फलनिष्पत्ति अशा रीतीनें संदेशाच्या कामाला आली. ह्याबद्दल संदेशाच्या मनाला आजच्या शुभ प्रसंगीं जें आनंदाचें भरतें येत आहे तें काय विचारावें ?

× × × ×

एवढ्या खटाटोपानें नागपुरास जाण्याचें प्रयोजन एवढेंच कीं, नागपूरची कॉंग्रेस खुद्द नागपूरास पहावी व त्याची खरी हकीकत नागपूरहून वाचकांस अर्पण करण्यास

सांपडावी ! ही इच्छा बहुतांशीं सफल झालेली आहे ! संदेशनें नागपुरास गेल्याबरोबर ' संदेशाचा देशसेवक ' ताबडतोब सुरू केला व नागपूर येथें जमलेल्या प्रचंड जनतेस कॉंग्रेसची माहिती रोजच्या रोज पुरविली एवढेंच नव्हे, तर खुद्द नागपुराहून 'संदेशाचा देशसेवक' गांवोगांवीं कॉंग्रेसची खरी हकीकत घेऊन गेला ! अर्थात् हें करण्यांत आम्हांस भरपूर अंक कोठेंच पुरवितां आले नाहींत, मग गांवोगांवीं अंकाचा पुरवठा करण्याची गोष्ट कशाला ? तथापि शक्य तितका प्रयत्न करून आम्ही—संदेशच्या नोकरांनीं—नागपुरास जमलेल्या जनतारूपी जनार्दनाची चरणसेवा तर केलीच, परंतु गांवोगांवीं संदेशाचा देशसेवक पाठविण्याचीही शक्य तितकी खटपट केली. तथापि इतकें करूनही हजारों वाचकांच्या सेवेला अंतरलों हें आम्हांस माहीत आहे, आणि म्हणूनच या प्रसंगीं त्यांची अंतःकरणपूर्वक आम्ही क्षमा मागत आहोंत !

× × × ×

अशा रीतीनें एखाद्या वर्तमानपत्राच्या कामकरी वर्गानें परक्या ठिकाणीं जाऊन तेथें रोजच्यारोज वर्तमानपत्राचे अंक प्रसिद्ध करणें ही गोष्ट हिंदुस्थानांतील वर्तमानपत्रांत तरी नवीन आहे. निदान हिंदुस्थानांत तरी असला उपक्रम कोणत्याही वर्तमानपत्रानें कोठेंही केलेला माहीत नाहीं. परंतु ह्यांत आम्हांस कोणत्याही प्रकारची आत्मप्रौढी वाटत नाहीं. सेवा करण्याची नवीन दिशा सांपडल्याबद्दल आम्हांस उलट आनंद मात्र होतो. वाचकांची सेवा करण्याचें पवित्र कार्य अंगावर घेतल्यानंतर त्यांत शक्य तितकें आधिक्य व शक्य तितकें उत्कटत्व साधण्याचा प्रयत्न केलाच पाहिजे. असला प्रयत्न आम्ही न करूं तरच आम्ही आपल्या कर्तव्यांत कसूर केली असें आम्हांस वाटेल. ईश्वराच्या कृपेनें असली कसूर संदेशच्या हातून घडण्याचा प्रसंग आला नाहीं. उलट, सेवेचा नवीन मार्ग संदेशला सांपडला. आम्ही याबद्दल परमेश्वरास व सर्व संदेशच्या वाचकांना पुन्हां पुन्हां धन्यवाद देतों.

× × × ×

संदेशवाचकांच्या यशाचा दुंदुभी आम्हांला नागपूर येथें जमलेल्या अफाट जनसमूहापुढें जेव्हां गर्जवितां आला त्यावेळीं आमच्या मनांत आनंदाच्या केवढाल्या लाटा उसळल्या असतील ह्याची कल्पनासुद्धां करतां यायची नाहीं. संदेशवाचकांच्या यशाचा मोर्चाच या वर्षी कॉंग्रेसच्या किल्ल्यावर लागला गेलेला आहे. संदेशवाचकांच्या यशाचें शिंग आज कांग्रेस किल्ल्याच्या बुरुजावर गरजलें गेलेलें आहे.

संदेशवाचकांच्या यशाचें निशाण आज काँग्रेसच्या तटावर उभारण्यांत आलेलें आहे. प्रिय वाचकांनों, हा तुमच्याच पुण्याचा प्रभाव बरें. ह्या संदेशला तुम्ही आपल्या कृपेच्या जवळ केलांत त्याबद्दल हा संदेश आपले उपकार कृतज्ञतेनें स्मरत आहे. ह्यापुढेंही असा आशिर्वाद द्या कीं, संदेशाच्या हातून आपली जन्मभर सेवा घडो व ज्या दिवशीं परलोकांतून संदेशला आमंत्रण येईल त्यावेळीं आपली सेवा बजावतां बजावतांच त्याला इथून जावें लागो.

× × × ×

वर योजलेल्या लष्करी भाषेंतच बोलावयाचें म्हणजे यंदाची काँग्रेस हें एक तुमुल युद्ध होतें. या युद्धाचा शेवट चांगल्या रीतीनें लागला तर राष्ट्राचा भाग्योदय व्हावयाचा होता. ह्या युद्धाचा शेवट जर खराब झाला तर राष्ट्राचा अधःपात होण्याचा प्रसंग होता. राष्ट्राचें खरोखर भाग्य कीं सर्व राष्ट्रदेवतांच्या शुभ साह्यानें ह्या युद्धाचा अनुकूल शेवट झाला. एवढेंच नव्हे तर राष्ट्राचें पाऊल एकदम इतकें पुढें गेलें कीं, कोणी कितीही शिकस्त केली तथापि आतां राष्ट्राचा पाय मागें येणें शक्य नाहीं. राष्ट्र आतां पुढें गेलेलें आहे. राष्ट्राच्या ध्येयानें आतां फार पुढची मजल मारलेली आहे ! आतां राष्ट्र मागें फिरेल ही आशा कोणी कधींही करूं नये. राष्ट्राच्या कितीही दुर्दैवशक्ति असोत, त्या सर्व जरी राष्ट्राच्या खनपटीला बसल्या तरी राष्ट्राचें पुढें गेलेलें पाऊल रेसभरही मागें खेंचतां यायचें नाहीं.

× × × ×

नागपुरला काँग्रेस बोलावली गेली तिथपासूनची सर्व हकीकत सांगून वाचकांना कंटाळा आणण्याचा ह्या लेखाचा हेतू नाहीं. कारण त्यांतली पुष्कळशी हकीकत वाचकांच्या कानावर खुद्द संदेशमधूनच गेलेली आहे. नागपुरला काँग्रेस बोलवल्या-नंतरची पहिली मोठी गोष्ट म्हणजे जबलपुरला काँग्रेस नेण्याबद्दलचा तंटा होय ! त्यानंतर काँग्रेसचे पंजाब-रिपोर्ट प्रसिद्ध झाले, स्पेशल काँग्रेस भरविण्याचें ठरलें, आणि ही काँग्रेस नागपूर किंवा जबलपुर येथें भरवावी कीं काय ह्याची थोडीशी चर्चा होऊन लाला लजपतराय यांचे अध्यक्षतेखालीं स्पेशल काँग्रेसचें अधिवेशन कलकत्ता येथें होण्याचें ठरलें !

× × × ×

ह्यानंतर सर्व देशावरच एक दुर्धर प्रसंग ओढवला. आणि तो म्हणजे लो. टिळक यांचा स्वर्गवास होय. लोकमान्यांच्या परलोकगमनानें कोणाचें कितीही नुकसान झालेलें असलें तरी नागपुरच्या काँग्रेसला जसे त्याचे परिणाम जाणवले तसे

दुसऱ्या कोणालाही जाणवले नसतील ! कारण टिळक अध्यक्ष हवेत, टिळक अध्यक्ष हवेत, ह्याकरितां गेलीं बारा तेरा वर्षें कॉंग्रेसनें एकसारखी तपश्चर्या चालविलेली होती. टिळक नाहींत तर कॉंग्रेसमध्यें जीवन नाहीं, प्राण नाहीं, श्वास नाहीं अशी नागपुरकरांची भावना होई. लोकमान्यांवरील सर्व संकटें टळल्यानंतर आतां लोकमान्यांना अध्यक्ष होण्यास कोणतीही अडचण उरणार नाहीं ह्या कल्पनेनें, ह्या अंदाजानें, ह्या आशेनें त्यांनीं नागपुरला कॉंग्रेस बोलावलेली होती. पण लोकमान्यांची इतर सर्व संकटें जरी नाहींशी झालेलीं होतीं तरी एक नवीनच संकट लोकमान्यांवर कोसळलें. लोकमान्यांवर कृतांतानें झडप घातली आणि हेच अध्यक्ष हवेत, हेच अध्यक्ष हवेत अशी जपमाळ नागपुरची कॉंग्रेस घेऊन बसलेली असतांनाच लोकमान्यांच्या स्वर्गवासानें जगतीतलावरील दाही दिशा काळ्याकुट्ट झाल्या.

× × × ×

पुढें लवकरच कलकत्त्याची स्पेशल कॉंग्रेस भरली आणि त्यांत गांधींचा तेजःपुंज तारा क्षितिजावर येऊन त्यानें लोकमान्यांचें कार्य पुढें चालविलें. सत्याग्रह आणि गांधींची असहकारिता हीं कांहीं नवीन तत्वें आहेत असा पुष्कळांचा गैरसमज आहे, पण वस्तुस्थिती तशी मुळींच नाहीं. लोकमान्यांनीं पुकारलेली स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण आणि स्वराज्य हीच असहकारिता ह्या एका सूत्रांत महात्मा गांधींनीं गोवलेली आहे व ह्याला साधन म्हणून जो निशःस्त्र प्रतिकार लोकमान्यांनीं जाहीर केलेला होता त्यालाच गांधींनीं सत्याग्रह हा दुसरा शब्द दिलेला आहे.

× × × ×

गांधी आणि टिळक यांचें कार्य ह्याप्रमाणें अगदीं एक आहे. गांधी हे टिळककार्याच्या रेषेचें दीर्घीकरण आहे. टिळकांच्याच कार्यपेटिकेवर गांधींनीं असहकारितेचें एक नवीन लेबल चिकटविलें आहे. गांधींना हें मान्य आहे, गांधींना हें माहीत आहे ! ही एक साधी गोष्ट जर सर्वांनीं लक्षांत घेतली असती तर नागपूर येथें ज्या संग्रामाची तयारी यंदा झाली तशी तयारी करण्याची दुर्बुद्धि दुसऱ्या कोणासही झाली नसती. परंतु तसें व्हायचें नव्हतें. लोकमान्यांच्या कार्याचा अभिमान धरणाऱ्यांपैकींच अनेकांना गांधींचा कार्यक्रम विषमय वाटायचा होता. नागपुरला भयंकर रणसंग्रामाचें जें रणशिंग फुंकलें गेलें तें ह्याच गैरसमजामुळें होय ! सुदैवाची गोष्ट ही कीं ह्या सर्व गैरसमजाचीं पाळेंमुळें ह्या सर्व रणसंग्रामांतच खणलीं गेलीं आणि यंदाची कॉंग्रेस संपण्याचे वेळेस असहकारितेचा सर्वत्र जयजयकार, जयजयकार गरजण्यांत आला.

# आज पानिपतच्या लढाईचा स्मृतिदिन !*

इतिहासांतील पान ! बरोबर ह्या दिवशीं पानिपतची लढाई १७६१ सालीं झाली !

दुड्डम् दुड्डम् नौबती झडूं लागल्या, शहाजणें वाजूं लागलीं, आणि खुद्द खास तंबूजवळील चौघडाही आपले मंजूळ निनाद काढूं लागला, तोंच सर्व जण जागे झाले. आज पहांटे अशा रीतीनें वाजतगाजत जो प्रत्येकजण उठला, त्या प्रत्येक तरुणानें आधीं आपली तलवार सरसावली. त्यांना स्नान अगर जेवणखाण कसचें सुचणार ? सकाळीं उठल्याबरोबर गरमागरम पेय त्यांना कुठलें दिसायला ?

× × × ×

देशासाठीं, केवळ स्वदेशाला गुलामगिरींतून मुक्त करण्यासाठीं, आणि परकीय संस्कृतीपासून आपल्या हिंदुधर्माचें संरक्षण करण्यासाठीं आज प्रत्येक तरुण आपलें स्नान व जेवणखाण अशा तऱ्हेनें भागवून घेणार होता. आजचाच तो दिवस, आजचाच तो प्रभातकाल, याच हिंदुस्थान देशांत गुलामगिरीचा अंत आज व्हावयाचा होता. आणि आजच्या दिवशीं राष्ट्रप्रेमानें सर्व हिंदुस्थान उचंबळून गेलें होतें. आज रानोरानच्या वृक्षांना हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या हर्षनिर्भरतेनें वारंवार हंसायला येत होतें. वनोवनींचीं हरणें उत्साहानें उड्या मारूं लागलीं होतीं. जंगलाजंगलांतले सिंह हिंदुस्थानांतून परकीय सत्तेचा अंत होणार हाच संदेश अखिल दिग्गजांना कळविण्यासाठीं किंकाळी फोडीत होते. सर्व ग्रहताऱ्यांचा आनन्द गगनांत मावेनासा झाला, देवांच्या विमानांची आकाशांत गर्दी लोटली इतकेंच नव्हे, तर कधींही न दिसणारें असें एक शेण्डेनक्षत्रही पानिपतावरची ही गर्दी पाहण्यासाठीं डोकावूं लागलें.

× × × ×

झालें, दुधांत मिठाचा खडा टाकावा, तशी अवस्था झाली, आणि शेण्डेनक्षत्राचा तो अपशकून सर्वांस बाधला. पण आज प्रभातकाळीं हिंदुस्थानांतून परकीय सत्ता

* संदेश ता. १८ जानेवारी १९२९.

नष्ट करण्याच्या ईर्षेनें जे तरुण स्फुरण पावून आपल्या तलवारींची पातीं चमकावूं लागले, त्यांनीं माघार घेतली नाहीं. तरुणांना या अपशकुनांचा विचार करायला सवडच नव्हती. डोळ्यांपुढें एकच ध्येय, मनांत एकच विचार, अन्तःकरणांत एकच उमेद, कीं हिंदुस्थान देश गुलामगिरीपासून आजच्या आज मुक्त झालाच पाहिजे.

× × × ×

आणखी कांहीं काळानें नाहीं, आजच्या आज हिंदुस्थान परकी सत्तेपासून मुक्त झाला पाहिजे, ही भावना प्रत्येकाच्या हृदयांत उचम्बळूं लागली आणि याच प्रेरणेनें सर्व तरुणांनीं युद्धाच्या तयारीची नौबत झडकतांच एका आरोळीनें हरहर महादेव असा गजर केला. सर्व युवतींनीं आपापल्या पतींना आनन्दानें निरोप दिले. वृद्ध माणसांनीं परमेश्वराचा धांवा करायला प्रारंभ केला. आणि तो केवळ एकाच ध्येया-साठीं, कीं आपल्या देशाला परकीय सत्तेचा लागलेला कलंक धुवून काढण्याला परमेश्वरानें सामर्थ्य द्यावें. आजच्या आजच तें कर्तव्य तरुणांच्या हातून व्हावें, त्याला एकाद्या वर्षाचाच नव्हे तर एका क्षणाचाही विलम्ब लागतां कामा नये!

× × × ×

आज पानिपतावरील भाऊसाहेबांच्या सैन्यांतील प्रत्येक तरुणाच्या मुखावर वीरश्री खुलून दिसत होती. गजराजावर भगवा झेण्डा फडफडूं लागला. श्यामसुंदर गजावर खुद्द भाऊसाहेब आपल्या अंबारींत विराजमान झाले. गजावरच त्यावेळच्या तरुणांचा राजा विश्वासराव अतुल विरश्रीनें स्फुरण पावत विराजमान झाला. रणभेरी, रणतुरें, शहाजणें, यांच्या आवजांनीं सारें नभोमंडळ दुमदुमून गेलें. त्या आवाजानें परस्परांचें द्वेषभाव भिऊन पळाले. भ्याडपणाला अवकाश राहिला नाहीं. एवढा मल्हारराव होळकर, शिंद्याशीं त्याचें वैर पडलें होतें, पण तो यावेळीं शिंद्यांच्याच शेजारीं मोठ्या ऐटीनें उभा राहिला. एका टोंकाला इब्राहीमखान गारदी आणि दुसऱ्या टोंकाला जनकोजी आणि महादजी यांसारखे खन्दे वीर उभे राहिले. दमाजी गाय-कवाड, विंचूरकर, अन्ताजी माणकेश्वर, समशेर बहाद्दर, यशवन्तराव पवार आणि या सर्वांच्या मध्यभागीं खुद्द पेशवे वीरश्रीनें गर्जत होते.

× × × ×

तरुण आणि वृद्ध, यांच्या विरश्रींत बिलकूल फरक राहिला नाहीं. मातृभूमीचें प्रेम सर्वांना सारखेंच. कीडमुंगीपासून तों दिग्गजापर्यंत, आणि पशूपासून तो नरेंद्रापर्यंत

आपली मातृभूमी परकीय सत्तेखालीं खचून गेलेली कोणाला आवडेल ? पराजयाच्या भविष्यावर ज्यांचीं हृदयें खचून जातात, ते तरुण कसले ? दगड ते. त्यांना वास्तविक दगडाइतकीही किंमत नसावी ! ज्यांच्या हृदयाचें दगड स्वदेशस्वातंत्र्याचें भव्य मंदीर उभें करण्यासाठीं उपयोगी पडत नाहींत, ते दगड तरी कोणाला रुचणार ? दगडांहून हीन झालेल्या अन्तःकरणाच्या लोकांनीं पानिपतच्या तरुणांकडे प्रेमभावानें एकदां नजर फेंकावी, कीं स्वदेशभक्तीच्या पूरानें ते पानिपतावर उभे असलेले तरुण बेफाम झालेले दिसतील. हत्ती मदोन्मत्त झाले. अश्वांनीं वीरश्रीनें आपलें खिंकाळणें सुरू केलें. तरवारी, भाले, बंदुका, यांची खणाखणी सुरू होण्यापूर्वी इब्राहिम-खानाच्या तोफखान्याचे गोळे धडधड सुटूं लागले.

× × × ×

आजचाच तो प्रभातकाळ ! सूर्योदय होतो न होतो, तोंच जगाला स्वदेशभक्तीचे धडे शिकविणारे ते हिंदुस्थानचे तरुण एकच रणधुमाळी माजविण्यासाठीं वेगानें शत्रुसैन्यांत घुसूं लागले. बरखुरदाराची घाबरगुण्डी उडाली, अमीरबेगखानाची छाती फाटून गेली, दुहीखानाचें दोंद त्याला सांभाळतां येईनासें झालें. महंमदखान बंगषाला पेशव्यांचा तडाखा पूर्वीं माहीत होता, तो तर क्षणभर मूर्च्छित होऊन पडला. त्यानें आपला हात जो आश्चर्यानें तोंडावर ठेवला, तो तलवारीला भिडेच ना ! त्यावेळचा जनरल म्हणजे नजीबखान, त्याचें धाबें दणाणलें. शाहाणसन्तखान तर या महाराष्ट्रीय तरुणांवर कोणतें शस्त्र धरावें या मसलतींतच गुंग झाला. युद्धाचें स्मरणच त्याला राहिलें नाहीं. इतक्यांत 'या अल्ला, या खुदा' असा आवाज ऐकूं आला. अहमदशा अबदल्लीची पांचावर धारण बसल्यामुळें निघालेला त्याचा आवाज होता. सर्व लोकांना एकदम आश्चर्य वाटलें. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याभिमानी तरुणांचा तो अगम्य उत्साह पाहून शत्रूंची गाळण उडाली. ते सकाळचे थण्डीचे दिवस होते. हुक्का ओढून जरा थण्डी कमी करण्याइतकीही फुरसत अफगाण सैन्याला मिळाली नाहीं.

× × × ×

उभय सैन्याची अशी अवस्था झाली, हें जेव्हां अरुणानें रथांत बसलेल्या सूर्याला सांगितलें, तेव्हां जलद रथ हांकण्याविषयीं सूर्यानें सूचना केली. राष्ट्रीय भावनेनें बहरलेल्या तरुणांतून एकही तरुण युद्धामुळें भूमिगत झाला नाहीं, तोंच सर्वांची मुखकमलें पहावीं, अशी उत्कण्ठा सूर्याला लागली. तो उदयदिशेकडून हळूच वर आला. आणि पाहतो, तोंच युद्धासही प्रारंभ झाला.

× × × ×

पानिपतनें उत्साहाचा संदेश जगाला दाखवून दिला. झालें, आजचें युद्ध झालें, आणि मुसलमान व हिन्दु परस्परांत भांडल्याचें प्रायश्चित उभयतांना मिळालें. आपण हिंदुस्थानाबाहेरील सत्तांचा आश्रय घेऊन अधिकारारूढ होऊं ही हिंदुस्थानांतील मुसलमानांची पोंकळ हाव फुकट जाणार हाच सन्देश पानिपतनें मुसलमानांना दिला. पानिपतनें हिन्दूंना हिन्दुस्थानाविषयींचें कर्तव्य सोडल्याचें प्रायश्चित दिलें. पण हिन्दु तरुणांना स्वतःचें कर्तव्य बजाविल्याचा स्वर्गीय आनंद झाला !

---

# शेम शेम पुराण. *

एके काळीं नैमिषारण्यामध्यें सर्व मुनि जे आहेत्ते एकत्र जमून अध्यात्म विषयाच्या चर्चेमध्यें जे आहेत्ते निमग्न झाले असतां कलियुगामध्यें किस्तायनांत कोणकोणते चमत्कार घडणार ह्यासंबंधानें त्यांच्यांत चर्चा सुरू झाली. बराच काळपर्यंत जे आहेत्ते चर्चा सुरू असतांनाही ज्यावेळीं कोणत्याही प्रकारें त्यांच्या चित्ताचा निश्चय होईना त्यावेळीं जे आहेत्ते त्यांनीं सर्व ऋषिमंडळींत प्राज्ञ गणला गेलेला जो सुत त्याला शरण जाण्याचा विचार केला. परंतु सूतापर्यंत जाऊन त्याला पृच्छा करावी इतकेंही धैर्य कुणाचें होईना. प्रत्येक ऋषीचे मनांत असा विचार येई कीं आपण कोणीकडे आणि सूत कोणीकडे ! सूतांच्या तपश्चर्येचा लवलेश सुद्धां आपले ठायीं नाहीं ! असा विचार मनांत येऊन त्यांचें मन माघार घेऊं लागलें. इतक्यांत गरुडाच्या विज्ञप्तिवरून विष्णुलोकांप्रत गमन केलेले परम तेजःपुंज असे शौनक ऋषि त्या तपोवनांत प्राप्त झाले. तें पाहून सर्व ऋषिमुनींना जे आहेत्ते परम सन्तोष झाला. तदनन्तर सर्व मुनि जे आहेत्ते शौनकाप्रत जाऊन त्याला प्रार्थना करते झाले ( येथें सर्व वाचकांनीं नमस्कार करावा. ) कीं हे भगवन्, सर्व तपस्वी जनांचा अग्रणी जो सूत त्याचे जवळ आमचें जे आहेत्ते किंचित् कार्य आहे, तर तें त्या महाभागवत सुताकडून करवून घेण्याची जे आहेत्ते आपण कृपा करावी. शौनक म्हणतात, ऋषिसत्तमहो, आपलें जें कार्य असेल तें मजजवळ कथन करण्याबद्दल मनांत किमपि शंका धारण करूं नका; कारण ऋषिमण्डळीचें जे आहेत्ते प्रिय करण्यासाठींच सूतांचा अवतार

---

* संदेश २६ सप्टेंबर १९२०

आहे. ते सूत आपले मनोरथ पूर्ण करतीलच करतील. शौनकांचें आश्वासनपर भाषण श्रवण केल्यानन्तर सर्व ऋषिगण जे आहेत्ते सूताप्रत जाण्यास निघाले. सूत जे आहेत्ते नुकतीच आपली समाधि उतरून विश्रान्ति पावण्याच्या बेतांत होते, इतक्यांत जे आहेत्ते सर्व ऋषिमंडळी येऊन त्यांच्या आश्रमांत प्राप्त झाली. त्यांना अवलोकन करून प्रमुदित होत्साते सूत त्यांना कुशल प्रश्न विचारणार इतक्यांत शौनक पुढें येऊन सूतांस प्रार्थना करते झाले कीं हे मुनिपुंगव, हे सर्व ऋषि आपले जवळ कांहींएक पृच्छा करण्याकरतां आलेले आहेत तर त्यांची मनीषा आपण जे आहेत्ते तृप्त करावी.

सूत शौनकाप्रत कथन करतात कीं बा शौनका, आतांच आपली समाधि उतरली त्यावेळींच मला जे आहेत्ते कळून चुकलें होतें कीं, हे सर्व ऋषि आतां येथें प्राप्त होणार! हे शौनका, अरे मी एक्सपेक्टच केलें होतें—

( शेम शेम ! शेम शेम ! असा सर्व ऋषींमधून एकच आवाज उत्पन्न होतो. )

शौनकाला तो प्रकार कांहींच कळेना. त्यानें सूताला अशा रीतीची ट्रीटमेंट दिलेली कधींही पाहिली नव्हती.

सूत शौनकाप्रत पुन्हां म्हणतात, बा शौनका, ऋषिमंडळीच्या मुखांतून आतां जे शब्द आले ते ऐकून तुला आश्चर्य वाटल्यासारखें दिसतें. पण यांत आश्चर्य वाटण्याजोगें कांहीं नाहीं. अरे सध्यांचा स्पिरिट् ऑफ दी एज च—

( सर्व ऋषींतून पुन्हां शेम शेम ! शेम शेम ! अशी आरोळी उत्पन्न होते. )

शेमशेमची ही पुनरावृत्ति झाल्याबरोवर शौनक त्या ऋषिवर एकदम उखडला. तो म्हणाला, ऋषिहो, तुम्ही काय समजलां ? अहो, हा सूत म्हणजे तुमच्या आमच्यासारखा साधारण मनुष्य आहे असें तुम्हांला वाटतें कीं काय ? अहो, हा सूत म्हणजे सर्व ऋषींचा लीडर आहे—

( पुन्हां शेम शेम ! शेमशेमची गर्दी उसळते. )

एक्सक्यूज मी ! शौनक म्हणाला ! पण आजची तुमची कॉण्डक्ट—

( एकदम हंशा उत्पन्न होतो. कांहीं ऋषि थट्टेला प्रवृत्त होतात. बहुतेक ऋषि पायांतील खडावांचा खडखडाट करूं लागतात. शौनकाचा सन्ताप चढूं लागतो. )

आय से, शौनक लाल होऊन म्हणतो, मला तर वाटतें कीं आतां अगदीं मॅटर्स कायसेसला जायला—

( शेम शेम ! शेम शेम ! )

शौनक जों जों संतापायला लागला तों तों ऋषींत ज्यास्तच हंशा पिकला ! शौनकाची रागानें बोबडी वळायला लागली. इतक्यांत एक काळें कुत्रें तिथें येऊन

ऋषिंच्या मधून जायला निघालें व ऋषिंत एकच गोंधळ उडवायला लागलें. कुत्र्याचा स्पर्श झाला तर स्नान करायला लागेल ह्या भीतिनें एक एक ऋषि तेथून उठणार इतक्यांत सूत उभे राहून बोलूं लागले कीं आजच्या ह्या प्रसंगाची आपणां सर्वांना खात्रीनें आठवण राहील. आपल्याला माहीतच असेल कीं इथें आपण जें सर्व जमलां ते मला आपल्या मनांतील शंका विचारण्यांसाठीं जमलां. पण ही आपली शंका एकीकडेच राहून इथें शेम शेमचा मात्र हलकल्लोळ उडाला, हें सर्व डिस्ग्रेसफुल्—

( शेम शेम ! शेम शेम ! )

**सूत**:—समजलों, समजलों. आपण शेम शेम कां ओरडतां हें सर्व समजलों. पण मी तुम्हांला खात्रीनें सांगतों कीं, माझ्या बोलण्यांत जे थोडेबहूत इंग्रजी शब्द येतील ते विसरभोळेपणानेंच येत असून त्याला आतां माझा नाइलाज आहे. अहो, हॅबिट् इज् सेकण्ड् नेचर अशी इंग्रजींत म्हण आहे—

( संस्कृतांत बोला ! संस्कृतांत बोला ! )

अहो, पण माझें ऐकाल तर खरें !

( नो, नो, यस्, यस्, गो-ऑन् ! )

अहो गो ऑन् काय ? आपल्याला इतकें टॉलरन्स् जर नसेल तर कोणत्याही प्रसंगीं एकमेकांशीं पुल-ऑन् करणें—

( शेम शेम ! शेम शेम ! )

( वरील प्रकार चालू असतांनाच तेथें नारद अवतीर्ण होतात. )

**नारद**:—ऋषिजनहो, आजचा प्रसंग वाईट झाला. पण त्यांत आनंद मानण्या-जोगी गोष्ट एवढीच कीं, चमत्कार विचारण्याकरितां आपण सर्व नैमिषारण्यस्थ ऋषि इथें प्राप्त झालां हाच चमत्कार होय. हा चमत्कार कलियुगांत उत्पन्न होणार आहे व ह्याच्या पायीं पुढारी व अनुयायी, मित्र आणि मित्र, स्नेही आणि स्नेही, देश-बान्धव आणि देशबान्धव यांच्यांत तण्टे उपस्थित होणार आहेत. ऋषिजनहो, कलियुगांतील जें सर्वांत मोठें आश्चर्य तें हें होय. ह्या आश्चर्यापुढें कलियुगांतील इतर सर्व आश्चर्यें लुप्त होतील. इथेंच पहा ना ! आज युगानुयुगें निरनिराळीं पुराणें सूत शौनकांप्रत कथन करीत आहेत. असें एकही पुराण नाहीं कीं, जें सूतांनीं शौनकांप्रत कथन केलेलें नाहीं. पण हें पुराण सुरू झाल्याबरोबर सूतांचा आणि तुमचा बेबनाव झाला आणि शौनकावर तुम्ही आणि तुम्हांवर शौनक तुटून पडला. ऋषिमण्डळीहो, कलियुगांत अत्यन्त मोठें आश्चर्य तें हेंच होय !

नारदाची वाणी श्रवण करतांच सर्व ऋषींना जे आहेत्ते लज्जा उत्पन्न झाली. सूतांना " इन्सल्ट " दिल्याबद्दल त्यांचें मन त्यांना खावूं लागलें. इतक्यांत शौनकांनीं धैर्य धरून नारदांना प्रश्न केला कीं हे देवर्षे, ह्या पुराणाचें नांव तरी काय ?

**नारदः**—हे शौनका, ह्या पुराणास शेम शेम पुराण असें नांव आहे. ह्या पुराणाची मुख्य देवता तुम्हांस माहीत आहे?

( ऋषींनीं नाहीं म्हणून मान डोलावली. )

**नारदः**—अहो, या पुराणाची देवता मिसेस बेझण्ट! ह्या देवतेमुळेंच कलियुगांत शेमशेमचा प्रसार होणार आहे.

तो कसा? शौनकांनीं पुन्हां प्रश्न विचारला.

**नारदः**—शौनका, फार योग्य प्रश्न विचारलास. अरे कलकत्ता कॉंग्रेसपर्यंत देवी, माताजी, इत्यादि वंद्य नांवांनीं संबोधिलेली ही विदुषी जेव्हां अमृतसर कॉंग्रेसहून परत येईल त्यावेळीं तिला शेमचा प्रसाद मिळेल. मग ह्या देवतेला शेमशिवाय दुसरा कोणताही प्रसाद चालणार नाहीं. ह्यानंतर भारतवर्षांत शेमचा विस्तार व्हायला लागेल. आणि कांहीं केलें तरी त्या शेमला उतार पडणार नाहीं. मिसेस बेझण्टनंतर त्या शेममध्यें कोण सांपडेल आणि कोण सांपडणार नाहीं त्याचा नेम, मी इतका त्रिकालज्ञ आहें तरी, मला लागत नाहीं.

( एक तरुण ऋषि उभा रहातो. )

**तरुण ऋषिः**—नारदमुनि, काय हें? आपण त्रिकालज्ञ असून आपणांला ह्याचा नेम लागत नाहीं म्हणतां? शेम शेम शेम.

( सर्व ऋषि शेम शेम शेम ओरडायला लागतात. )

**नारदः**—गोविन्द! गोविन्द! गोविन्द!

**शौनकः**—ब्रह्मर्षे, मिसेस बेझंटनंतर शेमशेमला पात्र होणारे कोणी महाभाग आपणांस आज दिसतात काय?

**नारदः**—पुष्कळच. मला ते मोजतांसुद्धां यायचे नाहींत.

**शौनकः**—तथापि थोडीं ठळक ठळक नांवें आपण सांगाल काय?

**नारदः**—ठीक तर. श्रवण करा! पण ऋषिहो, लक्षांत ठेवा कीं ही शेम मिळण्याचें मुख्य कारण त्या पुरुषांतील दोष नसून हें त्या कालाचेंच लक्षण आहे.

**शौनकः**—मिसेस बेझंटवर शेम झाल्यानन्तर पुढें कोणास शेम होईल?

**नारदः**—जम्नादासांना! त्यांचेनंतर कोठाऱ्यांची पाळी येईल आणि श्रीनिवासशास्त्र्यांचें लेक्चर चालू असतां व रँगलर परांजपे ह्यांना शेमशेमचा मारा बसेल.

**शौनकः**—देवमुने, हा शेम शेमचा प्रसाद मवाळांनाच मिळेल असें आपल्या उदाहरणांवरून वाटतें. ह्यासंबंधानें माझी शंका निवृत्त करावी.

**नारदः**—अगा शौनका, अरे मी तुला प्रथमच सांगितलें कीं, ह्या शेमपुढें जहाल आणि मवाळ तर सगळे सारखेच आहेत. अरे हा, हा काळाचा स्पिरीट आहे.

**शौनकः**—अशीं नांवें आपण कथन कराल काय ?

**नारदः**—अरे, वाटेल तितकीं ! स्पेशल कांग्रेसमध्यें बाबू बिपिनचंद्र पाल यांना शेम मिळेल. धारवाडास गंगाधरराव देशपांडे यांना शेम मिळेल. कौन्सिल निवडणुकींत नरसोपन्त केळकरांना शेम मिळेल. बारामतीस कृष्णाजीपंत खाडीलकरांना शेम मिळेल. ऋषिवर्यहो, ह्या शेमच्या भयानें शिवरामपन्त परांजपे पंढरपुरास जाण्याचें टाळतील. ऋषिवर्यहो, रँगलर परांजप्यांची शेम पाहून श्रीनिवास शास्त्री पुणें येथें फार सांभाळून बोलतील.

**शौनकः**—देवमुने, ह्यानंतर कोणाकोणास शेम मिळेल ?

**नारदः**—शौनका, ह्या काळांत कोणास शेम मिळेल आणि कोणास मिळणार नाहीं, ह्याचा कांहीं नेम नाहीं. पंढरपुरांत गुण्डोपंतांना शेम मिळेल. कोल्हापुरांत कुर्तकोटींना शेम मिळेल. ऋषिजनहो, असहकारितेच्या विरुद्ध बोलणारे शेममधून सुटतील असें मला नाहीं वाटत; त्याचप्रमाणें खिलाफतीच्या विरुद्ध बोलणारांना शेमचा प्रसाद मिळेलच मिळेल ! मुनिवर्यहो, नागपुर हें शेम शेमचें मोठें आगर होणार व कॉंग्रेसचे तीन दिवस मोठमोठे लोक तिथें शेम खाणार हें मला स्पष्ट दिसत आहे.

**शौनकः**—देवमुने, ह्या शेमला उत्तर कांहींच नाहीं काय ?

**नारदः**—ह्याला उत्तर एकच ! मातृभूमीवर प्रेम करीत रहाणें ! ह्या शेमवरून मनुष्याला कांहींएक कमीपणा येत नाहीं. ही शेम एवढेंच दाखविते कीं देशांत विचारांची क्रांति चाललेली आहे. देशांत विचारांची खळबळ सुरू झाली कीं तिथें शेमचेंही पण महात्म्य वाढेलच ! ह्या शेमची जो भीति बाळगील त्याला शेम असो ! ह्या शेममधूनच राष्ट्राला यशाकडे जायचें आहे. यशाच्या प्रवासाला देश निघाला कीं तिथें शेमच्या कमानी उभारलेल्याच असतात. ह्या कमानीमधूनच यशाकडे जायचें असतें. त्याला शेम असो कीं जो शेमला भिईल ! त्याला शेम असो कीं जो शेममुळें कचरेल. त्याला शेम शेम असो कीं जो शेममुळें सार्वजनिक विषयांवर मत देणार नाहीं. ऋषिजनहो, या शेममुळें प्रेमाचा बिघाड होऊं देऊं नका. शेम घेणाऱ्यांनीं, शेम ओरडणाऱ्यांवर प्रेम करा. शेम ओरडणाऱ्यांनीं, शेम घेणाऱ्यांवर प्रेम ठेवा. सूता, ह्या ऋषींनीं तुला शेम शेम केलें म्हणून तूं ह्यांचेवर रागावलास कां ?

**सूतः**—नाहीं, नाहीं, मुळींच नाहीं. मी तें अंतर्ज्ञानानें जाणलेंच होतें.

**नारदः**—ऋषिमंडळीनों, सूतांना शेम करून तुम्ही त्यांचेवरील प्रेम कमी केलें आहे काय ?

**ऋषि:—**नाहीं, नाहीं, मुळींच नाहीं. सूत आम्हांस सर्वथैव वंद्य आहेत.

**नारद:**—ऋषिहो, शेम शेमनन्तर तुमचें हें ऐक्य पाहून मला फार संतोष वाटला. मला तर वाटतें कीं, अष्टादश पुराणांहूनही हें शेमशेम पुराण श्रेष्ठ आहे. कारण ही विचारवृद्धीची पताका आहे. देशाच्या उत्कर्षाची ही ध्वजा आहे. सूता, हें पुराण तूं पुन्हां माझे देखत सांग व त्यावेळीं सर्व हिंदुस्थान शौनक बनूं दे !

---

# सोमा परटीण*

## —सोमवारची कहाणी—

आटपाट नगर होतें, तिथें एक गरीब ब्राह्मण रहात होता. त्याला सात मुलगे होते आणि एक मुलगी होती. त्या ब्राम्हणाच्या बायकोचें नांव धनवंती व मुलीचं नांव गुणवंती. एकदां दोनप्रहरच्या सुमारास त्यांचे घरीं एक मोठा सूर्यासारखा तेजस्वी ब्राम्हण अतिथी आला. धनवंतीचा नवरा विचारा गरीब जुन्या चालीचा ब्राम्हण; आलेल्या अतिथीचा आदरसत्कार करून त्याची पूजा करावी, त्याला भिक्षा घालावी आणि सर्वांनीं त्याला नमस्कार करावा. अशा प्रकारचीं वेडगळ मतें त्यांचीं होतीं. त्याला पाश्चात्य शिक्षणाचा गंधहि नव्हता. त्यामुळें अतिथि-अभ्यागताचा परामर्ष घेणें हें अर्थशास्त्राच्या सर्वमान्य सिद्धांताच्या विरुद्ध आहे व आपल्या देशाचें त्यामुळें फार मोठें नुकसान होत आहे ही साधी व सोपी गोष्ट धनवंतीच्या नवऱ्याला माहीत नव्हती. तेव्हां आलेल्या ब्राम्हणाची सर्वांनीच पूजा केली. साती सुनांनीं त्याला भिक्षा घातली, नमस्कार केले. ब्राम्हणानें त्यांना आशिर्वाद दिला, ' संतत वाढो, संपद वाढो, तुमचें सौभाग्य अक्षयी असो ! ' पण धनवंतीच्या मुलीनं जेव्हां नमस्कार केला तेव्हां ब्राम्हणानें तिला संततिसंपत्तीचा आशीर्वाद न देतां ' धर्मिणी ' हो असा आशिर्वाद दिला. म्हणजे काय? तर तुला वैधव्य प्राप्त होणार आहे, तेव्हां वैधव्याची दीक्षा घेतल्यानंतर धर्माप्रमाणें उत्तम आचरण करण्याची तुझी सुबुद्धि नेहमीं जागृत राहो, असेंच त्या ब्राम्हणानें सुचविलें. तो ब्राह्मणहि तसलाच अश्रुढाळ ! त्याला तरी पुनर्विवाहाची गोडी काय ठाऊक? विधवा झाल्यावर तशा स्थितींत राहूनच तूं धर्माचरण कर, असं सांगण्याचा त्याला काय अधिकार? तिनेंच काय म्हणून धर्माचरण करायचं? " तूं विधवा होणार आहेस पण घाबरूं नकोस, पुन्हां दुसरा नवरा तुला चांगला मिळेल; दुसरा गेला तरी तिसरा मिळेल. माणसानं नेहमीं यत्न केला पाहिजे. सात सात वेळां जरी धागा तुटला तरी कोळी आपलें

* संदेश ता. २३ ऑगस्ट १९१५.

जाळें विणण्याचा पुनः पुनः प्रयत्न करतोच कीं नाहीं? प्रयत्नांतीं एखादा तरी तुझा नवरा टिकेलच टिकेल." पण अन्यायाचा व जुलमाचाच आशीर्वाद त्या ब्राह्मणानं गुणवंतीला दिला. त्या ठिकाणीं जर आमच्या विदुषी कृष्णाताई असत्या, तर त्यांनीं संतापून 'मिल्ल'चींच पुस्तकें त्या ब्राह्मणाच्या बोडक्यांत घातलीं असतीं. पण गुणवंतीची आईहि अगदींच वेडगळ होती. तिला स्वातंत्र्याचें शिक्षण मिळालें नव्हतें. मुलीला वैधव्य येणार म्हणून ती फार घाबरून गेली. धनवंतीनें ब्राह्मणाचे पाय धरले व ती म्हणाली, "जो अपाय सांगेल तोच उपाय सांगेल. माझी एकुलती एक मुलगी विधवा झाली तर मी काय करूं? याचा मला कांहीं उपाय सांगा." असं म्हणून ती रडूं लागली. ब्राह्मणाला तिची दया आली. "बाई, बाई, रडूं नका. मी तुम्हांला एक उपाय सांगतों. सातासमुद्रापलीकडे एक बेट आहे. तिथें एक सोमा नांवाची परटीण आहे, तिला मुलीच्या लग्नाला आणा म्हणजे संकट दूर होईल. लगीन झाल्यावर तिला वाटेस लाव." असें म्हणून ब्राम्हण आपला दुसऱ्या घरीं भिक्षेस गेला. इकडे काय झालं? धनवंतीनें आपल्या नवऱ्याला सांगितलें, अशी गोष्ट आहे. कुणीतरी जाऊन सोमेला आपल्या घरीं आणले पाहिजे. तेव्हां त्यानें आपल्या मुलांना जवळ बोलाविलें. त्यांना सांगूं लागला, ज्याची आमच्यावर भक्ति असेल त्यानं आपल्या बहिणीला बरोबर घ्यावं आणि सोमेला घेऊन यावं. तेव्हां सगळे मुलगे आईला म्हणूं लागले तुझी सर्व माया मुलीवरतीं; आमच्यावर कांहीं माया नाहीं. सातासमुद्रापलिकडे आम्हीं कांहीं जात नाहीं. हें ऐकून आईला रडूं आलं, बापाला वाईट वाटलं. तो आपल्या बायकोला म्हणाला, तूं कांहीं भिऊं नकोस, आपल्याला सात मुलगे असून नसून सारखेच. तूं निपुत्रीकच आहेस असं समज. तूं कांहीं काळजी करूं नकोस. मीच जातों नी सोमेला घेऊन येतों. तेव्हां त्यांतला धाकटा मुलगा होता, तो बापाला म्हणाला, "बाबा, बाबा, आम्हीं सात जण असून तुम्हीं आपल्याला निपुत्रीक कां म्हणवून घेतां? मी ताईला बरोबर घेऊन जातों नि सोमेला घेऊन येतों." पुढें आईबापांना नमस्कार केला, आणि तीं आपलीं बहिणभावंडं निघालीं. जातां जातां समुद्र आला. वाऱ्याचा सोसाटा सुरू झाला, समुद्राच्या लाटा येऊं लागल्या. पलीकडे कसं जावं हें सुचेना. जवळ कांहीं खायला, प्यायला नाहीं. सारं त्रिभुवन आठवलं. परमेश्वराचं स्मरण केलं. देवा, देवा, आतां तूंच ह्या संकटांतून पार पाड. असा देवाचा धांवा केला. तिथं एक वडाचं झाड होतं. त्याच्या खालीं दोघं बसलीं. सगळा दिवस उपास पडला. त्या झाडावर गृध्र-पक्षाचं घरटं होतं. त्यांत त्या पक्षाची पिलं होतीं. संध्याकाळ झाली, पक्षी घरीं आले. पिलांना चारा देऊं लागले. पिलं कांहीं चारा घेईनात. त्यांनीं आपल्या आई-

बापांना सांगितलं, आपल्या घरीं दोन पाहुणे आले आहेत. झाडाखालीं उपाशी आहेत. त्यांना टाकून आम्ही जेवणार नाहीं. गृध्रपक्षी खाली आले. ब्राह्मणाला पुसूं लागले, तूं असा चिंतेंत कां पडला आहेस ? तुझं काम असेल तें आम्हाला सांग. आम्हीं तें काम पार पाडूं. उपाशी कांहीं निजूं नकोस. आम्हीं तुला फळं देतों तीं थोडीशीं तूं खा, थोडीशीं ह्या मुलीला दे. ब्राह्मणाला आनंद झाला. देवाचे त्यानें आभार मानले. गृध्रपक्षाला त्यानें आपला हेतू सांगितला. पक्षी म्हणाला, उद्यां उजाडल्यावर तुम्हांला मी घेऊन जातों. सोमा परटीणीच्या दारीं नेऊन सोडतों. मग बहीणभावांनीं फळें खाल्लीं, रात्रीं आनंदानें झाडाखालीं निजलीं. उजाडल्याबरोबर पक्षी झाडाखालीं आले. आणि बहिणभावांना आपल्या पाठीवर बसवून सोमेच्या दाराशीं नेऊन सोडलें. पुढें बहीणभावांनीं काय केलें ? रोज पहांटेस उठावं, सारवून ठेवावं. एके दिवशीं सोमेनें आपल्या मुलींना–सुनांना विचारलं–‘ रोज सकाळीं कोण उठतं ? माझं अंगण कोण झाडतं ? त्याच्यावर सारवण कोण घालतं ? ’ ही म्हणे ‘ मी नाहीं, ’ ती म्हणे ‘ मी नाहीं ’ तेव्हां सोमेला आश्चर्य वाटलं. मग दुसरे दिवशीं सोमा जागत बसली. तीन प्रहर रात्र उलटून गेली. चौथ्या प्रहरीं काय झालं ? ब्राह्मणाची मुलगी अंगण झाडते आहे, तिचा भाऊ सारवतो आहे, असं पाहिलं. सोमा पुढें आली. विचारलं, मुलांनों, तुम्ही कोण आहांत ? ब्राह्मणाच्या मुलानं सोमेला सर्व हकीगत सांगितली. आणि तूं आमच्याबरोबर चल, न आलीस तर आमच्या बहिणीला लग्नांतच वैधव्य येईल, तूं प्रसन्न होऊन आमच्या बरोबर यावंस म्हणून आम्हीं तुझी सेवा करतों, असें म्हणाला—सोमा प्रसन्न झाली. आणि त्या मुलाबरोबर त्यांच्या घरीं जाण्यास निघाली. जातांना सोमेनं आपल्या घरांतील मंडळींना सांगितलं, मी त्या मुलीचं लग्न झालं म्हणजे परत येईन, तोंपर्यंत आपल्या घरांत किंवा सोयऱ्या धायऱ्यांत कोणी मेलंबिलं तर दहन करूं नका. असं सांगून ती निघाली. ब्राह्मणाच्या मुलाला व मुलीला घेऊन समुद्रापार झाली. धनवंतीच्या घरीं येऊन पोंचली. धनवंतीला फार आनंद झाला. तिनं तिची पूजा केली. मी ब्राह्मणाची असून परटिणीची पूजा कशी करूं ? असा जातिभेदाचा प्रश्न धनवंतीच्या मनांत आला नाहीं. पुण्यवान् माणसं कोणत्याहि जातीचीं असलीं तरी तीं वंद्य आहेत. त्यांत ब्राह्मण, शूद्र किंवा तेली तांबोळी, धोबी असा भेद नाहीं, त्याला जातीभेद आडवा येत नाहीं, हें तत्त्व धनवंतीच्या मनावर पूर्णपणें बिंबलेलें होतें. पुढें योग्य वराची निवड करून मुलीच्या लग्नाचा योग जुळवून आणला. सुमुहूर्तावर लग्न लावलं. वधुवरांवर अक्षता टाकल्या. तों एकाएकीं काय झालं ? नवऱ्या मुलाला मूर्च्छा आली. धाडकन् भुईवर पडला. हालेना, बोलेना,

दा. क्र.

सगळे लोक घाबरले. पण त्यांत कांहीं दूरदर्शी, दीर्घशहाणे लोक होतेच. ते म्हणाले, घाबरण्याचें कारण नाहीं. अजून लेज्जाहोम झालेला नाहीं. सप्तपदी झालेली नाहीं. इतक्यांत मुलीला वैधव्य कसें येणार? नवरा मुलगा मेला तरी हरकत नाहीं. मुलीला वैधव्य येत नाहीं. पण हा शास्त्रीय वाद नवऱ्या मुलीला व मुलाच्या आईला पसंत पडला नाहीं. त्या रडूं लागल्या. सोमा परटीण तिथें होतीच. तिला दया आली. ती म्हणाली, 'मुली, मुली, घाबरूं नको. मी तुला माझ्या श्रावणी सोमवाराचं पुण्य देतें. त्यानं तुझा पति जिवंत होईल.' मग सोमा उठली, हातीं उदक घेतलें, संकल्प केला आणि आपलं पुण्य गुणवंतीला दिलं. तसा तिचा नवरा जिवंत झाला. सगळ्यांना आनंदी आनंद झाला. पुढें लग्न झाल्यावर सोमा घरीं जायला निघाली. इकडे काय झालं? सोमेच्या घरीं एकदम तिचा मुलगाच मेला, मागून नवरा मेला, त्याच्या मागून जांवई मेला. इकडे सोमा आपली वाट चालतच आहे. वाटेंत तिला सोमवती अंवस पडली. मग ती एका नदीच्या काठीं आली. तिथें पिंपळाचे झाड दिसलें. नदीचं स्नान केलं, श्रीविष्णूची पूजा केली. तिच्याजवळ कांहीं नव्हतं म्हणून शंभर नी आठ वाळूचे खडे हातीं घेतलें नि पिंपळाला प्रदक्षिणा घातल्या. त्या पुण्यानं काय झालं? तिच्या घरीं, तिचा मुलगा, नवरा, जांवई सारे जिवंत झाले. सोमा आपल्या घरीं आली. सुनांनीं तिला विचारलें, सासूबाई, सासूबाई, तुम्ही गेल्यावर घरांतलीं माणसं मेलीं होतीं तीं आम्हीं तशींच ठेवलीं होतीं, आणि तुमची वाट बघत बसलों होतों. तुम्हीं यायच्या अगोदर जिवंत झालीं. असा चमत्कार कशानं झाला? सोमा म्हणाली, मी आपलं सोमवतीचं पुण्य ब्राह्मणाच्या मुलीला दिलं, तिचा नवरा जिवंत केला. माझ्या जवळचं पुण्य खपलं म्हणून इकडे असं अशुभ झालं. वाटेंत मला सोमवती अंवस पडली, पण माझं व्रत मी कांहीं सोडलं नाहीं. त्या पुण्यानं घरांतलीं माणसं जिवंत झालीं. तुम्हीं या व्रताचं आचरण करीत जा, म्हणजे तुम्हालाही संतत संपत अक्षयी राहील.

सोमे, तूं जातीची परिटीण, अशिक्षीत, अडाणी, पण केवढं उदार कृत्य केलंस? पूर्वीच्या काळीं जन्मास न येतां आज जर तूं जन्मास आली असतीस, तर दुसऱ्यासाठीं स्वतःचें पुण्य खर्ची घालण्याचें पाप तुझ्या हातून खात्रीनें घडलं नसतं! सोमे, तूं जातीची परटीण असल्यामुळेंच दुसऱ्याच्या पापाची घाण आपल्या पुण्यानं धुऊन टाकण्यांत तुला कांहींच वाटलं नाहीं. माझीहि शंकराजवळ अशी प्रार्थना आहे, कीं, हे सांभा, आमच्यापैकीं पुष्कळांना तूं वरिष्ठ बनव.—**वत्सलावहिनी.**

**— समाप्त —**

REFBK-0005432